इतिहासाचार्य

राजवाडे

भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास



भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास

विकार-विचारप्रदर्शनाच्या
साधनांची उत्क्रांती

प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
" शिव-पार्वती "
टिळक रोड
पुणे ४११०३०

प्रकाशक
श्रीमती शांता रानडे
प्रागतिक पुस्तक
प्रकाशन, पुणे
६/१ बुधवार पेठ,
लक्ष्मी रोड
पुणें ४११००२

प्रसिद्धी /
३१ डिसेंबर /
१९७६

पहिली आवृत्ती /
१९७६

किंमत /
आठ रुपये

या पुस्तकाचा
कागद
महाराष्ट्र राज्य
शिक्षणखात्याने
सवलतीच्या दरात
उपलब्ध करून
दिला आहे.

पान २९ वरील
टीप ' संशोधक '
मासिकातील आहे.
वस्तुतः हें पहिलें
प्रकरण
' चित्रमयजगत् 'च्या
मे १९२३ च्या अंकांत
प्रसिद्ध झालें आहे.

V. P. Bhopwal

अनुक्रमणिका

प्रकाशनापूर्वी

इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे यांच्या " भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास " हा ग्रंथ व " विकार-विचार-प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती " हा लेख कै. राजवाडे यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त प्रसिद्ध करून आम्ही महाराष्ट्राच्या या महान् विचारवंताचे पुण्यस्मरण करीत आहोत.

" भांडवल " या ग्रंथाचा अनुवाद पूर्ण झाल्यावर त्या ग्रंथाचे अनुवादक कॉ. वसंतराव तुळपुळे एकदा कॉ. डांगे यांच्याशी बोलत असताना त्यांना म्हणाले, " यानंतर आमच्या प्रकाशनातर्फे एंगल्स यांच्या " कुटुंबसंस्था खाजगी मालमत्ता व शासनसंस्था यांचा उगम " यांचे भाषांतर आम्ही प्रसिद्ध करणार आहोत. " त्यावर कॉ. डांगे म्हणाले, " यांच्याबरोबर तुम्ही राजवाड्यांचा ' भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास 'ही छापा. " एंगल्सच्या ' कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता आणि शासनसंस्था यांचा उगम ' या ग्रंथाची आणि राजवाडे यांच्या " भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास " यांची सांगड कॉ. डांगे यांच्या डोक्यात किती पूर्वीपासून आहे हे आपल्याला त्यांच्या या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत कळेलच.

आम्हालाही कॉ. डांगे यांचा हा विचार सयुक्तिक वाटल्यामुळे आम्ही ही दोन्ही पुस्तके बरोबरच छापून प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला.

परंतु यापूर्वीही आमचे एक स्नेही श्री. के. पी. भागवत यांनी त्यांच्या " वैवाहिक जीवन " या ग्रंथात विवाहसंस्थेच्या इतिहासाचे एक प्रकरण १९४६ साली लिहिले होते. ते लिहिताना त्यांना इतिहासाचार्य राजवाडे यांच्या या ग्रंथाच्या अस्तित्वाची जाणीव नव्हती. तो ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर आमचे दुसरे स्नेही, रत्नाकर मासिकाशी संबंध असलेले वयोवृद्ध सर्वश्री श्री. बाळासाहेब गोखले यांनी ते पुस्तक वाचून अशाच पद्धतीने श्री. राजवाडे यांनी ' भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास ' लिहिला असल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर पुढे श्री. बाळासाहेब यांनी तो ग्रंथ असलेले संशोधक मासिकाचे अंकही आम्हाला उपलब्ध करून दिले. तेव्हाच तो प्रसिद्ध करावा असे श्री. भागवतांना

वाटले होते; परंतु ते झाले नाही. 'वैवाहिक जीवन' या ग्रंथाच्या ६ व्या आवृत्तीत कै. राजवाडे यांच्या ग्रंथाचा उल्लेख श्री. के. पी. भागवत यांनी केला आहे.

कै. राजवाडे यांचा हा ग्रंथ पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेला नाही. एक एक प्रकरण निरनिराळ्या मासिकांतून वेगवेगळ्या कालखंडात प्रसिद्ध झालेले आहे. त्याचीही कथा वाचकांना कॉ. डांगे यांच्या प्रस्तावनेत वाचायला मिळेल. अशा या विखुरलेल्या प्रकरणांचा पुन्हा शोध घेणे, ४० वर्षांपूर्वीच्या त्या त्या मासिकांचे ते सर्व अंक मिळवणे या सर्व कठीण गोष्टी पुन्हा करणे भाग होते. ते सर्व काम पूर्ण होऊन या ग्रंथाची टंकलिखित प्रत छपाईसाठी आम्ही तयार केली. "संशोधक" मासिकाच्या ८ वर्षांपैकी तीन वर्षांतील सहा दुर्मिळ अंक आम्हाला प्रा. एस्. एस्. काळे यांच्यामुळेच मिळू शकले. अजूनही हा ग्रंथ अपुराच आहे. कै. राजवाडे यांची इच्छा असूनही ते तो पुरा करू शकले नाहीत.

एंगल्स यांचे 'कुटुंबसंस्था खाजगी मालमत्ता आणि शासनसंस्था यांचा उगम', व कै. राजवाडे यांचे 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' ह्या ग्रंथांचे प्रकाशन मात्र आम्ही आमच्या संकल्पाप्रमाणे एकाच वेळी करू शकलो नाही. दोन्ही ग्रंथांची छपाई पूर्ण झालेली होती; पण इतिहासाचार्य राजवाडे यांच्या पुस्तकाला इतिहासाचार्यांची योग्य किंमत जाणणाऱ्या व त्यांच्या बुद्धिवैभवाबद्दल नितांत आदर असणाऱ्या कॉ. डांगे यांचीच प्रस्तावना हवी हा आमचा पहिल्यापासून आग्रह होता. कॉ. डांगे यांचे आजारपण; नंतर त्यांच्या प्रिय पत्नी कॉ. उषाताई यांचा मृत्यू, त्यांची इतर विविध कामे, यांमुळे ती प्रस्तावना आम्हाला वेळेवर मिळू शकली नाही. म्हणून आम्ही एंगल्स यांच्या पुस्तकाचे प्रकाशन आधी केले.

एकप्रकारे झालेला हा उशीर योग्यच ठरला. त्यामुळेच इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे यांच्या ५० व्या स्मृतिदिनाच्या दिवशी हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा मुहूर्त आम्ही साधू शकलो.

कै. राजवाडे यांच्या "विकार-विचारप्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती" या लेखाचाही समावेश आम्ही या पुस्तकांत केला आहे. सकृद्दर्शनी या दोन्हींतील विषयांत साम्य दिसत नसले तरी या लेखात राजवाडे यांची विचार करण्याची मूलगामी पद्धत मांडलेल्या नव्या विचाराला पूरक असे उतारे देऊन तो सिद्ध करण्यांची शास्त्रीय पद्धती यांचे अतिशय स्पष्ट व उत्तम दर्शन घडते आणि तीच पद्धती त्यांनी आपला 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' हा ग्रंथ लिहिताना वापरली आहे. तिचा परिचय वाचकांना व्हावा म्हणून या लेखाचा अंतर्भाव आम्ही या पुस्तकात केला आहे. या लेखाचा समावेशही आम्ही कॉ. डांगे यांच्या सूचनेनुसारच या पुस्तकात केला आहे. आम्हाला आश्वासन दिल्याप्रमाणे कॉ. डांगे यांनी या ग्रंथाला विस्तृत आणि विवेचक प्रस्तावना लिहून दिली, तसेच वेळोवेळी मार्गदर्शन केले,

याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहो.

३१ डिसेंबर १९७६ रोजी पुस्तक-प्रकाशन-समारंभ करण्याचे ठरले तेव्हा छपाईचे उरलेले काम पूर्ण करण्यास फक्त १५ दिवसांचाच अवधी होता; पण एवढ्या अल्प मुदतीतही मुखपृष्ठ तयार करण्यापासून ते ग्रंथ बांधून पूर्ण स्वरूपात आमच्या हाती देण्याचे काम ' कल्पना ' मुद्रणालयाचे संचालक श्री. चिं. स. लाटकर आणि त्यांचे कामगारबंधू यांनी अतिशय तत्परतेने केले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

' संशोधक ' मासिकाचे दुर्मिळ अंक आम्हाला उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही प्रा. एस्. एस्.काळे यांचे सदैव ऋणी राहू.

या पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी आवश्यक असलेला कै. वि. का. राजवाडे यांचे दुर्मिळ छायाचित्र उपलब्ध करून दिल्याबद्दल भारत इतिहास संशोधन मंडळाच्या चालकांचे आम्ही शतशः ऋणी आहोत.

मुद्रण साहित्य भांडाराने स्वस्त किंमतीत कागद उपलब्ध करून दिल्यामुळेच पुस्तकाची किंमत आम्ही इतकी कमी ठेवू शकलो. त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे यांच्या विपुल ग्रंथसंपत्तीपैकी एक ग्रंथ प्रसिद्ध करून त्यांच्या शास्त्रीय बैठकीवर आधारलेल्या तेजस्वी विचारांचा व परखड मांडणीचा अल्पसा परिचय महाराष्ट्रातील नवीन पिढीला आम्ही करून देऊ शकलो त्याबद्दल आम्हाला धन्यता वाटते.

या ग्रंथाच्या वाचनाने मराठी वाचकांस कै. राजवाडे यांच्या विचारधनाचा परिचय व अभ्यास करण्याची स्फूर्ती मिळावी एवढीच इच्छा या ग्रंथप्रकाशनाच्या निमित्ताने आम्ही करतो. आमच्या याआधीच्या प्रकाशनांप्रमाणेच या प्रकाशनालाही मराठी वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळेल याची आम्हाला खात्रीच आहे.

शांता रानडे

संचालिका

प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे.

इतिहासाचार्य कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे
जन्म – २४ जून १८६३ – मृत्यू – १ डिसेंबर १९२६

जीवनपरिचय

---

१९ व्या शतकाचा उत्तरार्ध व २० व्या शतकाचा पूर्वार्ध या कालखंडात इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे हे एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व पारतंत्र्य व अंध इंग्रजीभक्तीच्या अंधाऱ्या पार्श्वभूमीवर विशेषच उठून दिसते. त्यांच्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेची, अचाट कर्तृत्व-शक्तीची, चिवट संशोधक वृत्तीची जाणीव असलेल्या ज्ञानकोशकार कै. डॉ. श्री. व्यं. केतकरांसारख्या समकालीन व्यक्तींना त्यांच्या कार्याची योग्य ती जाण होती व त्यांचा गौरव त्यांनी वेळोवेळी केलेला आहे. पण काहीशा अहंकारी व विक्षिप्त वाटणाऱ्या वागणुकीमुळे मात्र ते सर्वसाधारण समाजापासून थोडे अलगच पडलेले दिसतात.

अशा या विवाद्य व वादळी व्यक्तिमत्त्वाचा परिचय नव्या पिढीस असणे अत्यंत आवश्यक आहे.

कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचा जन्म २४ जून १८६३ रोजी वरसई येथे झाला. धाकटा विश्वनाथ ३ वर्षांचा असतानाच त्याच्या वडिलांचा अंत झाला. म्हणून त्याची आई मोठा वैजनाथ व धाकटा विश्वनाथ यांना घेऊन वरसईस आपल्या वडिलांच्या घरी परत आली.

या दोन्ही भावांचे शिक्षण मात्र पुण्यासच झाले. विश्वनाथचे प्राथमिक शिक्षण शनिवार पेठेतील तीन नंबरच्या शाळेत झाले. दुय्यम शिक्षणासाठी त्यांनी बाबा गोखले यांच्या शाळेत प्रवेश घेतला. नंतर काही काळ वामनराव भावे व काशीनाथपंत नातू यांच्या शाळेत, त्यानंतर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व काही काळ मिशन स्कूल असे करीत आपले दुय्यम शिक्षण संपवून

श्री. राजवाडे १८८२ साली प्रवेश परीक्षा-उत्तीर्ण झाले.

पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात नाव दाखल केले; पण घरच्या गरिबीने जेमतेम एक सहामाहीच ते कॉलेजमध्ये जाऊ शकले. त्यानंतर द्रव्यार्जनाचे साधन म्हणून त्यांनी पुण्यास पब्लिक सर्व्हिस सेकंडग्रेड परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी एक वर्ग सुरू केला. त्यात थोडी प्राप्ती झाल्यावर पुन्हा डेक्कन कॉलेजमध्ये नाव घातले. त्यांचे वडील बंधू वैजनाथ यांनाही तेथे फेलोशिप मिळाली होती, त्याचाही फायदा शिक्षण पुढे सुरू करण्यास मिळाला.

शालेय किंवा कॉलेजमधील अभ्यासक्रमातील नेमलेल्या पुस्तकांकडे त्यांनी कधीच फारसे लक्ष पुरवले नाही. शालेय शिक्षक, कॉलेजमधील प्राध्यापक त्यांच्या कुशाग्र व विशाल बुद्धीला पुरेसे खाद्य पुरवण्यास असमर्थ होते. मात्र डॉ. रा. गो. भांडारकर, न्यायकोशकर्ते म. म. झळकीकर यांच्यासारख्या काही विद्वान, भारतीय कीर्तीच्या प्राध्यापकांच्या शिकवणीचा लाभ त्यांना मिळाला. ग्रंथांनाच आपले गुरु समजून त्यांनी इतिहास, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, समाजशास्त्र, वनस्पतिशास्त्र अशा विविध शास्त्रांतील अनेक ग्रंथांच्या अभ्यासानंतर १८९१ साली बी. ए. ची परीक्षा दिली व पदवी संपादन केली. "केवळ विद्यार्जन करण्याचा हेतू बाळगणारा मी, नोकर तयार करण्याच्या गिरणीत जाऊन पडलो" अशा कडक शब्दात त्यांनी तत्कालीन शिक्षणसंस्थांसंबंधी आपली मते व्यक्त केलेली आहेत. प्राथमिक शिक्षणापासून ते कॉलेजमधील उच्च शिक्षणासंबंधीचे आपले अनुभव त्यांनी "कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळांतील स्वानुभव" या निबंधाद्वारे ग्रंथमाला मासिकातून समाजापुढे ठेवले. या निबंधात श्री. राजवाडे लिहितात, "मला एकही पंतोजी शास्त्रीयरीत्या शिक्षण देणारा भेटला नाही. येथून तेथून सर्व पंतोजी पोटभरू, इकडची पाटी तिकडे उचलून टाकणाऱ्यांपैकी. माझ्या आयुष्यातील अडीच वर्षे नूतन ज्ञानसंपादनाच्या दृष्टीने अगदी फुकट गेली. शिवाय नैतिक व धार्मिक दृष्ट्या माझा किती तोटा झाला तो तर सांगवतच नाही." त्याच निबंधात ते पुढे म्हणतात, "बारान् बारा वर्षे शिक्षण द्यायचे नोकरीचे व युनिव्हर्सिटीच्या पदवीदान-समारंभाच्या वेळी परीक्षा पास झालेल्या सेवार्थी उमेदवारांना उपदेश करायचा स्वतंत्र धंदा करण्याचा किंवा सरस्वतीच्या एकान्त उपासनेचा. ह्या मानभावीपणाचाही मला बहुत तिटकारा आला. वाजवीच आहे की ह्या भाडोत्री शिक्षकांच्या गुलामगिरीच्या नोकऱ्यांच्या कंटाळवाण्या परीक्षांच्यापासून मी पराङ्मुख झालो व पुस्तकालयातील ग्रंथाकडे एक दिलाने वळलो." अशा तऱ्हेने विद्यार्थि दशेपासून सुरू झालेली ज्ञानसाधना आयुष्याच्या अंतापर्यंत चालूच राहिली.

कै. राजवाडे यांनी पदवी मिळवली तरी तिचा उपयोग करून उत्तम नोकरी मिळवावी, उच्चपदे भूषवावी ही आकांक्षा त्यांना मुळीच नव्हती. पण कार्यक्षेत्र निश्चित

होईपर्यंतची २–३ वर्षे संभ्रमात गेली. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्यांचे लग्न १८८८ मध्ये विद्यार्थिदशेतच झाले होते. पदवीधर झाल्यानंतर प्रपंचासाठी त्यांनी न्यू इंग्लिश स्कूल-मध्ये तात्पुरती नोकरी धरली होती; पण दोन अपत्यांच्या व पत्नीच्या अकाली मृत्यूमुळे राजवाडे यांचा प्रपंचाचा पाश तुटला व साहजिकच प्रपंचासाठी पत्करलेली नोकरी त्यांनी १८९३ मध्ये सोडून दिली. पत्नीनिधनानंतर लग्नाचे वय असूनही पुन्हा लग्न करायचे नाही असा ठाम निर्धार करून राजवाडे यांनी कामास प्रारंभ केला. मराठी भाषा व स्वदेश याबद्दलच्या अभिमानाची व त्यांची स्थिती सुधारण्याची जी भावना राजवाडे यांच्या मनात मूळ धरून होती तीच वाढीस लागून आयुष्याचे ध्येय निश्चित झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे लेख, काव्येतिहासकार रा. ब. काशीनाथपंत साने यांची ऐतिहासिक पत्रे व परशुरामपंत गोडबोले यांनी छापलेल्या काव्यांनी महाराष्ट्र-सारस्वताचा मला अभिमान वाटू लागला असे खुद्द राजवाडे यांनीच नमूद करून ठेवले आहे.

जानेवारी १८९४ मध्ये ‘ भाषांतर ’ मासिकाचा पहिला अंक राजवाडे यांनी प्रसिद्ध केला. राष्ट्राचा स्वाभिमान वाढीस लावण्यासाठी व जगातील निरनिराळे विचारप्रवाह देशबांधवांना सांगण्याच्या हेतूने उत्तमोत्तम विचारप्रवर्तक ग्रंथांची भाषांतरे लोकांना देणे आवश्यक होते. पश्चिमेकडे जे निरनिराळ्या शास्त्रातील अगाध ज्ञान निर्माण होत होते तशा तऱ्हेचे स्वतंत्र ज्ञानभांडार निर्माण करण्याची कुवत तूर्त आपणात नाही म्हणून तेच आपण मराठी भाषेत आणण्याचा प्रयत्न करावा या हेतूने हे मासिक राजवाडे यांनी सुरू केले. ते ३७ महिने चालून त्यात १५ पूर्ण व ७ अपूर्ण अशा २१ ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध झाली. कॉलेजात असतानाच राजवाडे यांनी अनुवादित केलेल्या प्लेटोच्या ‘ रिपब्लिक ’ या ग्रंथाचा अनुवादही या मासिकातूनच प्रसिद्ध झाला. पुण्यातील प्लेगच्या संकटाने हे मासिक बंद पडले.

हे मासिक बंद पडले तरी त्यांचे ध्येयवादी मन त्यांना स्वस्थ बसू देईना. कॉलेज-पासूनच इतिहास हा राजवाडे यांचा आवडता विषय ! ग्रँट डफ व इतर इंग्रज इतिहासकारांनी लिहिलेला भारताचा इतिहास हा जेत्यांनी जितांचा लिहिलेला इतिहास असल्याने त्यात सत्यापलाप फार व अवाजवी घटनांना महत्त्व दिलेले आहे असे राजवाडे यांचे मत होतेच. सत्य इतिहास उजेडात आणल्याशिवाय राष्ट्रांत स्वत्त्वाची चेतना निर्माण होणार नाही हाही एक विचार राजवाडे यांच्या मनात घर करून होता. अशा अस्वस्थ मनःस्थितीत असतानाच त्यांचे एक विद्यार्थी काकाराव पंडित यांना वाई येथे जुन्या कागदांचे एक पेटार सापडल्याचे व त्यांनी ते वाचून पाहिल्यावर एका पुस्तकाची सामग्री त्यांत असल्याची हकीगत त्यांच्या कानावर आली. “ निरलस विसूभाऊ त्याच रात्री पुण्याहून वाईस आले. सकाळी माझ्याकडे आले व एकदम सर्व दप्तर पाहाण्यास सुरुवात केली ” असे खुद्द काकासाहेब पंडितांनी लिहिले आहे.

याप्रमाणे २ महिने अविश्रांत श्रम करून 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' हा पहिला खंड १८९६ मध्ये छापून तयार झाला. पानिपतच्या युद्धासंबंधीची २०४ पत्रे या खंडात आहेत.

अशा तऱ्हेने सुरू झालेली राजवाडे यांची इतिहासाची साधने जमा करण्याची साधना अखंड चालू राहिली. यासाठी यात्रिकाच्या चिकाटीने उभा महाराष्ट्र त्यांनी पायाखाली घातला. ऐतिहासिक महत्त्वाच्या स्थळांना वारंवार भेटी दिल्या. त्या वास्तू बोलत्या झाल्या. अमूल्य माहिती गोळा झाली. तेथील जनजीवन, त्यांची भाषा, चालीरीती, वाङ्मय यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करून निष्कर्ष काढले. धोतर, लांब काळा कोट, डोक्याला पागोटे, स्वतःचे अन्न शिजवून खाण्यासाठी मोजक्या भांड्यांची पडशी टाकून एखाद्या ठिकाणी जुनी दप्तरे मिळण्यासारखी आहेत असा सुगावा लागला, की ते ती मिळवण्यासाठी जिवाचे रान करीत. एरवीचे फटकळ विसूभाऊ नम्र होत आणि अशा तऱ्हेने मिनतवाऱ्या करून कागद हस्तगत केले की त्यावर तुटून पडत. अहोरात्र परिश्रम करून त्यांचा संदर्भ लावीत व पदरमोड करून ते प्रसिद्ध करण्याचा खटाटोप करीत. एकाद्या सरदार घराण्यातील किंवा संस्थानिकांकडील वारस असे कागदपत्र देण्यास खळखळ करू लागले की राजवाडे संतापून म्हणत "ज्यांच्या पराक्रमावर आज ऐश्वर्य भोगत आहेत ते संस्थानिक झोपले आहेत, जहागिरदार डुलक्या खात आहेत म्हणून हा खटाटोप आम्हाला करावा लागतो आहे."

धुळीची पुटे बसलेली, भिजून चिखल झालेली ही दप्तरे हस्तगत करण्यात आलेल्या कुठल्याही तऱ्हेच्या अडचणींनी राजवाडे यांच्या तपश्चर्येत कधीही खंड पडला नाही. थकवा जाण्यापुरती थोडी झोप व स्वतःचे अन्न शिजवून खाण्यापुरती सवड याशिवाय सर्व वेळ वाचन, लेखन, मनन-चिंतनात जाई.

या सर्व तपाचे फळ म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे प्रसिद्ध केलेले २२ खंड होत. याशिवाय मृत्युसमयी त्याहून अधिक असा अप्रकाशित संग्रह राजवाडे यांच्यापाशी होता. या भ्रमंतीतच त्यांना एकनाथपूर्वकालीन ज्ञानेश्वरीची प्रत मिळाली. ती त्यांनी संपादित करून प्रसिद्ध तर केलीच, शिवाय "ज्ञानेश्वरीतील मराठी व्याकरण" हा भाषाशास्त्रीय दृष्ट्या मौलिक ग्रंथ लिहून ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांना नवे मार्गदर्शन केले. "राधामाधवविलासचंपू" हा जयराम पिंड्येकृत शहाजी-चरित्रावरील काव्य-ग्रंथ व "महिकावतीची बखर" हे राजवाडे यांनी संपादित केलेले आणखी दोन ग्रंथ. या दोन्ही ग्रंथांच्या प्रस्तावना म्हणजे महाराष्ट्राची वसाहत, त्याचे समाजजीवन यासंबंधी राजवाडे यांनी जो अभ्यास केला, जे निष्कर्ष काढले त्याचे प्रतिबिंबच होय. तुटपुंजे संशोधन, अपुरी साधने, संशोधक वृत्तीचा अभाव अशा परिस्थितीत राजवाडे यांनी या प्रस्तावनांत महाराष्ट्राच्या वसाहतीसंबंधी केलेले विवेचन विशेषच महत्त्वाचे ठरते.

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या खंडांना त्यांनी ज्या प्रदीर्घ प्रस्तावना लिहिल्या,

त्यांत इतिहासविषयक अनेक प्रश्नांचा ऊहापोह राजवाडे यांनी केला आहे. मराठ्यांचा इतिहास शास्त्रीय पद्धतीनेच लिहिला गेला पाहिजे हा त्यांचा आग्रह त्यांत दिसतो. तसेच परिस्थिती व मानव यांच्या झगड्यातून इतिहास घडतो; दैवी संकेत, एकाद्याच व्यक्तीचे कर्तृत्व या गोष्टी ते महत्त्वाच्या मानीत नाहीत तर सामान्य व असामान्य व्यक्तींची चरित्रे मिळून इतिहास घडतो असे राजवाडे मांडतात. इतिहास म्हणजे तत्कालीन समाजाचे भौतिक व आत्मिक चरित्र अशी इतिहासाची व्यापक व्याख्या ते करतात.

कै. राजवाडे यांची कामगिरी निव्वळ इतिहासविषयकच नसून मराठी भाषाशास्त्राच्या दृष्टीनेही त्यांनी फार मोठी कामगिरी बजावलेली आहे. 'राजवाडे धातुकोश' व 'राजवाडे नामादिशब्दव्युत्पत्ती कोष' हे दोन ग्रंथ त्यांच्या सूक्ष्म व मूलगामी बुद्धिमत्तेचे निदर्शक होत. त्याचप्रमाणे 'सुबन्त विचार' व 'तिङन्त विचार' या दामले यांच्या व्याकरणावरील टीका-लेख व 'संस्कृत भाषेचा उलगडा' हा स्वतंत्र ग्रंथ त्यांच्या स्वतंत्र विचारसरणीचे निदर्शक होत. या ग्रंथात व्युत्पत्तींतून मानवाच्या इतिहासाचा अर्थ लावण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न निःसंशयपणे मौलिक स्वरूपाचा आहे.

महानुभवांच्या ग्रंथांच्या सांकेतिक भाषेचा राजवाडे यांनी केलेला उलगडा ही त्यांची फार मोठी कामगिरी आहे. भाषाभ्यासाला या उलगड्याने नवेच दालन खुले झाले. याशिवाय वेळोवेळी विविध विषयांवर निरनिराळ्या मासिकांतून जे लेख व निबंध प्रकाशित केले त्यांची संख्याही फार मोठी आहे. त्यांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेने अनेक विषयांवर काही नवीन विचार व सिद्धान्त पुढे मांडले. ते सर्वच अविवाद्य व अचूकच होते असे जरी नसले तरी ते मांडताना प्रमाणे देऊन ते सिद्ध करण्याची अवलंबिलेली पद्धती निर्विवादपणे शास्त्रीयच होती.

विचार, मनन, चिंतन, यांना शब्दरूप देऊन ते लेखांच्या, ग्रंथाच्या रूपाने वारंवार प्रसिद्ध करण्याची तत्परता कै. राजवाडे यांनी दाखविली. हा त्यांच्या चरित्रातील विशेष होय. त्यामुळे त्यांचे विचारधन विपुल ग्रंथसंपत्तीच्या द्वारा भावी पिढ्यांना मिळू शकले.

१०० वर्षे जगून खूप काम करण्याची राजवाडे यांची इच्छा होती. विद्यार्थिदशेतील व्यायामाने प्रकृतीही निकोप होती. पण सततची भ्रमंती व अखंड मनन-चिंतनाचा मनावरील ताण यामुळे त्यांना हाय ब्लड प्रेशरच्या विकाराने ग्रासले तरी तशाही स्थितीत त्यांचे काम चालूच होते. सन १९२६ च्या मार्च महिन्यात टाचणांच्या ट्रंका व स्वयंपाकाची भांडी घेऊन ते धुळे येथे गेले. या गावाशी त्यांचा फार निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध होता. तेथे गेल्यावरही धातुकोश नीटपणे पुरा करण्याची खटपट चालूच होती. पण जिद्दी मनाला दुबळ्या शरीरापुढे वाकावे लागले व दुर्वासाप्रमाणे

कोपिष्ट पण अखंड ज्ञानसाधना करणाऱ्या या ऋषितुल्य संशोधकाचा, वैय्याकरणाचा, समाजशास्त्रज्ञाचा ३१ डिसेंबर १९२६ रोजी अंत झाला.

राजवाडे आणखी जगते तर आर्यांच्या विजयाचा मोठा ग्रंथ निर्माण झाला असता. मराठ्यांच्या इतिहासाचा शोध घेत असताना साऱ्या आर्य संस्कृतीचा इतिहास शोधण्याची जी ईर्षा त्यांच्यात निर्माण झाली होती तिचा परिपाक या ग्रंथरूपाने मिळू शकला असता. त्याची रूपरेषाही त्यांनी आखली होती. धातुकोश व विवाहसंस्थेचा इतिहास पूर्ण होऊ शकले असते, पण मृत्यूने त्यांचे हे विशाल मनोरथ मध्येच अडविले.

इतिहासाचार्यांचे अपुरे राहिलेले हे कार्य पुरे करण्याची ईर्षा नव्या पिढीत निर्माण झाली तर तीच त्यांना मिळालेली खरीखुरी स्मृति-सुमनांजली ठरेल.

प्रस्तावना

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या थोरवीसंबंधी मी लिहिण्याची जरुरी नाही. ते काम इतिहासतज्ज्ञ करतीलच. राजवाडे यांनी हिंदुस्तानच्या इतिहासशास्त्राची, भाषाशास्त्राची, समाजरचनाशास्त्राची जी अपूर्व व मूलभूत क्रांतिगर्भ रचना करून ठेवली तिचे नीट ज्ञान व अभ्यास अद्याप योग्यपणे झालेले नाही. हे खरे की खोटे हे अजमावयाचे असल्यास महाराष्ट्रातील किंवा हिंदुस्थानातील अत्यंत उच्च विद्यापीठात अत्यंत उच्चस्थानीय पाठक किंवा आचार्य जे काय शिकवतात ते पाहिल्यास कळून येईल. इंग्रजी राज्यात तसे होत होते तेव्हा त्याला इलाज नव्हता; पण आता ?

एक आठवण सांगतो. एका इंग्रजी मिशनऱ्यांच्या शाळेत काही दिवस मी मास्तरकी केली होती. त्या वेळी मॅट्रिकच्या इतिहासवर्गात शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेचा इतिहास-सारांश राजवाडे यांच्या प्रतिपादनानुरूपाने मी सांगितला. टेक्स्ट बुक बाजूला सारले. ते सर्व प्रिन्सिपलबाईंनी शेजारच्या वर्गातून आडून ऐकले. ती इंग्रज होती. तिचा तिळपापड झाला. मला ताबडतोब बोलावून माझी मास्तरकी पगार न देता तत्काळ बरखास्त करण्यात आली. हा प्रकार १९२० साली घडला.

आता तोच धडा मी परत सांगितला तर नोकरी जाणार नाही. राजवाडे यांचे इतिहासचित्रण आमच्या शिक्षणतज्ज्ञांना कितपत माहीत आहे किंवा मान्य आहे याची मला शंका वाटते. राजवाडे यांचे सर्वच सिद्धान्त किंवा मांडणी आहे तशीच मान्य करून इतिहासशिक्षण करावे असे माझे म्हणणे नाही. माझा स्वतःचाही मार्क्सवादी भूमिकेवरून त्यांच्याशी सैद्धान्तिक मतभेद आहे हे खरे; तरीपण इतिहास आध्यात्मिक द्वन्द्वविरोधानुसार मांडावा की विशिष्ट इतिहासजनित भौतिक द्वन्द्वातून मांडवा या बाबतीतील मुख्य शास्त्रांबद्दलचे मतभेद सोडले तर राजवाडे यांच्या पद्धतीने व त्यांची सामग्री घेऊनच इतिहास लिहावा लागेल असे माझे मत आहे. हिंदुस्थानविषयक इतिहासाची मार्क्सवादी शास्त्रशुद्ध मांडणी करणाऱ्याला तर राजवाडेकृत लिखाणाचा भरपूर आधार घेतल्याशिवाय पर्याय नाही. म्हणूनच कदाचित् बुझ्र्वामान्य विद्वानांना राजवाडेअनुसारित इतिहासाची शिकवणी करण्याची भीती वाटत असावी.

असे विधान मी कां करतो याची एक महत्त्वाची स्मरणिका मी नमूद करतो.

"भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास" या राजवाडे यांच्या अपूर्ण राहिलेल्या ग्रंथाची शोकांतिका येथे मला सांगायची आहे.

या ग्रंथाचे पहिले प्रकरण १९२३ च्या मे महिन्यांत पुण्याच्या सुप्रसिद्ध 'चित्रमयजगत्' मध्ये प्रसिद्ध झाले. त्यामध्ये असे म्हटले होते की अत्यंत प्राचीन आर्यसमाजात आज आपण मानतो ती किंवा कोणतीच विवाहसंस्था नव्हती. भाऊ-बहीण, पिता-दुहिता असे शरीर-संबंध रानटी आर्यसमाजात होत होते. हा सर्व भाग वेदसंहिता व महाभारतातील पुराव्यावर आधारलेला होता. अशा अनिर्बंध शरीरसंबंधाची पुढे प्रगति कशी झाली हा या ग्रंथाचा विषय होता. पण या पहिल्याच प्रकरणाने महाराष्ट्रातील वाचकांत, विशेषतः विद्वानांत, भयंकर वादळ उठले. त्यांनी चित्रमयजगतचे मालक वासुकाका जोशी यांना पत्रे पाठवून आणि काठी दाखवून धमकी दिली की पुढचे भाग प्रसिद्ध कराल तर तुमचा छाप-खाना आम्ही जाळू. अर्थातच नाइलाजास्तव वासुकाकांनी ते पुस्तक छापावयाचे बंद केले. ही बातमी मला समजली तेव्हा हे पुस्तक अथवा विवेचन समाजशास्त्राच्या मांडणीला, विशेषतः मार्क्स-एंगल्सच्या इतिहासविषयक सिद्धान्ताला, कच्चा माल या नात्याने किती उप-युक्त ठरेल हे माझ्या लक्षात येऊन मला आनंद वाटला. हा ग्रंथ आपण छापावा हे मनात धरून मी राजवाडे यांना भेटायला पुण्याला गेलो. ते घरी नव्हते. मी त्यांच्यासाठी एक चिठ्ठी ठेवून आलो की मी हा इतिहासग्रंथ छापावयास तयार आहे. त्यात मी खेतवाडी येथील माझ्या प्रेसचा पत्ता दिला. काही दिवसांनी मी प्रेसचा पत्ता बदलला होता. खेतवाडीतून तो प्रेस ठाकुरद्वारला इंदुप्रकाशच्या आवारात आणला होता त्याचा शोध काढून एक दिवस शुभ्रवेषधारी तापसीवत् दिसणारे दोन धिप्पाड पुरुष माझ्यासमोर येऊन उभे राहिले. एक वि. का. राजवाडे व दुसरे शं. रा. राजवाडे. त्या वेळी मी त्यांच्या पहिल्या लेखाचे इंग्रजी भाषांतर करीत होतो. त्याची प्रुफे माझ्यासमोर होती. तसेच त्याच्या पहिल्या लेखाचा मराठीत छापलेला सोळा-पानी फॉर्मही टेबलावर पडला होता. मग पुढील संभाषण झाले.

राजवाडे: "तुमची चिठ्ठी मिळाली. तुम्ही हा ग्रंथ पुढे छापू इच्छिता असे म्हटले होते म्हणून नीट चौकशी करण्यासाठी आलो आहे." त्यांनी असे म्हणताच मी त्यांना मराठीतील फॉर्म दाखवला आणि या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर करून छापण्याचा माझा विचार आहे असे सांगून माझ्या 'सोशॅलिस्ट' मासिकाच्या पानांची गॅली प्रुफे त्यांच्यापुढे धरली. राजवाडे यांच्या रागीटपणाची ख्याती मला माहीत होती म्हणून मी हे सर्व भीत-भीतच करीत होतो. येथपर्यंत स्वतः व त्यांच्याबरोबर आलेले आहिताग्नि राजवाडे खुर्चीवर बसले नव्हते. तसा मीही अर्थातच उभा होतो. नंतर ते म्हणाले "तुम्ही बरेच धाडसी दिसता. हा ग्रंथ छापलात तर कर्मठ मंडळी तुमचा छापखाना जाळतील. पण तुमचा निश्चय असल्यास मी एक तोड सुचवितो. मी हा ग्रंथ अद्याप पूर्ण लिहिलेला नाही. तेव्हा मी त्याचे

क्रमशः सोळा पानांचा फॉर्म होईल असे एक एक प्रकरण तुमचेकडे पाठवीन. तो फॉर्म छापून तुम्ही मला पाठवा म्हणजे मी पुढचा भाग तुम्हाला पाठवीन. तुमच्याकडून छापील फॉर्म आला नाही तर मी समजेन की हा ग्रंथ तुम्हालाही झेपत नाही. किंवा हा व्याप करता करता तुमचे दिवाळे निघाले आहे. हे समजून मी पुढचे प्रकरण लिहिणारही नाही आणि पाठवणारही नाही. ही योजना तुम्हाला पसंत आहे का ? " मी उत्तर दिले की काहीही झाले तरी हा ग्रंथ छापण्याचा मी निश्चय केला आहे. हे ऐकून ते प्रेसकडे न्याहाळून पाहू लागले व म्हणाले ' या ग्रंथापासून तुम्हाला लाभ होणार नाही. तुम्हाला दिवाळ्याची धास्ती वाटत नाही ? ' मी परत ' नाही ' असे उत्तर देऊन म्हणालो : " या ग्रंथाच्या पहिल्याच प्रकरणात माझ्या मार्क्सप्रणीत इतिहासशास्त्राला बळकटी आणण्यासारखा मसाला मला हिंदुस्थानच्या इतिहासातून तुम्ही दाखवला व पुढेही तो तसाच मिळेल. म्हणून मी हा खटाटोप करीत आहे. "

राजवाडे : अस्सं. म्हणजे तुम्ही हे तुमच्या शास्त्रासाठी करणार आहात असे दिसते. म्हणूनच एखाद्या व्यापाऱ्यासारखी तुम्हाला दिवाळ्याची भीती वाटत नाही.

आणखी एक दोन गोष्टींचा उल्लेख करून ही स्मरणिका संपवतो. हा सर्व खटाटोप करण्यात माझा काय उद्देश होता ? या ग्रंथातील सामग्री वाचून माझी खात्री झाली होती की कम्युनिस्ट तत्त्वज्ञान-प्रस्थापक कार्ल मार्क्स व त्यांचे सहकारी एंगल्स ह्यांनी ' कुटुंबसंस्था खाजगी मालमता व शासनसंस्था ' हा जो ग्रंथ लिहिला त्याला संपूर्ण पूरक असा खात्रीलायक पुरावा भारतीय शास्त्रातून व इतिहासातून राजवाड्यांच्या ग्रंथामुळे मला मिळू शकेल. म्हणून कसेही करून हा ग्रंथ त्यांच्याकडून पुरा करून घ्यावा असा अट्टाहास मी धरला.

अर्थात् राजवाडे यांचे जे इतिहासशास्त्र आहे ते स्थल, काल, व व्यक्ती या तीन घटकांवर आधारलेले आहे. हे घटक मार्क्सवाद अपुरे समजतो. स्थल, काल, व्यक्ति (सामान्य वा असामान्य) यांच्या अन्योन्यसंबंधांच्या मुळाशी जीवनपोषणार्थ लागणारी अवजारे, हत्यारे व तज्जन्य उत्पादन, वितरण, संभोजन, वर्गसंबंध व जातीसंबंध, तसेच राज्ययंत्रही आहेत. आदिकालापासून तो कम्युनिस्ट समाजरचनाकालापर्यंत यांची उत्क्रांती–क्रांतीची एक द्वन्द्वात्मक गती–आहे. तिची फोड मार्क्स व एंगल्स यांनी केली आहे; पण ही शास्त्रपद्धती हिंदुस्थानातल्या वैदिक, वेदान्तबद्ध व वर्णजातीधर्मसाधित हिंदुसमाजाला लागू शकत नाही असा कम्युनिस्टशास्त्रविरोधकांचा दावा आहे. या दाव्याला व विरोधाला वेदबद्ध, शास्त्रशुद्ध व इतिहासदत्त घटना इत्यादींतून पुरावा देण्याचे काम मी पहिल्यापासून पत्करले होते. त्या कामाला अत्यंत परिपोषक असा हा ' भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास ' ग्रंथ आहे. हे पहिल्याच लेखावरून मी ओळखले. तो ग्रंथ पूर्ण करून घेण्याच्या मागे लागलो. राजवाडे यांच्या इतिहासात कुठेही मार्क्सचा उल्लेख मला आढळला नाही. रामदासाची चर्चा करतांना त्यांनी हेगेलचा उल्लेख केला आहे व आणखी एका ठिकाणी सोशॅलिस्टिक हा शब्द आला आहे एवढेच. तरी पण त्यांनी मांडलेल्या माहितीवरून व चर्चेमधून मार्क्सवादी

इतिहास-विकास सिद्धान्ताच्या मांडणीला भरपूर मालमसाला मिळू शकतो.

आणखी एक उल्लेख करणे आवश्यक आहे. राजवाडे यांच्या पहिल्या प्रकरणाचे इंग्रजी भाषांतर मी केले. त्याचा काही भाग माझ्या 'सोशॅलिस्ट' पत्राच्या मासिक आवृत्तीमध्ये जून १९२३ पासून छापण्यास सुरुवात केली होती. त्यात फक्त दोन पाने येऊ शकली (पान ४१०-४११). नंतर आणखी एक हप्ता जुलै १९२३ च्या अंकात पान ४२३-४२४ वर आला आहे व पुढे चालू म्हणून लिहिले आहे. याच अंकात कव्हर पेजवर Marriages in Ancient India By V. K. Rajwade price four annas अशी इंग्रजीत जाहिरात दिली आहे. यानंतरचे अंक सापडत नाहीत. श्री. राजवाडे ह्यांच्या इंग्रजी भाषांतराचा पहिला लेख छापताना मी एक अगदी त्रोटक नोट इंग्रजीत लिहिली आहे. ती येथे द्यावी असे मला वाटते. या प्रस्तावनेत माझा राजवाडे यांच्या काही निष्कर्षांबाबत मतभेद आहे असे त्याच वेळी मी नमूद करून ठेवले आहे. त्या ओळी येथे देणे कदाचित् अप्रस्तुत दिसेल हे खरे; पण मे-जून १९२३ ची ही माझी नोंद पुढच्या इतिहासाला उपयोगी पडेल असे वाटते. नोट : The veteran researcher Mr. Rajwade is known to every student of history. Those who would take every existing moral rule as descending directly from heavens eternal and true for all eternity to come and who would consider a violation of a moral value as criminalism would find that morality is an 'article' as much subject to the creative and evolutionary will of man as any dead thing as a chisel or a knife. Our deductions from the findings of Mr. Rajwade with whom we differ on many posints we reserve. Ed. S.

हे मतभेदाचे मुद्दे ग्रंथ संपूर्ण झाल्यावर मी लिहिणार होतो. तेव्हा किती भाग भाषांतरित केले ते आज सांगता येत नाही व आठवतही नाही. चौथ्या प्रकरणाची राजवाड्यांची हस्तलिखित प्रत तशीच पडून राहिली व पुढच्या दंगलीत सगळेच गहाळ झाले. पण राजवाडे आपल्या लिखाणाची एक प्रत स्वतःकडे ठेवीत असत. शिवाय मी पाठवलेले छापील फॉर्म होतेच. ती प्रत पुढे धुळे येथील सत्कार्योत्तेजक सभा व राजवाडे संशोधन मंदिर यांच्या मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली. त्या सर्वांना धन्यवाद द्यावयास पाहिजेत. श्री.भट यांनी मी कैदेत असताना राजवाडे ह्यांच्या मृत्यूनंतर पत्राने चौकशी केली होती, की त्यांना जी चार प्रकरणांची हस्तलिखिते राजवाडे यांच्या दप्तरांत मिळाली त्यापेक्षा आणखी हस्तलिखिते माझ्याकडे पाठविली होती का ? व ती आहेत का ? अर्थात् मी नकारार्थी उत्तर दिले.

राजवाडे यांनी आपली प्रतिज्ञा पूर्णपणे पाळली होती. मी जेव्हा एक फॉर्म छापून पाठवीत असे तेव्हाच ते दुसरा लिहीत. चौथ्या प्रकरणाचा भाग छापण्यापूर्वीच मी मार्च १९२४

मध्ये कैदेत गेल्यामुळे व माझ्या सहकाऱ्यांकडून त्यांना त्या प्रकरणांची छापील प्रत न मिळाल्यामुळे त्यांनी पुढचा भाग लिहिण्याचे सोडून दिले. मी १९२७ साली सुटून आलो तोपर्यंत ते दिवंगत झाले होते. राजवाडे यांच्या चौथ्या प्रकरणाच्या भागात ते स्त्री-पुरुषांच्या सांघिक अशा लैंगिक समागमातून एकपतिपत्नीक पद्धतीचा (मोनोगामीचा) ऐतिहासिक विकास कसा दाखवतात याची मला नितान्त जरूर होती; कारण त्या घटनेचा खाजगी मालमत्तेच्या व राज्ययंत्राच्या उदयाशीं निकट संबंध आहे. तो अत्यंत महत्त्वाचा तसाच गुंतागुंतीचा प्रश्न चौथ्या किंवा पाचव्या प्रकरणानंतर येणे अपरिहार्य होते. त्याच वेळी मी त्यांना एंगल्सच्या पुस्तकाची प्रत देणार होतो. ते जर मी करू शकलो असतो तर माझी खात्री आहे की राजवाडे यांनी आमचा ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धान्त मान्य केला असता. हे विधान करण्याचे धार्ष्ट्य मी करतो याचे कारण असे की त्यांच्या विवेचनात व विचारसरणीत हिंदु धर्म भावनेला धर्म नात्याने कुठेच स्थान नव्हते. वैदिक इतिहासावर लिहिताना ते नेहमी "आमचे रानटी ऋषिपूर्वज" असाच उल्लेख करीत. धर्मभावनेबद्दल त्यांची ऐतिहासिक वृत्ती काय होती याचे उत्तम उदाहरण म्हणून त्यांचा "विकार आणि विचार प्रदर्शनांच्या साधनांची उत्क्रांती" हा लेख पाहावा. सध्या आपली घटना व समाजधारणा सेक्युलर म्हणजे धर्मनिरपेक्ष आहे असे जाहीर झाले आहे; पण हा केवळ जाहीरनामा आहे, सत्यनामा नाही. तो सत्य करावयाचा असेल तर सर्व शाळा-कॉलेजांतून, विशेषतः सर्व मंत्रिमंडळे, विद्वान शिक्षक आणि नोकरवर्ग यांना, या लेखाचे वाचन व मनन सक्तीचे करावे असे मला वाटते. या लेखातील एकच वाक्य नमुन्यादाखल उद्धृत करतो.

राजवाडे लिहितात : " स्थूलमूर्तीवरचा चित्रावरचा, वृक्षपशुपक्षादिकांच्या प्रतिमांवरचा तरी भ्रांत विश्वास अद्याप लुप्त कुठे झाला आहे ? आणि अद्यापि कुठे कुठे क्वचित् क्वचित् झाला. तथापि स्वर्ग, नरक, देव, देवदूत, जीव्होवा, गॉड, अल्ला या अमूर्त भ्रांत कल्पना अद्याप सर्वत्र विराजमान आहेतच. फक्त अद्वैती वेन्दाती म्हणून ज्यांना म्हणतात व भौतिक शास्त्रज्ञ म्हणून ज्यांना म्हणतात त्याच्यातून काहींशा ह्या कल्पना नष्ट झाल्या आहेत. परंतु या थोड्या काहींची संख्या पृथ्वीवरील लोकसंख्येच्या कितवा लक्षांश आहे ? अद्यापि जग बाल्यावस्थेत कसले शैशवावस्थेतच आहे " (राजवाडे लेखसंग्रह पा. २६ प्रकाशन : साहित्य अॅकॅडमीतर्फे संपादक लक्ष्मणशास्त्री जोशी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.). या लेखाची व वरील विधानांची बौद्धिक व शास्त्रीय झेप आमच्या अनेक विद्वानाना झेपायचीसुद्धा नाही.

याच्या पुढची पायरी काय हे राजवाडे यांच्यासारख्या विचारवंताला सांगणे हे मी माझे महत्त्वाचे कर्तव्य समजत होतो. पण त्यांच्या अकाली मृत्यूमुळे आणि माझ्या तुरुंगवासामुळे ते करण्याची संधी मला साधता आली नाही याबद्दल दुःख वाटते. अर्थात् हा विचार अत्यंत धाडसीपणाचा किंवा उर्मटपणाचा दिसेल; पण राजवाडे विचाराने फारच प्रगतिमान व बेछूट झेप घेणारे असल्यामुळे मला त्यांची धास्ती किंवा माझी वरील आशा फोल आहे असे वाटत नव्हते. पण हे कल्पनातरंग चालविण्यात काय अर्थ आहे असे

कुणीही म्हणू शकतो.

इतिहासाचार्य राजवाडे यांचा हा अपूर्व ग्रंथ इतिहासाच्या अभ्यासूंना पुस्तकरूपाने प्राप्त करून दिल्याबद्दल प्रागतिक पुस्तक प्रकाशनाचे आभार मानणे आवश्यक आहे. याच अपूर्व ग्रंथाबरोबर राजवाडे यांचा अत्यंत मूलभूत विचारसरणीचा दुसरा तात्त्विक निबंध म्हणजे " विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती " याच पुस्तकात घातला आहे हेही युक्तच झाले.

पुढचा टप्पा

आता यापुढे काय असा प्रश्न उभा राहातो. ' प्रागतिक पुस्तक प्रकाशन ' आणि अशाच प्रवाहाचे विद्वान यांच्यापुढे काय कामगिऱ्या उभ्या राहतात याचा थोडासा विचार या प्रसंगानुसार मांडल्यास वावगे दिसणार नांही असे वाटते.

आपल्या देशाचा आणि समाजाचा, ऐतिहासिक भौतिकवादाची मूलतत्त्वे लक्षात घेऊन लिहिलेला, असा इतिहास किंवा त्याची आखणी अद्याप झालेली नाही. ती करणे आवश्यक झाले आहे. असा संपूर्ण इतिहास रचणारी सामग्री किंवा तज्ज्ञ मंडळी आजमितीला फारशी नाहीत. तरीपण हे काम आराखडा किंवा पायाभरणीच्या रूपाने उपयोगी सामग्री घेऊन तिचा उपयोग करणारे विद्वान अगदीच नाहीत असे नाही. यासंबंधी माझे काही कच्चे विचार येथे नमूद करण्याचे मी धाडस करू इच्छितो.

अशा ग्रंथाचा आराखडा करण्यासाठी तीन-चार संग्रहांचा प्रथम वापर करावा. पहिला संग्रह म्हणजे राजवाडे यांचे संपूर्ण लिखाण. दुसरा संग्रह म्हणजे डी. डी. कोसांबी यांचा हिंदुस्तानच्या इतिहासाची प्रस्तावना व इतर लेख. तिसरा संग्रह के. पी. जायस्वाल यांनी लिहिलेला ' हिंदू पॉलिटी ' आणि चौथा माझ्या ' आदि भारत ' या पुस्तकात केलेली यज्ञसंस्थेची विवेचना.

या सर्व खटाटोपांचा पाया एंगल्स यांचा " कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता आणि शासनसंस्था यांचा उगम " हा ग्रंथ धरायलाच पाहिजे हे सांगायला नको.

पण त्या कामात हात घालण्यापूर्वी राजवाडे यांच्या संपूर्ण वाङ्मयाचे निरीक्षण करणे आवश्यक आहे.

हिंदुस्तानच्या या नव्या इतिहासाची रचना करणे हे अवघड काम आहे. त्यासाठी एक कमिटी नेमून तिने कोणकोणाचा सल्ला घेऊन काम करावे असाही प्रश्न आहेच. काही नावे मला परिचित आहेत. त्यात सर्वश्री आर. एस. शर्मा, ' शूद्र ' या ग्रंथाचे लेखक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रो. मिराशी, प्रो. नूर-उल-हसन, सोवियट इतिहासशास्त्रज्ञ बोनगार्द लेव्हिन इत्यादींचा सल्ला व सहाय्य घेणे जरूरीचे वाटते. आणखी विद्वान मंडळी आहेत पण त्या सर्वांची नावे घेऊ गेल्यास यादी फारच मोठी दिसेल. (अभ्यंकरशास्त्री आज हयात असते तर किती तरी बरे झाले असते. त्यांच्या मारेकऱ्यांनी संस्कृत व्याकरणशास्त्रावरच

एक जीवघेणा वार केला आहे हे त्या मारेकऱ्यानाही दिसले नसेल.) आपल्या देशात जे विकृत विचार इतिहासलेखनद्वारा पसरविले जात आहेत त्यासाठी हा खटाटोप जरूरीचा आहे.

या इतिहासग्रंथाचा पसारा ज्ञानकोशाएवढा नको. तसेच जुन्या भिकार इंग्रजी चाकोरीतलाही नको. म्हणूनच राजवाडे, कोसांबी व जायस्वाल यांच्या ग्रंथांचा प्रथम उल्लेख केला आहे. डॉ. भांडारकर आणि इतर पंडितांचेही लेखन मदतीला घ्यावे.

एंगल्सचा ग्रंथ मूलभूत धरल्याने कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रसार करणे असा या सूचनेत उद्देश नाही. प्रत्यक्ष राजवाडे, कोसांबी, जायस्वाल यानी जी सामग्री काढून ठेवली आहे तिचा आराखडा दिला तरी प्राथमिक गरज भागण्यासारखी आहे. शिवाय कोसांबी याना मार्क्स-एंगल्स मान्य होते हे सर्वश्रुत आहे.

या खटाटोपाचा उद्देश हा की हल्लीचे इंग्रज व तत्सम विद्वान यांचे भिकार खंड व विकृत विचार बाजूला सारून आपल्या नव्या तरुण पिढीला आपल्या देशाचे, समाजाचे, विचारांचे सत्यदर्शन देणे व त्यांचा अपप्रवृत्तीपासून बचाव करणे हा आहे.

हे काम शक्य आहे का याचे उत्तर देणे कठीण आहे. सरकार आणि धनाढ्य कारखानदारांच्या देणग्यावर ज्या संस्था अथवा व्यक्ती आज या क्षेत्रात कार्य करीत आहेत त्यांच्यापासून ग्रंथनिर्मिती होते, पण त्यामुळे प्रगतीचे पाऊल फारसे पुढे पडण्याची आशा नाही. अशा संस्था अथवा विद्वानांची येथे नावे घेणे योग्य नाही. पण हे विधान सत्य आहे हे खरे.

नाही तर शिक्षणक्रमात अथवा विद्वानांच्या चर्चेत अथवा रोज गाजणाऱ्या सेमिनारचक्रात अथवा विद्वज्जनसभांमध्ये राजवाडे, कोसांबी, जायस्वाल यांचा नाममात्र सुद्धा उल्लेख न होण्याचे कारण कुणी सांगेल का?

या कार्यासाठी पैसा कसा उभारायचा याचा विचार नंतर करावा. प्रथम वैचारिक सामग्री जमा करायला सुरुवात करावी.

ही योजना आखीत असताना प्रथम राजवाडे यांच्या लिखाणाचा, त्यांच्या भाषाशास्त्र, इतिहासशास्त्र, विचार विकारप्रदर्शनशास्त्र इत्यादींचा पूर्ण व एकसंध सारांश तरी तयार व्हायला पाहिजे.

मोगल काळाचा योग्य इतिहास नाही. आहे तो जातीय अपप्रवृत्तींनी भरलेला आहे. हा कालखंड तर अत्यंत महत्त्वाचा, जवळचा व अद्याप हिंदुस्थानच्या समाजजीवनात व विचारसाधनिकेमधे खूप जीव धरून बसलेला आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा शेवटचा कालखंड म्हणजे मराठी राज्य व मराठ्यांचा राष्ट्रसमगुणी भावनांचा प्रबंध. त्याचा विचार राजवाडे सोडून इतरांनी नीटसा व फारसा केलेला नाही; कारण महाराष्ट्रधर्म, रामदास व इतर संतमंडळी यांच्या ऐतिहासिक कामगिरीबाबतच्या मतभेदात तो भाग बुडाला आहे.

V. P. Bhagwat

मराठे समजायला मोगल समजले पाहिजेत व इंग्रज समजायला मराठे समजले पाहिजेत. नुसत्या मशिदी, देवळे, चर्च आणि त्यांची दानपत्रे किंवा भग्नखंड पाहून किंवा भूदान व गोदानाच्या सनदा पाहून इतिहास लिहिणाऱ्यांनी बराच गोंधळ केला आहे. म्हणून आपल्या नव्या राष्ट्राच्या व नव्या समाजाच्या निर्मितीसाठी शास्त्रशुद्ध नवा इतिहास रचणे हे विचारवंतांचे काम आहे.

त्यासाठी प्रथम राजवाडे-वाङ्मयाचा नीट अभ्यास झाला पाहिजे. राजवाड्यांच्या ऐतिहासिक प्रस्तावना व मराठ्यांच्या इतिहासांची साधने शास्त्रशुद्ध आसंदीवर बसविली पाहिजेत.

मुसलमान रियासतीबद्दल वाटेल त्या कल्पना पसरवून आपण आपल्या लोकांच्या राष्ट्रीयत्वाच्या व एकीच्या वाढीला संकुचित कुंपणे घालीत आहोत व हिंदुस्थानातील सर्व जनतेच्या एकात्मतेला अडथळे निर्माण करीत आहोत. एका दैवी संदेशाचा आधार घेऊन वाळवंटमय प्रदेशातून हा मुसलमानी लोंढा जगभर कसा पसरला; जे अलेक्झांडर, अशोक किंवा नेपोलियन यांना जमले नाही ते या केवळ टोळीबद्ध समाजाला कसे जमले, याचे धड शास्त्रही सांगणे ज्यांना जमत नाही ते इतिहास काय लिहिणार किंवा शिकवणार व तो कसा? तशी टोळधाड म्हणाल तर त्यापूर्वी ग्रीक व रोमन, अलेक्झांडर व सीझर यांनीही घालण्याचा प्रयत्न केला होता आणि अटिलाच्या श्वेत व ताम्र हूणांच्या स्वाऱ्यांचा उल्लेखही आपल्या इतिहासात आहे. नंतर मराठ्यांच्या टोळधाडी उत्तर हिंदुस्थानात शिरून त्यांनी काय केले त्याचे संस्थानी अवशेष व दप्तरे अजूनही आहेत. महादजी शिंद्यांची अमोल दप्तरे ग्वाल्हेर दरबारात धूळ खात आहेत. पण या सगळ्यांची इतिहाससंगती कशी लावायची?

हे प्रश्न आपल्या देशातील इतिहासकारापुढे आहेत. पण त्यांची संगति लावण्याचे शास्त्र काय हाच मुख्य प्रश्न सुटलेला नाही आणि नुसत्या राष्ट्रवादाची व एकीची पोकळ गर्जना करून तो सुटणार नाही.

महाराष्ट्रामध्ये तर राष्ट्रवाद, प्रादेशिक वाद व जातिवाद, शुगर-सत्तावाद, मंत्रिगणांचे परस्पर वाद व प्रतिसंवाद, तसेच त्या सर्वांवर पांघरूण घालून एकीची व राष्ट्रवादाची सोनेरी शाल चढवून वर्गविग्रहावर पांघरूण घालण्याचे धुरंधर प्रयत्न चालू आहेत; पण या सर्वांचे मूळ तत्त्व व त्याचा विकास कुठून व कुठच्या साधनिकेवरून काढायचा याची सर्वच विचारवंतांना व राज्यकर्त्यांना, तसेच सामान्य कष्टकरी जनतेला काळजी पडली आहे यात शंका नाही.

त्यासाठी मनुष्यप्राणी प्राथमिक रानटी अवस्थेपासून इथपर्यंत कसा पोचला याचा एखादा सर्वंकष सिद्धान्त सापडतो का असा प्रश्न आहे. त्यासाठी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, भाषिक साधने व इलाजही शोधण्यात अनेक विद्वान व सामान्य लोक गुंतलेले आहेत.

जाता जाता असाही येथे उल्लेख करावासा वाटतो की काही महाशय संस्कृत भाषा

सर्वांना शिकवून आपल्या देशातील काही प्रकारच्या, विशेषतः भाषा-भेदोद्भव, भेद-भावांना काढून टाकून राष्ट्रीय ऐक्य साधू इच्छितात. त्यासाठी रेडियोवर काही संस्कृतसम " आवाजी " अथवा वाचन करतात. या महाभागांच्या एवढेही लक्षात येत नाही की भाषा ही व्यवहारातून निघते रेडियोमधून नाही. संस्कृत क्रियापदाला लिंग नाही आणि आपल्या हल्लीच्या अनेक भाषांत तीं तीनतीन आहेत. तसेच संस्कृताच्या द्विवचनाला आपण कधीच निकालात काढले आहे. ज्ञानेश्वरीत जुन्या मराठीचे एक द्विवचनाचे उदाहरण जुना अवशेष म्हणून सापडल्यावर राजवाडयांना केवढे भाष्य लिहावे लागले. एवढेच नव्हे तर द्विवचन, त्रिवचन – म्हणजे अनेकवचनच-का व चार वचनाला काय म्हणतात असा प्रश्न शाळेत मास्तरांना विचारल्यामुळे मास्तरांचा जो थोबाडीत फटका बसला तसले " शंका-समाधान " पाहून राजवाडे या प्रश्नाच्या मागे लागले. त्यातूनच " संस्कृत भाषेचा उलगडा " हा अत्यंत मौलिक शास्त्रीय ग्रंथ उत्पन्न झाला. पण त्याचा मागमूसही न घेता आमचे राज्यकर्ते व गांवढळ विद्वान डॉ. भांडारकरी व्याकरणाची शालोपयोगी पुस्तके शिकवून व रेडियोवर अज्ञेय असे संस्कृतसम निरनिराळे आवाज काढून हिंदुस्थानची एकी घडवू पहात आहेत.

भारतीय समाजाची किंवा त्यापूर्वीच्याही समाजाची घडण कुठून कशी निघाली याचा अभ्यास सबंध मानवजातीच्या एकात्मतेच्या ध्येयाला अत्यंत जरूरीचा आहे. त्याबाबत आम्हा मार्क्सवादी किंवा कम्युनिस्ट शास्त्राचे मूलभूत सिद्धान्तही आहेत. त्यांची व्याख्या मी इथे करू इच्छीत नाही. ती व्याख्या राजवाड्यांच्या वाचनात आली नाही. ते हेगेल व कॉम्ट-पर्यंत पोचले; पण हेगेलच्या निर्गुण परमतत्त्व-वादावरच राजवाडे थांबले. त्याच्यापुढे जाऊन फायरबॉख व नंतर मार्क्स-एंगल्स यांच्यापर्यंत जाण्याला त्यांना संधी मिळाली नाही म्हणा किंवा हेगेलियन परब्रह्माचे डायलेक्टिक्स व त्यातून निघणारें विरोधविकासशास्त्र पुरेसे समजून त्यांना पुढे सरकणे जमले नाही. म्हणून ते अद्वैत वेदान्तावर थांबले हे खरे. त्यांच्या 'विकार-विचार साधनांची उत्क्रांति ' या लेखामध्ये त्यांचे मन द्विधा झाले होते व अद्वैत वेदान्ताच्या जोडीला त्यांनी भौतिक शास्त्रालाही जागा देऊन ठेवली. ईश्वरकल्पनेच्या भ्रांतामधून सत्याकडे येण्यासाठी अद्वैत वेदांताच्या जोडीला अद्वैत प्रकृती अथवा गीतेमध्ये ज्याला ' परा प्रकृती ' म्हटले आहे तेथपर्यंत राजवाडे आले व तिथेच थांबले. मनुष्य-समाजाच्या प्राकृतिक व ऐतिहासिक द्वंद्वाची गती त्यांना सापडली नाही.

या एकमेवाद्वितीयं परमाणुमय पण अत्यंत शक्तिमान अशा पराप्रकृतीपासून राज-वाड्यांनी ब्रह्मांडरचनेचा व तज्जन्य समाजरचनेचा, भाषारचनेचा, वर्ण व जातिरच-नेचा एवढा इतिहास-प्रपंच उभा केला आहे की त्याची अद्याप नीट पहाणीसुद्धा कोणी केलेली नाही. हिंदूंच्या परंपरागत व प्रचलित समजुती व भावना यांना कशाला हात लावा असा संधिसाधु विचार करून किंवा राजवाडे हाच इतका कोण मोठा शहाणा की ज्याने पाणिनीला काही ठिकाणी समाज-इतिहास अवगत नसल्याने भाषाशास्त्रोद्भव अशा अष्टा-

ध्यायी अशास्त्रीय पद्धती अवलंबाव्या लागल्या असे म्हणण्याचे धाडस करावे असे विचारणारे काही विद्वानही आपल्यात निघाले.

परंतु ज्याला आपल्या भाषांचा, चालीरीतींचा, सामाजिक व ऐतिहासिक हालचालींचा, राज्यांचा, समाजपरिवर्तनाचा, भाषापरिवर्तनाचा, विचारपरिवर्तनाचा व वर्गबंधरचनेचा इतिहास लिहायचा असेल त्याला प्रथम मार्क्स-एंगल्स व त्याच्यासह राजवाडे-संशोधनाचा खजिना घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. हे काम आमच्या विद्वानांनी व मार्क्सएंगल्सच्या शास्त्रानुयायांनी करावे म्हणूनच हा विवाहसंस्थेवरचा ग्रंथ पुस्तक-रूपाने मुद्रित करण्यात आला आहे.

आपल्या देशाचा, समाजाचा, समजुतींचा, विचारविकारांचा, राज्ययंत्रविकासाचा इतिहास समजण्यास माझ्या मते प्रथम राजवाडे, नंतर कोसांबी व जायस्वाल यांचा आधार घेऊनच सुरुवात केली पाहिजे. अर्थात् या सर्वांचा मुकुटमणी राजवाडे यांना मार्क्स-एंगल्सच्या सिद्धान्तांच्या ' लेसर 'वत् तेजाच्या कोंदणात बसवूनच पुरुषसूक्तजन्य अशा या भुवनमंडळाचे नीट दर्शन घेतले पाहिजे.

या माझ्या विधानाने मी कुणाही इतिहासकाराची किंवा संशोधकाची कामगिरी कमी लेखू इच्छीत नाही. पण असा प्रश्न कां विचारू नये की इतक्या सर्व विद्वानांसमोर वेदादी ग्रंथ हजर असता, पाणिनी व पतंजली उभे असता, त्यांना राजवाड्यांचा विवाहसंस्थेच्या इतिहासाच्या मूलगामी सिद्धान्ताचा शोध कां लागू नये किंवा अर्थ कां सांगता येऊ नये ?

जाति-संस्थेचा इतका अचाट ऊहापोह व जाती मोडण्याची अफाट व न्यायभूत चळवळ करणाऱ्या विद्वानांच्या मनात घोळणारा जाति-संस्थेचा मूलगामी सिद्धान्त फक्त मार्क्स-एंगल्सनी सिद्ध केला आहे; पण त्याला परिपोषक व त्यांचे सिद्धान्त माहीत नसता तत्सम इतिहासाची मांडणी फक्त राजवाडे यांनीच केली आहे हे स्पष्ट आहे. याचे कारण इतकेच की आमची बरीच इतिहासकार मंडळी जर्मन, इंग्रज, अमेरिकन शोधकांच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय घेऊन इतिहास-शोधनात परभृताप्रमाणे प्रविष्ट झाली असे म्हटले तर कुणी राग मानू नये.

नाही तर वेद वाचणाऱ्या किंवा प्रत्यक्ष मनुस्मृतीने सुद्धा मान्य केलेल्या अनेक विवाहपद्धतींचा विचार करून आर्य समाजातील अनेक विवाहपद्धतींचे म्हणजे स्त्रीपुरुष लैंगिक संबधाचे विवरण कोणी कां केले नाही ? चतुष्पाद स्थितीतून द्विपाद स्थितीत अवतीर्ण झालेल्या या मनुष्य प्राण्याचे विकासशास्त्र डार्विनच्या पुस्तकाने कधीच करून टाकले होते. लेटुर्नोचे रानटी समाजातील लैंगिक संबंधांचे तसेच बॅशोफेनचे ग्रंथ आमच्या संस्कृतज्ञ सर्व विद्वानांसमोर आज अनेक वर्षे होते. त्यांनी त्याचा वापर करून राजवाड्यांनी जो हिंदू विवाह-संस्थेचा इतिहास १९२०–२३ साली लिहायला घेतला तो या इतरांनी कां नाही घेतला ? एवढेच नव्हे तर राजवाड्यांनी तो प्रश्न उचलताच त्यांच्या प्रकाशकाला मारण्याची धमकी देण्यात आली. प्रत्यक्ष जिच्या आधारे मालमत्तेचे अनेक तंटे इंग्रजी कोर्टात वकील मंडळी

लढवीत त्यांनी मनूच्या अनेक विवाहप्रकारांसंबंधी किंवा सगोत्रावरची बंदी, सपिंडाचा विचार इत्यादीकडे कां लक्ष दिले नाही ?

याचे कारण एकच की इंग्रज अमेरिकन-जर्मन ग्रंथकारांच्या ओंजळीनेच ज्ञानरस प्यायची सवय. संस्कृत कोशकार मौनियर विलियम्स मोठे, पण आमचे आपटे मात्र कश्चितात गण्य !

चतुष्पाद प्राण्यापासून द्विपाद मनुष्यप्राणी उत्पन्न झाल्यानंतर त्याची स्थित्यंतरे कशी काय झाली व त्याबद्दल प्राचीन आर्यांच्या शास्त्रात काय लिहिले आहे याचा मुळी आमच्या अनेक विद्वानांनी विचारच केला नाही. त्यामुळे आपली अद्यापही किती राजकीय, आर्थिक व वैचारिक हानी होऊन भाऊबंदकी माजत आहे ?

स्वतः राजवाडे यांनासुद्धा मराठी इतिहासाची, सरदार-इनामदारांच्या घरची, सडकी मळकी दप्तरे धुंडाळता धुंडाळता इतके आयुष्य खर्च करावे लागले की हिंदवी समाज विकासाचा व शास्त्राचा विचार करण्यासाठी फुरसत मिळत नसे. पण असामान्य व्यवसायात्मिका बुद्धी म्हणजे ' जीनिअस ' टाईपची, म्हणूनच या सर्वांतून ते रस्ता शोधून काढू शकले. पण ते करता करता अपुरेपणीच त्यांचा जीवनप्रवाह संपला.

या संबंधांचा विचार करण्यापूर्वी राजवाडे हिंदवी म्हणा किंवा आर्य किंवा हिंदू (हिंदू हे नाव कुठल्याही शास्त्रग्रंथात नाही व त्याची व्याख्याही नाही) यांच्या समाज व राज्य-रचनेचा विचार करण्यात गुंतले होते.

लैंगिक अथवा विवाहसंस्थेच्या ज्वलंत विषयाला हात घालण्यापूर्वी त्यांनी दोन तीन अत्यंत मूलगामी प्रश्न हाती घेतले होते.

एक म्हणजे वर्ण आणि जाति-संस्था आर्यांनी कुठे, कधी, कां व कशा निर्माण केल्या हा अत्यंत महत्त्वाचा व जिवंत विषय आहे. अस्पृश्य जातींच्या लोकांची आजची अत्यंत अपकृष्ट स्थिती पाहून त्यांची पूर्वेतिहासरचना करता येत नाही. उदाहरणार्थ, पूर्वी अनेक आर्यसमूहामध्ये वर्णांची आळीपाळीने बदली होत असे. काही काळ ब्राह्मण्यात प्रविष्ट झालेले शूद्र होत तर शूद्रवर्गीय ब्राह्मण होत. हा चक्री नियम काही काळाने बदलावा लागला. ज्या मनुष्यजातीला अग्नी कसा उत्पन्न करावा हे माहीत नव्हते, तो सापडताच त्यांची आर्थिक जीवनाची व साधनाची परिस्थिती बदलली. खूप मनुष्यबळ हे एक साधन. त्यासाठी खूप व बेबंद यमनक्रिया करून मनुष्यसंख्याबल उत्पन्न करून स्वसंरक्षण व वर्धन करणे हेच प्राथमिक लैंगिक संबंधाचे हेतू होते. नंतर रक्तबीजशुद्धीचे (इन्सेस्टचे) ज्ञान सामायिक प्रजोत्पादनाच्या परिणामांच्या अवलोकनाने झाले. तेव्हा मातापुत्र,भाऊबहीण वगैरे शरीरसंबंधांवर नियंत्रण घालून ते निषिद्ध करण्यात आले; पण त्यांचे अवशेष वेदातल्या यम-यमी संवादात व वर्णभेदरहित यमनक्रियावाचक क्षत्तापालागली संवादात, वेदोक्त यज्ञक्रियाबद्ध धर्मरक्षणाच्या नावाखाली आपल्या हाती पडले आहेत. त्याचा समाजशास्त्रासाठी प्रथमच राजवाडे यांनी उपयोग केला. नंतर आर्यसमाजाची संपत्ती, साधने व निसर्गसाधने वाढत गेली, पशुपालन वाढत गेले, तसे वेदकर्मांचे साफल्य म्हणजे प्रजापशवः उत्पन्न करणे. यज्ञाचा

म्हणजे समाजाच्या उत्पादन-वितरणकार्याचा, दानाचा, दैवी याचनेचा तो मुख्य विषय झाला. पुढे उत्पादनाची साधने वाढत वाढत अनेक वस्तूंच्या उत्पन्नाची हत्यारे व त्यांचे कौशल्य वाढविणे आवश्यक झाले तसतसे अनेक जाति-धंदेवाचक समाज-गट पडत गेले.

पण त्यांच्या परस्परसंबंधात अभेद्य असे भेद नव्हते. म्हणून वर्ण किंवा जाती बदलणे किंवा वर्णावर्णांतील लग्नांना वा संकरप्रजोत्पादनाला प्रत्यवाय नव्हता.

अशी ही वर्णसंस्था आपापल्या कर्मामध्ये कर्मसाधनेमध्ये व कर्मफलाच्या उपभोगामध्ये रत होऊन समाजाला संपन्न करीत राहिली. संततपणे तेच ते हत्यार व तेच ते काम अंगमेहनतीने करीत राहिल्याने कर्मफलाची निष्पत्ती वाढत गेली. निसर्गदत्त अन्नपाण्याचे सौकर्य अथवा वैपुल्य व कामाचे परंपरागत कौशल्य, त्यातून निर्माण होणारी संपत्ती यामध्ये काही काळाने वर्ण व जातिकर्मामध्ये बांधिलकी येणे अपरिहार्य होते. ते होता होता संकराची क्रिया बंद पाडण्याची प्रवृत्ती वाढली. चारही वर्णांच्या सर्वसकट विवाहपद्धतीवर बंधने आली. शेवटी संपत्तिसाधन व त्यासाठी अनुभवजन्य समाजनियमन यांमुळे वर्ण व जाती लखोटेबंद झाल्या. या आर्थिक व सामाजिक प्रक्रियेचा नियम मार्क्सच्या 'भांडवल' या ग्रंथात सांगितला आहे.

ही प्रक्रिया हिंदुस्तानच काय तर इजिप्त वगैरे परदेशातही पुरातन काली झाली होती.

उत्पादन व त्यांच्या साधनांची प्रगती झाल्यावर श्रमाची त्रैवर्णिक विभागणी जाऊन त्या जागी चातुर्वर्ण्य निर्माण झाले.

त्रैवर्णिकामधून चातुर्वर्ण्यात पोचण्याची क्रिया ही एक आर्य समाजातील क्रान्तीच होती. तिचे संपूर्ण वर्णन इथे करणे शक्य नसले तरी तिचा मुख्य गाभा जो राजवाड्यांनी दिला त्याचा सारांश देणे आवश्यक आहे.

या समाजसंस्थेचे वर्गनिष्ठ किंवा वर्णनिष्ठ कर्मविभागणीचे अत्यंत प्रभावी दर्शन राजवाडे यांनी पुरुषसूक्तावर जे भाष्य केले आहे त्यात मिळते. राज्य व वर्ण-वर्ग-संस्थेचे इतके पुरातन इतिहासलेखन जगाच्या कुठल्याही वाङ्मयात सापडणार नाही.

त्रैवर्णिक आर्य समाजाचा चातुर्वर्णिक समाज शूद्रागमनाने किंवा समन्वयाने झाला. या चातुर्वर्णिक क्रान्तिकारक घटनेमुळे आर्य समाजाची जी भरभराट झाली, पुनर्रचना झाली त्याची फोड स्वतंत्रपणे राधामाधवमध्येच संपूर्णपणे वाचणे योग्य होय. राजवाडे लिहितात : " त्रैवर्णिकांच्या समाजामधे एव्हापर्यंत शूद्राला आपले स्वतःचे असे हक्काचे स्थान नसे. ते हक्कांचे स्थान चातुर्वर्ण्य संस्थेच्या निर्मितीने शूद्रास कायमचे मिळाले. आजपर्यंत शूद्राला त्रिवर्णबाह्य अस्पृश्य व ओंगळ समजत. इथून पुढे तो चातुर्वर्ण्यान्तर्गत, स्पृश्य व सोंगळ समजला जाऊ लागला. चातुर्वर्ण्यात घेतल्यामुळे चातुर्वर्ण्याचे सामान्य धर्म पाळण्याची त्याच्यावर जबाबदारीही आली......तात्पर्य, चातुर्वर्ण्यात आल्याने शूद्राची रानटी स्थितीतून ग्राम्य स्थितीत बढती झाली. "

पण हा कायदा एकतर्फी नव्हता याचीही मांडणी राजवाड्यांनी केली आहे. " शूद्रानी

सर्व दासकर्म आटोपल्यामुळे स्वास्थ्य व फुरसत मुबलक मिळून वैश्यांना व्यापारधंद्याकडे, क्षत्रियांना देशसंरक्षणाकडे व ब्राह्मणांना विद्यावृद्धीकडे लक्ष देण्यास सापडून राष्ट्रांची चोहोंकडून भरभराट झाली. आफ्रिकन गुलाम मिळाल्यामुळे युरोपियन व अमेरिकन राष्ट्रांची गेल्या चारशे वर्षांत जशी अभूतपूर्व भरभराट व प्रगती झाली तशीच प्रगती उत्तर कुरूंतील आर्यांची शूद्रप्राप्तीने झाली. पुरुषसूक्तकार मोठ्या दिमाखाने व फुशारकीने सांगतो की विराटसंस्था स्थापन होऊन, चातुर्वर्ण्याची समाजपद्धत सुरू झाल्यापासून घोडे, गाई, शेळ्यामेंढ्या इत्यादि संपत्ती वाढून ऋक, यजुः, साम व अथर्व अशा चार वेदांचे उपबृंहण झाले आणि वैराज्य भोवतालील सर्व भूमी आक्रमून बसले." (राधामाधव. पान १४४–१४५).

त्याच्या पुढचे विवेचन पुढे पाहू. प्रथमतः निसर्ग, उत्पादनाचे हत्यार व मनुष्य आणि यातून उत्पादन झालेली वस्तू ही केवळ त्या मनुष्यसमूहापुरतीच वापरली जाई. हत्यार व कौशल्य यांची वाढ होऊन गरजेपेक्षा उत्पादन करण्याची क्षमता येताच दुसऱ्याकडून श्रम करून घेऊन, त्याच्या पोटापाण्यासाठी लागणारा हिस्सा ठेवून त्याच्यावरचा अतिरिक्त हिस्सा स्वतःचीच मालमत्ता करण्याची पद्धती निर्माण झाली. संभोगार्थ सामायिक उत्पादन अशी स्थिती होती तोपर्यंत वैश्य-शूद्र कर्म व त्यांच्याशी शरीरसंबंध व त्यांची प्रजा ही धर्मबाह्य नव्हती. तसेच त्यामध्ये बाह्य समाज येण्याची किंवा गुलामीसमान शूद्र जाती निर्माण होण्याची शक्यता नव्हती.

पण साधनांची व मनुष्यबलाची उत्पादक शक्ती वाढली तसे त्यामध्ये लढाईत किंवा इतर मार्गांनी सापडलेल्या टोळ्यांना आपल्या तंत्रांत किंवा वर्ण-जातिरचनेत आणून त्यांच्यावर "राज्ययंत्र-शक्ति" स्थापण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. समाजाच्या रचनेमध्ये जातिभेदांना केवळ कर्मभेदाचे जे स्वरूप होते व शूद्रीपासून ब्राह्मणाला झालेली मुले ही ब्राह्मणच समजली जात व शूद्रा-भार्यः असे ब्राह्मण कुटुंब असे ती पद्धत बंद पडली. नवी वर्ण व जातिसंस्था निर्माण झाली. जिच्यामध्ये पूर्वीचे नैसर्गिक व उपभोगहेतु-पूर्तीचे उत्पादनकार्यांमधले वर्ण-जातिसंबंध शास्त्रशुद्ध समजले जात त्यात फरक घडला. त्याची सुरुवात **शूद्रामध्ये दोन भाग** करून झाली.

राधामाधवचे हे विवरण इतके इतिहासदृष्ट्या अमोल आहे की त्याचे मूल्यमापन व संपूर्ण फोड इथे करणे कठीण आहे.

येथून मात्र राजवाडे यांच्या आणि मार्क्सप्रणीत सिद्धान्तांची फोड निरनिराळ्या रीतीने करणे भाग पडते.

हा नवा वर्गबद्ध किंवा नवशूद्र नववैश्य यावर आधारित वर्गीय समाज निर्माण झाला, **व प्रथम त्रैवर्णिक होता तो चातुर्वर्णिक झाला.** वर्ण व जाति यांचा पूर्वीचा सामाजिक सरमिसळ संबंध बदलून संकराची प्रक्रिया निषिद्ध मानली जाऊ लागली. एवढेच नव्हे तर पूर्वीचे जे समसमा शूद्र त्यामध्ये दोन भेद पडले. एकाचे नाव पडले **अवसित** शूद्र व

दुसऱ्याचे नाव पडले **निरवसित** शूद्र. अवसित तर अद्याप आर्यांच्या वर्णजातींच्या सत्तेमध्येच बसायला तयार नव्हता. तो समाजबाह्य ग्रामसंस्थाबाह्य, होता; कारण त्याचा स्वतंत्र समाजच इतका शक्तिमान होता की तो आर्यांच्या चातुर्वर्ण्याच्या श्रमविभागणीत बसायला तयारच नव्हता.

त्याचबरोबर निरवसित शूद्र ही आपापल्या कर्मकौशल्याच्या बळावर ब्राह्मणाशी, क्षत्रियांशी लग्न लावून त्यांच्याच घरात मळ्यावर अथवा खळ्यावर काम करून ब्राह्मण-क्षत्रियांच्या संसारात व गोतवळ्यात राहून वरच्या वर्णामध्ये किंवा तत्समान स्थितीमधे उभा राहू लागला होता. एवढेच नव्हे तर संपत्तीच्या वाटणीमधे त्याचा हिस्साही ठेवला जात होता. ही हिस्सेवाटणी मनूला सुद्धा मानावी लागली हे त्याच्या स्मृतीमध्ये नमूद आहे.

पण हे थांबणार कुठे ? ही श्रमाची समाजविभागणी निरवसितांच्या आगमनाने व साहचर्याने बिघडू लागली. त्यात आणखी खाजगी मालमत्तेच्या वाढीने समाजामध्ये वर्ण-जाती व वर्गविग्रहाचे काहूर उत्पन्न झाले. ब्राह्मण-क्षत्रियांमध्ये कळपावरून, संपत्तीच्या वाटणीवरून युद्धे होऊ लागली. तेव्हा हे परस्थ " अवसित ", ज्यात नुसते शूद्रच नव्हते, त्यांची आर्य समाजात नव्या शास्त्रबंधनावर आधारलेली रचना करणे आवश्यक झाले. त्या प्रक्रियेमधूनच व संघर्षातून **राज्यसंस्था** निर्माण झाली व दंडधारी राज्ययंत्र अस्तित्वात आले. महाभारतातील उल्लेखिलेली " रक्तानुबंधी " समाजरचना जाऊन राजदंडनियमनबद्ध प्रदेशानुबंधी समाज अथवा राज्य निर्माण झाले. या राज्यसंस्थेचे अनेक प्रकार होते; पण त्यामुळे संपत्तिसाधन, श्रमविभाजन व परस्पर-उत्पादन-संबंधांचे नियमन हे सोपे झाले. त्यामुळे प्रथम आर्य समाजाचा झपाट्याने विकास झाला. समाजविघातक संघर्षाला आळा बसला. ही प्रक्रिया ग्रीक समाजात कशी झाली व तिचे मूलभूत तत्त्व काय हे एंगल्सच्याच पुस्तकाने समजू लागते.

राजवाड्यांनी पुरुषसूक्ताची व निरनिराळ्या राज्यघटनांची जी फोड केली आहे तिला आपल्या देशातील इतिहासलेखनात जोड नाही. जायस्वाल यांनी आपल्या ग्रंथात हा विषय गणसंघरचना या सदरात घेतला आहे. पाणिनीकालीन राज्य-संस्थांच्या प्रकाराची वर्णनेही दिली आहेत. वार्तोपजीवीसंघ, आयुधोपजीवी संघ इत्यादी राज्यघटना यामध्ये प्राचीन हिंदुस्थानातील किंवा आर्यसमाजातील राज्यरचनेचा मोठा गंभीर व अर्थपूर्ण इतिहास आहे; परंतु आमच्या शिक्षणक्रमात किंवा ज्ञानार्जनात इंग्रज, फ्रेंच अमेरिकन व आता भारतीय घटनांची त्यांच्या उपसूचनांची चर्चाच काय ती केली जाते. एवढेच नव्हे तर खाजगी मालमत्तेची मालकी व वर्ण व जातिसंस्था प्राथमिक अवस्थांत असताना जेथे दमनधर्मी अथवा दंडधारी राज्ययंत्र नव्हते अशा समाजाची कल्पनाही आमच्या इतिहासाच्या शिकवणुकीत येत नाही. अर्थातच अशा शिक्षणावर राजवाडे किंवा कोसांबी किंवा जायस्वाल यांच्या व यांच्यावर शास्त्रशुद्ध कळस चढविणाऱ्या मार्क्स-एंगल्स यांच्या सिद्धान्ताचा काय प्रकाश पडणार ?

इतिहासदृष्टीची गरुडझेप

राजवाड्यांच्या इतिहासदृष्टीची गरुडझेप इतकी मोठी होती की पाणिनीच्या व्याकरणाचीही फोड अथवा विवरण करताना त्यांना विकासक्षम समाज व विकासबद्धतेच्या पायऱ्यापायऱ्याने परिवर्तित होणारा माणूस दिसत असे. त्यांच्या सगळ्या कार्यांचे ध्येय व केंद्रबिंदू **माणूस** हा असे. त्यांचे यमन, संवर्धन, धनसंपादन, समाजविभाजन, व्यक्ती, कुटुंब व समूहसंबंधांचे शास्त्रशुद्ध वाचन करणे ह्याचेच त्यांना वेड असे. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये अस्मद्-युष्मद् ची रूपे करताना सात विभक्त्यांची एकवीस रूपे साधण्यासाठी त्याला तेवीस सूत्रे रचावी लागली (' संस्कृत भाषेचा उलगडा ' पान ६२); कारण पाणिनीला पूर्वसमाजाच्या मिश्रणाचे व समन्वयाच्या घटनेचे ज्ञान पाहिजे तितके नव्हते असे राजवाड्यांनी म्हटल्यामुळे अनेक व्याकरणशास्त्री त्यांच्यावर उखडले. अनेकांनी राजवाडे-खंडनाचे लेख लिहिले आणि प्रश्न विचारला की व्याकरणाचा आणि समाजशास्त्राचा संबंध काय ? एका विद्वानाने तर राजवाड्यांना पाणिनी कळला नाही; कारण अमेरिकन व जर्मन भाषाशास्त्रज्ञांनी व वैय्याकरणानी तयार केलेल्या नव्या शास्त्राची त्यांना माहिती नव्हती असे म्हटले ! अशा विद्वानांची ज्ञानसंपादनाची पिल्ले " अन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयन्ति " असे म्हटल्यास कोणी राग मानू नये. येथे हे लक्षात ठेवायला पाहिजे की राजवाड्यांना पाणिनीबद्दल अत्यंत आदर होता व त्याला व्याकरणाचा " भगवान सूर्य " ही त्यांनी म्हटलेले आहे. एका व्याकरणसूर्याने दुसऱ्या व्याकरणसूर्याशी भांडणे शोभते तरी. परंतु परभृत विद्यासंपन्न खद्योतानी या दोन सूर्यांच्या भांडणात पडून स्वतःला भस्मसात् करून का घ्यावे ?

" संस्कृत भाषेचा उलगडा " या ग्रंथातील अस्मद्-युष्मद्चा ऊहापोह, नपुसकलिंगी शब्दातील म् व इ प्रत्यय कुठून आले याची उपपत्ती सांगताना राजवाडे म्हणतातः रानटी आर्यांपैकी एक समाज एक ही संख्या स्वतः जो हम् म्हणजे आपण त्याने दाखवी व दोन ही संख्या निराळा जो त्वि त्याने दाखवी. म् व इ प्रत्ययांची वचने दाखविणारा समाज कोकण्यांच्याप्रमाणे किंवा फ्रेंचांच्याप्रमाणे किंवा डोंगरी भिल्लांच्याप्रमाणे आपली सर्व बोली नाकातून अनुनासिक बोले. ह्या अनुनासिकप्रधान समाजाचा निरनुनासिक समाजाशी जेव्हा मिलाफ झाला तेव्हा नाकातून अनुनासिक उच्चार करणाऱ्या समाजाचे उच्चार पेंद्रू ठरून त्यांच्या शब्दांची व प्रत्ययाची नेमणूक नपुंसक खात्यात झाली व केवळ पुल्लिंगी बोलणाऱ्या समाजाच्या बोलण्यात पुं व नपुं अशी द्विलिंगी भाषा येऊ लागली. संस्कृत पाणिनीय व वैदिक भाषेत नपुंसकलिंगाच्या प्रवेशाची ही अशी हकीकत आहे.'' (' संस्कृत भाषेचा उलगडा ' पान ६१).

महाराष्ट्रात आता या घडीला कोकणी-मराठीचा जो वाद चालविला जात आहे तसाच पूर्वी वैदिक व पाणिनीय अशा दोन समाजांत होऊन त्यातून ही तडजोड निघाली असे

राजवाड्यांनी म्हटले तर जर्मन-अमेरिकन पदवीधारक विद्वानांना राग कां यावा हे समजत नाही.

खरे म्हणजे व्याकरण हें मनुष्यप्राण्याच्या भाषेचे शास्त्र आहे. मनुष्य हा एक प्राणी आहे पण त्याला भाषा आली म्हणून तो इतरांहून निराळा झाला असे महाभारततला एक शृगाल एका ब्राह्मणाला सांगतो. म्हणून व्याकरणाची फोड करताना समाजशास्त्राचा वापर राजवाडे शास्त्रशुद्ध रीतीने करून जे पाणिनीला उकलले नाही त्याची उकल करतात. याबाबत एके ठिकाणी ते जे लिहितात ते लक्षात ठेवणे अत्यंत जरूर आहे म्हणून त्याचा उतारा इथे देणे आवश्यक वाटते.

पाणिनीची अनैतिहासिक दृष्टी

" सर्वनामस्थान, स व पद यांच्या बाबीत मूळ प्रतिपादिका पासून अंगे तयार करण्याकरिता शेकडो ठिकाणी नवीन नवीन सूत्रे रचावी लागली आहेत. ह्या सूत्रांच्या जाळयातून वाट काढता काढता नवशिक्या व जूनशिक्या अशा दोन्ही विद्यार्थ्यांचे पंचप्राण कासावीस होतात; इतकेच नव्हे तर ठणठणीत कोरडे होतात. देव शब्दांची देव, देवा, देवे ही अंगे होतात किंवा तस्थिवस् शब्दांची तस्थिवत्, तस्थुष् व तस्थिवांस् ही अंगे होतात ह्या सूत्रावरून विद्यार्थी जाणतो. परंतु आगम कां होतात, आदेश कां होतात, अंगे कां बदलतात हे पाणिनी सांगत नसल्यामुळे, शास्त्राध्ययनापासून मतीला जी प्रगतिशीलता व जो जागतेपणा यावा तो येत नाही, यांचे कारण इतिहासदृष्टीचा पूर्ण अभाव. वैदिक भाषा ही देवांची असून ती अर्थात् अनादि आहे अशी पाणिनीची विचित्र समजूत होती, यात मोठेसे नवल नाही. नवल दुसरेच आहे. वैदिक भाषेपासून संस्कृत भाषा निघाली या अर्थाचा एक शब्द किंवा एक ज्ञापक संबंध अष्टाध्यायीत एकही नाही. वैदिक भाषेचा संस्कृत भाषा हा अपभ्रंश किंवा विपरिणाम आहे ही सुद्धा कल्पना पाणिनीला शिवलेली नाही. शुद्ध प्रयोग विद्यार्थ्यांना कळावेत म्हणून पाणिनीने सूत्रे रचली. तत्रापि वेदात येणारे आर्ष प्रयोग व भाषेत येणारे लौकिक प्रयोग दोन्ही सारखेच शुद्ध आहेत असे तो मानी. छांदस प्रयोग विचित्र दिसला तर छंदसि बहुलं म्हणून वेदातील अशुद्ध नव्हता; पण हेंगाड्या रूपासंबंधाने पाणिनी तिरस्कार व उपहास न दाखविता उलटा आदर दाखवितो. या इतिहासांधतेमुळे वेदांच्या पाठीमागे जग नव्हते व काल नव्हता इत्यादी प्रगतिविरोधक कल्पना समाजात प्रचलित झाल्या आणि भावी कालासंबंधाने तुच्छता वाटू लागली. पूर्ववैदिक अनेक भाषा, वैदिक भाषा, पाणिनीय भाषा, प्राकृत भाषा व मराठी प्रभृती प्राकृतिक भाषा ही चढती वर्धमान श्रेढी आहे ही कल्पना यावयाची ती न येता, ही उतरती क्षीयमान श्रेढी आहे अशा विपरीत कल्पनेने समाजाचे मन भारून व उदासीन होऊन गेले. इतिहासदृष्टीच्या अभावापासून समाजाचे केवढे घोर नुकसान होते त्याचे पाणिनीय सूत्रे नामांकित उदाहरण आहे. " (" संस्कृत भाषेचा उलगडा " १९२० ची प्रत, पान ५३).

शब्द किंवा वाक्यप्रक्रियेतून समाजाचा इतिहास दाखविण्याची राजवाड्यांची दृष्टि किती सखोल व विशाल आहे याचे आणखी उदाहरण म्हणजे अभिवादन व प्रत्यभिवादनाच्या प्रकारांचा जो विकास व ऱ्हास झाला त्याची राधामाधवमधील चर्चा पहावी (पान १३६–३७). पाणिनीकालीन अभिवादनाचा प्रकार, त्याच्यानंतर पाच सहाशे वर्षांनी झालेल्या कात्यायनाच्या सूत्रांतील बदललेला प्रकार आणि कात्यायनानंतर दोनशे वर्षांनी झालेल्या पतंजलीच्या सूत्रातला प्रकार या तिहींची तुलना करून स्त्रियांचा दर्जा कसकसा उतरत गेला व तो आणि वैश्य व काही ब्राह्मण सुद्धा शूद्रत्वापर्यंत कसे पोचले याची फोड राजवाडे करतात. त्या व्याकरणशास्त्राची व इतिहासशास्त्राची जी फोड त्यांनी केली त्याची महती अद्याप आपल्या इतिहासकारांना, भाषाशास्त्रज्ञांना व समाजसुधारकांना अवगत झालेली दिसत नाही. व्याकरणातून समाजाचा विकास अथवा ऱ्हास पहाणे हे मोठे अवघड काम आहे. त्यासाठी राजवाडे-दृष्टीच लागते आणि अशी त्यांची थोरवी पहाण्यात विद्वानाना मत्सर न वाटून त्यांनी त्या थोरवीचा उपयोग आपल्या देशाचा, समाजाचा व वर्गांचा इतिहास लिहिण्यास उद्युक्त व्हावे म्हणजे त्याचा लाभ प्रगत जगालाही मिळेल.

पुराणगत इतिहासकथन

संस्कृतमधील पुराणे आणि ग्रंथ यांना इंग्रजी राज्यकर्त्यांनी भाकडकथा म्हणून नाव दिले. त्याचा प्रभाव आपल्या येथील अनेक विद्वानांवर अद्याप आहे. पुराणग्रंथातील उल्लेख व कथा अद्भुतमय रंगात सांगितल्याही आहेत; पण त्यामध्ये इतिहाससत्याचे मूळ आहे व त्यावर भ्रामक समजुतींचा डोलारा तत्कालीन लेखकानी आधुनिक शास्त्राच्या अभावी रचला हेही खरे आहे. या डोलाऱ्यात इतिहाससत्याचा अंशही नाही ही समजूत आता रद्द ठरली आहे. इजिप्तच्या पिरामिड स्तंभामध्ये अनेक भाकडकथा किंवा पुराणसमजुतींच्या मजकुरामध्ये सत्य इतिहासाचीही गुंफण आहे हे मान्य झाले आहे. तशीच मध्यआशियातील असीरिया बाबिलोनच्या मातीच्या ग्रांथिक विटासंग्रहामध्येही इतिहासाची गुंफण सापडते.

पण संस्कृतपुराणाच्याबद्दल ही स्थिती यायला फार प्रयास पडले; कारण. आमच्या राज्यकर्त्या साहेबानी त्यांना तसे सर्टिफिकेट दिले नव्हते.

पुराणातील अनाडी कल्पना बाजूला सारल्या तर त्यात इतिहास किती तरी सापडतो. आता अनाडी कल्पनांत किंवा भारुडात इतिहास कां दडविला असे कुणी विचारील तर त्याला उत्तर पूर्वकाळातील समजुतींच्या अरण्यात शिरावे लागेल. परमेश्वर हा मोठा गणिती व्यक्ति किंवा शक्ति आहे असे जर मोठमोठे इंग्रज शास्त्रज्ञ १९३० मध्ये जागतिक सायन्स काँग्रेसपुढे म्हणू शकतात तर पाच हजार वर्षांपूर्वीच्या अडाण्यानी वेद व पुराणग्रंथांतून समाजशास्त्र व इतिहास सांगताना अडाणी उपरणी किंवा पगडया घातल्या तर बिचकून जाण्याचे कारण काय ? राजवाडे शास्त्रज्ञ या नात्याने उपरणे, पगडी वगैरे बाजूला सारून

भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास लिहू लागले तेव्हा पाराशराने सत्यवतीशी उघड संभोग केला हे विधान करण्याऐवजी जुन्या लेखकाला लाज वाटून त्याने धुके निर्माण करून त्या प्रकारावर काव्यमय पांघरूण घातले व ते बाजूला सारून खरा प्रकार शास्त्र-शोधक राजवाड्यांनी सांगितला तर फार झाल्यास अडाण्यानी रागवावे; पण सर्व पंडितांनी, विद्वानांनी राजवाड्यांना आतापर्यंत मारण्याचा किंवा अज्ञातात फेकण्याचा प्रयत्न केला त्याला काय म्हणायचे ?

अशा परिस्थितीत " हिस्टोरियन्स हिस्टरी ऑफ दि वर्ल्ड " या ग्रंथातील राजवंशांच्या जनसमूहांच्या नामावळ्या घेऊन राजवाडे यांनी " आमची पुराणे व असीरियातील नवे शोध " या लेखाने युरोपियन इतिहासकारांचे अज्ञान खोडून काढले व हिंदुस्थानच्या अतिप्राचीन इतिहासाचा एक प्रचंड व नावीन्यपूर्ण खंड उघडून दाखविला. तरीपण विष्णु-पुराण व इतर आधार दाखवूनही आमचे तज्ज्ञ शिक्षणखाते या इतिहासाला आमच्या शिक्षणक्रमात जागा देत नाही. याचे कारण ते स्वतः जरी अज्ञान नसले तरी शिक्षणाचे तंत्र ठरविणारी नोकरशाही अद्याप अंधारात व युरोपीय तज्ज्ञजन्य कुहरातच अडकलेली दिसते.

मनुष्यसमाज निर्माण झाला तेव्हा समाज या संस्थेची रचना करणे, तिचे नियमशास्त्र तयार करणे हे अपरिहार्यत्वाने येतेच व तिथूनच समाजरचनेचे, कुटुंबरचनेचे, परस्पर-संबंधांचे व नंतर राज्यसंस्थेच्या स्वरूपाचे व घटनेचे तंत्र किंवा शास्त्र सुरू होते. मूर्धा-भिषिक्त दंडधारी राजा ज्यात नाही अशी गणराज्ये, वैराज्ये, द्वैराज्ये इत्यादी अनेक घटनांचे प्रकार आपल्या देशात झाले. आजची आपली राज्यघटना ही जणू काय अत्यंत अननुभूत व अपूर्व संस्था आपण निर्माण केली आहे व त्यात अनेक दुरुस्त्या करून काय नवे ब्रह्मांड निर्माण केले आहे असे अनभिज्ञ तरुण व वृद्धांना सांगणाऱ्या मंत्रिगणाला सूचना करावीशी वाटते की चालू वर्गकलहात, धर्म व जातिकलहात आपण जी कामगिरी केली ती स्वागतार्ह आहे हे खरे असले तरी हजारो वर्षांपूर्वी सुरू झालेल्या व अनेक शतके टिकलेल्या राजसंघटनांचा जो इतिहास राजवाडे, जायस्वाल यानी मांडला आहे तो लक्षात घेऊनच चालू परिस्थितीच्या अभिमानाची व कामगिरीची चौकट त्यात बसवून मगच ऐतिहासिक दृष्टीने तसेच योग्य अभिमानदृष्टीने वागावे. आमच्या राज्यकर्त्यांना हे इतिहासवाचन सक्तीचे करावे व वर्गात बसवून (अत्यंत गुप्त कॅबिनेट चेंबरमध्ये का होईना) त्यांची परीक्षा घ्यावी असे राजवाडे यांनी नक्की सुचविले असते. घटनाशास्त्राला ऐतिहासिक, जानपदिक व वर्गीय दृष्टिकोण दिल्यावाचून जनतेची त्याबाबतची मान्यता अथवा अभिमान अथवा समज ही कृत्रिम व ढोलकबाजीला मान तुकविणाऱ्यासारखी होण्याचा धोका असतो. म्हणूनच आम्ही म्हणतो की राजवाडे, कोसांबी, जायस्वाल यांचे ग्रंथ वाचणे हे सर्वमान्य करून घेतले पाहिजे. तसेच त्याला एंगल्सची अखेर जोड दिली पाहिजे. हे शेवटचे विधान सध्या मान्य नसले तर तात्पुरते बाजूला ठेवावे; पण प्रथम ऐतिहासिक दृष्टीचा विकास करून घ्यावा. मग एंगल्सवर पोचणे आपोआपच येईल असा

आमचा इतिहासजन्य अनुभव व विश्वास आहे. दुराग्रह नाही.

मराठी धातुकोश

शास्त्राची चर्चा करताना किंवा तद्विषयक ग्रंथाची पहाणी करताना, दुरभिमान, मत्सर, असूया इत्यादि भावनांना जागा देणे योग्य नसते, तसेच शास्त्रशुद्ध नसते. पण राजवाडे यांच्या बुद्धितेजाने व ज्ञानसंपन्नतेने जे दिपून गेले ते वरील अनेक मानसिक रोगानी पछाडले गेले होते. त्यांच्या मरणोत्तर त्यानी रचलेल्या मराठी धातुकोशाला मारण्याचा जो काही लोकांनी प्रयत्न केला त्याची आठवण ठेवणे जरूर आहे. पाणिनीने वाटल्यास संस्कृतचा धातुपाठ लिहावा. ज्ञानकोशाची रचना करताना डॉ. केतकरांचे व त्यांच्या सहायकांच्या नाकी नव आले व शेवटी ते दारिद्र्यात मेले, असे असता स्वत:च्या एकट्याच्या मेहनतीवर मराठी धातुपाठ तयार करणारा हा प्रतिपाणिनी कोण अशीही मत्सरग्रस्त पृच्छा झाली. विशेष म्हणजे पाणिनीच्या धातुपाठांची संख्या दोन हजारापर्यंत आहे तर राजवाडे यांच्या मराठी धातुपाठांची संख्या जवळजवळ सोळा हजार भरली. कोणतीही कमिटी न करता किंवा सरकारदरबारीच्या लाखोंच्या देणग्या न मिळता या फाटक्या मनुष्याने एकट्याच्या विद्वत्तेवर एवढा मोठा मराठी धातुपाठ करणे शक्यच नाही व केलाच असला तर तो रद्दीमय असावा हे नक्कीच, तेव्हा तो टाकून द्यावा अशीही काही विद्वानात बोलवा झाली होती. पण शेवटी एक कमिटी नेमून जांच-पडताळा होऊन हा खरोखरच धातुपाठ आहे असे सिद्ध झाले. शेवटी श्री. कृ. पां. कुलकर्णी या विद्वान गृहस्थांनी तो संपादन केला व धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळाने छापून प्रसिद्ध केला ही एक ऐतिहासिक व अभिनंदनीय गोष्ट घडली.

पण हे काम अद्याप संपूर्ण झालेले नाही. धातु देताना पूर्ववैदिक, वैदिक, पाणिनीय संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व चालू मराठी इतक्या भिन्नभिन्न स्वरूपात हे धातु कसे आढळतात व त्यांचा वाङ्मयीन वापर कसा झाला व स्थित्यंतरे कशी झाली एवढा मोठा प्रपंच दाखविण्याचा राजवाडे यांचा बेत होता; पण ते काम पूर्ण करण्यास आणि एकट्या-च्याने करण्यास त्यांना वेळ मिळाला नाही. आता हे काम कोणते भाषाशास्त्रज्ञ अंगावर घेतील ते पाहायचे. फडतूस ग्रंथासाठी लाखोंची अनुदाने देणाऱ्या आमच्या सरकारला या ग्रंथाची महती काय हे समजायला किती वर्षे जावी लागतील किंवा स्थित्यंतरे होतील कुणास ठाऊक ?

या विषयाचे सामाजिक महत्त्व समजावे म्हणून श्री. कुलकर्णी यांच्या प्रस्तावनेतील एक विधान येथे देत आहे. "एखादा समाज सुधारणेच्या कोणत्या अवस्थेत आहे हे पहावयाचे झाले तर त्या समाजाची भाषा पहावी. त्यातही पुनः तिचा शब्दसमूह पहावा, त्यातही पुनः तिचा धातुपाठ पहावा. अशा रीतीने धातुपाठाचे मानवशास्त्रात किती महत्त्व आहे हे कळून येईल." ["राजवाडे मराठी धातुकोश प्रस्तावना" पान ११].

अशा या मराठी धातुपाठाची रचना करणाऱ्या आचार्यांची महती वर्णन करावी तितकी थोडीच. राजवाडे यांचा स्वभाव, चरित्र, विद्वत्ता, विचारपद्धती यांचे वर्णन करायचे तर धातूंना जे सूत्र लावले आहे तेच त्यांना लावावे लागेल. सतत पुरोगामी गतिमानता हाच त्यात स्थायीभाव होता. "गत्यार्थास्तेज्ञानार्थाः"

हिंदु समाजात हिंद्वितरांचा समावेश

राजवाडे यांच्या विचारप्रणालीची संक्षेपाने मांडणी करणे अवघड काम आहे. त्यांच्या "हिंदु समाजात हिंद्वितरांचा समावेश" या लेखाची वर्ण व जातिभेदाच्या चर्चेला, ती मोडण्याच्या चळवळीला व या चळवळीत आज जी द्वेषभावना येते तिला सौम्यत्व आणून तिला वर्गीय व शास्त्रीय दृष्टीने नष्टभूत करण्याचे काम सुकर होण्यासाठी मार्क्सवादी समाजशास्त्राच्या जोडीला बरीच मदत होण्यासारखी आहे. वर्ण व जातिसंबंधांची उत्पत्ती, उत्पादनाची हत्यारे व तज्जानित समाजसंबंध या सिद्धान्ताच्या पूर्ततेला राजवाड्यांचा हा निबंध अत्यंत उपकारक ठरतो. हिंदूंच्या ग्राम व समाज-रचनेचा विचार करताना राजवाडे म्हणतात : "ग्राम किंवा नगर म्हटले म्हणजे ते अठरा पगड जातीखेरीज इतरांचे बनलेले नसे. प्रत्येक धंद्याची स्वतंत्र जात असून त्या जातीचे ग्राम बने. प्रत्येक जात ही आपापल्या धंद्याची वतनदार होती. ज्याला वृत्ती म्हणजे वतन नाही असा मनुष्य ग्रामात हक्काने राहू शकत नसे. इतर ग्रामातून कोणी बेकार आर्य मनुष्य ग्रामात राहण्याची इच्छा करू लागला तर ग्रामातील वृत्तिवंतांची म्हणजे वतनदारांची ग्रामसभा भरून त्यांनी एकमताने— बहुमताने नव्हे— परवानगी दिली तर त्याची स्थापना गावात होई व तीही उपरी म्हणून होई. उपरीचा मिरासी म्हणजे पिढीजात ग्रामस्थ होण्यास कित्येक पिढ्या जाव्या लागत. ही कथा आर्य उपरींची झाली.

"अनार्य लोकांचा समावेश ग्रामसंस्था काही विशेष संस्कार झाल्याखेरीज होऊ देत नसत. अनार्य दोन प्रकारचे असत. एतद्देशज अनार्य व बहिर्देशज अनार्य. एतद्देशज अनार्यांत नाग, कोल, भिल्ल, गोंड पुक्कस, कातकरी, ठाकुर वगैरे लोक येत. बहिर्देशज अनार्यांत शक, यवन, पारसीक, बाल्हिक, मुसलमान वगैरे लोक येत. नाग, कोल व राक्षस हे या देशात आर्यांच्या पूर्वीचे लोक होत. आर्यावर्तात व दक्षिणारण्यात व अपरान्तात ग्रामसंस्था जेव्हा केल्या तेव्हा या एतद्देशज अनार्यांना ग्रामसंस्थेत कोणते स्थान कसे द्यावे याचा विचार पडला. या विचारातून सुरक्षितपणे पार पडण्यास आर्यांचा पूर्वीचा एक प्रघात उपकारक झाला. गुणानी व कर्मांनी भिन्न इसमांचे निराळे वर्ण करण्यास आर्य फार पुरातन कालापासून शिकले होते. ह्या शिक्षणाचा ऊर्फ सतत मनःप्रवृत्तींचा परिणाम चातुर्वर्ण्य होय.

"चातुर्वर्ण्यातील चारी वर्ण बीजक्षेत्राने पृथक् होण्यापूर्वी अनुलोम व प्रतिलोम संबंध घडत. त्या संबंधापासून जी प्रजा निर्माण होई तिला तीन पिढ्यांनी किंवा पाच पिढ्यांनी

किंवा सात पिढ्यांनी मूळ पित्याच्या वर्णात परत जाता येई.

" पण संकरज प्रजेची संख्या वाढून त्यांचे आपसातील मायेचे कौटुंबिक संबंध वाढता वाढता त्याची पित्याच्या वर्णात जाण्याची गती थांबली व संकर जाती स्वतःच्या संघटनेत, वृत्तीत व धंद्यात स्थिर झाल्या.

" ज्या समाजाची वृत्ती, फक्त बीजक्षेत्राचा व्यवहार त्या समाजातल्या समाजात होऊन जाते, अन्य कोणत्याही रीतीने होत नाही त्या समाजास जाती म्हणतात. जाती फक्त जन्माने प्राप्त होते. इतर कोणत्याही तऱ्हेने प्राप्त होत नाही. जातिसंस्थेने एक कार्य अगदी बेमालूम होते ते हे की बीजक्षेत्राची शुद्धी परिपूर्ण राहते व जिवलगांची ताटातूट होत नाही. संकरांच्या वर्णोन्नतीचा प्रश्न सोडविता सोडविता आर्यांना ही जातिसंस्था निर्माण करण्याची क्लृप्ती सुचलेली आहे. तीच क्लृप्ती एतद्देशज अनार्य समाजाची स्थापना ग्रामसंस्थांत करताना आर्यांनी अमलात आणली. त्या त्या अनार्य समाजांची आर्यांनी स्वतंत्र जात म्हणून गणना केली.

"संकरांची व्यवस्था करण्यात जातिसंस्थेची कल्पना सुचली आणि ती कल्पना आर्यांनी अनार्य समाजांना लावली. इतकेच नव्हे तर स्वतःच्या चातुर्वर्ण्य संस्थेलाही लाविली. संकरातून बीजक्षेत्र-शुद्धी झाल्यावर व्यक्तींना चातुर्वर्ण्यातील कोणत्याही मूळवर्णात परत जाता येत असे तसेच चातुर्वर्ण्यातील कोणत्याही खालच्या वर्णाच्या व्यक्तीला गुणकर्मांचा उत्कर्ष साधल्यास म्हणजे तपश्चर्या केल्यास ब्राह्मणवर्गात प्रविष्ट होता येत असे. जातिसंस्थेची कल्पना सुचल्यावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चारी वर्णही जाती बनले. सध्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण असून शिवाय चार जातीही आहेत. खेरीज सुतार, चांभार, शूद्र, लोहार, सोनार वगैरे स्थिर झालेल्या संकर जातीही आहेत. शिवाय नाग, कोल, राक्षस वगैरे एतद्देशज अनार्यांच्या संस्कारापासून झालेल्या अंत्यज व बाह्य जाती झाल्या त्या वेगळ्याच.

" एतद्देशज अनार्य असोत की बहिर्देशज अनार्य असोत, हिंदुस्थानात त्यांना कायमचे रहायचे म्हणजे जात बनूनच हिंदुसमाज राहू देत असे. म्हणजे अनार्यबाह्य समाजाला जात बनवून त्याचा समावेश हिंदुसमाज आपल्यात करून घेत असे. जात बनल्याशिवाय नागरिकत्वाचे किंवा ग्रामस्थाचे हक्क मिळत नसत. म्हणजे स्थानिक स्वराज्याच्या व साम्राज्याच्या छत्राचा आश्रय मिळत नसे. हिंदुसमाजात बाह्यांचे राजकीय समावेशन जातीचे रूप घेतल्यानंतर होत असे. बाह्यजातिसंस्था झाले म्हणजे त्यांना त्यांच्या अनुरूप वृत्ती मिळून किंवा धंदा मिळून हिंदुसमाजात व हिंदुदेशात देशातील राज्यछत्राखाली सुखरूप राहता येत असे. अशी जाती देशात फार काल राहिली, येथील अभिजन बनली व हिंदुसमाजाचे सामान्य धर्म पाळू लागली म्हणजे त्या जातीला हिंदू हे अभिधान प्राप्त होई. नंतर त्या जातीचा जो देव असेल त्याची स्थापना हिंदूंच्या तेहतीस कोटी देवतामंडळात होऊन, पूर्ण हिंदुत्वाचा शिक्का त्या जातीवर कायमचा बसे."

जातिसंस्थेच्या उत्पत्तीची, विकासाची व स्थैर्याची जी परंपरा राजवाडे यांनी वर्णन केली त्यामध्ये मुख्य बिंदू वृत्ती हा आहे. वृत्ती बांधून देणे म्हणजे काय हा खरा प्रश्न आहे. वृत्ति-सामर्थ्याच्या रचनेवर आधारलेला जो समाज तो जातिबद्ध समाज. जात आणि वृत्ती ही जोडी साऱ्या समाजरचनेची फ्रेम आहे. त्याचा मूळ पाया म्हणजे वृत्तिकाराला म्हणजे जाति कुटुंबाला गावाभोवती जमिनीचा एक भाग मिळे, शिवाय त्याची समाजोपयोगी वस्तू उत्पन्न करण्याची हत्यारे असत. ती त्याच्याजवळ असत आणि त्यांच्या वापरातून म्हणजे त्याच्या श्रमातून त्याला इतर जातिवाचक समूहांच्या श्रमाचे फल गावांतर्गत देवघेवीत मिळे व त्यावर त्याचा संसार व त्या सर्व वर्णीयांचा व जातींचा समाज श्रम किंवा कर्म-विभागणीनुसार चाले. जमिनीचा हिस्सा व अवजारांचे अखंड सातत्य यानेच बांधलेल्या हिंदु-जाती हजारो वर्षे अभेद्य व इतिहासाच्या पुनरावृत्त्या करीत राहिल्या याचे मूलभूत विवरण मार्क्स-एंगल्सने केले आहे. याचीच वर्णनात्मक व समाजरचनावाचक मांडणी राजवाड्यांनी केली.

हे जरी खरे असले तरी समाजपरिवर्तनाचा हा अबाध्य व सनातन कायदा हाच हिंदू समाजाचा प्रेरक, पोषक व संरक्षक झाला आहे व तसाच तो राहावा व राहील अशी समजूत राजवाड्यांच्या मनात ठाम भरली होती. ही पद्धती आता नव्या उत्पादनतंत्रात बसत नाही, कारखानदारीत व त्यावर आधारलेल्या समाजात जातींना व जातिकर्माला जागा नाही एवढेच नव्हे तर त्या प्रगतीला मारक होतात व त्यांचे मरण समाजवादात संपूर्णपणे होणार हे त्यांच्या लक्षात येणे अशक्य झाले होते. म्हणून राजवाडे हे कर्मठ ब्राह्मण व इतर जातीद्वेषी अशी त्यांची ख्याती झाली. एवढ्या प्रचंड विचारशक्तीच्या व जुन्या सर्व शास्त्रांचा, रूढींचा, धर्मसमजुतींचा चेंदामेंदा करून त्याची ऐतिहासिक उत्पत्ती सांगणारा, परमेश्वरालाही न मानणारा, विचार आणि विकार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती कशी झाली याचे क्रांतिगर्भ विवरण करणारा हा महान् शास्त्रज्ञ ऐतिहासिक भौतिकवादाचा मार्क्सवादी सिद्धान्तापर्यंत पोहोचू शकला नाही ही एक मोठी हिंदुस्थानच्या इतिहासाला हानिकारक अशी घटना घडली यात संशय नाही. हजारो जातींचे व धंद्यांचे श्रमजीवी लोक भांडवलदारी वर्गसमाजपरिवर्तनाच्या मुशीत जातिवृत्ती सोडून एकच वृत्तिबद्ध म्हणजे कामगारवर्ग कसे बनतात व वर्गयुद्ध करून समाजपरिवर्तन कसे करतात व समाजवादाचे नवे जग निर्माण करून शस्त्र, शास्त्र व वृत्ती यांचे नव्या पुरुषसूक्ताचे समाजवादी गणसंघ कसे रचतात याचा गंधही राजवाड्यांना लागला नाही. त्यामुळे त्यांच्या विवेचनामध्ये ते वर्णाभिमानी व जात्यभिमानी बनले. आदि व मध्ययुगीन समाजाचा भारतातील अखंडपणा, अलौकिकपणा, संततपणा पाहून त्यांचे लक्ष वर्णजातीपद्धतीवरच खिळून बसले. इंग्रजानी आणलेल्या नव्या जातिविहीन कल्पना; समाजरचनेचा प्रचार व तसेच आपल्या देशातील जातिभेदाच्या व त्या नष्ट करण्याच्या चळवळीमध्ये स्वराज्यसाधन व राजकारण यांचा अभाव पाहून त्यांचे समाजशास्त्रीय सिद्धान्त कोंडीत

सापडले; पण पूर्वीचा हिंदुसमाज हा एकवर्णी व जातिविहीन होता हेही त्यांना दिसत होते. त्याचे पुढे त्रैवर्णिक व नंतर शूद्रागमनाने, जातिरचनेने चातुर्वर्णिक व अनंत जातिबद्ध स्वरूप हे कसे झाले हेही त्यांनी पाहिले होते. तेव्हा हा जातीजातींच्या कलहात गुंतलेला समाज परत एकवर्णी होईल अशीही मांडणी करून त्यांनी वर्तमान कलहातून रस्ता काढण्याची कल्पना मांडली. पण ते कसे होणार हे त्याना उमगेना. वर्ण व जातीच्या आवरणाखाली मूलभूत उत्पादन-वितरणक्रियेमध्ये मूलभूत ज्या शोषणकर्त्या वर्णजाति व शोषित वर्णजाति व त्यापासून निर्माण होणाऱ्या राज्ययंत्र वगैरे सर्वांचे योग्य वर्णन व वाचन करूनही त्यांना उत्पादनाचे हत्यार व त्यातून निघणारे मनुष्यसमाजाचे विविध वर्गबंधनाचे ब्रह्मांड उमगण्याचा सिद्धान्त मिळाला नाही. हेगेलचा सिद्धान्त अपुरा पडतो म्हणून त्यानी रामदासांचा आधार घेतला. काही इंग्रज इतिहासशास्त्रज्ञांकडे जरा नजर टाकली पण मार्क्स-एंगल्स दिसला नाही.

म्हणून एकवर्णी समाज परत कसा होणार याचीही फोड जमली नाही. त्यांचे आयुष्य संपण्यापूर्वी समाजवादी रशियन क्रांती व सोविएट समाजाची आजची वर्गविहीन समाजवादी समाजाचे व नवमानवाचे दर्शन होण्याची संधी मिळाली नाही व त्यामुळे समाजक्रान्तीचे, विचारक्रान्तीचे व विचामंथनाचे फळ त्यांना लाभले नाही.

हिंदुस्थानातील जनतेच्या जीवनाला लागणाऱ्या सर्व वस्तूंची उत्पादनक्रिया अत्युत्तम यंत्रबलाने व तज्जन्य भौतिक व मानसिक शास्त्राने सिद्ध होऊन, त्यावरचा भांडवलदारी अर्थसंबंधांचा व राजकीय पकडीचा पूर्ण निरास होऊन हा आपला समाज अत्युच्च समाज-वादी संघटनेच्या स्तरावर पोचेल तेव्हाच सर्व जातिभेदांची व वर्णांची इतिश्री होईल हा सिद्धान्त त्यांच्या आकलनात आला नाही. नाही तर राधामाधवचा व पुरुषसूक्ताचा एक नूतन आविष्कार आपल्याला पाहावयाला मिळाला असता.

ही इतिहासज्ञानाची शोकांतिका टाळता आली असती का? हेगेल आणि कॉम्टच्यापुढे त्याना व त्यांच्या ऐतिहासिक-भाषिक ज्ञानभांडाराला नेता आले असते का? या प्रश्नाला माझे स्वतःचे उत्तर होय असे आहे. पण त्याला एकच अट होती की त्यांच्यासमोर मार्क्स-एंगल्स ठेवायला हवा होता.

असे ठाम विधान करण्यासाठी काय आधार आहे? मराठ्यांच्या पराजयाची कारणे शोधताना त्याना पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज फौजांच्या लांब पल्ल्यांच्या तोफांची अत्यंत प्रभावी व प्राणघातक व विजय-संपादक कामगिरी ध्यानात येऊन चुकली होती. तोफखाना, बंदुका, दारूगोळा हा मराठ्यांना अपरिचित नव्हता. शिवाजीला तोफा मिळविण्यासाठी इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीजांची काय काय मनधरणी करावी लागे, धमक्या द्याव्या लागत व पैसा आणि व्यापारसनदा द्याव्या लागत याचा पसारा त्यांच्या पत्रव्यवहारात आहे. असे असूनही हे इतके भयानक अस्त्र व शस्त्र इथेच निर्माण करणे, त्याचे मूलभूत शास्त्र अभ्यासणे या सर्वांना कां जमले नाही? पेशवाईअखेर दिल्लीश्वरावर जरब बसवून महादजी शिंद्यानी

आग्र्याजवळ तोफा करण्याचा कारखानाही फ्रेंच इंजिनियरना हाताशी धरून काढला होता; पण त्यासाठी त्याने लोखंड, सर्पण व रासायनिक सामग्री कुठून आणली याची चर्चा आपल्या इतिहासात नाही. ग्वाल्हेरचे दप्तर ज्या वेळी उघडले जाईल तेव्हा त्याचा खुलासा काहीतरी मिळेल.

पण तोफांचे शस्त्रसाधन करणे याचे महत्त्व राजवाड्यांना माहीत होते व त्याबाबतच्या शास्त्राबद्दल मराठी विद्वान व राज्यकर्ते गाफिल व गबाळ ठरले असे त्यांचे मत आहे; त्याची तात्त्विक बैठक शोधायची तर या घटनेच्या चर्चेसाठी मार्क्सवादी शास्त्रच वापरावे लागेल. ते काम राजवाडे करू शकले नाहीत हे खरे; पण या अत्यंत महत्त्वपूर्ण प्रश्नाबद्दल हा विद्वान शास्त्रज्ञ गाफील नव्हता. शहाजीवरील निबंधात ते लिहितात : "या प्रश्नाला उत्तर एकच आहे व अगदी साधे आहे. ते हे की उत्तम रेखीव व नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रात व्हावी लागते ती त्या काली महाराष्ट्रात नव्हती. शहाजीच्या हयातीत युरोपात डेकार्ट, बेकन इत्यादी विचारवंत सृष्टपदार्थसंशोधनकार्याचे वाली जारीने पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते आणि आपल्याकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपट-निरंजन इत्यादी संत पंचमहाभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटीत होते. अशाना स्क्रू, टाचणी, बंदूक व तोफा यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यात नवल काय ? ज्या दिवशी व्हास्कोने कालिकतच्या चातुरीच्या थोबाडीत मारली तोच हिंदुस्थानचे साम्राज्य युरोपियनांच्या हातात जाऊ लागण्याचा पहिला दिवस होय... लांब पट्ट्यांची कारीगार हत्यारे त्यात त्यांचे सामर्थ्य होते. ही हत्यारे म्हणजे युरोपियन शास्त्रीय संस्कृतीचा केवळ निष्कर्ष होत...तेव्हा दोषाचा वाटा शहाजीप्रमाणेच तत्कालीन समाजावर पडतो हे उघड आहे...या बाबतीत दादाजीच्या पंक्तीस अकबर, शहाजहान, मीर जुमला व अवरंगजेब असे सारखेच बसतात. तेव्हा हा तत्कालीन भारतवर्षीय संस्कृतीलाच सर्वधारण दोष होय हे कबूल करावे लागते." ('राजवाडे लेखसंग्रह' पान २०६ साहित्य ॲकाडेमी प्रत)

पण हिंदी समाज तरी असा कां राहिला याचे उत्तर मिळत नाही. त्यासाठी मार्क्स-एंगल्सप्रणीत शास्त्राकडे वळावे लागते. नाहीतर आजच पहा ना ? समाजवादी राष्ट्रांचे शास्त्रीय व सामग्री-सहाय्य व त्याचबरोबर त्याच शास्त्रांचा अभ्यास करून व आपले बुद्धिबल, संपत्ति व राज्यसाधन यांचा वापर करून परकीय तोफानी मार खाल्लेल्या या आपल्या देशातील बुद्धिमंतानी शास्त्रज्ञांनी आणि राज्यकर्त्यांनी इथेच बनविलेला रॉकेट तयार केला व न्यूक्लिअर स्फोट करून आमच्या स्वातंत्र्यवाढीला धमक्या देणाऱ्या साम्राज्यवाद्यांना निरर्गल बडबड करायला लावली. हे पहाण्यासाठी राजवाडे हयात असते तर त्यांनी या नव्या समाजवाद-शास्त्राचे नवे पुरुषसूक्त रचले असते व चातुर्वर्णिकांच्या भुवनसंस्थेतून "एकवर्णी" समाजसत्तावादाचा कम्युनिस्टप्रणीत शास्त्राचा प्रचंड खंड

लिहिला असता असे कां म्हणू नये ?

कादंबरी

राजवाड्यानी समाजशास्त्राचे जे विविध पैलू हाताळले त्यात जाता जाता त्यांनी साहित्याला हात लावला आहे आणि त्यातही त्यांची बुद्धिमत्ता, विशाल दृष्टी व वाचन किती होते हे त्यांच्या " कादंबरी " या निबंधात दिसते.... " समाजातील हा जो पतित भाग आहे त्याच्या स्थितीचे प्रदर्शन करणे हे प्रत्येक कादंबरीकाराने आपले आद्य कर्तव्य समजले पाहिजे....ह्या देशातील दारिद्र्याने गांजलेल्या, रोगाने पीडिलेल्या व विद्येने मागासलेल्या सामान्य जनसमूहाचा कैवार सहृदयतेचे मूर्तिमंत पुतळे जे कादंबरीकार त्यांनी घेतला नाही तर दुसरा कोण घेईल ? " साहित्यावरचे राजवाड्यांचे हे विचार " कादंबरी " या निबंधात पाहून मराठीत साहित्यावर होणाऱ्या वादावर बराच प्रकाश पडतो. पाणिनी, व्याकरण, वेद, प्रपंच, इतिहाससाधने, स्मृतिलुप्त झालेले नगर शहराचे संशोधन, धातुकोश एक ना दोन अशा शेकडो विषयांच्या अभ्यासात " कादंबरी " वाचनही चालू असे. ते केवळ मनोरंजन म्हणून नव्हे तर " समाजशास्त्रा "चा भाग म्हणून.

त्या वेळच्या अनेक नामांकित साहित्यिकांचे त्यांनी मूल्यमापन केले. त्यात इंग्रजी भाषांतरित इतर देशातीलही लेखकांच्या कादंबऱ्यांचे त्यांचे वाचन खूपच व्याप्ती करून केलेले होते. ह्यूगो आणि टॉलस्टॉयची महती दाखविताना त्यांनी हरि नारायण आपटे यांना अलिकडच्या साहित्यसमीक्षकाप्रमाणे त्यांनी कचऱ्यात टाकले नाही. हरिभाऊंची " काळ कठिण आला " ही गोष्ट लिहून इंग्रजांचा राग ओढवून घेतला हेही इतिहासकार विसरले आहेत. माझ्या मनात एकच गोष्ट खटकली ती ही की त्यांनी फ्रेंच कादंबरीकार डुमासला एवढा मोठा दर्जा देण्याचे काय कारण ? आणि दुसरे असे खटकले की इंग्रज कादंबरीकार रेनॉल्डस् याबद्दल लिहिताना "इंग्रजी कादंबरीकारांतील अत्यंत रद्दड असा जो रेनॉल्डस् यांच्या भिकार कादंबऱ्यांचेच आस्वाद घेणारे हरीचे लाल आपल्या इकडे पुष्कळ" हे विधान त्यांनी कां करावे ? त्याच्या अनेक कादंबऱ्या " रद्दड " समजायला म्हणजे नुसत्याच ऐतिहासिक गोष्टीवरचा रोमान्स आहे हे खरे. डुमासचाही तोच प्रकार आहे आणि हरि नारायण आपटे यांची 'रूपनगरची राजकन्या' किंवा 'वज्राघात' याच सदरात पडतील. रेनॉल्ड्सबद्दलचा हा समजच या अनेकांत पाहिला आहे. एवढेच काय तर इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास लिहिणाऱ्यांनी या ग्रंथकाराचा उल्लेखही केला नाही.

याचे खरे कारण तो रद्दड होता हे नाही. रेनॉल्डसने तिसऱ्या जॉर्जच्या वेळची बादशाही घराणी आणि लंडनचे सरंजामी लॉर्ड गणांचा संघ यांच्या प्रेमकथांच्या, साध्या कुटुंबातील निरागस तरुणींना फसविण्याच्या लीलांच्या कथा " मिस्टरीज ऑफ दि कोर्ट ऑफ लण्डन " या दहा-खंडात्मक कादंबरीत उघड्यावर आणल्या. स्कॉटलंडचा कबजा घेण्यासाठी इंग्रजांनी काय कत्तली केल्या याच्याही कथा त्याने लिहिल्या. क्वीन

एलिझाबेथने स्कॉटलंडच्या क्वीन मेरीला कसे मारले याचे क्रूर कथानक लिहिले आणि सगळ्यात मोठी कामगिरी या "रद्दड" कादंबरीकाराने बजावली तिचा उल्लेखही इंग्रजी वाङ्मयाचे इंग्रजी इतिहासकार करीत नाहीत. ते म्हणजे "सोल्जर्स वाईफ" (सैनिकाची बायको) या कादंबरीत शिपायांना क्षुल्लक अपराधावरून श्रीमंत घराण्यातून आलेले अधिकारी "फटक्याची" सजा देऊन त्याचे अमानुष हाल करून जीवही घेत याचा स्फोट केला याची दखल घेऊन पार्लमेंटला हा फटक्यांचा प्रकार बंद करावा लागला. त्याची "सीमस्ट्रेस" (शिंपीण) या कादंबरीतही कामगारस्त्रियांच्या परिस्थितीवरचा उल्लेख आहे.

असे असताही रेनॉल्डसूवर टीकाकार हल्ला करतात हे चमत्कारिकच दिसते असे मला वाटते. मी स्वतः याचे ग्रंथ १९१४ मध्ये वाचले तेव्हा मी चुकलो काय अशीही शंका येते. राजवाडे यांच्या आणखी एका सिद्धान्तवजा मताचा उल्लेख करून हे प्रकरण संपवितो.

संत रामदासांबाबत लिहिताना ते विचारतात की "भक्तिमार्गाचा, ज्ञानमार्गाचा, व कर्ममार्गाचा विस्तृत प्रपंच दासानी जसा केला तसा योगमार्गाचा कां केला नाही ? ह्या शंकेचे उत्तर असे की मूळ वेदान्तात योगमार्गाचे महत्त्व विशेषसे मानलेले नाही...समर्थांनी योगमार्गाचा प्रपंच केला नाही इतकेच नव्हे तर केवळ हठयोगाचा त्यांनी उपहास केला आहे. आमचा पाण्यावर तरून जातो, जमिनीत पुरून घेतो, बीरमंत्र जाणतो वगैरे फटके असद्गुरूंना दासानी मारले आहेत. हठयोगाच्या बलावर अद्भुत चमत्कार करू जाणाऱ्या भोंदूचा समर्थांना फार तिटकारा असे. शिवाजी व रामदास ही माणसे फसवेगिरीला विचारात किंवा आचारात बिलकुल भीक घालणारी नव्हती." ('राजवाडे लेखसंग्रह' साहित्य ॲकाडेमी प्रकाशन, पान २६४). आज आमच्या देशात चमत्काराचा धिंगा जो चालू आहे त्याबद्दल रामदास व इतर अद्वैत वेदान्ती तत्त्वज्ञान्यांचे हे विचार पहाण्यासारखे आहेत.

राजवाड्यांच्या लिखाणाचे व विचारभांडाराचे सर्वंकष दर्शन नुसत्या त्रोटक निबंधाने करणे अगदी अशक्य आहे. म्हणून हा अर्धवट व असखोल प्रपंच येथेच संपविणे बरे.

राजवाड्यांचा वैचारिक-तात्त्विक पुनर्जन्म होणे शक्य होते, पण ते अशक्य झाले; कारण साधनसाहाय्याच्या अभावी गावोगाव हिंडून मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनासाठी अनेक घराण्यांचे माळे साफ करून पायी प्रवास करून, सापडलेल्या दप्तरातून इतिहास-सुवर्णाचे कण काढण्यात सर्वच आयुष्य घालवायचे, व जाता जाता मिळेल तिथे चिठ्या लिहून धातुकोशासाठी धातूंचा संग्रह करायचा, व्युत्पत्त्या शोधायच्या, एखाद्या जयराम पांडेसारख्या भाटाच्या पद्यरचनेचा बहाणा करून शहाजी-शिवाजी यांच्या स्वराज्यस्थापनेचा विचार करता करता हिंदुसमाजरजनाशास्त्राचा अमोल राधामाधव ग्रंथ लिहायचा ! अशा आयुष्यक्रमात या विलक्षण बुद्धिमंताची झेप मार्क्स-एंगल्स किंवा रशियन क्रांतीपर्यंत पोचली नाही, हे आपल्या इतिहास-

शास्त्राचे व विचारसाधनांच्या हिमालयाचे एक एवरेस्टचे शिखरच अज्ञातात दडून पडले असे वाटते. हे पाहून मनाला खिन्नता येते. भाषाशास्त्राची, संस्कृत भाषेच्या ज्ञानाची, इतिहासशास्त्रसंभाराची उकल करणारी हिंदुस्थानातली एक "जीनियस"च आपल्या जनतेने अकाली घालविली. इतिहासमंथनाच्या मेरू पर्वताला बांधणारा वासुकीचा दोरच महासागरात निखळून पडला व मंथन खुंटले. त्या ताटातुटीच्या पन्नासाव्या वर्षादिनी ती मंथनक्रिया नव्या साधनातील सिद्धान्तांनी परत सुरू करण्याचा आपण सर्व विद्वज्जनांनी निर्णय घ्यावा.

खंडाळा,
२५ डिसेंबर, १९७६

—एस. ए. डांगे

भारतीय विवाह-संस्थेचा इतिहास

(या लेखाकरिता कै. वि. का. राजवाडे यांनी केलेली टिपणे)

(१) कुटुंब

गोत्र गोत्रनाम आत्रेयः

कुल–कुलनाम अत्रे

जाती, ज्ञाती } When stress is laid on birth.
[जेव्हा जन्मावर भर असतो.]
वर्ण } When stress is laid on colour.
[जेव्हा वर्णावर भर असतो.]

राष्ट्र } When government is meant.
[जेव्हा शासनसंस्था अभिप्रेत असते.]
देश } When territory is meant.
[जेव्हा भूप्रदेश अभिप्रेत असतो.]

कुलपती : मुनीनां दशसाहस्रं योऽन्नदानादि पोषणात् ॥
अध्यापयतिविप्रर्षि रसौ कुलपतिः स्मृतः ॥ १ ॥

कुल या शब्दाचे दोन अर्थ :

(२) माता * व्यास – पराशर ऋषी व सत्यवती कुमारी यांचा पुत्र व्यास.
पिता कानीन (आदि–६३). नंतर शंतनूचा विवाह त्याच सत्यवतीशी
पुत्र झाला.

पुमान्स्, पुपुवस, पुपुमस् —

शंतनूला गंगेपासून कुमारीपासून सत्यवतीशी विवाह होण्यापूर्वी भीष्म झाला.

भगिनी, भ्राता, पती, स्त्री, नृ, नर, नरी —

विचित्रवीर्याच्या धर्मपत्न्या अंबिका व अंबालिका यांच्या ठायी विचित्रवीर्य

मेल्यानंतर व्यासांनी धृतराष्ट्र व पांडु हे दोन पुत्र उत्पन्न केले व दासीपासून विदुर झाला.

This is maternal filiation. [हे मातेपासून अपत्यत्व].

(३) अटीची लग्ने — शंतनू व गंगा यांचे लग्न, अट : माझ्याविरूद्ध कांही बोलू नये, (आदि. ९८). बोलल्यास निघून जाईन. स्त्रीची अट : स्त्री मातेच्या जागी. जरत्कारूची अट : विरुद्ध गोष्ट करू नये व तिच्या भावाने तिचे पोषण करावे, नाही तर सोडून जाईन. पुरुषाची अट : स्त्री भावाच्या जमावात राही. this is paternal filiation. [हे पित्यापासून अपत्यत्व]. पुत्रोत्पत्तीपर्यंत भीमाने हिडिंबेशी राहण्याची अट घातली (आदि – १५५). पुत्रोत्पत्तीपर्यंत अर्जुन मणिपूरच्या चित्रांगदेपाशी तीन वर्षे राहिला (आदि – २१५).

(३ $\frac{1}{2}$)*दिवसाढवळ्या[1] सर्वादेखत समागम : पराशर व सत्यवती (आदि–६३) रणजितसिंग (Letournaou, page 41) [लेटार्नो, पृ. ४१]

उतथ्यपुत्र दीर्घतमाने सर्व लोकांसमक्ष स्त्रीसमागम करण्यास आरंभ केला (आदि-पर्व – १०४. पृ. २३२ b).

मैथुन एकान्तात करावे. (शांति – १९३).

(३ $\frac{3}{4}$)*वसिष्ठाची मुलगी शतरूपा त्याच्याशी पती मानून राहिली (हरिवंश – अं. २) modern incest. [आधुनिक रक्तसंबंधी नात्यात सुरतसंबंध]

इंद्राने आपला निपगतु जनमेजयाची स्त्री वपुष्टमा इजशी गेला. (हरिभविष्यपर्व अ. ५) व तो अपराध जनमेजयाने सहन केला.

(३ $\frac{4}{5}$)*दहा प्रचेत्यांनी व त्यांचा पुत्र सोम याने मारिषेच्या ठायी गर्भ स्थापून दक्ष प्रजापती निर्माण केला. (हरिवंश अ. २).

(३ $\frac{5}{6}$)*सोमाचा दौहित्र किंवा मुलगा दक्षप्रजापती याने आपल्या कन्या आपला बाप किंवा आजा सोम यास दिल्या (हरिवंश – अ. २, पृष्ठ ७). जनमेजय येथे शंका करतो की हे असे व्यभिचारी कृत्य कसे झाले ? त्याला वैशंपायनाचे उत्तर की ही प्राचीन चाल आहे (हरिवंश पृ. ७).

(३ $\frac{6}{7}$)*ब्रह्मदेवाचा पुत्र दक्ष याने आपली मुलगी ब्रह्मदेवाला दिली. तिच्यापासून नारद झाला (हरिवंश अ. ३ पृ. ८).

(४) लग्न वयोमान : गंगा शंतनूहून बरीच वडील होती. राधा कृष्णाहून वडील होती.

१. कै. राजवाडे यांनी * अशा फुल्या कित्येक ठिकाणी केलेल्या आहेत; पण त्यांचे स्पष्टीकरण केलेले आढळत नाही, पण तशाच फुल्या कायम ठेवल्या आहेत.

(५) सहगमन : मृताबरोबर स्त्री, गाय व मालमत्ता जाळीत असत. माद्रीने पांडूशी सहगमन केले. अग्निहोत्र्याबरोबर त्याचा अग्नी, यज्ञपात्रे, गाय किंवा शेळी जाळीत व क्षत्रिय असल्यास धनुष्य मोडून जाळीत. स्त्री, अग्नी, यज्ञयात्रे ही जाळीत (आश्वलायन गृह्यसूत्र, अ. ४).

(६) गुरुतल्पगमन : उत्तंकाची कथा (आदिपर्व अ. ३). आश्रमस्त्रियानी गुरुपत्नीचा ऋतू शांत करण्यास सांगितले. म्हणजे एके काळी स्त्रियांची ऋतुशांती वाटेल त्या पुरुषाने करण्याची पद्धत होती. म्हणजे अनिर्बंध लैंगिक संबंध promiscuity होते, नंतर शिष्यानेही ऋतुशांती करण्याची पद्धत होती, नंतर गुरुतल्पगमन अधर्म्य समजू लागले.

(७) गंधर्व, अप्सरा व ऋषी यांचा शरीरसंबंध : विश्वावसु गंधर्व व मेनका अप्सरा यांच्यापासून प्रमद्वरा झाली. ती रुरूची स्त्री झाली. गंधर्व व अप्सरा स्वापत्यांस वाटेल तेथे सोडून देत. प्रायः ऋषींच्या आश्रमासन्निध सोडून देत. Savages deserted their new-born children. रानटी लोक आपल्या नवजात अपत्यांना टाकून देत (आदिपर्व–अध्याय ८).

Temporary marriages. गौतम ब्राह्मण व जानपदी अप्सरा यांच्या क्षणिक समागमापासून कृप व कृपी झाली. (आदि. १३०). भरद्वाज व घृताची अप्सरा यांजपासून temporary तात्पुरत्या समागमाने द्रोणाचार्य झाला (आदि. १३०). व्यास व घृताची पासून शुक (शांति – ३२४).

(८) रुरूने आपले अर्धे आयुष्य सर्पदष्ट व मृत प्रमद्वरेला देऊन जिवंत केले (आदि. अ. ९).

(९) जरत्कारू प्रतिज्ञा करतो की स्वनामधेय कन्या आपल्या नावाची कन्या वरीन (आदि. अ. १३). जरत्कारू ब्राह्मण जरत्कारू नागीण यांचा शरीरसंबंध. गरुडाच्या तोंडात गेला ब्राह्मण व त्याची कोळीण स्त्री (आदि. २९).

(१०) व्यासास जनमेजयाने मधुपर्क व धेनू अर्पण केली (आदि ६०). परंतु अवध्य म्हणून त्यांनीं ती धेनू सोडून दिली. परंतु आश्वलायन गृह्यसूत्रात, पशुकल्पात व शूलगवकल्पात गाय वध्य म्हणून सांगितले असल्यामुळे गोवध व्यासानंतरही चालू होता असे दिसते.

(११) विश्वामित्र ऋषी व मेनका अप्सरा आपले मूल शकुंतला टाकून देतात. प्राचीन भारतात अपत्यांना उवड्यावर टाकण्याची आणि टाकून देण्याची प्रथा. Exposure and abandonment of children in ancient India.

Temporary marriage ? तात्पुरता विवाह ? संकल्प समागम ? दृष्टी समागम ? अल्पावधिक समागम. गांधर्व विवाह हा प्रथमारंभी अल्पावधिक होता. नंतर परस्पर-संकेत एवढीच खूण गांधर्वसंबंधाची राहिली.

विश्वामित्र व मेनका यांचा समागम निदान दहापाच दिवस तरी झाला – दुष्यंत-शकुंतलेचे गर्भाधान एकदोन घटकाच झाले (आदिपर्व अध्याय ७२, ७३, ७४).

(१२) मनूपासून ब्राह्मण व क्षत्रिय झाले. वर्णव्यवस्था मनूपासून. क्षत्रियांत इला ही स्त्री लढाऊ झाली (आदि. अ. ७५). रेत व शोणित या उभयतांचेही आधान इलेनेच केले. चतुर्धर म्हणतो की इलेला बुधापासून पुरूरवा झाला व तिने पुरूरव्याला राज्य दिले म्हणून मातृत्व पितृत्व इलेकडेच आले.

(१३) अ – पुरुष याचक किंवा भिक्षा स्त्रीची मागतो, याची उदाहरणे अनेक आहेत. पुरुष याचक Man proposer. शर्मिष्ठेने ययातीजवळ ऋतुभिक्षा, गर्भाधानाची भिक्षा किंवा याचना केली. स्त्री याचक Woman proposer (आदिपर्व ८२).

ब—सखीचा जो पती तोच तिच्या दुसऱ्या सखीचा पती अशी चाल होती (आदि. ८२). दासी दोन प्रकारच्या (१) सखी दासी व (२) परिचारक दासी.

A man became husband to all the associates and followers of the chief girl. दासी s were the property of the chief girls & when the chief girl became wife & property of the husband, her दासी s also became property of the husband (आदि. ८२).

प्रमुख कन्येच्या सख्या आणि सेविका या सर्वांचा पुरुष पती होई. प्रमुख कन्येच्या दासी या तिची मालमत्ता असत आणि जेव्हा प्रमुख कन्या नवऱ्याची पत्नी आणि मालमत्ता बने तेव्हा दासीसुद्धा त्या नवऱ्याची संपत्ती बनत (आदि. ८२).

(१४) शास्त्राने उपभोग्य म्हणून ठरविलेली कामुक स्त्री जर एकांतात भोग मागेल तर तो तिला दिला पाहिजे, नाही तर तो धर्मदृष्टीने भ्रूणहत्या करणारा होतो असे नीतिवेत्ते म्हणत आले आहेत (आदि. ८३ पृष्ठ १९१ a). उलूपी अर्जुनाला म्हणते की मदनार्त स्त्रीची इच्छा पुरविणे एक रात्र समागम हा अधर्म नाही (आदि. २१४).

(१५) ययाति तुर्वसूला शाप देतो, गुरुदारेशी रत होणारे व पशूंसारखे ज्यांचे आचार विहार आहेत असे म्लेंच्छ लोक (आदि ८३ पृष्ठ १९२ b). उच्चवर्णाच्या स्त्रियांशी जेथे नीच वर्णाचे पुरुष रमतात असे अंत्यज (आदि. ८३ पृष्ठ १९२ b).

(१६) १. दक्ष प्रजापती

२. कन्या × कश्यप-कन्येचे नाव अदिति

३. विवस्वान्

४. मनु
५. इला
६. पुरूरवा – ऊर्वशी
७. आयु
८. नहुष
९. ययाति यादव यवन भोज म्लेंच्छ पौरव
यदु, तुर्वसु, द्रुह्यु, अनु, पुरु
१०. कुरू × कौसल्या
१२. जनमेजय × अनंती (मधुकुल)
१३. प्राचिन्वान × अश्मकी (यादव कुल)
१४. संयाति × वरांगी दृषद्वानाची मुलगी
१५. अहंयाति × भानुमती कृतवीर्याची मुलगी
१६. सार्वभौम × सुनंदा केकय
१७. जयत्सेन × सुश्रूवा विदर्भ,
१८. अर्वाचीन × मर्यादा विदर्भ
१९. अरिह × अंगदेशाची राजकन्या
२०. महाभौम × सुयज्ञा प्रसेनजिताची मुलगी
२१. अयुतनायी × कामा पृथुश्रव्याची मुलगी
२२. अक्रोधन × करंभा कलिंग
२३. देवातिथी × मर्यादा विदेह
२४. अरिह × सुदेवा अंग
२५. ऋक्ष × ज्वाला तक्षककन्या
२६. मतिनार × सरस्वती देशस्थ सरस्वती
२७. तंसु × कलिंग कन्या
२८. इली × रथंतरा
२९. दुष्यंत × शकुंतला
३०. भरत × काशेयी सार्वसेनी
३१. भुमन्यू × विजया दशार्ह
३२. सुहोत्र × सुवर्णा इक्ष्वाकुवंशीय
३३. हस्तिन् × यशोधरा त्रिगर्त. हस्तिनापूर वसविणारा
३४. विकुंठन × सुदेवा दशार्ह
३५. अजमीढ × कैकयी, गांधारी, विशाला, ऋक्षा १२० मुलगे.
३६. संवरण × तपती विवस्वानाची मुलगी

३७. कुरु × शुभांगी दशार्ह
३८. विदुर × सांप्रिया मधु
३९. अनश्वा × अमृता मगध
४०. परीक्षित् × सुयशा
४१. भीमसेन × कुमारी कैकेय
४२. प्रतिश्रवा × ०
४३. प्रतीप × सुनंत शिबिकन्या
४४. शांतनु × गंगा भागीरथी

देवापि, बाल्हिक } × सत्यवती—(व्यास पराशर पुत्र)

४५. देवव्रत, भीष्म } व विचित्रवीर्य × अंबा, अंबिका, काशि

४६. (१) धृतराष्ट्र
(२) पांडु
(३) विदुर

४७.	धर्म	भीम	अर्जुन	नकुल	सहदेव	
	|	|	|	|	|	|
	प्रतिविंध्य	सुतसोम[1]	श्रुतकीर्ति	शतानीक	श्रुतकर्मा	५ द्रौपदीपासून
	×	×	×	×	×	
	देविका	बलंधार	सुभद्रा	करेणु	विजया	
	शिबि	काशी	द्वारका	चेदि	मद्र	
	|	|	|	|	|	
४८.	यौधेय	सवर्ग[2]	अभिमन्यु	निरमित्र	सुहोत्र	
		×	×			
		हिडिंबा	उत्तरा विराट			
		|	|			
४९.		घटोत्कच[2]	परीक्षित × माद्रवती			

५०. जनमेजय × वपुष्टमा
५१. शतानीक व शंकुकर्ण × विदेहकन्या
५२. अश्वमेध दत्त

(१७) उजवी मांडी मुलीची, डावी मांडी स्नुषेची
(आदिपर्व ९७ पृ. २१७ b)

प्रतीपाची कथा - गंगा उजव्या मांडीवर येऊन बसली.

२ ३ ४ १
(१८) कुल, गण व पक्ष, अन्वय (आदि. ६६ पृ. १४७ b)

(१९) प्रतीपाने मुलगी गंगा मुला (शंतनू) करिता पसंत केली. त्यात शंतनूचे मत बिलकुल घेतले नव्हते (आदि. ९८).

(२०) उतथ्याचा धाकटा भाऊ बृहस्पती उतथ्याच्या ममता नामक स्त्रीजवळ कामुक बुद्धीने गेला. संभोग देण्याची तिची हरकत नव्हती. परंतु ती गर्भार होती. सबब तिने हरकत घेतली (आदि. १०४)

देवरधर्म नियोगाची चाल.

(२१) बलिराजाने संतानोत्पादनार्थ दीर्घतमा ऋषीला घरी बाळगले. सुदेष्णेपासून दीर्घतम्याच्या वीर्याने अंग, वंग, कलिंग, पुंड्र व सुम्ह असे पुत्र झाले (आदि. १०४). नियोगाची चाल म्हणून भीष्मांनी ही कथा सांगितली आहे.

(२२) काही थोडे द्रव्य देऊन एखादा ब्राह्मण बोलावून आणावा व त्याच्याकडून क्षेत्रामध्ये प्रजोत्पादन करून घ्यावे, म्हणून भीष्म सांगतात (आदि. १०५).

शरदंडायनाने आपल्या भार्येस पुत्रोत्पादन करण्यास सांगितले. तिने राजमार्गावर जाऊन एका ब्राह्मणास आमंत्रण दिले व त्या ब्राह्मणाकरवी पुत्रोत्पादन केले (आदि. १२०).

वडील दिराकडून पुत्रोत्पादन करावे (आदि. १२०).

सौदासाने आपल्या मदयंती स्त्रीला वशिष्ठाकरवी पुत्रोत्पादन करण्याची आज्ञा केली (आदि. १२२). यवनराजाने गार्ग्याकडून स्वस्त्रीचे ठायी कालयवन निर्मिला (विष्णु-पुराण हरि – ३४).

(२३) मानस प्रजा, शवापासून प्रजा (आदि. १२१). व्युषिताश्वाची कथा. There was a myth current from very ancient times that children could be begot from the dead body of a husband. मृत पतीच्या शरीरापासून पुत्रप्राप्ति होऊ शकते अशी अतिप्राचीन कालापासून चालत आलेली कल्पना होती.

(२४)* (आदि–१२२) अतिप्राचीन कालीन विवाहनीती. स्त्रिया अनियंत्रित-कौमारावस्थेपासून मैथुन–उत्तर कुरूंत म्हणजे तिबेटात हाच धर्म आहे म्हणून पांडू सांगतो. विवाहमर्यादा प्राचीन नाही. तिचा स्थापक श्वेतकेतू. ब्राह्मण श्वेतकेतूच्या मातेचा संभोगार्थ हात धरतो. त्याचा श्वेतकेतूस राग येतो व तो मर्यादा घालतो की (१) परपुरुषसंगत्याग, (२) परस्त्रीसंगत्याग, (३) पुत्रप्राप्त्यर्थ पतीच्या अनुज्ञेने

परपुरुषसंग. श्वेतकेतूचा बाप उद्दालक म्हणतो की स्त्रियांनी स्वैरसंग करणे हा धर्म म्हणजे मान्य प्रचारच आहे.

(२५) पुरुषांनी अनेक स्त्रिया केल्या तरी अधर्म होत नाही, असे ब्राह्मणस्त्री म्हणते (आदि. १५८ बकासुरवध).

(२६) देवलोक व पितृलोक. गंगानदी देवलोकांत अलकनंदा हे नाव प्राप्त झाली आहे व पितृलोकात वैतरणी हे नाव मिळविती झाली आहे. पितृलोक म्हणजे where ancient fathers lived (जेथे पूर्वज रहात).

(२७) वसिष्ठाला शंभर पुत्र होते (आदि १७४). विश्वामित्राला शंभर पुत्र. धृतराष्ट्राला शंभर पुत्र. polygamy. बहुपत्नित्व. आहुकाला शंभर पुत्र (सभा – १४, पृ. ४५ b). सगराला ६०,००० पुत्र (वन. १०६). सोमकाला शंभर भार्या (वन. १५८) व शंभर पुत्र. कुवलाश्वाला २१,००० पुत्र होते (वन. २०२).

(२८) म्लेंच्छ : पल्हव, द्राविड, शक, यवन, शबर, किरात, बर्बर, सिंहल, खस, चुबक, पुलिंद, चीन, हूण, केरल (आदि. १७५).

(२९) नरमांसभक्षण : कल्माषपाद राजा राक्षस होऊन नरमांसभक्षक झाला (आदि – १७६). हिडिंब नरमांसभक्षक होता. कालेय दैत्य ऋषी भक्षण करीत (वन – १०२).

(३०) अयोध्येच्या कल्माषपादाने आपली पट्टराणी आपले पुरोहित जे वसिष्ठ त्यांजकडे पाठविली व गर्भाधान करून घेतले.

(३१) अग्रजन्मत्वाचा अधिकार : अर्जुनाला युधिष्ठिराने द्रौपदीशी विवाह करण्यास सांगितले असता, अर्जुन म्हणतो, आपला युधिष्ठिराचा विवाह प्रथम झाला पाहिजे नंतर क्रमाने इतर भावांचा (आदि–१९१). आम्ही धाकटे भाऊ आपले दास आहो. नकुल सहदेवांनी भिक्षा मागून आणिलेली धर्माच्या स्वाधीन केली. धर्म ज्येष्ठ सबब गुरु.

सुंद उपसुंदाला म्हणतो, मी वडील आहे, तेव्हा तिलोत्तमा माझी भार्या आहे (आदि—२१२). ज्येष्ठ बंधू, त्याच्या पूर्वी लग्न करणार कनिष्ठ बंधू व ती स्त्री, ही तिन्ही पतित होत. (शांति–१६५).

(३२) परतंत्र वैश्य म्हणून द्रुपद म्हणतो (आदि. १९२, पृ. ३८८ b).

(३३) राजगृह येथील अंबुवीच राजाचे राज्य त्याच्या महाकीर्ण अमात्याने आटोपले (आदि. २०४). ही कथा शुंगांच्या राज्याची आठवण करून देत्ये.

(३४) सुभद्राहरण कृष्ण व युधिष्ठिर यांच्या अनुमतीने व सर्व यादवांच्या अनुमतीने होते (आदि २२०).

(३५) जरा नामक नरमांसभक्षक राक्षसीने दोन शकले असलेले जरासंध नामक बालक चवाठ्यावरून ओढीत नेले (सभा – १७ – पृ. ५१ b). हेच राक्षस महारादि लोकांचे पूर्वज असावेत.

(३६) माहिष्मती नगरीतील स्वच्छंद स्त्रिया (सभा ३१).

(३७) पती कोणत्याही स्थितीत असला तरी स्त्रीवरची त्याची सत्ता नाहीशी होत नाही असे भीष्म म्हणतात (सभा – ६७).

(३८) कुलाचा अधिपती त्यांतील व्यक्तींचा मालक व व्यक्तींच्या पुण्याचा व तपाचा अधिकारी असतो. इतकेच नव्हे तर त्यांच्या प्राणाचाही अधिकारी असतो (सभा – ७०) असे भीम द्रौपदीला सभेत आणली असता म्हणतो.

(३९) मालक जिंकिला गेल्यावर त्याची कुलांतील व्यक्तींच्या प्राणावरील मालकी उडते असे भीम प्रतिपादितो (सभा – ७०)

(४०) धृतराष्ट्राला प्रजापति म्हटले आहे (सभा – ७५). सप्त प्रजापति. प्रज शब्द जुनाट मराठी लेखातून येतो.

(४१) Incest रक्तसंबंधी नात्यात सुरतसंबंध : ऊर्वशी ही पौरव वंशाची जननी अर्जुनावर कामासक्त झाली. ती म्हणाली, अप्सरास कसलाच प्रतिबंध नाही. पुरूच्या वंशातील जे पुत्र अथवा नातू इंद्रलोकी येतात ते आमच्याशी रमतात, तथापि ते अधर्म्य नसते. परंतु अर्जुनाने तिची ही याचना मान्य केली नाही. Incest was unknown to अप्सरा s. रक्तासंबंधी नात्यात सुरतसंबंध माहीत नव्हते. तेव्हा ऊर्वशीने शाप दिला की तू षंढ होशील (वन. ४६). पुरूरव्याला उर्वशीपासून ७ पुत्र झाले (हरि. २५).

(४२) नलदमयंती : इंद्र, अग्नी, यम आणि वरुण या देवांपैकी एकास दमयंतीने वरावे असे नल म्हणतो. अर्यमन्, पूषन्, वरुण यांचा उल्लेख अश्वलायन् गृह्यसूत्रात येतो (१, खं. ७ सूत्र १३). ह्यांच्यापासून सुटका होऊन मनुष्यवराला नवरी मिळावी व मिळते. एके काळी देवांशी विवाह करणे मनुष्यांना अभिलषणीय वाटे, याचे हे चिन्ह राहिलेले आहे.

(४३) यज्ञात ऋत्विजांकडून प्रजोत्पादन, यालाच अयोनिज प्रजा म्हणत असत (द्रौपदी, इ. इ. इ.).

(४४) लोपामुद्रा अगस्त्याची मुलगी. हिला विदर्भराजापाशी ठेवून, उपवर झाल्यावर हिचे अगस्त्यानेच पाणिग्रहण केले (वन. ९६ । ९७ । ९८). Incest.

(४५) जरत्कारू व अगस्त्य यांना आपले पितर उलटे लोंबत असलेले दिसले. अपत्य त्यांना पद्दू देत नाही. a horde which did not catch females from another horde came naturally to an end. दुसऱ्या टोळींतून स्त्रिया पळवून न आणणारी टोळी सहाजिकच नष्ट होई (आदि. व वन – ९६)

(४५) युवनाश्व गर्भार राहिला व त्याची वरगडी फोडून मांधाता पुत्र जन्मला (वन १२६). इंद्राने मांधात्याला आपल्या तर्जनीने पाजिले. (convade) स्त्रीकर्मानुकरण.

(४७) सोमकाने आपला पुत्र जंतू याचा होम केला (वन. १२७ – १२८).

(४८) कृतयुगांत सर्व चतुष्पाद धर्म येतात. त्रेतां यज्ञ सुरू झाला. द्वापारात तप व दान होते. कलींत भक्ती सुरू झाली (वन. १४९) यज्ञ व तप लोपली.

(४९) सप्तर्षींच्या स्त्रियांचा व अग्नीचा अन्योन्य समागम (वन. २५५।२२६).

(५०) रावण वश न झालेल्या स्त्रीशी समागम करू शकत नाही (वन. २८०).

(५१) सुग्रीवाची स्त्री तारा त्याचा पराभव झाल्यावर सुखाने वालीकडे गेली आणि जय झाल्यावर पुन्हा निमूटपणे सुग्रीवाकडे आली (वन – २८०).

(५२) मातेचा पती मेल्यावर तिचे संरक्षण करणारा पुत्र, असे शब्द अश्वपती राजाच्या तोंडून निघाले. Mother's husband means any husband even other than the progenitor of the son— आईचा पती याचा अर्थ आपल्या मुलाचा पिता नसलेलाही कोणताही पती (वन २८३).

(५३) कुंतीने सूर्याला आव्हान केले तेव्हा तिला रजोदर्शन झाले नव्हते, ती अप्रौढ होती. परंतु, लगेच रजोदर्शन होऊन ती समागमेय झाली (वन – ३०६). यावरून This shows that immature girls cohabited with men. वयात न आलेल्या मुलींचा पुरुषाशी संबंध होई असे दिसते.

सूर्योपभोगानंतर कुंती कुमारीच म्हणजे अक्षतयोनि राहिली.

(वन – ३०७) सूर्य म्हणतो, कन्या शब्दाची व्युत्पती कम् धातूपासून झाली असून त्याचा अर्थ हव्या त्या पुरुषाची इच्छा करू शकणारी असा आहे. कन्या स्वतंत्र आहे. तिजवर कोणाचाही अधिकार नाही. अधर्म नाही. स्त्रिया व पुरुष यामध्ये आडपडदा नसणे हीच लोकांची मूळची स्वाभाविक स्थिती असून, विवाहादिक संस्कार कृत्रिम आहेत. तू जरी माझ्याशी समागम केलास तरी कुमारीच राहशील.

(५४) मातेचे शव वृक्षास बांधून ठेवण्याची चाल सैबीरियात आढळते (विराट ८ – ५ पृ. ११ a). पांडवांनी आपली शस्त्रे ठेवली तो शमीवृक्ष.

(५५) कीचकाच्या शवाबरोबर सैरंध्री जी द्रौपदी तिला जाळण्याकरिता नेतात (विराट – अ. २२ । २३). This custom was to carry everything loved by the dead. मृत व्यक्तीला जे प्रिय होते ते सर्व बरोबर नेण्याची चाल होती.

(५६) दौहित्रांनी मातामहाचा उद्धार : माधवीची कथा (उद्योग – २१) पुत्रिकापुत्र.

Sons of daughters supported fathers of daughter. Sons were begotten from males of other clans. From this custom sprang the custom of considering कानीन s as sons. कानीन s were begotten on a daughter from a stranger at home.

मुलींची मुले मुलींच्या वडलांचा सांभाळ करीत. इतर टोळीतील पुरुषांचेपासून मुले होत. या चालीतूनच कानीन यांना अपत्य समजण्याची प्रथा अस्तित्वात आली. कानीन म्हणजे मुलीला घरीच बाहेरच्या पुरुषांपासून झालेले अपत्य.

(५७) पुत्र मातांशी रत होत आहेत, म्हणून दुश्चिन्ह (भीष्म–३).

(५८) आरट्ट देशातील, वाहीक देशातील स्त्रिया मैथुनकाली स्वपरपुरुष विचार राखीत नाहीत, अशी शल्याची कर्ण निंदा करितो (कर्ण–४४) व अभद्र शब्द उच्चारतात. त्यांच्यात जारज प्रजेचे अतिशय प्रमाण असते (कर्ण–४४). शूद्रापासून अन्य स्त्रियांच्या ठिकाणी झालेले अधम ब्राह्मण तेथे आहेत. प्रस्थल, मद्र, गांधार, आरट्ट, खस, वसाति, सिंधुसौवीर, कारस्कर, माहिषक, कालिंग, केरल कर्कोटक, वीरक इत्यादी भ्रष्ट देशांची नावे कर्ण घेतो.

आरट्ट देशात बहिणीच्या मुलांना वारसाहक्क प्राप्त होतो. पुत्राना तो होत नाही (कर्ण—४५).

वाहीक देशात मनुष्य प्रथम ब्राह्मण बनतो. मग क्षत्रिय होतो. मग वैश्य होतो. नंतर शूद्र होतो, आणि शूद्राचा नापितही होतो, पुनः ब्राह्मण होतो व ब्राह्मणांचा पुनः गुलाम बनतो. (कर्ण–४४). गांधार, मद्रक व वाहीक या देशातील लोक निंद्य आहेत (कर्ण–४४).

पंचनद देशातील लोक म्हटले म्हणजे कृतयुगातसुद्धा अधर्माचरण करणारे (कर्ण–४५). कृतयुग was all अधर्म, and in such a युग वाहिका s were होत्या.

भिक्षा मागणे हे क्षत्रियांना लांछन आहे. व्रतांचा त्याग करणे हे ब्राह्मणांना लांछन आहे, वाहीक लोक भूतलाला लांछन आहेत व मद्रस्त्रिया स्त्रीजातीला लांछन आहेत (कर्ण ४५).

१. कन्यादूषण, २. देख संगम ३. देवसंगम, ४. षंढ, ५. Barter (विक्री) कन्याविक्रय, ६. hire out (भाड्याने देणे)—माधवी, ७. हकीकत ब्रह्मदेवाच्या पूर्वीची. maternal (मातृप्रधान) प्रजापतीपासून निराळी नीतिमत्ता सुरू झाली. Patriarchal (पितृप्रधान). ८. स्वयंवराची चाल :—

मद्र देशात पिता, पुत्र, माता, सासू , सासरा, मामा, जावई, मुलगी, भाऊ, नातू व दुसरे बांधव, सोबती, पाहुणे, दासदासी ही सर्व एके ठिकाणी मिसळतात. त्या देशातील स्त्रिया कोणत्याही पुरुषाशी स्वेच्छेने सहवास करतात, मग ते पुरुष त्यांच्या ओळखीचे असोत किंवा नसोत. भलती सलती गाणी गातात. मद्रदेशामुळे गांधारीचाही आचार बिघडला. मद्र देशातील स्त्रिया दारू पितात व वस्त्रे टाकून नागव्या नाचतात. वैवाहिक विधींनी स्त्री-पुरुषांचे संबंध नियत होत नाहीत व स्त्रिया मन मानेल त्य पुरुषाला नवरा करतात. स्त्रिया उंट किंवा गाढवाप्रमाणे नैसर्गिक उत्सर्ग करतात. मद्र देशातील स्त्रियांपाशी कोणी मद्य मागितले तर त्या कुले खाजवीत खाजवीत मद्य देणार नाही. वाटेल तर पुत्र किंवा पती देऊ म्हणतात. मद्र देशातील कुमारिका निर्लज्ज व अनाचारी असतात (कर्ण ४०).

म्लेंछ सर्व मानवजातीला लांछन, औष्ट्रिक म्लेंछांना लांछन, षंढ औष्ट्रिकांना लांछन, राजपुरोहित षंढांना लांछन (कर्ण-४५). सुराष्ट्रातील लोक संकरवृत्ती आहेत (कर्ण–४५).

मद्र गुरुपत्नीगमन, भ्रूणहत्या करतात (कर्ण–४५).

पृथ्वीवर वाहीक लोकांचे वास्तव्य पृथ्वीला कमीपणा आणते असे नारद व्यासांना सांगतात (शांति. ३२८).

शल्य म्हणतो :—अंग देशात बायकामुलांचा विक्रय होतो (कर्ण–४५).

(५९) प्राक्श्रृंगवान वृद्धकन्या नामक वृद्ध कुमारिकेस अशी अट घालितो की, मी तुजसमागमे फक्त एक रात्र राहीन. त्याप्रमाणे राहून, ती वृद्धकन्या गेली (शल्य. ५२).

(६०) शंख आणि लिखित :—ज्येष्ठ बंधूच्या अनुमतीशिवाय फळे खाल्ली म्हणून लिखिताचे हात राजाकडून तोडविले (शांति–२३).

Primogeniture Right of (अग्रजाधिकार).

(६१) स्त्रिया रजोदर्शनाने शुद्ध होतात (शांति–३५). ही कल्पना भारतीयात अगदी वन्यावस्थेपासून आहे. तेव्हा पिता, माता, इत्यादी संबंध त्यांच्यात झाले नव्हते,

तेव्हापासून ही कल्पना अस्पष्टपणे त्यांच्यात होती. पुढे अनेक स्त्रियांवर एका पुरुषाची मालकी झाल्यावर त्यांपैकी कोणी व्यभिचार केल्यास पुरुष वरील कल्पनेने समाधान मानून घेत.

(६२) तीनही वर्णांची संतती ब्राह्मणाच्या योगाने संकीर्ण झालेली आहे. शूद्राची देवता प्रजापती म्हणजे रक्तसंबंध असलेल्या टोळीचा मालक किंवा नेता Master or leader of the consanguinous clan. ब्राह्मण हा सर्व वर्णांचा प्रजापती आहे (शांति-६०), ब्राह्मण ज्येष्ठ व श्रेष्ठ आहे (शांति-७२).

(६३) यवन, किरात, गांधार, चीन, शबर, बर्बर, शक, तुषार, कंक, पल्हव, आंध्र, मद्रक, पौंड्र, पुलिंद, रमठ, कांबोज हे सर्व आणि ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यापासून उत्पन्न झालेले वैश्य व शूद्र या जातीचे संकीर्ण वर्ण हे धर्माचरण कसे करतील ? या दस्यूंनी सर्वांची शुश्रूषा करावी, पितृयज्ञ करावे, वापी खणाव्या, पाणपोया, शय्या, ब्राह्मणांना दाने द्यावी—पाकयज्ञ करावे व ब्राह्मणक्षत्रियांच्या यज्ञात दक्षिणा द्यावी (शांति-६५).

(६४) क्षत्रियापासून निषादीच्या ठायी झालेला निषाद भारतधर्मी झाल्याची हकीकत (शांति-१३५). आर्यानार्य संकराची उन्नती कशी झाली असेल ते या कथेवरून समजते.

(६५) Cannibalism नरभक्षण प्रथा :—अगस्त्य मुनींनी क्षुधाक्रांत झाल्यामुळे वातापि राक्षस भक्षण केला (शांति—१४१). नृशंस माणसे मारणारा (man-killer) नृ + शंस् = to *kill*.

(६६) मृताकरिता अश्रुमोचन, ऊर बडविणे इ० इ० ह्या चाली रानटी देशातील स्मारक आहेत. एका टोळीने दुसऱ्या टोळीतील माणसे मारिली म्हणजे त्यांचे आप्तइष्ट रडत. ज्या मृतांना आप्तेष्ट नसत त्यांच्याकरिता कोणी रडत नसे. सबब, रडणे हा आप्तेष्टांचा धर्म म्हणजे समाजमान्य रूढी झाली.

(६७) रजस्वला समागम करणारे पातकी होत. शूद्र स्त्रीबरोबर बारा वर्षे राहणारा, जिच्याशी आपला विवाह झाला नाही तिला शय्येवर घेणारा, गुरुस्त्रीगमक, व्यभिचारी स्त्रीस श्वानाकडून भक्षवावी (शांति. १६५).

(६८) नग्न परस्त्रीचे अवलोकन करू नये, धर्माशी अविरुद्ध असे मैथुन करावे व तेही एकांतात करावे (शांति. १९३).

(६९) युवनाश्व राजाने आपल्या प्रिय स्त्रिया ब्राह्मणांना दिल्याने त्याला स्वर्गलोकाची प्राप्ती झाली (शांति. २३४).

मित्रसह राजाने वसिष्ठाला मदयंती नामक आपली प्रिय स्त्री अर्पण केली, त्यामुळे तो तिच्यासह स्वर्गलोकास गेला (शांति. २३४).

शिबीने आपला औरस पुत्र ब्राह्मणाला दान दिला (शांति. २३४).

(७०) वसिष्ठ, ऋष्यश्रृंग, काश्यप, वेद, तांड्य, कृप, काक्षिवत्, कमठ, यवक्रीत, द्रोण, आयु, मतंग, दत, द्रुमद, मात्स्य इत्यादी ऋषी अशुद्ध योनीत जन्मून तपाने मूळ पित्याच्या वर्णाला पोहोचले (शांति. २९६) i. e. (1) The males i. e. fathers claimed the male children, (2) Where mothers claimed the children, the वर्ण of the children was that of the mother. (3) Sometimes the children belonged to a caste lower than that of the mother and other than that of the father. i. e. neither father nor mother claimed the child. (1) paternal family (2) maternal family and (3) out-caste family.

म्हणजे (१) पुरुष पुत्रसंततीला पिता आपली म्हणे; (२) जेथे माता अपत्यावर हक्क सांगत तेव्हा अपत्यांचा आणि आईचा वर्ण एकत्र असे; (३) कांही वेळेला अपत्याची जात आईच्या जातीपेक्षा खालची असे आणि बापाच्या जातीपेक्षा वेगळी असे म्हणजे माता किंवा पिता यापैकी कोणीही अपत्यावर हक्क सांगत नसत; (१) पितृप्रधान कुटुंब, (२) मातृप्रधान कुटुंब, (३) जातिबाह्य कुटुंब.

(७१) अंगिरा, कश्यप, वसिष्ठ व भृगु ही चारच गोत्रे प्रथम होती (शांति. २९६).

(७२) श्वशुरगृही सदा राहिले पाहिजे या अटीवर दुर्योधनराजाने आपली मुलगी सुदर्शना अग्नीला दिली (अनुशासन – १).

(७३) नरकः क्षुद्रः नरः नरकः । नरकाः यत्र संति सः नरकः देशः ॥

(७४) पुत्रिकापुत्राला म्हणजे तुला मी माझी कन्या देतो व तिला तुजकडून जो पुत्र होईल तो माझा, ह्या पुत्राला देवपितृकार्यांत पाचारू नये (अनुशासन – २३).

the cause is plain that son is not of the direct blood of his grandfather. याचे कारण स्पष्ट आहे की मुलगा आपल्या आज्याच्या प्रत्यक्ष रक्तसंबंधातील नव्हता.

(७५) मातंगाला बहुत तप करूनही ब्राह्मण होता आले नाही (अनुशासन – २७. २८. २९).

वीतहव्यराजा एका क्षणात ब्रह्मर्षी झाला (अनुशासन – ३०).

(७६) ब्राह्मणाच्या अवकृपेमुळे शक, यवन, कांबोज व इतर क्षत्रिय जाती शूद्र झाल्या. ब्राह्मणांच्या अवकृपेमुळे द्राविड, पुलिंद, उशीनर, कोलिसर्प व इतर क्षत्रियजाती शूद्र झाल्या (अनुशासन – ३३).

ब्राह्मणाच्या अवकृपेमुळे मेकल, द्राविड, लाट, पौंड्र, शबर, बर्बर, कान्वाशिर, किरात, यवन व इतर क्षत्रियजाती शूद्र झाल्या (अनुशासन – ३५).

(७७) स्त्रिया अन्योन्याश्रय करून व्यभिचार करतात (अनुशासन – ३८). असे पंचचूडा अप्सरा नारदास सांगते.

(७८) उत्तरकुरूत स्त्रिया स्वच्छंदाने वागतात व नरनारीमध्ये मत्सरबुद्धी वास करीत नाही. (अनुशासन – १०२).

(७९) ज्येष्ठ भ्रात्याची प्रशंसा (अनुशासन – १०५).

(८०) उतथ्याची भार्या वरुणाने पळविली व भोगिली. नंतर वरुणाला शिक्षा करून उतथ्याने आपली बायको परत आणून तिच्यासह तो सुखे नांदू लागला (अनुशासन – १५४).

(८१) मनू आपली मुलगी इला इजशी समागम चाहू लागला (हरिवंश – १०).

(८२) विश्वामित्राच्या स्त्रीने आपला पुत्र त्याच्या गळ्याला दोरी लावून विकावयास काढिला (हरिवंश – १२).

(८३) यवन, पारद, कांबोज, पल्हव व खस हे गण म्हणजे आयुधोपजीवी संघ होते (हरि – १४). शक अर्धे डोके मुंडीत, यवन व कांबोज सबंध डोके मुंडीत, पारद मोकळ्या जटा ठेवीत व पल्हव दाढ्या ठेवीत. कोली सर्प, महिष, दीर्घ, चोल व केरळ ह्या लढाऊ गणांच्या धर्माचा उच्छेद सगराने केला. खस, तुषार, चोल, मद्रक, किष्किंधक, कौंतल, वंग, साल्व व कौंकणक यास सगराने जिंकिले.

(८४) जन्हूची मुलगी गंगा हिने जन्हू आपला बाप याला पती केले (हरि–२७).

(८५) गाधिराजाची मुलगी सत्यवती ऋचीक ब्राह्मणाला दिली होती. ऋचीकाने दोन चरू सत्यवतीला व तिच्या आईला दिले. अदलाबदल झाली व गाधीला ब्राह्मण स्वभावाचा मुलगा झाला व सत्यवतीला क्षत्रिय स्वभावाचा मुलगा झाला. येथे स्त्रियांची अदलाबदल सासरा व जावई यांच्यात झालेली स्पष्ट दिसते. जावई सासूकडे गेला व सासरा मुलीकडे गेला.

(८६) सर्व गोत्र प्रवर्तकांत अत्रीचा मान श्रेष्ठ. यज्ञात आत्रय ब्राह्मणाला स्वतंत्र दक्षणा देतात. स्वस्त्यात्रेय (हरि – ३१ पुरुवंशाची कथा.)

(८७) यौधेय हे नृगाची संतती (हरि – ३१).

(८८) बलीला संतती त्याची स्त्री सुदेष्णा हिला दीर्घतप नामक ऋषीपासून झाली (हरि – ३१).

(८९) पुरुकुलोत्पन्न राजे व कुशिक कुलोत्पन्न ऋषी त्यांचे आपसात संबंध झालेले आहेत. (हरि – ३२).

(९०) यदुवंशीय महिष्मान् राजाने माहिष्मती वसविली. (हरि – ३३, पृष्ठ १०२ b) प्रथम ही नगरी कर्कोटक नागांची होती ती कार्तवीर्य अर्जुन यदुवंशी याने जिंकली व तीत मनुष्यांची वस्ती केली (हरि – ३३). सहस्रार्जुन रावणाचा समकालीन. हा सहस्रार्जुन भार्गवराव परशुराम याचे हातून मेला. परशुराम रामाचा समकालीन. मृत्तिकावती व शुक्तिमती ही दोन नगरे नर्मदेवर यादवांनी वसविली (हरि – ३६). माहिष्मती, करवीर वनवासी (क्रौंचपूर).

(९१) सुतनु व वडवा या कृष्णपिता वसुदेव याच्या परिचारिका म्हणजे भोगांगना होत्या (हरि-३५). शिवाय १४ पत्न्या वसुदेवाला होत्या.

(९२) विदर्भाची स्त्री त्याच्या अगोदर निदान १६ वर्षांनी वडील होती (हरि. ३६, पृ. ११०). प्रद्युम्नाने हरण केलेली शंबुर असुर स्त्री मायावती त्याच्याहून २०/२५ वर्षांनी वडील होती (हरि १०७).

(९३) अपत्यवध–देवकीचे सात पुत्र कंसाने मारिले (हरिवंश).

(९४) हर्यश्व हा यौवनाश्वाचा भाऊ व बहीण

हर्यश्व	बहीण
यदु	सर्पकन्या

आते बहिणीशी लग्न (हरि ३७. पृ. २८८)

(९५) कृष्णाभिषेककाली इंद्राने मथुरेतील गणिकांना इतर नागरिकांप्रमाणे शंभर सुवर्णभाग काढून ठेविले (हरि ५५).

(९६) शक, तुषार, दरद, पारद, शंगल, खस, पल्हव, हैमवत इत्यादि म्लेंच्छ (हरि ५७).

(९७) कृष्णाने रुक्मिणीला हरण केले तेव्हा मोठे घनघोर युद्ध झाले व कित्येक लोक ठार झाले. म्हणजे अद्याप हरणक्रियेला केवळ रूढीचे व देखाव्याचे रूप आले नव्हते (हरि ५९). यावरुन कृष्णकालीन संस्कृतीचा अंदाज होतो.

(९८) कृष्णाने १६००८ नारी विवाहविधीने वरिल्या (हरि ६०).

(९९) पुण्यक व्रतात स्त्रिया त्यांच्या भर्त्यांपासून विकत घेऊन आचार्यास उदकपूर्वक द्याव्या. नंतर द्रव्य देऊन आचार्यापासून त्या स्त्रिया परत घ्याव्या (हरि ७९).

(१००) गौरीशंकराच्या चित्रमय मूर्ती, लाकडी मूर्ती, दगडी मूर्ती ब्राह्मणास द्याव्या (हरि ७९).

(१०१) ब्रह्मदत्तला २०० ब्राह्मण, १०० क्षत्रिय, १०० वैश्य व १०० शूद्र मिळून पाचशे स्त्रिया होत्या (हरि ८३).

(१०२) प्रत्येक संगमाच्या वेळी त्यांच्या कन्या कुमारी असल्यासारख्या होतील (हरि ८३).

(१०३) निकुंभाच्या वज्रनाभ नामक भ्रात्याची प्रभावती कन्या प्रद्युम्नाने हरण केली. सबब निकुंभाने भानुमती नामक भानु यादवाच्या कन्येचे अपहरण केले (हरि ९०). बाणासुराची कन्या उषा अनिरुद्धाने वरिली (हरि १२८).

(१०४) सुपुर, विपुर, वृत्र, क्षुण्ण हे देश आहेत. सुपुरवासी असुर (हरि ९३, पृष्ठ ४६१).

(१०५) कुमारीपतिः, कुमारी म्हणजे काय ? दुर्वासाने असुरकन्या प्रभावतीला (प्रद्युम्नाच्या स्त्रीला) अखंड सौभाग्य व कौमार्य दिले (हरि ९४).

(१०६) अश्वमेध यज्ञात यजमानपत्नी मृत घोड्यापाशी निजते (हरि भविष्यपर्व५).

(१०७) गोत्र All the women of one tribe are the wives of all the men of another tribe.
(एका टोळीतील सर्व स्त्रिया दुसऱ्या टोळीतील सर्व पुरुषांच्या बायका).

(१०८) दक्षाच्या कन्या २७ सोमाला etc., groups of sisters are marrying of one husband. येथे अनेक बहिणी एकाच पतीशी विवाहबद्ध होतात. Letournaou 299 base. लेटार्नो २९९.

(१०९) पुत्रिकापुत्र—is a trait of maternal filiation. ही मातृसंततीची प्रथा आहे. Letournaou 310.

(११०) दिति–दैतेयः दैत्यः, अदिति, आदितेयाः, आदित्यः वैनतेयः, आंजनेयः, कौंतेयः, राधेयः, भाद्रेयः, सौभद्रः. These show maternal filiation. हे मातृ-संततीची प्रथा दर्शवितात.

(१११) सप्तपदी होण्याच्यापूर्वी लग्न पूर्ण झालेले समजत नाहीत. Experimental (प्रायोगिक).

(कै. राजवाडे यांनी " भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास " या विषयावर लिहिलेली ही टिपणे आहेत. वरील १११ आकड्यांच्या पुढच्या आकड्यांचे टिपण सापडत नाही. यापुढे एक इंग्रजी टिपण आहे ते देऊन त्यापुढे २०१ आंकड्यापासून २०५ आकड्यांपर्यंतचे टिपण दिले आहे. नंतर इतर काही टिपणे देऊन मग वेदांतर्गत टिपणे दिली आहेत. पुढे लग्नसंस्था या मथळ्याखालील टिपण दिले आहे.—संपादक).

(१०७)

(1) One woman marrying five brothers. एका स्त्रीचा पाच भावांशी विवाह–द्रौपदी-पांडव.

(2) One man marrying seven sisters, एका पुरुषाने सात बहिणींशी विवाह करणे.
(कृष्णाचा पिता वसुदेव) (वसुदेव father of कृष्ण—हरिवंश विष्णुपर्व अध्याय १०१).

(3) Four sisters marrying four brothers.
चार बहिणींचे चार भावांशी विवाह.

(4) One woman marrying more than one males not brothers.
एका स्त्रीचा बंधू नसलेल्या एकापेक्षा जास्त पुरुषांशी विवाह.

(5) One man marrying more than one females not sisters.
एका पुरुषाचा बहिणी नसलेल्या एकापेक्षा अनेक स्त्रियांशी विवाह.

---

(6) One man marrying one waman.
एका पुरुषाचा एका स्त्रीशी विवाह.

(7) A man of any race marrying a woman of any race.
कोणत्याही वंशातील पुरुषाचा कोणत्याही वंशातील स्त्रीशी विवाह

(२०१) Forced abduction, बलात्काराने हरण :

आजामि त्वा अजन्या परि मातुस्थोपितुः ।
यथा मम क्रतावसो मम चित्तमुपायसि ॥ ५ ॥
अथर्ववेद—तृतीय कांड अनुवाक ६ सूक्त ५.

I goad (आजामि) with a goad (अजन्या) मी अंकुश दाखवून प्रेरित करतो.—away from father and mother, so that you be in my power and act according to my mind. आई आणि वडील यांचेपासून दूर, कारण त्यामुळे तू माझ्या ताब्यात राहशील, माझ्या मनाप्रमाणे वागशील.

(२०२) अथर्ववेद चतुर्थ कांड यात " ब्रह्मजज्ञानं " या पहिल्या सूक्ताचा विनियोग सांगताना सायण खालील वाक्य लिहितो :—

" विवाहे चतुर्थिकाकर्मणि ' ब्रह्मजज्ञानं० ' इत्यनया वरः अंगुष्ठेन प्रजननदेशं तुदति। सूत्रितं (कौ. १०-५) हि ब्रह्मजज्ञानं इत्यंगुष्ठेन व्यचत्करोति। "

The bridegroom scratched the valva of the bride with his finger. वर आपल्या बोटांनी वधूची जननेंद्रिये खाजवतो.

(२०३) Girl enjoyed by three before she is enjoyed by the husband. पतीबरोबर संभोग होण्यापूर्वी तीन पुरुषांनी उपभोगिलेली स्त्री.

सोमजुष्टं ब्रह्मजुष्टं अर्यम्णा संभृतं भगम् ॥
धातु र्देवस्य सत्येन कृणोमि पतिवेदनम् ॥ २ ॥

अथर्ववेद—द्वितीयखंड, षष्ठानुवाक—पंचमसूक्त—द्वितीया ऋक्. भग is enjoyed by सोम, ब्रह्म and अर्यमन्; by the divine धातर्. I choose my husband now (आता मी माझा पती निवडते).

(२०४) They ate semen as mentioned several times in भारत. अनेकदा उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी रेत प्राशन केले. संवत्सरं स्त्रियं अनुपेत्यशुक्तयां रेत आनीय तंडुलमिश्रं अश्नाति (कौशिक सूत्र ३-५) Semen was mixed with boiled rice of course & eaten.

(२०५) Infanticide male मुलांची हत्या : In the भारत आणि हरवंश, आदिपर्व, there is story of a प्रजापति who having many wives had his sons carried away by नारद. भारत, हरिवंश, आणि आदिपर्व यात एका प्रजापतीची कथा आहे. त्याला पुष्कळ बायका असतात आणि तो आपल्या मुलांना नारदाला घेऊन जाऊ देतो. he begot 1000 sons on his wives. त्याला त्याच्या स्त्रियापासून १००० पुत्र होतात.

(b) कंस killed 7 sons of वसुदेव for fear the male child might kill him (कंस) & usurp the गादी and right over all the wome-

of the tribe. वसुदेवाच्या मुलाने आपल्याला ठार मारून आपली गादी बळकावू नये व आपल्या टोळीच्या सर्व स्त्रियांवर हक्क प्रस्थापित करू नये म्हणून कंस त्यांच्या सात मुलांना मारतो.

---

(1) Different terminations of अपत्य means different tribal languages of the same stock. अपत्य शब्दाला लागणारे निरनिराळे प्रत्यय एकाच कुलातील निरनिराळ्या टोळ्यांच्या भाषा दर्शवितात.

(2) गोत्रापत्य means progeny of the गोत्र (गोत्राचे अपत्य).

(3) अनंतरापत्य is a later word (हा नंतरचा शब्द आहे).

(4) युवापत्य is a later word (हा नंतरचा शब्द आहे.)

(5) All the terminations are for masculine अपत्यs. Hence patriarchal system prevalent. सर्व प्रत्यय पुल्लिंगी अपत्यांना लागणारे आहेत. म्हणून पितृप्रधान कुटुंबव्यवस्था रूढ.

(6) गौतमीपुत्रः, वासिष्ठीपुत्रः show matriarchal system (हे शब्द मातृप्रधान कुटुंबव्यवस्था दर्शवितात). माद्रेय, कौंतेय, देवकीनंदन shows matriarchal system giving place to patriarchal system. पितृप्रधान व्यवस्था मातृप्रधान व्यवस्थेची जागा घेत असल्याचे हे चिन्ह आहे.

(7) Before अपत्य प्रत्यय s feminine nouns assume masculine forms and then the termination applies, which means that females were subordinate to males. अपत्य प्रत्ययापूर्वी येणारी स्त्रीलिंगी नामे पुल्लिंगी स्वरूप धारण करतात आणि मग प्रत्यय लागतो याचा अर्थ स्त्रियांचे स्थान पुरुषापेक्षा कनिष्ठ होते.

---

१. पितृ (पा–पालन करणे) = पालन, रक्षण करणारा Protector and fighter of the horde.

२. मातृ (मा–मोजणे) = अन्न मोजून देणारी distributor of food, grain & flesh to the different families in the horde who lived in a long wigwam.

३. दुहित (milk-maid) of the horde. टोळीतील दूध काढणारी स्त्री.

४. स्वसृ who followed her own people and married her own brothers. आपल्याच लोकांत राहणारी आणि आपल्या बंधूशीच विवाह करणारी.

५. पत्यृ who built a house, separate house. स्वतःचे घर, स्वतंत्र घर बांधणारा.

६. पत्नी who arranged a house. घराची व्यवस्था पाहणारी.

(५ व ६) Both words arose when individual family life as distinguished from horde life began. दोन्ही शब्द जेव्हा टोळीजीवन संपूर्ण वैयक्तिक कुटुंबजीवन सुरू झाले तेव्हा आले.

७. ननंद who sympathised with the girl, who was forcibly carried away from one horde to another. (एका टोळीतून दुसऱ्या टोळीत बळजबरीने नेलेल्या मुलीबद्दल सहानुभूती बाळगणारी).

८. यातृ—workers, co-workers with the girl forcibly carried away. बळजबरीने नेलेल्या मुलीबरोबर काम करणारे सहकारी.

९. श्वश्रू (F)— who directed the dogs against ran away foreign girls from the horde. टोळींत बाहेरून आलेल्या व पळून जाणाऱ्या मुलीच्या मागे कुत्रे सोडणारी.

श्वशुर (M) who directed the dogs (कुत्री सोडणारा).

(१०) भ्रातृ who supported the horde & brought provisions to the horde. टोळीला पोसणारा आणि टोळीसाठी अन्नसामग्री आणणारा.

(११) भर्तृ = हर्तृ who forcibly abducted girls. मुलींना बळजबरीने पळविणारा.

(१२) भार्या = हार्या one abducted पळवून नेलेली.

(१३) देवृ – One who pities & sympathises with the co-wife. सवतीबद्दल दया आणि सहानुभूती दाखविणारी.

---

(१) प्रजापति ष्ट्वा नियुनक्तु मह्यम् (पारस्कर–कांड १ कंडिका ८ वाक्य ८).

(२) पांडव हे तिबेटातून आले. कौरव हे काश्मीरातून आले. पांडवांत

Polyandry (बहुपतित्व) होती. कौरवांत Polygamy (बहुपत्नित्व) होती. पांडवांत शिवाय प्रत्येक भावाला निराळी बायको होती, म्हणजे पृथक् लग्ने करण्याची चाल पडत चालली होती. कौरवांत एका गांधारीला १०० पुत्र झाले; व ते कुंभात रुजत ठेविले होते. कुंभ म्हणजे घट, एक घर. अनेक स्त्रियांपासून धृतराष्ट्राला जे पुत्र झाले ते सर्व पट्टराणी जी गांधारी तिचे समजले जात. गांधारीला कन्या एकच होती. म्हणजे कन्याहत्या कौरवांत होती हे उघड झाले.

(३) पंजाबात Marriage (विवाह) फार स्वैर असे. ते कां? तर पूर्वेकडील जे कौरव-पांडव त्यांच्याहून नंतर पंजाबातील आर्य पंजाबात शिरले व त्यांच्यात कौरव-पांडवांच्या इतकी सुधारणा अद्याप लग्नाच्या बाबतीत झाली नव्हती. अनेक टोळ्या निरनिराळ्या संस्कृतीच्या व कालाच्या अंतराअंतराने हिंदुस्थानात शिरल्या, त्याला हे प्रमाण आहे.

(४) नृप=Feeder of leading men. नेत्यांना पोसणारा.
नृनाथ=One who is obsequeously obliged by नृ s. नरनाथ. नंतर उपकृत केला गेलेला.

राजन् = One who entertained नृ s. आतिथ्य करणारा feudal words; when leaders were beseeched and followers were rewarded. सरंजामशाही समाजातील शब्द. जेव्हा नेत्यांना विनंती केली जाई आणि अनुयायांना बक्षिसे दिली जात.

पृथ्वीपति, पार्थिव, भूपति lords of earth, dominins.

(५) गोविंद = Obtainer of cows – गाई मिळविणारा.
गोपाळ=Protector of cows—गाईचे रक्षण करणारा.
कृष्ण = One who loots. – लूटमार करणारा.
हरि=One who lifts cattle.—जनावरे चोरणारा.
देवकीनंदन=Son of देवकी (देवकीचा पुत्र), mother name आईचे नाव.

(६) कंस brother of देवकी kills sons of देवकी, for fear they might usurp his thrown. देवकी lives with कंस with her husband i. e. the husband was Sub-ordinate i. e. there was a tribe where husbands had to live in the tribe of the wife and the ownership of the children belonged to the brother of the wife, which clearly shows that at a previous stage of development there was मल्याळ

polyandry in the कंस & कृष्ण tribe – slowly the tribe was coming out of matriarchy to patriarchy, but by stage. The heritage belonged to the sons of the Sister.

आपले सिंहासन घेतील या भीतीने कंस आपली बहीण देवकी हिच्या मुलांना ठार मारतो. देवकी आपल्या नवऱ्याबरोबर कंसाच्या घरी रहाते म्हणून नवऱ्याचे स्थान दुय्यम. म्हणजे अशा टोळ्या होत्या की ज्यात नवऱ्याला पत्नीच्या टोळीत रहावे लागे आणि मुलावर पत्नीच्या भावाचा अधिकार असे. यावरून हे स्पष्ट होते की, विकासाच्या आधीच्या टप्प्यात कंस आणि कृष्ण यांच्या टोळीत मल्याळ बहुपतित्व रूढ होते. हळू हळू टोळी मातृप्रधान समाजातून पितृप्रधान व्यवस्थेकडे येत होती, परंतु टप्प्याटप्प्याने वारसा बहिणीच्या मुलाकडे असे.

वेदान्तर्गत टिपणे

(०) वस्त्रेणेव वासया मन्मना शुचिं (१–२१–१४०–१) writing on cloth (कापडावर लिहिणे).

(१) सनायते गोतम इंद्र नव्यं अतक्षद्ब्रम्ह हरियोजनाय } (१–११–६२–१३) ऋग्वेद

(२) त्वष्टा अस्मै वज्रंस्वर्यं ततक्ष
($2\frac{1}{2}$) त्वष्टा रूपाणां अधिपतिः (पारस्कर–४७) } मं. अ. सू. क्र. (१–७–३२–२)

(३) य इंद्राय वचोयुजा ततक्षुः मनसा हरी (१–५–२०–२)

(४) तक्षन्नासत्याभ्यां परिभ्मानं सुखं रथं तक्षन् धेनुं सबर्दुघाम् } (१–५–२०–३)

त्वष्टा व ऋभु हे देवांचे सुतार, कारीगर.

(५) एक श्चरन् उपशाकेभि रिन्द्र = हे इंद्र शाकेभिः एकः उपचरन्।

येथे शाक लोकांचा उल्लेख आहे, कारण पुढील अर्धात सनकांचा उल्लेख आहे. सनक हे वृत्रानुचर होते.

(६) सं अर्यो गा अजति यस्य वष्टि।

अर्य may mean वैश्य (अर्य याचा अर्थ वैश्य असणे शक्य आहे).

(७) (१) हलीबिश, शुष्ण, वृत्र, सनक who were अनुचरs of इंद्र, सप्त पुराणि, त्रिपुर, शंबर, व्यंस, पिप्रु, रौहिण, कुयवं.

(८) मिमीहि श्लोक मास्ये पर्जन्य इव ततनः ।
गाय गायत्र्य मुक्थ्यम् (१-८-३८-१४)
तोंडात श्लोक तयार करा व तो मोठ्याने म्हणा व मधुर गान गा.

(९) होतारं विश्ववेदसं सं हि त्वा विश इन्धते। (१-९-४४-७)
समिंधते kindle (पेटविणे) हा पहिला अर्थ, worships पूजा करतो हा दुसरा अर्थ, परंतु पहिला अर्थच घेतला पाहिजे.

(१०) तक्षतू यत् ते उशना सहसा सहो,
विरोधसी मज्मना बाधते शवः } (१-१०-५१-१०)

when उशना with his genius carved your prowess it filled both earth & heaven (जेव्हा उशनाने स्वतःच्या बुद्धीने तुझे सामर्थ्य कोरून काढले तेव्हा त्यामुळे पृथ्वी आणि आकाश भरून गेले).

(११) त्वष्टा चित्ते वावृधे शवःततक्ष वज्र मभिभूतू योजसम् (मं १-अ-१०-५२-७) त्वष्टा himself carved out your triump and chipped of the वज्र brilliant. the defeating enemies वृध to cut, वर्धकिः = सुतार.

(१२) करंज, पर्णय, वंगृद ह्या असुरांची नावे १-१०-५३-८ यात येतात.
(१३) अर्चा शक्राय शाकिने (१ - १० - ५४ - २) शाक लोकांचा उल्लेख.
(१४) नर्यं, तुर्वीति, तुर्वशं, वय्यं, एतश, रथ (१ - १० - ५४ - ६).
(१५) अस्मा इदुस्तोमं सं हिनोमि रथं न तष्टेव तत्सिनाय (१ - ११ - ६१ - ४).

(१६) अस्मा इदु ग्ना श्चिद्देवपत्नी रिन्द्रायार्क महिहत्य ऊवुः (१-११-६१-८) women saw the exploits of इंद्र. knew how to weave letters into patterns (स्त्रियांनी इंद्राचा पराक्रम पाहिला. त्याला शब्द ओवीबद्ध करावयाचे माहीत होते).

(१७) आपो न धीरो मनसा सुशस्त्यो गिरः समंजे विदथेषु आभुवः (१-११-६४-१) मनसा गिरः समंजे I cleave together words in my mind annoint together (मी माझ्या मनांत शब्द एकत्र करतो व गुंफतो).

(१८) जारः कनीनां पतिर्जनीनां (१-१२-६६-४) lovers of girls.
यस्त्वा भ्राता पति र्भूत्वा जारो भूत्वा निपत्यते।
प्रजां यस्ते जिघांसति तमितो नाशयामसि ।
(अध्याय १० - अष्टक १६२ - वर्ग ५)
Brothers or owners or lovers lay with women भ्राता, पती किंवा जार होऊन इत्यादी.

(१९) हृदा यत्तष्टान् मंत्रान् अशंसन् (१-१२-६७-२).
Utters मंत्र s engraved on the heart (हृदयात कोरलेले मंत्र म्हणतो).

(२०) नरः पितु र्न जिव्रे र्वेदो भरन्त (१-१२-७०-५)
as men take property from their old father. माणसे पित्यापासून संपत्ती घेतात त्याप्रमाणे.

(२१) अर्यो भागं=अरेः भागं (१-१२-७३-५).
अरेः आगतं अर्य-वैश्यांना अर्य म्हणतात. once inimical (एकेकाळी शत्रू).

(२२) यज्ञै रथर्वा प्रथमः पथ स्तते (१-१३-८३-५)
ततः सूर्यो व्रतपा वेन आजनि ॥
आ गा आजद् उशना काव्यः सचा ।
यमस्य जातं अमृतं यजामहे ॥
अथर्वन् first invented the यज्ञ (अथर्वन् ने प्रथम यज्ञ शोधला).

(२३) ग्रावा यत्र वदति कारुः उक्थ्यः (१-१३-८३-६).

(२३-अ) रुद्रस्य सूनवः रुद्रासः, रुद्रपुत्राः, (१-१४-८५-१/२) सूनु=हूनु.
गोमातरः, पृश्निमातरः, दिवस्पुत्राः, रुद्रियाः.

(२३-ब) भयन्ते विश्वा भुवना मरुद्भ्यः राजान इव
त्वेषसंदृशो नरः (१-१४-८५-८)
see this whole सूक्त on मरुत् s.

(२४) यस्य वाजिनो अनु विप्रं अतक्षत (१-१४-८६-३).

(२५) दक्ष हा अदितीचा बाप, अदिति ही दक्षाची कन्या व अदिति ही दक्षाची आई, असे अष्टक १० अध्याय ७२ वर्ग ४ यांत सांगितले आहे.

(२६) मातॄ र्जनयत स्वधाभिः lay with his mothers (मंत्र १ - अनुवाक १५ - सूक्त ९५ - ऋचा ४) बहूवींनां गर्भो.

(२७) व्राधतश्चित् (१-१५-१००-९)
वृध्=वृद्ध=व्राधत्
भृ=भर्तृ=भ्रातृ

(२८) अपां तोकस्य तनयस्य (१-१५-१००-११) sons & grandsons of अप्. अप् पासून झालेल्या आपिः mothers.

(२९) स कीरिणा स्तोता चित् सनिता धनानि (१–१५–१००–९)

(३०) मा नो अकृते पुरूहूत योनौ (धाः) (१–१५–१०४–७)

(३१) आंजमा नो मघवन् शक्र निर्भेत् (१–१५–१०४–८)

(३२) स वां धियं वाजयन्तीं अतक्षम् (१–१६–१०९–१)

(३३) अश्रवं हि भूरिदावत्तरा वां विजामातु रुत वा घा स्थालात् (१–१६–१०९–२)

जामातु one who dined & get a wife-service marriage [जेवण घेऊन बायको मिळविलेला – सेवा–विवाह].

विजामातृ one who got a wife and did not dine at the wife's house. price–marriage [बायको मिळालेला परंतु तिच्या घरी न जेवलेला].

(३४) येभिः सपित्वं पितरो न आसन् (१–१६–१०९–७) पितृs are सपिs that is co-drinkers [बरोबर पिणारे].

(३५) वाजसाति fiight for food. This word occurs abundantly' The ऋषिs fought for food. [अन्नासाठी युद्ध. हा शब्द पुष्कळदा येतो. ऋषी अन्नासाठी लढले].

(३६) जामि Co-diner [सहभोजन करणारे] अजामि not a co-diner (सहभोजन न करणारे).

(३७) याभि र्भरे कारं अशाय जिन्वथः (१–१६–११२–१) कारं = नादं = ॐकार (कृ). the sound ॐ (कृ) the letter ॐ.

(३८) म १ अ १६ सू. ११२ यात खालील व्यक्तींचा उल्लेख आहे :–

१. तरणि २. रेभ ३. कण्व ४. वन्दन ५. अंतक ६. भुज्यु ७. कर्कंधु ८. वय्य ९. शुचन्ति १०. अत्रि ११. पृश्निगु १२. पुरुकुत्स १३. परावृज् १४. वर्तिका १५. सिंधु १६. वसिष्ठ १७. कुत्स १८. श्रुतर्य १९. नर २०. विश्पल २१. अथर्व्य २२. वश २३. अश्व २४. औशिज दीर्घश्रवा २५. कक्षीवान् २६. त्रिशोक २७. सर्य २८. मंधातृ २९. भरद्वाज् ३०. अतिथिग्व ३१. कशोजु ३२. दिवोदास ३३. त्रसदस्यु ३४. वभ्र ३५. उपस्तुत ३६. कलि ३७. व्यश्व ३८. पृथि ३९. शयु ४०. अत्रि ४१. मनु ४२. स्यूमरश्मि ४३. पठर्वन् ४४. शर्यात ४५. अंगिरस् ४६. मनु ४७. विमद ४८. अरुणि ४९. सुदास् ५०. शंताती ५१. भुज्यु ५२. अध्रिगु ५३. ऋतस्तुभ् ५४. कृशानु ५५. युवन् ५६. कुत्स आर्जुनेय ५७. तुर्वीति ५८. दभीति ५९. ध्वसंति ६०. पुरुषंति.

(३९) त्मने तोकाय तनयाय मृळ (१–१६–११४–६).

(४०) नासत्याभ्यां बर्हिरिव प्रवृंजे स्तोमान् (१–१७–११६–१) प्रवृंजे twist, cut. twist like दर्भ s. (पिरगळणे, कापणे, दर्भाप्रमाणे पिळणे).

(४१) च्यवनं पति अकृणुतं कनीनां (१–१७–११६–१०) master of girls.

(४२) घोषायै जुर्यत्यै पतिं अश्विनौ अदत्ताम् (१–१७–११७-७) gave a husband to the old girl (वृद्ध मुलीला पती दिला).

(४३) शतं मेषान् वृक्ये मामहानं तमः प्रणीतं अशिवेन पित्रा। आक्षी ऋज्राश्वे अश्विना अधत्तम् (१–१७–११७–१७) father blinded his son for letting a वृक kill them वृद्धांना त्यांना मारू दिल्याबद्दल पित्याने मुलांना आंधळे केले–डोळे काढले.

(४४) युवतिः पुनर्भू (१–१८–१२३–१).

(४५) भगस्य स्वसा वरुणस्य जामिः उषा (१–१८–१२३–५) स्वसृ & जामि. स्वसृ one who resorts to one's own house (स्वतःच्या घरात राहणारा). जामिः one who dines and lives (जेवून राहणारा). योषा, युवतिः, कन्या, दुहितृ, जाया, पति, भ्रातृ, प्रजा, मातृ, शिशु.

(४६) मातृमृष्टे व योषा (१–१८–१२३–११) योषा deflowered by her मातृ.

मृश = to touch, स्पर्श करणे = मृष्ट. शंकर पंडित and सायन take मृज् (पुसून काढणे) to wipe which also makes p. p. मृष्ट

(४७) वारा सर्वैः स्पृहणीया courted by all. विश्ववारा (१–१८–१२३–१२).

(४८) नाजामिं न परिवृणक्ति जामिं (१–१८–१२४–६) masculine जामि co-diner, अजामि not a co-diner.

(४९) अभ्रातेव पुंस एति उषा (१–१८-१२४–७). उषा approaches a man without a भ्राता [भाऊ नसलेल्या पुरुषाकडे उषा जाते].

(५०) स्वसा स्वस्रे जायस्यै योनिं अैरक् (१–१८–१२४–८) younger स्वसृ, makes place of her योनि to an elder स्वसृ. right of primogeniture.

(५१) आमधिता परिगधिमा (१–१८–१२६–६/७) libidinous.

(५२) परशु र्न द्रुहंतरः (१–१८–१२७–३) like the hateful परशु.

(५३) ऋभूणां जर्णिः (१-१८-१२७-११) ऋभ्वि = ऋभु.

(५४) भगम् = भजनीयं – भगिनी one who has a भजनीय भग (भोक).

(५५) उभा तरेते अभि मातरा शिशुम् (१-२१-१४०-३) both the parents approach the child.

(५६) आदिन्मातॄराविशद्यास्वा शुचिरहिंस्यमान उर्विया विवावृधे ।
अनुयत्पूर्वा अरुहत्सनाजुवो नि नव्यसीष्ववरासु धावते (१-२१-१४१-५) अग्नि lies with his old and young mothers—promiscuity (आपल्या वृद्ध आणि तरुण मातांबरोबर समागम करतो).

(५७) जानन्नेव जानती नित्य आ शये lies with well-known girls and assumes an innocent form in the presence of elders. प्रसिद्ध मुलींच्याबरोबर वडीलधाऱ्यांसमोर निष्पाप असल्याचे दाखवितो (१-२१-१४०-७/८). youngsters co-habiting in the absence of elders. शंकर पंडित calls it गूढार्थ. वडीलधाऱ्यांच्या गैरहजेरीत एकत्र विहार करणारे तरुण. शंकर पंडित याला गूढार्थ म्हणतात.

(४४) यूयं शचीभि र्विमदाय जायां न्यहथुः पुरुमित्रस्य योषाम् (१-१७-११७-२०) you gave a girl woman as wife to विमद (तू विमदाला स्त्री पत्नी म्हणून दिलीस).

(४५) योषा वृणीत जेन्या युवां पती (१-१७-११९-२०) सूर्या or ऊर्जानी made you two her masters–polyandry (सूर्याने तुम्हा दोघांना आपले पती केले—बहुपतित्व).

(४६) तनूनपात् son of son (तनूचे मुलगे)तनु son नपात् son (मुलगा).

(४७) दश प्रमतिं जनयंत योषणः (१-२१-१४१-२) ten women generated अग्नि (दहा स्त्रियांना जन्म दिला).

All the women of a clan were the mothers of all the children of the clan (टोळीतील सर्व स्त्रिया टोळीतील सर्व मुलांच्या माता).

---

(१) नाग्निं चित्वा रामां उपेयात् अयोनौ रेतो धास्यामीति p. ३७५४ (कांड ५-६-८). They used to lie promiscuity with any woman. That

was prohibited by this मंत्र ते कोणत्याही स्त्रीबरोबर मुक्तपणे समागम करीत. त्याला या मंत्राने बंदी केली.

(२) एतं वै पर आट्णारः प्रजाकामा सहस्त्रं पुत्रान् अविन्दंत ३७६१ (५–६–५)

(भारतीय विवाहसंस्थेविषयी निबंध तयार करण्याकरिता राजवाड्यांनी केलेली टिपणे आतापर्यंत छापिली. यापुढे या विषयावर त्यांनी लिहिलेले निबंध छापण्यास सुरुवात केली आहे. या अंकात छापलेला पहिला निबंध हा मागे ‘ चित्रमयजगत् ’मध्ये १९२५ सालात छापला होता. बाकीचे निबंध छापले न गेल्यामुळे ते यापुढे देण्यात येणार आहेत.—संपादक)

प्रकरण १ ले

स्त्रीपुरुषसमागमसंबंधक कित्येक अतिप्राचीन आर्ष चाली

(१) मित्राला किंवा अतिथीला स्वस्त्री संभोगार्थ देण्याची चाल पुरातनकालापासून पाणिनीच्या कालापर्यंत भारतीयांत होती. सध्याच्या आपल्या नीतीप्रमाणे पाहता, ही चाल आपणास नीतिबाह्य व चमत्कारिक वाटते; परंतु या उत्क्रमिष्णु जगतात सर्वच वस्तूंना जंगमत्व असल्यामुळे, नीती ही वस्तुदेखील उत्क्रमिष्णु आहे, स्वयंभू, स्थाणु किंवा स्थिर नाही. त्या त्या काळी ती ती चाल नीतिमत्तेची समजली जाते व वाटत्ये इतकेच. तो काळ पालटला व समाजात अंतर्घर्षणाने किंवा बाह्य प्रेरणेने बदल झाले म्हणजे ती जुनी व वहिवाटेतून गेलेली किंवा जात असलेली चाल नीतिबाह्य व चमत्कारिक भासून तिची गणना गर्ह्य वस्तूंत होते. गर्ह्य म्हणजे समाजाला अमान्य एवढाच अर्थ मुळात असतो हे विसरता कामा नये. अशा गर्ह्य म्हणजे सध्याच्या समाजाला अमान्य व विलक्षण भासणाऱ्या अशा स्वस्त्रीसमर्पणाव्यतिरिक्त इतर कित्येक चाली पुरातन आर्य समाजात, पृथ्वीच्या पाठीवरील इतर प्राचीन व अर्वाचीन कमजास्त रानटी समाजातल्याप्रमाणे प्रचलित होत्या. पैकी काहींचा निर्देश पुढे करतो.

(२) महाभारतांत व हरिवंशात प्रथम प्रजोत्पत्ती ब्रह्मदेवापासून झाली असे वर्णन आहे. आदिपर्वाच्या ६६ व्या अध्यायांत ब्रह्मदेवापासून वंशावळ दिली आहे ती अशी :

ब्रह्मा

मरीचि — दक्ष × दक्षा — धर्म

मरीचि → कश्यप × दक्षाच्या १३ कन्या

दक्ष × दक्षा : दक्षाने स्वभगिनी दक्षा इजशी विवाह केला. → ५० कन्या

धर्म × दक्षाच्या १० कन्या

ह्या वंशावळीत (१) पहिली लक्ष्यात घेण्यासारखी बाब म्हटली म्हणजे दक्ष व दक्षा ह्या सख्ख्या बहीणभावंडांचा शरीरसंबंध ही होय. ब्रह्मदेवाच्या उजव्या आंगठ्यापासून दक्ष झाला व डाव्या आंगठ्यापासून दक्षाची भार्या झाली. दक्षाच्या ह्या भार्येचे किंवा बहिणीचे नाव व्यासांनी दिलेले नाही. व्यासांची ही कदाचित् नजरचूक असेल किंवा त्यांच्यापर्यंत ही पुरातन कहाणी जेव्हा पोहोचली तेव्हा ह्या स्त्रीचे नाव लोककथेतून नष्ट झाल्यामुळे व्यासांनी ते सहजच दिले नसेल. कारण कोणतेही असो, दक्षाच्या बहिणीचे नाव व्यासांच्या महाभारतात नमूद नाही एवढे खरे. समजुतीच्या सौकर्यार्थ ह्या बाईचे नामकरण मी दक्षा म्हणून केलेले आहे. वंशावळीतील (२) दुसरी लक्ष्य बाब अशी की ब्रह्मदेवाचा नातू जो कश्यप त्याने आपल्या १३ चुलतबहिणींशी समागम केला आणि (३) तिसरी लक्ष्य बाब ही की ब्रह्मदेवाचा पुत्र जो धर्म त्याने आपल्या १० पुतण्यांशी संगनमत केले. तात्पर्य, सख्खी भावंडे, चुलतभावंडे व चुलता-पुतणी यांचे शरीरसंबंध प्राचीन आर्षकाळी होत असत असे इतिहासकार जे महर्षी व्यास ते लिहून ठेवतात. परंपरेने समाजात ज्या लोककथा चालत येतात त्यांचा स्वतंत्रपणे उल्लेख ज्या इतिहास-पुराणांतून येतो तो इतिहास वर लिहिल्याप्रमाणे अतिप्राचीन आर्य समाजांत प्रचलित असलेल्या चालींचा निर्देश करतो. भारतहरिवंशादी इतिहासातून उल्लेखिलेल्या ह्या चालींचा निर्देश ऋग्वेदादी ग्रंथांतूनही आढळतो. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळातील दहावे यमयमी–संवादात्मक सर्वप्रसिद्ध सूक्त एतत्प्रकरणी विचारार्ह आहे. यम आणि यमी अशी दोन सोदर बहीणभावंडे ऋग्वेदाहूनही प्राचीन काळी आर्षसमाजात होऊन गेली. यम आणि यमी ही व्यक्तिनामे यमाजी व यमूबाई, यमाबाई या रूपाने अद्यापही आपल्या म्हणजे ऋषींचे वंशज जे आपण त्यांच्या समाजात सर्रहा प्रचारात आहेत. यमी आपल्या सोदर भावाला म्हणते की तू माझ्याशी पतिभावाने वाग व आपल्या बापाचा नातू माझ्या ठायी उत्पन्न कर.

ओचित् सखायं सख्या ववृत्यां, पितु र्नपातं आदधीत, यमीचे हे म्हणणे यमाला रुचले नाही. तत्रापि यमी यमाला आग्रहाने म्हणते की,

जायेत पत्ये तन्वं रिरिच्याम् विचिद् गृहेव रथ्येव चक्रा.

इतकेच बोलून यमी गप्प बसली नाही. ती यमाला आणीक असे म्हणाली की, भाऊ असतांना बहीण अनाथ राहिली व दुःख भोगीत पडली, तो भ्राता कसला ?

किं भ्राताऽसद्यदनाथं भवाति ।
किमु स्वसा यन्निर्ऋति र्नि गच्छात् ॥

येथे भ्राता लक्ष्य आहे. भ्रातृ व भर्तृ हे दोन्ही शब्द भृ भरणे, पालन करणे या धातूपासून निघालेले असून दोन्ही शब्दांचा अर्थ पालन करणारा, रक्षण करणारा, भरण करणारा असा आहे. पैकी भ्रातृ हे रूप भर्तृ या रूपाहून जुनाट आहे. बहिणीचे म्हणजे

भगिनीचे पतिभावाने भाऊ भरण करीत, सबब भावांना भ्रातृ हे नाव अतिप्राचीन आर्षकाली पडलेले आहे. स्वसृ हा शब्दही हाच इतिहास सांगतो, स्वान् सरति अनुगच्छति इति स्वसा. स्वतःच्या कुळातील भावांना जी अनुसरते ती स्वसृ. भ्रातृशीं शरीरसंबंध ठेवी, व त्या संबंधामुळे ती सनाथ म्हणजे सुसंरक्षित होई हा मूळ इतिहास. तात्पर्य, सोदर बहीणभावांचा शरीरसंबंध अत्यंत प्राचीन आर्षकाली होत असे, या भारतीय ऐतिहासिक विधानाला ऋग्वेदांतील वचनांचा दुजोरा मिळतो. ह्या अतिप्राचीन आर्ष चालीसंबंधाने येथे एक इशारत देऊन ठेवणे युक्त आहे. सख्खे, सोदर, चुलत, चुलतापुतणी, हे शब्द व शरीरसंबंध इतिहासकार जे व्यास व ऋग्वेदकार जे मंत्रकर्ते ऋषी त्यांच्या काळचे आहेत, मूळ ब्रह्मदेव व दक्षप्रजापती यांच्या अतिप्राचीन काळचे नाहीत. ब्रम्ह व दक्ष यांच्या काली भाऊ, बहीण, चुलता, पुतणी संबंध समाजात उद्भवले नव्हते व अर्थात् माहीत नव्हते, फक्त स्त्री आणि पुरुष, दोन संबंध तेवढे समाजाच्या लक्षांत आलेले होते. तथापि असाही एक प्राचीन काल होता की ज्या काली हा भेद भिन्नलिंगदर्शक शब्दांनी दर्शविण्याची क्लृप्ती आर्यांना सुचली नव्हती. उदाहरणार्थ, ऋषिः हा शब्द मंत्रद्रष्ट्या स्त्रीपुरुषांना सूक्तांच्या मथळ्यावर लावलेला आढळतो. ऋषिः हे रूप वैय्याकरणदृष्टीने पुल्लिंगी आहे, पण "अस्य सूक्तस्य वाग् ऋषिः" या वाक्यात ऋषि हा शब्द स्त्रीलिंगी वाग् या शब्दाला जोडलेला आहे. तात्पर्य, स्त्रियांचा व पुरुषांचा दर्जा एका अतिप्राचीन रानटी काली समान मानण्याची रीत प्रचलित होती, हे ह्या स्त्रीलिंगी व पुल्लिंगी ऋषिः रूपावरून अनुमानता येते. या अनुमानाशी प्रस्तुत आपणास विशेष कर्तव्य नाही. सध्या आपण एवढेच शोधण्याचा व साधार सांगण्याचा यत्न करीत आहोत की प्राचीन आर्यकाली बहीणभावांचा पतिपत्नीभावाने व्यवहार चालत असे. हा व्यवहार प्राचीन आर्य लोकांतल्याप्रमाणेच तत्समकालीन इतर प्राचीन समाजात असलेला आढळतो. पांच सात हजार वर्षांपूर्वीच प्राचीन मिसर समाजांत बहीण भावंडांच्या लग्नाची चाल जारीने प्रचलित होती व ती क्लियोपट्रेच्या कालापर्यंत टिकली होती हे इतिहासात नमूद आहे.

(३) हरिवंशाच्या दुसऱ्या अध्यायात वर्णन आहे की वसिष्ठ प्रजापतीची मुलगी शतरूपा ही वयात आल्यावर आपला पिता जो वसिष्ठ त्याच्याशी पत्नीभावाने राहिली. तसेच ह्याच ग्रंथाच्या दहाव्या अध्यायात असे विधान केले आहे की मनूने आपली मुलगी इला इजशी शरीरसंबंध केला. त्याचप्रमाणे इतिहासाच्या सत्ताविसाव्या अध्यायात असे लिहिले आहे की जन्हूची मुलगी जी जान्हवी गंगा हिने आपला बाप जन्हू यालाच आपला पती केले. ह्या तीन ऐतिहासिक उदाहरणांचा अर्थ असा की बाप आणि त्याच्या पोटची मुलगी यांचा शरीरसंबंध अतिप्राचीन आर्ष काली होत असे व तो तत्कालीन समाजमान्य असल्यामुळे निंद्य किंवा गर्ह्य मानला जात नसे. ही ऐतिहासिक विधाने निव्वळ भाकडकथा आहेत किंवा वास्तविक घडलेली वृत्ते आहेत या

बाबींचा पडताळा व पाहण्याची इतर साधने उपलब्ध आहेत. ऋग्वैदिक अशी एक समजूत सर्वमान्य आहे की सूर्याची दुहिता जी उषा ऊर्फ सरण्यू तीच सूर्याची भार्या होती. यास्ककृत निरुक्तांच्या पाचव्या अध्यायाच्या सहाव्या खंडात उषाः सूर्या वृषाकपायी सरण्यूः ही चार उषसूची नावे दिलेली आहेत.

प्रजापति वैं स्वां दुहितर मध्यायत्। (ऐ. ब्रा. पं. ३ अ. ३ खंड ३३)

ह्या ऐतरेय ब्राह्मणवचनांत हाच अर्थ स्पष्ट सांगितला आहे. पितृदुहितृसंबंधाचा हा वैदिक पुरावा झाला. स्मृतिग्रंथातही ह्या चालींची म्हणजे बापाचा स्वतःच्या मुलीशी संबंध होण्याची ज्ञापके आढळतात. वसिष्ठसंहिता ही एक जुनाटातली संहिता म्हणजे स्मृतिग्रंथ समजतात. ह्या संहितेत कानीन म्हणून ज्याला म्हणतात त्या पुत्रासंबंधाने खालील वाक्ये आली आहेत:—

"कानीनः पंचमः। या पितृगृहे
असंस्कृता कामादुत्पादयेत्
मातामहस्य पुत्रो भवतीत्याहुः।
॥ अथाप्युदाहरंति ॥

अप्रत्ता दुहिता यस्य पुत्रं विंदति तुल्यतः॥
पुत्री मातामहस्तेन दद्यात्पिंडं हरेद्धनं ॥ १ ॥

पित्याच्या घरात राहून विधियुक्त विवाह न होता कन्येला तुल्य जातीच्या पुरुषाकडून जो पुत्र होईल तो पुत्र त्या कन्येच्या बापाचा म्हणजे मातामहाचा शास्त्र म्हणजे रूढी समजते. त्या पुत्राने पिंड द्यावे व धनाचा उपभोग घ्यावा. येथे समाजशास्त्रदृष्ट्या असा प्रश्न उद्भवतो की तुल्य जातीच्या परपुरुषाकडून लग्न न झालेल्या स्वकन्येच्या ठायी जो पुत्र उत्पादन केला तो पुत्र त्या कन्येच्या बापाचा काय म्हणून शास्त्र किंवा रूढी ठरवी? तो कानीन मुलगा ज्या परपुरुषाकडून झाला त्याचा वास्तविक ठरावा व आपल्या आज्याचा म्हणजे आईच्या बापाचा नातू ठरावा. परंतु कानीन मुलगा परपुरुषाचाही न ठरता किंवा आज्याचा नातूही न ठरता, आज्याचा धर्मोत्पादित पुत्र ठरे व त्या पुत्राची प्रत्यक्ष आई त्याची बहीण ठरे. ह्या चमत्कारिक चालीचा अर्थ काय? समाजात ही समजत व रूढी व हा धर्म काय म्हणून मान्य झाला? सध्याच्या आपल्या समाजात असा प्रकार निंद्य समजला जाईल. परंतु वसिष्ठसंहिताकाली तो अधर्म्य व निंद्य समजला जात नसे. ह्याचे कारण काय? ह्याचे कारण एकच आहे आणि ते हे की वसिष्ठकालीन समाज अशा एका पुरातन समाजाचा वंशज होता की ज्या समाजात पिता आपल्या स्वतःच्या कन्येच्या ठायी संतती उत्पन्न करी. सर्वच समाजात ही चाल त्या पुरातनकाली प्रचलित असल्याकारणाने कोणी कोणाला नावे ठेवीत नसत. म्हणजे त्या चालीला

अधर्म्य व निंद्य समजत नसत. वसिष्ठोत्तर मन्वादिसंहिताकाराना व मन्वादिसंहिताकालीन आर्यसमाजांना स्वकन्येच्या ठायी परपुरुषाकडून झालेल्या मुलाला कन्येच्या बापाने आपला मुलगा म्हणावा ही चाल अप्रशस्त व अस्वाभाविक वाटून त्या कानीन मुलाचे पितृत्व उत्पादक परपुरुषाकडे किंवा कन्येच्या भावी पतीकडे येणे प्रशस्त वाटलेले उत्तर-कालीन स्मृतिग्रंथातून नमूद केलेले आहे. त्या नमूदीचा प्रपंच प्रस्तुत प्रकरणाचा विषय नसल्यामुळे, तत्संबंधाने जास्त लिहिण्याचे येथे प्रयोजन नाही. येणेप्रमाणे अतिप्राचीन आर्यसमाजात पितृदुहितृशरीरसंबंध एका काली प्रचलित होता हे विधान स्मृतिग्रंथातील वचनांनीही सिद्ध होत आहे. एकूण इतिहास, वेद व स्मृती, किंवा इतिहास, श्रुती व स्मृती या तिहीतील वचनांचा आधार या चालीच्या अस्तित्वाची सिद्धी करण्यास उपलब्ध आहेत. सबब, प्राचीन आर्यलोकात ही चाल प्रचलित होती या विधानाच्या पोषणार्थ जास्त पुरावे गोळा करण्याची किंचिन्मात्रही आवश्यकता राहिली नाही.

(४) वर जी ही भारतीय, हरिवंशीय, वैदिक व स्मार्त शरीरसंबंधक उदाहरणे नमूद केली ती सर्व एका स्त्रीशी एकाच बापाचा किंवा भावाचा शरीरसंबंध दाखविण्यापुरवी झाली. अनेक सपिंड पुरुषांचा एकाच सपिंड स्त्रीशी संबंध दाखविणारी वाक्येही इतिहासातून सापडतात. हरिवंशाच्या दुसऱ्या अध्यायात असे लिहिले आहे की, दहा प्रचेत्यांनी व त्यांचा पुत्र सोम याने सोमाची मुलगी जी मारिषा तिचे ठायी आपापली तेजे घालून दक्ष प्रजापति निर्माण केला. पितृदुहितृसंबंधाचे तर हे उदाहरण आहेच. शिवाय आजा व नात यांचा संबंध या उदाहरणात दाखविला आहे, इतकेच नव्हे तर दहा आजे व एक बाप यांचा संबंध बापाच्या मुलीशी झाल्याचे लिहिले आहे. याच अध्यायात पुढे असे वर्णन आहे की सोमाचा मुलगा किंवा दौहित्र जो दक्ष प्रजापति त्याने आपल्या सत्तावीस मुली आपला बाप किंवा आजा जो सोम त्यास प्रजोत्पादनार्थ दिल्या. येथेही आजाचा व नातींचा शरीरसंबंध झाल्याचा दाखला मिळतो. हरिवंशाच्या तिसऱ्या अध्यायात असे नमूद केले आहे की ब्रम्हदेवाचा पुत्र दक्ष याने आपली मुलगी ब्रम्हदेवाला दिली व तिजपासून प्रसिद्ध नारद झाला. हाही संबंध वरच्याच वर्गातला आहे. हे विचित्र संबंध वर्णिलेले, आणि तेही इतिहासकार व्यासांनी व वैशंपायनांनी वर्णिलेले ऐकून, सध्या आपल्याला जे आश्चर्य वाटते तेच आश्चर्य जनमेजय राजाला पाच हजार वर्षांपूर्वी वाटले आणि आपण जो प्रश्न करू तोच जनमेजयाने वैशंपायनांना केला. जनमेजय विचारतो की, वैशंपायन हो! हे असले अधर्म्य संबंध झालेले आपण इतिहास म्हणून वर्णिता याचा अर्थ काय? जेव्हा जनमेजयाचे वैशंपायनांनी असे समाधान केले की पूर्वयुगी हे असले संबंध होणे हाच धर्म ऊर्फ समाजरूढी सर्वमान्य होती. वर्तमानकाली समाजशास्त्रदृष्ट्या आपण जे उत्तर देऊ तेच उत्तर वैशंपायनांनी दिले. वैशंपायनाला, भीष्माला व व्यासाला पूर्व इतिहास म्हणून या कथा परंपरेने माहीत होत्या व पुरातन इतिहास म्हणून त्यांनी त्या ज्ञानतः

नमूद करून ठेविल्या आहेत, अज्ञानाने काहीतरी भोळसटपणा केलेला नाही. हर्यश्व व युवनाश्व असे दोघे भाऊ होते व या दोन भावांना एक बहीण होती. हर्यश्वाचा मुलगा जो यादववंशस्थापक यदु ह्याने आपल्या बापाच्या बहिणीच्या पाच मुलींशी शरीरसंबंध केला (हरिवंश, अध्याय २३७). येथे आतेबहिणीशी संबंध झाला. वरील सर्व अवतरणांचा मथितार्थ असा की प्राचीन काळी आर्यसमाजात सख्खी बहीण, चुलत बहीण, नात, सख्खी मुलगी व आतेबहीण यांच्याशी शरीरसंबंध आर्ष लोक करीत असत. यात बरेच नातगोत गोविले गेले हे खरे, परंतु ह्याहून आश्चर्यकारक चाली महाभारतात वर्णिल्या आहेत. महाभारताच्या आदिपर्वाच्या ४५ व ४६ या अध्यायांत अर्जुन व ऊर्वशी यांच्या भेटीचा वृत्तान्त दिला आहे. ऊर्वशी ही पौरववंशाची जननी आणि अर्जुन हा तिचा वंशज. असे असून भेटीच्या वेळी ऊर्वशीने अर्जुनाजवळ भोगयाचना केली ती अर्जुनाने फेटाळली; कारण अर्जुनाचा पूर्वज जो ऊर्वशीपती पुरूरवा त्याच्या काळच्या नीतींत व अर्जुनाच्या काळच्या नीतीत बहुत अंतर पडून प्रगती झाली होती. ऊर्वशी ही जुनाट स्त्री पुराणप्रिय असल्यामुळे ती पुरातन नीतीला अनुसरणारी होती. ती अर्जुनाला म्हणते, "मला तू असा फेटाळू नको, पुरूच्या वंशातील आमचे जे पुत्र व पौत्र येथे इंद्रलोकी येतात ते आमच्याशी रमतात आणि त्यांना कोणी दोष देत नाहीत, तेव्हा तूही मजशी रमलास तर तुलाही त्यात काही दोष नाही." अशी पुरातन नीति यद्यपि ऊर्वशीने आपल्या वंशजाला सांगितली तत्रापि नीतिसुधारक अर्जुनाने ती मान्य केली नाही. तेव्हा संतप्त होऊन ऊर्वशीने अर्जुनाला शाप दिला की, तू माझा आदर केला नाहीस सबब वर्षभर षंढ होशील. हे उदाहरण मातृगमनाचे किंवा मातामहीगमनाचे किंवा प्रमातामहीगमनाचे, असे वाटेल त्याचे समजावे; कारण, अर्जुन हा इंद्राचा मुलगा व ऊर्वशी ही इंद्राची भोग्य अप्सरा, या दृष्टीने ऊर्वशी अर्जुनाची माता ठरते; आणि अर्जुनाचा पूर्वज जो पुरूरवा त्याची स्त्री म्हणून प्रमातामही ठरते. तात्पर्य मात्रागमनाची चाल पुरातन भारतीयात होती. त्या काली माता, पिता, भाऊ, बहीण, नात, मुलगी, चुलतबहीण, आतेबहीण वगैरे नाती उत्पन्न झालेली नव्हती. यावरून अत्यंत पुरातन भारतीय पूर्वज किती रानटी स्थितीत होते त्याचा वर्तमानकालीन कित्येक रानटी समाजांशी तुलना करिता, अंदाज करता येतो.

The Chippeways frequently cohabit with their mothers and oftener still with their sisters and daughters. Kadiaks unite indiscriminately, brothers with sisters and parents with children. The Caribs married at the same time a mother and a daughter. The ancient Irish married, without distinction, their mothers and sisters (Letourneau, page 65-66).

[चिपेवे काही वेळेला आपल्या आयांच्या बरोबर व पुष्कळदा आपल्या भगिनी व

मुली यांचे बरोबर संभोग करीत. कादिकांच्यात अनिर्बंध संभोग असे, भाऊ-बहिणींचा व बाप लेकींचा. कारीब एकाच वेळी आई आणि मुलगी यांचेशी विवाह करतात. आयर्लंडचे जुने रहिवासी अनिर्बंधपणे आपले आया व बहिणी यांचेबरोबर विवाह करीत [लिटोर्न्यू–पृ. ६५–६६].

चिपेवे, कारीब वगैरे लोक रानटी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याच दर्जाचे महाभारतात वर्णिलेले हे प्राचीन आर्य लोक होते, असे म्हणावे लागते. आई, मुलगी, बहीण यांच्याशी व्यवाय करणारे असे लोक केवळ प्राचीन आर्यसमाजातच तेवढे होते असे समजू नये. खुद्द कौरवपांडवांच्या काली भारतवर्षात भारतीय म्हणून गणले जाणारे काही समाज प्राचीन आर्यसमाजाइतके किंवा त्यांच्याहूनही विचित्र होते. कर्णपर्वाच्या ४० पासून ४६ पर्यंतच्या अध्यायात कर्ण व शल्य हे एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत आहेत. त्यात शल्याला वाक्प्रहार करताना शल्याच्या राज्यातील जे आहीक, आरट्ट, पांचनद व भद्र देश तेथील लोकांच्या निंद्य–म्हणजे आर्यावर्तातील लोकांच्या दृष्टीने निंद्य-चाली-संबंधाने कर्ण म्हणतो, " शल्या, तुझ्या मद्र देशांत पिता, पुत्र, माता, सासू, सासरा, मामा, जावई, मुलगी, भाऊ, नातू व दुसरे बांधव, सोबती, पाहुणे व दासदासी ही सर्व सरमिसळ व्यवाय करतात. त्या देशातील स्त्रिया कोणत्याही पुरुषाशी स्वेच्छेने समागम करतात, मग ते पुरुष त्यांच्या ओळखीचे असोत नसोत. स्त्रिया भलती-सलती गाणी गातात. मद्रदेशाच्या सान्निध्याने गांधार देशातीलही चाली बिघडल्या. मद्र देशातील स्त्रिया दारू पितात व वस्त्रे टाकून नागव्या नाचतात. स्त्रिया उंट किंवा गाढव यांच्याप्रमाणे नैसर्गिक उत्सर्ग करतात. मद्र देशातील स्त्रियांपाशी कोणी मद्य मागितल्यास त्या कुले खाजवीत खाजवीत मद्य देणार नाही, वाटेल तर पति किंवा पुत्र देऊ म्हणून म्हणतात. वाहीक देशात जारज प्रजेचे प्रमाण अतिशय आहे. शूद्रांपासून अन्य स्त्रियांच्या ठायी झालेले ब्राह्मण तेथे आहेत. आरट्ट देशात, बहिणीच्या मुलांना वारसाहक्क प्राप्त होतो, पोटच्या पोरांना नाही. वाहिक देशात म्हणजे सध्याच्या पंजाबात मनुष्य प्रथम ब्राह्मण बनतो, मग क्षत्रिय होतो, नंतर वैश्य होतो, मग शूद्र होतो, शेवटी नापित होतो, पुनः ब्राह्मण बनतो व ब्राह्मणाचा शेवटी गुलाम बनतो. मद्र देशातील कुमारिका निर्लज्ज व अनाचारी असतात. पांचन देशातील लोक कृतयुगांत सुद्धा अधर्माचरण करणारे ठरतील. या शेवटल्या वाक्याचा अर्थ असा की, कृतयुगात सबगोलंकार असल्यामुळे त्या काली सर्वच अधर्म होता; अशा अधर्मी युगातही पांचनद अधर्मी ठरतील. शेवटी कर्ण म्हणतो की, वाहीकलोक भूतलाला लांछन आहेत व मद्रस्त्रिया स्त्रीजातीला लांछन आहेत ! मद्रलोक गुरुपत्नीगमन व भ्रूणहत्या करतात असेही कर्ण म्हणतो. मद्र व वाहीक देशांची ही निंदा एकट्या कर्णानेच केली आहे असे समजू नये. शांतिपर्वाच्या ३२८ व्या अध्यायात नारद व्यासाला सांगतात की, पृथ्वीवर वाहीक-लोकांचे वास्तव्य पृथ्वीला कमीपणा आणणारे आहे. मद्र व वाहीक इत्यादी निंद्य

देशांच्या प्रगतीला कर्ण प्रस्थल, गांधार, आरट्ट, खस, वसाति, सिंधुसौवीर, कारस्कर, माहिषक, कालिंग, केरल, कर्कोटक, वीरक या देशांनाही बसवितो. पैकी कारस्कर, माहिषक, केरल, कर्कोटक व वीरक हे दक्षिणेकडील देश आहेत. वीरक म्हणजे बहुशः करवीरक असावे. या निंद्य देशांची गणना येथेच संपली नाही. त्यात सुराष्ट्राचीही गणना कर्ण करतो. कर्णमते सुराष्ट्रांतील लोक संकरवृत्ति आहेत (कर्ण–४५). देशांची नाव-निशी संपविताना कर्ण म्लेंच्छ समाजांना विसरला नाही. तो म्हणतो, म्लेंच्छ मानव-जातीला लांछन, औष्ट्रिक म्लेंच्छांना लांछन, षंढ औष्ट्रिकांना लांछन, आणि राजपुरोहित षंढांना लांछन (कर्ण–४५). म्लेंच्छ म्हणजे अस्पष्ट भाषा बोलणारे भारतवर्षातील व भारतबाह्य देशांतील लोक. हा म्लेंच्छसमाज कर्णकाली स्त्रीपुरुषसंबंधात अत्यंत अनाचारी होता. पाच हजार वर्षापूर्वीचा कर्णच तेवढा म्लेच्छांची निंदा करतो असे नाही, आधुनिक प्रवाश्यांनी, पुराणेतिहाससंशोधकांनी व प्राचीन ग्रीक व रोमन इतिहासकारांनी ह्या लोकांची अशीच वर्णने केलेली आहेत.

Yazidies, a sect of Arabs, unite in the darkness without heed as to adultery or incest (Letourneau 44) Justin and Tertullian tell that the Parthians and Persians married their own mothers. In ancient Persia, religion sanctified the union of a son with his mother.

[व्यभिचार किंवा आप्तसंबंध याचा विचार न करता याझीदी, अरबातील एक पंथ, अंधारात संभोग करतात (लिटोर्न्यू-४४). जस्टिन आणि टेर्टुलियन असे सांगतात की, पार्थियन आणि पर्शियन आपल्या स्वतःच्या आईशी विवाह करीत. जुन्या पर्शियात मुलगा आणि आई यांच्या विवाहाला धर्माने मान्यता दिली होती.]

ही वर्णनमाला आणीक हवी तितकी वाढविता येईल. "व्यभिचारियासी मल्याळ देश" म्हणून मुक्तेश्वर आपल्या भारतात मल्याळ ऊर्फ मलयदेशाची कुत्सा करतो वर्तमानकाळी महाराष्ट्रात कोल्हाटी म्हणून लोक आहेत, त्यांच्यातील स्त्रियांची व नीतीची पूर्ण फारकत असलेली आढळून येते. येणेप्रमाणे म्लेंच्छ लोकांच्या नीतीसंबंधाने सर्वसामान्य हकीकत आहे. पैकी कर्णाचा कटाक्ष, गंधार, मद्र या देशांच्या बाजूच्या म्लेंच्छ लोकांवर मुख्यतः असलेला दिसतो. सभापर्वात (अध्याय ३१) माहिष्मतीनगरीत स्त्रिया स्वच्छंद वागतात म्हणून वर्णन आहे. उत्तरकुरूंत, म्हणजे जेथून कौरवपांडव मूळ आले त्या देशात, स्त्रिया स्वच्छंदाने वागतात आणि नरनारींमध्ये तत्संबंधाने मत्सरबुद्धी वास करीत नाही, असे अनुशासन पर्वाच्या १०२ व्या अध्यायात वर्णन आहे.

(५) महाभारतात व हरिवंशात वंशोत्पत्तीसंबंधक जे पुरातन इतिहास–पुरातन इतिहास हा शब्द माझा नाही. व्यासांचा आहे – दिले आहेत त्यांच्यावरून भारतीय समाजाची पुरातन नीतिमत्ता आपल्या सध्याच्या नीतिमत्तेच्या दृष्टीने कोणत्या दर्जाची

होती, हे आपणास बऱ्याच खुलाशाने सांगता आले. हा खुलासा ह्या पुरातन इतिहासांच्या आधाराने आणीकही विस्तृत करता येण्यासारखा आहे. मनुष्य हा वंशाने पाशव आहे व प्राथमिक वन्य मनुष्यांत काही काही बाबतीत पशूंचे आचरण दृष्टीस पडल्यास नवल करावयास नको. आदिपर्वाच्या ६३ व्या अध्यायात पराशरऋषी व सत्यवती ऊर्फ मत्स्यगंधा निषादी यांच्या समागमाचा वृत्तान्त दिला आहे, त्यात पराशराने सत्यवतीशी उघड्यात समागम केल्याचे लिहिले आहे. आपले कृत्य दिसू नये म्हणून पराशराने भोवताली योगमायेने अंधार उत्पन्न केला म्हणून कवीने पराशराची पाशववृत्ती झाकण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु थोडे सूक्ष्म पाहिले असता त्यात विशेषसा राम दिसत नाही; कारण अतिप्राचीन आर्यलोकांत दिवसाढवळ्या उघड्या हवेत स्त्रीपुरुष समागम होण्यात काही नीतिभंग होतो असे वाटत नसल्याचा पुरावा आहे. उतथ्यपुत्र दीर्घतपाने सर्व लोकांसमक्ष स्त्रीसमागम करण्यास आरंभ केला, असे वर्णन आदिपर्वाच्या १०४ व्या अध्यायात आढळते. आदिपर्वाच्या ८३ व्या अध्यायात, गुरुदारेशी रत होणारे आणि पशूंसारखे ज्यांचे आचारविचार आहेत, अशा म्लेंच्छ लोकांचे गुणवर्णन केलेले आढळते. सर्व लोकांसमक्ष उघड्यात स्त्रीसमागम करण्याची चाल हिंदुस्थानात कोठे कोठे अवशिष्ट असलेली अर्वाचीन प्रवाशांनी नमूद करून ठेविली आहे. रणजितसिंग हत्तीच्या अंबारीत सर्वांसमक्ष स्त्रीसमागम करी म्हणून ज्याक्मो लिहितो. पुण्यात बाजीराव रघुनाथ ह्यांची घटकंचुकी सर्वप्रसिद्ध आहे. निवडक स्त्रीपुरुष रंगमहालात जमून स्त्रियांच्या चोळ्या एका घागरीत घालीत व ज्या पुरुषाला ज्या बाईची चोळी सापडे तिशी तो सर्वांदेखत रममाण होई. या पाशव खेळाला घटकंचुकी म्हणत. ही घटकंचुकी कर्नाटकात पाचपन्नास वर्षांपूर्वी प्रचारात होती. घटकंचुकीत वडील, धाकुटे किंवा नाते हा भेद पाळीत नसत ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. असो. प्राचीन आर्य समाजाच्या जोडीला प्राचीन शक, अर्वाचीन टाहीटियन व प्राचीन तामील लोकांना बसविता येईल. हिरोडोटस एस्किथियन (Skythian) म्हणजे शक लोकासंबंधाने लिहितो की, When one of them desires a woman, he suspends his quiver in front of his chariot and tranquility unites with her. (जेव्हा त्यापैकी कोणाला स्त्री-संभोगाची इच्छा होई तेव्हा ते आपला भाता रथाला लटकावून शांतपणे संभोग करीत). हाच इतिहासकार तामील लोकांसंबंधाने नमूद करतो की, They coupled as publicly as beasts. (ते जनावरांच्याइतक्याच उघडपणे संभोग करीत). तात्पर्य, प्राचीन शक किंवा तामील किंवा अर्वाचीन टाहीटियन लोकांची जी वन्यावस्था होती व आहे तीच निकृष्ट दशा प्राचीन आर्य लोकांची असलेली महाभारतावरून दिसते. ही रानटी चाल जसजशी मोडत गेली तसतसा तद्विरुद्ध धर्मही निर्माण होत गेला. मैथुन एकान्तात करावे, म्हणून शांतिपर्वाच्या १९३ व्या अध्यायात व इतर स्मृतिग्रंथांत मुद्दाम सांगितलेले आहे. लोकान्तात मैथुन करण्याची चाल कधीतरी अस्तित्वात असल्याबिगर, ते एकान्तात करण्याचा

निर्बंध घालण्याची आवश्यकता भासली नसती. आर्ष लोकांत लोकान्तात मैथुन करण्याची चाल असल्याचा सुगावा अयोनिज या शब्दात सापडतो. द्रौपदी; सीता वगैरे अनेक व्यक्तींची उत्पत्ती अयोनिज झाल्याची वर्णने आहेत. अयोनिज या शब्दाचा अर्थ काय? अयोनिज म्हणजे स्त्री-योनीपासून न झालेले अपत्य असा उत्ताना अर्थ करतात, परंतु असा अर्थ करणे समंजस नाही. स्त्रीयोनिव्यतिरिक्त प्रजा होणे ज्या अर्थी अशक्य आहे त्या अर्थी हा उत्तानार्थ खरा अर्थ नव्हे, हे स्पष्टच होते. अयोनिज या शब्दाचा खरा अर्थ खालीलप्रमाणे आहे. योनि या शब्दाचा अर्थ गृह असा मुळात आहे व वेदांत या अर्थाने हा शब्द योजिलेला आढळतो. आरोहंतु जनयो योनि अग्रे (तैत्तिरीय आरण्यक प्रपाठक ६, अनुवाक १). स्त्रिया आधी घरात शिरोत, असा अर्थ आहे. योनिज म्हणजे घरात जन्मलेले मूल व अयोनिज म्हणजे घरात न जन्मलेले म्हणजे घराबाहेर जन्मलेले. घराबाहेर जन्मलेले म्हणजे कोठे जन्मलेले ? तर यज्ञमंडपात जन्मलेले. ऋषी वामदेव्यव्रते करीत आणि ही व्रते यज्ञभूमीवर करीत असताना कोण्याही स्त्रीने संभोगेच्छा दर्शविली असता ती तेथल्या तेथे पूर्ण करीत. वामदेव्यव्रताचे मंत्र छांदोग्योपनिषदात दिले आहेत. असल्या ह्या व्रताच्या वेळी जे मूल जन्मास घातले गेले त्या मुलास अयोनिज मूल म्हणजे घराबाहेर जन्मास घातलेले मूल म्हणत. यज्ञभूमीवर उघड्यात संभोग केल्याची उदाहरणे महाभारतात आहेत. तात्पर्य, आर्ष लोकांत उघड्यात समागम करण्याची चाल एके काळी होती व तिचा अवशेष म्हणून यज्ञभूमीवर वामदेव्यादी व्रते करताना समागम करण्याची चाल शिल्लक राहिलेली दिसते.

(६) संकीर्ण समागम व उघड्यात समागम या दोन रानटी चालींप्रमाणे प्राचीन आर्षलोकांत तिसरी एक वन्य चाल आहे. आपल्या समाजाहून कर्तृत्वाने, सामर्थ्याने व ऐश्वर्याने जो समाज अतीच अती श्रेष्ठ असेल, त्या समाजातील पुरुषांशी स्वस्त्रियांचा समागम झाल्यास भूषण मानणारे काही निकृष्ट समाज नुकते परवापरवापर्यंत होते.

In Tasmania it was thought an honour for women to prostitute themselves to Europeans, who were ennobled in the eyes of the natives by the prestige of their superiority (Letourneau). (टास्मानियात युरोपियन पुरुषाबरोबर संबंध असणे हा स्त्रीचा मोठेपणा मानला जाई; हे कारण तद्देशीय लोकांच्या दृष्टीने त्यांच्या उत्तमपणामुळे त्यांना श्रेष्ठत्व प्राप्त झालेले होते.) टास्मेनियन लोकांना जो युरोपियन लोकांचा दरारा, आदर, प्रेम वाटे तसलाच दरारा आदर व प्रेम आर्ष मानवांना देव म्हणून कोणी लोक होते त्यांचे वाटे. देवांनी जर कोण्या मानव स्त्रीच्या ठायी गर्भाधान केले, तर आपले भाग्य शिखरास पोहोचले असे प्राचीन आर्षांना वाटे. ह्या समजुतीचे प्रमाणक असे दाखले भारतात व हरिवंशात इतके आहेत की त्याचे परिगणन करण्याची अपेक्षा विशेषशी आपल्या देशात कोणाला वाटणार नाही. इंद्रापासून, यमधर्मापासून, नासत्यांपासून, अग्नीपासून, वायूपासून व इतर

देवांपासून आर्ष स्त्रियांना संतती झाल्याच्या कथा विपुल आहेत. देवसमाजासंबंधाने आर्ष लोकांना इतका काही दरारा वाटे की आर्ष लोकांत स्त्री अपत्य जन्मले की त्या वर देवांचा हक्क ते प्रथम कबूल करीत. स्त्री-अपत्य दोन वर्षांचे होईपर्यंत तिच्यावर अमुक देवाचा हक्क, चार वर्षांचे होईपर्यंत अमुक देवाचा हक्क आणि सहा वर्षांचे होईपर्यंत अमुक देवाचा हक्क असे जन्मापासून आर्ष स्त्रियांवर देवांचे अग्र हक्क असत.

सोमः प्रथमो विवेदे गंधर्वो विविद उत्तरः । ऋग्वेद
तृतीयो अग्निष्टे पति स्तुरीयस्ते मनुष्यजाः ॥ १०।८५।४०

हा हक्क कसा उत्पन्न झाला याचा अंदाज करता येतो. देवसमाज व आर्ष समाज हे दोन प्रातिवेशिक समाज असत. देवसमाज बलिष्ठ पडल्यामुळे त्याने आर्ष समाजाला आपल्या कह्यात आणले आणि आर्षांच्या सर्व चीजवस्तेवर व मालमत्तेवर ताबा मिळविला. आर्षांची मुख्य मालमत्ता म्हणजे त्यांच्या गुलामवजा स्त्रिया. त्यांच्यावरही देवांचा ताबा बसला, आणि तो ताबा इतका प्रखर बसला की स्त्री जन्मली की तिच्यावर कोणातरी देवाचे स्वामित्व चालू होई. देवांच्या ह्या अग्रहक्कातून मुक्त व्हायचे म्हणजे त्यांना आर्ष लोक नुसते हिरवे धान्य नव्हे तर उत्तम भाजलेल्या धान्याच्या लाह्या व साचलेले तूप देत व आपल्या मुली देवांच्या ताब्यातून सोडवून आणीत. हा देवांचा अग्रोपभोगाचा हक्क म्हणजे Medieval feudal युरोपातील Prelibation चा हक्क होय. Prelibation म्हणजे अग्रोपभोगाचा हक्क. This right of Prelibation has been in use in many fiefs and until a very recent epoch, certain lords of the Netherlands of Prussia, and of Germany still claimed, in our own days. In a French:Titledeed of 1507 we read that the Count d'Eu has the right of prelibation in the said place when anyone marries. Even ecclesiastics claimed the right in their quality of feudal lords (Letourneau).

(हा अग्रोपभोगाचा हक्क अनेक सरंजामी वतनात चालू होता. अगदी आधुनिक कालापर्यंत आणि प्रशियाच्या नेदर्लंडमधील आणि जर्मनीतील काही लॉर्ड आजही हा आपला हक्क असल्याचे सांगतात. १५०७ सालच्या फ्रान्समधील एका सनदेत काउंट ड'ल्यू याला त्या भागात होणाऱ्या विवाहांत अग्रोपभोगाचा हक्क असल्याचा उल्लेख आहे. धर्मगुरुसुद्धा सरंजामदार या नात्याने हा हक्क असल्याचा दावा करीत.

युरोपातल्या धर्माचार्याप्रमाणे आपल्या इकडे वल्लभाचार्यांना हा अग्रोपभोगाचा हक्क परवापरवापर्यंत गुजराथेत लोक देत असत आणि सध्या हक्काची बजावणी यद्यपि अक्षरशः होत नसली, तथापि वल्लभपंथीयांची ह्या हक्काला मानसिक अनुमति आहे. युरोपात हा

अग्रोपभोगाचा हक्क परवापर्यंत होता हे पाहिले म्हणजे प्राचीन आर्षसमाजात पाचसहा हजार वर्षांपलीकडे तो असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. देवलोक व देवसमाज नष्ट झाल्यावर, स्त्रियांचे अर्पण करण्यास मनुष्यदेहधारी देव राहिले नाहीत. परंतु या अवधीत वीरपूजेचा पगडा आर्षांवर बसून इंद्रादी देवांना व वीरांना आर्ष लोक ईश्वर समजू लागले व या ईश्वरांना स्त्रिया प्रथम अर्पण करू लागले. आर्ष ह्या चालीचा अवशेष अद्यापही आपणा महाराष्ट्रीयांत व इतर भारतीयांत जारीने प्रचलित आहे. विवाहात लाजाहोम म्हणून एक होम करीत असतात. या होमाची सर्व प्रक्रिया वधूची देवांच्या हक्कांतून मुक्त करण्यासंबंधाची आहे. आश्वलायन गृह्यसूत्रांतून ही सर्व प्रक्रिया क्रमवार येथे देतो व समाजशास्त्रदृष्ट्या तिचा अर्थ करून दाखवितो. अर्यमन्, वरुण आणि पूषन् या तीन देवांचा ताबा ऊर्फ पाश वधूवर होता. त्या पाशांतून तिला मुक्त करण्याचा वराने संकल्प केला. तेव्हा प्रथम देवांच्या साक्षात् कैचीतून वधूला काढून आणून वराने तिला एका बळकट शिळेसन्निध आणिले आणि म्हटले की इमं अश्मानं आरोह, अश्मेव त्वं स्थिरा भव, सहस्व पृतनायतः, अभितिष्ठ पृतन्यतः ॥ आश्वलायनगृह्यसूत्र, अ. १, खंड ७, सूत्र ७. ह्या शिळेवर चढ, शिळेप्रमाणे स्थिर हो आणि शत्रूंना हतप्रभ कर व तोंड दे. वराने आपल्या ताब्यातून काढून वधू नेलेली पाहून देव क्रोधायमान झाले व ते वधू-वरांवर चालून आले. तेव्हा वधूचा भाऊ जवळ साहाय्यार्थ होता. त्याने मध्यस्थी करून गोष्ट हाणामारीपर्यंत येऊ दिली नाही. त्याने रदबदली करून वराने पळविलेल्या वधूच्या मोबदला भाजलेल्या लाह्या दंड म्हणून देण्याचे कबूल केले व देवांच्या कचाट्यातून बहिणीची मुक्तता केली. ह्या दंडालाच अवदान म्हणून पारिभाषिक नाव आहे. ही तडजोड करण्याला वधूचा भाऊ होता. म्हणून प्रसंगी तो धावून आला. ज्या वधूला भाऊ नसेल तिचे हाल कुत्र्यानेही खाल्ले नसतील. सबब अभ्रातृक मुलीची किंमत विवाहकर्मात अत्यंत निकृष्ट किंवा शून्य मानलेली आहे व तसला पाठिंबा नसलेली मुलगी वधू करू नये असा निषेध केला आहे. शिळेवर वधू घट्ट उभी राहिली. नंतर देवांना द्यावयाचे धान्य भावाने आणिले आणि ते वधूच्या हाताने देवास अर्पण करविले. वध्वंजलौ उपस्तीर्य भ्राता भ्रातृस्थानो वा द्विर्लाजान् आवपति १-७-८. वधूच्या ओंजळीला तूप लावून तिच्या भावाने किंवा भावासारख्याने त्या अंजलीत दोन वेळ लाह्या घातल्या. (पंचप्रवरी असेल तर तीन वेळ लाह्या घालाव्या १-७-९). नंतर लाह्यांच्या अवदाना-वर तूप घातले १-७-१०/११. ते अवदान अग्निद्वारे अर्यमन् वरुण व पूषन् या देवांच्या पदरात टाकले, आणि अवदान देताना देवांना खालीलप्रमाणे बजावले. अर्यमणं नु देवं कन्या अग्निं अयक्षत, स इमा देवो अर्यमा प्र इतः मुंचातु न अमुतः स्वाहा १-७-१३. अग्नीच्या द्वारा कन्या अर्यमन् देवाला हे अवदान देत आहे, सबब येथून नवऱ्यापासून अर्यमन् देवाने हिला सोडवून नेऊ नये, तेथून आपल्या ताब्यातून सोडून द्यावी, हीच बजवणूक पूषन् व वरुण या देवांची भावाने केली. भाऊ साधाभोळा नव्हता,

हडसून खडसून व्यवहार करणारा होता. त्याने एकदम साऱ्या लाह्या किंवा सर्व अवदान तिन्ही देवांपुढे एकदम ओतले नाही. प्रत्येक देवाला एकेकटा बोलावून ज्याचे अवदान त्याच्या पदरात अग्नीला साक्ष ठेवून घातले. ओष्य ओष्य ह एके लाजान् परिणयंति तथा उत्तमे आहुती न सन्निपततः १–७–१५. एकदम सारी अवदाने देण्यात गडबड व गोंधळ होतो, कोणाचे कोणते अवदान ते समजत नाही, सबब प्रत्येक अवदानानंतर अग्नीला प्रदक्षिणा घालून भावाने प्रत्येक देवाच्या माथी त्याचे त्याचे अवदान बिनचूक मारले. भावाच्या साहाय्याने वधूची देवांच्या देण्यातून यद्यपि सुटका झाली, तथापि अद्याप वधूच्या केसांना वरुणाने जखडून बांधलेला लोकरीचा दोर ऊर्फ पाश वधूला पीडा करीतच होता. त्या पाशातून गरीब बिचाऱ्या वधूचे केश वराने हलकेहलके सोडविले व खालील धन्योद्गार काढिले.

प्र त्वा मुंचामि वरुणस्य पाशात् १–७–१७।१८.

प्रिये, तुला वरुणाच्या पाशांतून कायमची मुक्त केली आहे. हे आश्वासन दिल्यावर वराने मोठ्या तोऱ्याने व विजयाने वधूला अपराजित दिशेने सात पावले चालविले. देवांच्या कचाट्यांतून वधू सोडवीत आपण मोठा जय मिळविला हे जाहीर करण्याच्या हेतूने वराने वधूला ईशान्य दिशेकडे नेले, कारण ईशान्य दिशा ही आर्यलोकांना जय मिळाल्याची दिशा होती व एतदर्थ त्यांनी त्या दिशेचे नाव अपराजित असे ठेविले होते. स्त्रियांना अग्रोपभोगाकरिता देवांच्या स्वाधीन करण्याची ही पुरातन आर्ष चाल अवशेषरूपाने सध्या आपणात प्रचलित आहे व ती प्रतीकरूपाने प्रचलित आहे. पुरातन आर्ष लोकांत ही चाल साक्षात् प्रचलित होती. सबब श्रेष्ठांना, समर्थांना व आपल्याहून बलिष्ठांना स्त्रिया अर्पण करणाऱ्या रानटी टास्मेनियन लोकांच्या पंगतीस पुरातन आर्ष लोकांना बसविण्यास हे एक तिसरे कारण उपलब्ध झाले.

(७) पाशव अवस्थेतून परिणत होत होत मनुष्य जमाव करून राहू लागला. या यूथावस्थेत नाना प्रकारचे संकीर्ण व्यवाय स्त्रीपुरुषांत होत. वडील धाकुटपणाचे नाते अस्तित्वातच नसल्यामुळे, वयात आलेल्या कोणत्याही स्त्रीशी पुरुष सरमिसळ व्यवहार करीत. ह्याच्याही पलीकडे जाऊन, यूथावस्थ समाजात वयात न आलेल्या कन्यांशीही व्यवहार झाल्याची उदाहरणे भारतात व हरिवंशात आढळतात. आदिपर्वाच्या ११२ व्या अध्यायात कुंतीचे व पंडूचे संभाषण दिले आहे. त्यात प्राचीनकालीन म्हणजे आपल्याहून फार प्राचीनकालीन स्त्रीधर्माचे निरूपण करताना पंडु म्हणतो, अतिप्राचीन काळीं कन्या कौमारावस्थेपासून पतिमर्यादेचा अतिक्रम करीत व तो अतिक्रम अधर्म समजला जात नसे, म्हणजे तत्कालीन समाजाला संमत असे. कुंतीला कोणत्याही प्रकारची शंका राहू नये म्हणून पंडु पुढे असे ठासून सांगतो की, हे धर्मतत्त्व सनातन असून स्त्रियांस सुखप्रद असल्यामुळे उत्तर करू देशात हा व्यवहार

सांप्रत चालू आहे. उत्तरकुरू ही पांडवांची मूळभूमी असल्यामुळे तिच्यावर त्यांचे विशेष प्रेम असे व तीतील आचार ते शिष्ट मानीत असत, हे येथे लक्षात बाळगिले पाहिजे. हाच प्राचीन सनातन धर्म बालपणी कुंतीला सूर्यनारायणाने सांगितला होता. वनपर्वाच्या ३०७ व्या अध्यायात सूर्य म्हणतो, हे कुंती ! कन्या शब्दाची उत्पत्ती कम् धातूपासून झालेली असून त्याचा अर्थ हव्या त्या पुरुषाची इच्छा करू शकणारी असा आहे. कन्या स्वतंत्र आहे, स्त्रिया व पुरुष यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा आडपडदा नसणे हीच लोकांची स्वाभाविक स्थिती असून, विवाहादिक संस्कार सर्व कृत्रिम आहेत, यास्तव तू माझ्याशी समागम कर, समागम केल्यावरही तू पुनरपि कुमारीच म्हणजे अक्षतयोनीच राहशील. कुंतीला हा काळपर्यंत रजोदर्शन झाले नव्हते, म्हणजे ती केवळ बाला होती. अरजस्क स्त्रीशी समागम केल्याचा दोष भगवान सूर्यनारायणाला लागेल या भीतीने कवीने म्हणजे व्यासांनी येथे वर्णन करण्यात अशी शिताफी केली आहे की कुंतीला ह्याच वेळीं पहिले विटासपण आले म्हणून आगाऊच त्यांनी मेख मारून ठेवली. कवीची ही कारुणिक बुद्धि एकीकडे ठेवून पाहता असे दिसते की कुंती या वेळी अक्षतयोनि व अरजस्क मुलगी होती, कदाचित् तिचा उमेदवार होण्याचा समय जवळ आलेला असावा. कुंतीच्याप्रमाणेच पराशर ऋषीने उपभोगिलेली मत्स्यगंधा कुमारीच होती व उपभोगानंतर कुमारीच राहिली म्हणून कवी सांगतो. गंगानामक कुमारीशी शंतनु राजाने समागम केल्याचे वृत्त सर्वप्रसिद्ध आहे. तात्पर्य, ज्याला आपण कन्यादूषण म्हणून म्हणतो ते प्राचीन आर्यलोकात सनातन धर्म म्हणून होते, व त्याचा प्रघात कौरवपांडवांच्या काळींही होता. हा प्रघात पाणिनीच्या काळीही तुरळक होता. कुमारः श्रमणादिभिः २–१–७०. या सूत्रात कुमारकुलटा, कुमारगर्भिणी व कुमारबंधकी हे तीन सत्पुरुष समास पाणिनी देतो. श्रमणादिगणात कुलटा हा शब्द तिसरा आहे. कुमारकुलटा म्हणजे कुमारी चासौ कुलटा च. कुमारी असून जी कुलटा म्हणजे छिनाल ती कुमारकुलटा. कोंवारपणी जी गर्भार राहिली ती कुमारगर्भिणी व कोंवारपणी जी वांडकी निघाली ती कुमारबंधकी. याचा अर्थ असा की पाणिनीकाली कुमारी व्यभिचारिणी वांडक्या व गर्भार असलेल्या आढळत असत. कौमारापूर्ववचने ४–२–१३ या सूत्रात कौमारः पतिः व कौमारी भार्या असे दोन प्रयोग पाणिनी देतो. पुंसा सह यस्याः असंप्रयोगः सा कुमारी ६–२–९५ असा कुमारी शब्दाचा सांप्रदायिक अर्थ आहे. जिला पूर्वी पुरुष माहीत नाही अशा मुलीच्या नवऱ्याला पाणिनीकाली कौमारः पतिः म्हणून म्हणत व त्या मुलीला विवाहानंतर कौमारी भार्या म्हणत. ह्यापासून गर्भित अर्थ असा निघतो की पाणिनीकाली ज्याप्रमाणे विवाहापूर्वी पुरुष माहीत नसलेल्या मुली असत त्याचप्रमाणे पुरुष माहीत असलेल्याही मुली आढळत. नाहीतर कौमारः पतिः व कौमारी भार्या यांचे विशेष कौतुक पाणिनीकाली झाले नसते. ह्या सर्व विवेचनाचा मथितार्थ असा की, अतिप्राचीन आर्ष काळापासून पाणिनीकालपर्यंत अविवाहित

मुलीशी समागम करण्याची रूढी भारतीय समाजात प्रथम अनिंद्य व धर्म्य म्हणून व पुढे पुढे निंद्य म्हणून प्रचलित होती. मागे चौथ्या कलमात सांगितलेच आहे की अतिप्राचीन आर्षकाळी मुलींवर सहा वर्षांपर्यंत देवांचा हक्क असे. नंतर त्यांच्यावर मनुष्यांचा हक्क उत्पन्न होई. याचकरिता आठव्या वर्षी मुलीचा विवाह करावा अशी रूढी भारतीय समाजात असलेली दिसते. आठ वर्षांपासून मुली पुरुषाला उपभोग्य होत असा सामाजिक अभिप्राय होता. चोवीस वर्षांच्या मुलाने आठ वर्षांच्या मुलीशी विवाह करावा, अशा अर्थाच्या स्मृति प्रसिद्ध आहेत. विवाहरात्री समागम करावा अशीही स्मृतिवचने आहेत. तेव्हा, आठ वर्षांच्या मुली समागमेय समजण्याची रूढी देशात होती यात संशय नाही. पुरुषसमागम आधी यद्यपि झाला व त्या समागमापासून अपत्यही यद्यपि झाले, तत्रापि पुढे धर्म्य विवाह होण्याला मुलींना कोणतीच आडकाठी नसे. अशी ही कन्यादूषणाची चाल आर्ष समाजात होती. पृथ्वीवरील इतर त्याच योग्यतेच्या समाजात ही चाल आढळून येते. At Noukatriva, the young girls of the island are the wives of all those who can buy their favors. When they are older, they form more lasting connections. In the same archipelago the French sailors were frequently offered girls of eight years and they were not virgins (Letourneau).

नुकाट्रिवांत तेथील तरुण मुली जे कोणी त्यांना आकर्षित करून घेऊ शकत त्या सर्वांच्या पत्नी असत. जेव्हा त्या जरा मोठ्या होत तेव्हा त्या स्थिर संबंध प्रस्थापित करीत. द्वीपसमूहात पुष्कळदा फ्रेंच नाविकांना आठ वर्षे वयाच्या मुली दिल्या जात आणि त्या कुमारी नसत [लिटोर्न्यू].

ह्या तुलनेवरून दिसेल की अतिप्राचीन आर्षसमाज एके काळी अत्यंत रानटी अशा यूथावस्थेत होता, कन्यादूषणाच्या संबंधाने युवन् व युवती हे दोन जुनाट शब्द लक्ष्य आहेत. यु म्हणजे जुडणे आणि युवन् म्हणजे जुडणारा, समागम करणारा. युवती म्हणजे समागम करणारी. संघातील मुलगे व मुली ही समागम करण्यास योग्य झाली म्हणजे आर्षलोक त्यांना संभोग करू देत. ऑस्ट्रेलियांत ही चाल दृष्टीस पडते. हीच स्थिती प्राचीन आर्षसमाजात होती. In Australia, the girls cohabit from the age of ten with young boys of fourteen or fifteen, without rebuke from anyone (Letourneau). ऑस्ट्रेलियात दहा वर्षांच्या मुली चौदा आणि पंधरा वर्षांच्या मुलांबरोबर संभोग करीत आणि त्याबद्दल त्यांना कोणी दोष देत नसे. हीच स्थिती प्राचीन आर्ष समाजांत होती.

(८) यूथावस्थेत आर्षसमाज असताना, स्त्रीपुरुषसमागम अत्यंत अनियमित असे, म्हणजे नातेगोते काहीएक बघत नसत; कारण नातेगोते उत्पन्नच झालेले नव्हते. कुमारींशी समागम करीत, उघड्यात पशूंप्रमाणे समागम करीत इत्यादी स्वैरपणा यद्यपि

होता, तत्रापि तशाही स्थितीत स्त्रियांना पुरुष आपली मालमत्ता समजत ही बाब सदैव लक्षांत ठेविली पाहिजे. पाणिनीय समाहारद्वंद्वाची जी उदाहरणे दिली आहेत त्यात दारगवम् हे एक उदाहरण दिलेले सर्वप्रसिद्ध आहे. दाराः च गावः च दारगवम्. दाराः म्हणजे स्त्रिया. यांची गणना गाईच्याबरोबर केलेली आहे. ही स्थिती पाणिनीच्या वेळची. प्राचीन आर्षांच्या काळी तर ही स्थिती ह्याहून प्रखर होती. स्मृतिकार व सूत्रकार जे आठ विवाह सांगतात, त्यांत आर्षविवाहाचे वर्णन येते. या विवाहात वर किंवा वराचा बाप वधूच्या बापाला गोमिथुन म्हणजे एक गाय व एक बैल देऊन कन्या घेतो म्हणजे अर्थात् विकत घेतो. ह्या विवाहाला आर्षविवाह ही संज्ञा आहे. ह्यावरून उघड होते की, आर्षलोकांत मुलीची किंमत एक गाय व एक बैल इतकी समजत असत. अर्थात् नित्याच्या बोलण्यात आपल्या मालमत्तेचे वर्णन करावयाचे असल्यास ते दारगवम् या सामासिक शब्दाने आर्षलोक करीत. असुर साक्षात् धन घेऊन कन्याविक्रय करीत. आर्षलोक गोमिथुन घेऊन कन्याविक्रय करीत, कारण इतर सुवर्णादि धन अत्यंत प्राचीन काळी आर्षलोकांना मुळी माहीतच नव्हते. आर्षलोक जसा कन्याविक्रय करीत तसाच ते आपल्या इतर स्त्रियांचाही विक्रय करीत. हरिवंशात ७९ व्या अध्यायात पुण्यक व्रताची कहाणी सांगितली आहे. तीत असे वर्णन आहे की, पुण्यकव्रत करणाऱ्या पतिव्रता स्त्रीने ब्राह्मणांकडून त्यांच्या स्त्रिया विकत घ्याव्या व त्या आचार्यास उदकपूर्वक दान द्याव्या. In Polynesia, the husbands trafficked in their wives without scruple. [पॉलेनीशियात नवरे स्वस्त्रियांची विक्री करीत आणि त्याचे त्यांना काही वाटत नसे]. हीच चाल प्राचीन आर्षलोकांतही होती. जेथे स्व-स्त्रिया व कन्या विकीत असत, तेथे त्या भाड्यानेही दिल्या जात असल्यास त्यात काही नवल नाही. उद्योगपर्वाच्या १०६ व्या अध्यायापासून १२३ व्या अध्यायापर्यंत माधवीचे आख्यान वर्णिले आहे. गालव नावाच्या ऋषीला ययातिराजाने आपली मुलगी माधवी गालवाला गुरुदक्षिणा देता यावी म्हणून दिली. ऋषीने तिला स्वतःची मुलगी म्हणून तीन राजांना एकेक पुत्र होईतोपर्यंत क्रमाक्रमाने भाड्याने दिली, आणि नंतर ती मुलगी गालवाने आपला गुरु जो विश्वामित्र त्याला भार्या म्हणून अर्पण केली. तिच्यापासून विश्वामित्राला एक पुत्र झाल्यावर, गालवाने तिला तिचा बाप जो ययाति त्याच्या स्वाधीन परत केली. ह्या कथेत तीन आर्ष चालींचा निर्देश झाला आहे. (१) बाप आपल्या मुलीला वित्त म्हणून वाटेल त्यास काही काल भाड्याने देऊ शके. (२) शरीरसंबंध काही विवक्षित काल करण्याच्या अटीवर मुली गहाण टाकता येत असत. (३) आणि पुत्ररूप जो शिष्य त्याची मुलगी म्हणजे आपली नात पितृरूप जो गुरु तो काही काल बायको करू शके. आर्षलोक मुली किंवा स्त्रिया विकत किंवा भाड्याने देत असत हा प्रस्तुतचा मुद्दा आहे आणि ह्या प्रकरणी इतर रानटी लोकांप्रमाणेच पुरातन आर्षलोकांचा आचार असे हे सांगण्याकडे कटाक्ष आहे. ह्या चालीचा स्मारक असा

वर्तमानकाली अवशेष म्हटला म्हणजे मराठी भाड्या हा शब्द आहे. भाड्या या शब्दाचे संस्कृत रूप भाटिकः. स्वस्त्रीला भाड्याने देऊन त्यावर निर्वाह करणाऱ्याला भाटिक म्हणून पूर्वी म्हणत असत व भाड्या म्हणून सध्या महाराष्ट्रात म्हणतात.

(९) पाशवदशेतून यूथावस्थेत येत असताना पाशवीवृत्तीचे अवशेष वन्य समाजात अनेक ठिकाणी आढळतात. In the Sandwich Islands adultery, incest and formication were common things. (सँडविच बेटात व्यभिचार, जवळच्या नात्यात संबंध आणि निषद्ध संभोग या सामान्य गोष्टी होत्या). ज्याला सुधारलेला समाज आपल्या नातगोताच्या दृष्टीने Adultery incest व formication म्हणतो त्याची प्राचीन आर्ष समाजातील उदाहरणे वर हवी तितकी दिली. आता निराळ्याच एका नीति-भ्रष्टतेची उदाहरणे महाभारतातून देतो. वनपर्वाच्या ११० व्या अध्यायात असे लिहिले आहे की ऋष्यशृंगपिता जो विभांडक ऋषि त्याला मृगीपासून ऋष्यशृंग पुत्र झाला. येथे मृग या शब्दाचा एक अर्थ अनृषि मनुष्यांची एक जात असा होईल. सर्प, नाग, गरुड, वानर ह्या जशा अनृषि मनुष्यांच्या जाती तशीच त्या काली मृग ही एक जात असावी. दुसरा मृग शब्दाचा अर्थ हरिणनामक पशू. पशूपासून ऋष्यशृंगासारखी मानवी प्रजा निष्पन्न होणे अशक्य असल्यामुळे हा दुसरा अर्थ प्रस्तुत उदाहरणात सोडून देणे बरे. आदिपर्वाच्या प्रथमाध्यायात व ११८ व्या अध्यायात पांडुशापवृत्त दिले आहे. त्यात दम ऋषि मृगीशी संग करीत असता पांडुराजाच्या बाणाने विद्ध होऊन मरण पावल्याचे लिहिले आहे.पांडुराजा मृगया करावयास गेला होता व तेथे हरणे मारीत होता. त्यात दम ऋषि एका हरीणीशी रममाण होण्यात गुंतला होता. ते ध्यानात न येऊन पांडूने बाण मारिला व तो दम ऋषीला लागला तेव्हा दम ऋषीने पांडूला हे पापकृत्य केल्याबद्दल दोष देऊन मैथुनकर्मात निमग्न झालेल्या आपणांस प्राणांतिक जखम केल्याबद्दलही दोष दिला. पशूशी मैथुन करण्यात काही विपरीतपणा आहे हे राजाच्या किंवा ऋषीच्या मनातसुद्धा आले नाही. कवीने म्हणजे व्यासांनी दम ऋषीच्या ह्या कृत्यावर असे पांघरूण घातले आहे की दम ऋषीने हरिणीशी संग करण्याच्या वेळी हरणाचे रूप घेतले होते व ती हरणीही दम ऋषीची बायको होती; परंतु ही मखलाशी काढून टाकली म्हणजे खरा प्रकार उघडकीस येतो. आदि पर्वाच्या ६६ व्या अध्यायात वर्णन आहे की अश्वरूप धारण करणारी त्वाष्ट्री ही सूर्याची भार्या होती. म्हणजे घोडीशी पुरुष कर्म करीत असत अशी कल्पना तरी निदान व्यासकाली सर्वत्र वाचल्या जाणाऱ्या ग्रंथात लिहिलेली खपत असे. ह्याहून निःसंदिग्ध असे पशुसंगाचे आर्ष उदाहरण म्हटले म्हणजे अश्वमेधयज्ञातील घोड्यांशी यजमान पत्नीने निजण्याचे. अश्वमेधांतील हे प्रतीकरूप कर्म आर्षलोकांच्या पाशवीवृत्तीतील एका चालीचा अवशेष आहे हे जाणत्यांना सांगावयाला नकोच. अतिप्राचीन आर्षलोकांत स्त्रिया व पुरुष पशूंशी संग करीत व तो दिवसाढवळ्या सर्वांसमक्ष करीत व त्यांत काही विपरीतपणा त्यांना भासत नसे. या बाबीच्या सिद्ध्यर्थ ह्याहून जास्त पुरावा नको. सांप्रतकाली कुत्र्यांशी

गाढवीशी, शेळ्यांशी व गाईशी संग केल्याचे वृत्त कर्णोपकर्णी महाराष्ट्रात कधी कोठे ऐकू येते. परंतु समाजात व कायद्यात तो अक्षम्य अपराध म्हणून गणिला जातो. प्राचीन आर्षकाली तो अक्षम्य अपराध व गुन्हा समजला जात नसे, एवढाच प्राचीन व अर्वाचीन समाजात भेद.

(१०) असल्या ह्या सरमिसळ व्यवाय करणाऱ्या अतिप्राचीन आर्षसमाजात आपल्या ह्या वर्तमानकालीन समाजातील आई, भाऊ, बाप, चुलता, मामा, आत्या इत्यादी बहुविध नाती व भेद असण्याचा संभवच नाही. तत्रापि बहुविध नाती व भेद यद्यपी नसले तरी काही थोडे भेद व नाती ह्या रानटी समाजांत उद्भवल्याशिवाय राहिली नाहीत. जमावातील किंवा यूथातील सर्व बाया सर्व मुलांच्या आया पडल्याकारणाने, त्या काली स्त्रीसामान्याला जनि ही संज्ञा असे. जनि म्हणजे जन्म देणारी जन्+इ. इ. म्हणजे ती व जन् म्हणजे जन्म देणे, जनि म्हणजे ती जन्म देते. जमावातील सर्व स्त्रिया जशा जनि या शब्दाने निर्देशिल्या जात त्याचप्रमाणे ह्या जन्मापासून झालेल्या सर्व व्यक्तींना जन ही संज्ञा असे. जन या शब्दात स्त्री-पुरुष, लहानमोठे असे जमावातील सर्व माणूस सामान्यतः येई व विशेषतः जन्यांपासून झालेली पुल्लिंगी प्रजा येई. सर्व पुरुष सर्व स्त्रियांशी सरमिसळ व्यवाय करीत असल्यामुळे, सर्व जन सर्व जन्यांचे नवरे व सर्व जन्या सर्व जनांच्या नवऱ्या असत. म्हणजे स्त्री आणि पुरुष असे दोनच भेद यूथावस्थेतील अतिप्राचीन आर्षसमाजात असत. त्या काली स्त्री व पुरुष हे शब्दही बहुशः घडण्यात आले नव्हते. इतकेच काय तर ऋषी हा शब्दसुद्धा घडण्यात आला नसावा. अर्थात् त्या अतिप्राचीन सरमिसळ व्यवाय करणाऱ्या यूथावस्थ समाजाला आर्षसमाज म्हणणेही ऐतिहासिक म्हणजे पौर्वापर्य दृष्टीने अयुक्त होय. तथापि ऋषीचे ते पूर्वज होते एवढ्याचकरिता त्या यूथाला आर्ष ही संज्ञा लाविली आहे. त्या काली फक्त जन व जनि, जन्म दिलेले व जन्म देणाऱ्या हे शब्द निर्माण झाले होते. स्त्री, पुरुष, बंधु, भगिनी, पिता, पुत्र, माता, दुहिता, स्वसृ, यातृ इत्यादी शब्द, भेद व नाती कशी व केव्हा निर्माण झाली व उदयास आली या बोधप्रद विषयाचा ऊहापोह पुढे यथाप्रसंग करावयाचा आहे.

प्रकरण २ रे

स्त्रियांचे वंशप्रवर्तकत्व व प्रजापतिसंस्था

१. अतिप्राचीन आर्य समाजात म्हणजे यूथावस्थ आर्य समाजात, म्हणजे पाशवावस्थेतून नुकत्याच बाहेर पडलेल्या आर्य समाजात, स्त्रीपुरुषसमागम अत्यंत अनियमित असे, अथवा त्याला कोणताच निर्बंध नसे; म्हणजे, आई, बाप, भाऊ, बहीण ही नात्यांची नावे ज्यांना कालांतराने पुढे पडली त्यांच्यात समागम सररहा होत असे हे महाभारतातील कित्येक पुराण इतिहासकथांवरून आपणांस ताडिता आले. ह्या प्राचीन इतिहासकथांचा मूळ व एकच एक उगम वेद आहेत असे जरी म्हणता येत नाही, तरी एवढे प्रमाणबद्ध विधान बिनधोक करता येते की महाभारतात ज्या पुराणकथा सांगितल्या आहेत, त्यातील बऱ्याच व्यक्तींचा उल्लेख वेदातून आलेला आढळतो. हे इंद्रा, तू अमक्या अमक्या प्राचीन किंवा नुकत्याच होऊन गेलेल्या ऋषीला किंवा राजाला जसे अमुक अमुक तऱ्हेने तारिलेस व रक्षिलेस तसे मला किंवा माझ्या कुळाला तार, अशी प्रार्थना जेथे जेथे येते तेथे तेथे त्या ऋषीला किंवा राजाला कोणत्या संकटात इंद्राने किंवा अग्नीने किंवा ऋभूंनी तारिले त्याचा ओझरता, त्रोटक व फारच झाला तर संक्षिप्त उल्लेख केलेला बहुशः सापडतो. हे उल्लेख ज्या हकीकतीसंबंधाने केलेले आहेत त्या हकीकती ऋचा व सूक्ते ज्या ऋषींनी रचिली त्यांना तर संपूर्ण माहीत असतील यात जसा संशय नाही, तसाच त्या ऋचा व सूक्ते ऐकणाऱ्या समाजालाही तितक्याच संपूर्णतेने अवगत असल्यावाचून कवीचे व श्रोत्यांचे एकावधान शक्य नाही. तात्पर्य, ऋचा ज्या काली ऋषींनी रचिल्या त्या काली आर्य समाजात ह्या पुरातन कथा प्रायः तोंडी दंतकथा भारतात त्या त्या स्थळी व्यासांनी भीष्मादिकांच्या तोंडून पुराण इतिहास म्हणून वदविल्या आहेत. मूळच्या वैदिक दंतकथा म्हणजे तोंडी हकीकती व्यासांनी जशा त्या मुळात घडल्या तशाच बहुतेक दिल्या आहेत. त्यास त्यांनी स्वतःच्या पदरांचा जोड जो दिलेला आहे तो एवढाच की स्वतःच्या कालच्या समजुतीच्या व नीतिमत्तेच्या दृष्ट्या त्या विगर्हणीय भासू नयेत म्हणून बहुतेक प्रत्येक हकीकतीला दैवी व अद्भुत कारणांची

पुष्टी दिली आहे. उदाहरणार्थ, दम ऋषीने मृगीशी संग केला ही मूळची आर्षकालीन हकीकत. ही कथा स्वकालीन समाजाला निंद्य, गर्ह्य, लाजिरवाणी व अधर्म्य वाटेल व प्राचीन पूर्वजांची निंदा केल्याचे पातक माथ्यावर पडेल या भीतीने व्यासांनी एवढीच मखलाशी केली की दम ऋषीला व त्याच्या स्त्रीला वाटेल त्या प्राण्याचे रूप धारण करण्याचे तपोबलाने सामर्थ्य असल्यामुळे, ती दोघे मृगाचे रूप घेऊन क्रीडा करीत होती, सबब हा समागम नीतीला व धर्माला सोडून नव्हता. दुसरे उदाहरण अत्यंत प्रसिद्ध असे कुंतीचे घेऊ. कुंतीने तीन परपुरुषांपासून म्हणजे स्वपतीव्यतिरिक्त अन्य पुरुषांपासून संतती करून घेतली ही मूळ हकीकत. ही उघडीनागडी हकीकत व्यास-कालीन– म्हणजे शकपूर्व चार-पाचशे वर्षांपलीकडे झालेल्या महाभारतकालीन–नीतीला व धर्माला किंचित् गौण व कमीपणा आणणारी भासल्यामुळे व्यासांनी एवढीच दैवी व अद्भुत मखलाशी केली की, कुंतीशी ज्या परपुरुषांनी समागम केला ते पुरुष भिकार व पापी मानव नव्हेत तर इंद्र, यम, वरुण इत्यादी सारखे मोठे मोठे देव होते. ही मखलाशी पहिल्या प्रथम महाभारतकार व्यासांनीच निर्माण केली असेल असेही म्हणवत नाही. पिढ्यान्‌पिढ्या दंतकथा सांगणारांनी देखील उघड्यानागड्या अश्लीलत्वावर झाकण घालण्याच्या सद्बुद्धीने ही मखलाशी केली असण्याचा पूर्ण संभव आहे. कारण, पितरांची व त्याबरोबरच आपलीही निंदा करण्याची खंती मनुष्यमात्राच्या प्रगतिप्रवण नीतिमत्तेला वाटलेली सर्वत्र आढळून येते. यांचे अत्यंत ठळक असे सेमेटिक उदाहरण म्हटले म्हणजे ख्रिस्ती धर्मोत्पादक ख्रिस्ताचे. ह्याची आई जी मेरी तिला साक्षात् होली घोस्टकरवी गर्भदान झाले, अशी दंतकथा आहे. मर्त्य पुरुषाच्या समागमाव्यतिरिक्त मर्त्य स्त्रीला प्रजा होणे असंभाव्य आहे या दृष्टीने पाहता कुमारी मेरी हिला कोण्यातरी पुरुषा-पासून ख्रिस्त झाला असला पाहिजे. परंतु असले बिगरलग्न प्रजोत्पादन त्या काळी यहुदी लोकांत नीतिबाह्य दिसत असल्यामुळे दैवी गर्भाधानाची मखलाशी नवीन निर्माण करणे अवश्य झालेले उघड उघड दिसत आहे. पुरुषाशिवाय गर्भधारणेवर (Immaculate conception) कितीतरी पांडित्य ख्रिस्ती पंडितांनी केलेले जे आढळते त्यातील बीज इतकेच की, साधुवर्य ख्रिस्ताचा जन्म अधर्म्य व नीतिबाह्य नाही हे कसेतरी श्रोत्यांना पटवून द्यावे. युरोपियन पुरुषाशिवाय गर्भधारणावाल्यांची जी दुर्दशा तीच महाभारतकार व्यासांचीही दुर्दशा आहे. तात्पर्य, महाभारतातील विस्तृत प्राचीन इतिहासकथांना वैदिक त्रोटक उल्लेखांचा आधार आहे. असो. प्राचीन आर्य समाजात सरमिसळ स्त्री-पुरुषसमागम एका काळी प्रचलित होता, एतत्संबंधाने सध्या आपण विवेचन करीत आहोत व ते विवेचन मुख्यतः महाभारताच्या आधाराने करीत आलो आहोत. आता वैदिक वाङ्मयात व विशेषतः ऋग्वेदात सरमिसळ स्त्री-पुरुषसमागमासंबंधाने बरेच उल्लेख स्थळोस्थळी आढळतात. त्यापैकी दोन तीन मासल्याकरिता येथे देतो. यम आणि यमी या बहीण-भावंडासंबंधाने विशेष उल्लेख करावयाला नकोच, कारण ही

वैदिक कथा बहुतेक आबालवृद्धांच्या कानावरून गेलेली आढळते. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात व अथर्ववेदाच्या अठराव्या कांडात यम आणि यमी यांचा संवाद दिला आहे. यमी आपला सोदर भाऊ जो यम त्यापाशी संभोगाची याचना करू लागली. ती याचना यमाने फेटाळली. तो म्हणाला, वरुणाचे दूत आपले कृत्य पाहतील व दोष देतील.

महस्पुत्रासो असुरस्य वीरा। दिवो धर्तार उर्विया परि ख्यन ॥

त्यावर यमी म्हणाली, देव रागावणार तर नाहीतच, उलटे त्यांना आपले हे कृत्य पसंत पडेल.

उशंति घा ते अमृतास एतद्।

यम व यमी यांच्या ह्या संवादावरून उघड होत आहे की, फार पुरातनकाळी बहीण-भावंडांचा समागम रानटी आर्य लोकांत प्रचलित होता, व ऋग्वेदकाळी तो गर्ह्य समजला जाऊ लागला होता. बहीण-भावंडांच्या समागमाचे उत्तम उदाहरण महाभारताच्या प्रारंभालाच दिलेले आढळते. अदिति ही दक्षाची कन्या व तीच अदिति दक्षाची आई असे विधान दहाव्या अष्टकातील ७२ व्या अध्यायाच्या चौथ्या वर्गात केलेले आढळते. सरमिसळ समागमाचे हे नामी उदाहरण आहे. य इं चकार न सो अस्य वेद, स मातुर्योनौ परिवीतः। हे विधान पहिल्या मंडळाच्या २२व्या अनुवाकाच्या १६४ व्या सूक्तातील ३२ व्या ऋचेत आले आहे. बापाला आपला मुलगा कोणता ते माहीत नाही, आईच्या पोटी तो उत्पन्न झाला एवढे मात्र खरे, असा या ऋचेचा गर्भितार्थ आहे. हेही सरमिसळ समागमाचेच उदाहरण आहे. "यस्त्वा भ्राता पतिर्भूत्वा जारो भूत्वा विपद्यते, प्रचां यस्ते जिघांसति तमितो नाशयामसि (१०–१६२–५)" या वाक्यात गर्भार स्त्रीशी भाऊ, धनी किंवा जार यापैकी कोणी समागम करील त्याचे पारिपत्य करू म्हणून दहशत घातलेली आहे. हेही सरमिसळ समागमाचेच उदाहरण आहे. स्त्री गर्भार नसली तर भावाने, धन्याने किंवा जाराने तिशी समागम केला तरी चालेल असा ध्वनी या दहशतीतून निघतो. अशी आणिक किती तरी वाक्ये ऋग्वेदातून काढून दाखविता येतील. सध्या इतकीच देऊन प्रकृताचे अनुसरण करतो. तात्पर्य, महाभारत व ऋग्वेदात सरमिसळ समागमाचे दाखले आढळतात व त्यावरून बिनधोक असे विधान करता येते की, अतिप्राचीन आर्य समाजात एकेकाळी स्त्रीपुरुष समागम अत्यंत अनियंत्रित असे.

२. यूथावस्थ आर्य समाजात जो अनियंत्रित स्त्री-पुरुष समागम एकेकाळी प्रचलित असे त्याचे रूपांतर कालांतराने कसे कसे होत गेले हे शोधून काढण्याचा प्रांत येथून पुढे लागतो. स्त्री-पुरुष समागमाला नियंत्रण बिलकुल नाही अशा पाशव स्थितीतून अतिप्राचीन आर्य समाजाने कोणकोणती नियंत्रणे ऊर्फ नियमने कसकशा परंपरेने ज्ञानतः व अज्ञानतः निर्माण केली या बाबीचा शोध केवळ कल्पनेने करण्याची आवश्यकता

नसून भारत व हरिवंश यांतील संभवपर्वस्थ वंशकथांवरून बराच निश्चिततेने लाविता येण्यास साधने आहेत. आदिपर्वाच्या ६४ व्या अध्यायात व हरिवंशाच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायात देव, दानव, गंधर्वाप्सरस, मानव व यक्षराक्षस यांच्या उत्पत्तीची जी माहिती व्यासांनी पुराणातून परंपरेने ऐकिलेली दिली आहे ती पाहता असे दिसून येते की, प्राचीन इतिहासकार व्यास यांना प्राचीन आर्यसमाजविषयक जे काही ज्ञान पूर्वपुराणावरून झालेले होते ते बरेच संकुचित व मर्यादित होते. प्राचीन आर्य समाजात प्रजापतिसंस्था निर्माण झाल्यापासून माहिती हा दंतकथाकार ऊर्फ इतिहासकार देतो. तत्पूर्वीची माहिती याला ज्ञानतः नाही. येथे प्रजापतिसंस्था समाजशास्त्रात कशाला म्हणतात ते सांगणे जरूर आहे. अनियंत्रित स्त्री-पुरुष समागमकाली प्रजा, राज्य, पिता, पुत्र, माता, भगिनी इत्यादी नाती अस्तित्वात नव्हती. अमुक अपत्य अमुक पुरुषाचे असे नक्की म्हणण्यास सोय नव्हती. फक्त अमुक मूल अमुक स्त्रीचे इतकेच म्हणता येण्याची शक्यता होती. ती ही शक्यता त्या काळी तत्कालीन अनियंत्रित समाजाने मर्यादित करून ठेविली होती. जेवढ्या म्हणून स्त्रिया एखाद्या जमावात किंवा कळपात किंवा यूथात असत, तेवढ्या सर्व स्त्रिया कळपात जन्मलेल्या सर्व बालकांच्या माता समजण्याची रूढी असे. कार्तिकेय हा सहा किंवा सात आयांचा मुलगा म्हणून वर्णिलेला आहे व प्रत्येक आईने त्याला एकेक अवयव दिला असे सांगितले आहे. म्हणजे जमावांतील एक विवक्षित स्त्रीच्या पोटी यद्यपि एकादे मूल जन्मले, तत्रापि त्या मुलाचे एकेक अवयव जमावांतील सर्व स्त्रियांच्यापासून होऊन ते मूल सबंद झाले, अशी समजूत यूथावस्थ आर्यसमाजात होती. द्वैमातुर, षाण्मातुर, साप्तमातुर वगैरे शब्द व अर्थ ह्या प्राचीन समजुतीचे दर्शक आहेत. या यूथावस्थकाली कळपातील स्त्रियांना जनि म्हणजे पोरे विणाऱ्या म्हणत, पुरुषांना जन म्हणजे पोरे उत्पादणारे म्हणत व मुलांना जात म्हणजे स्त्रिया व पुरुष यांजपासून झालेले म्हणत. हे तिन्ही शब्द याच अर्थाने ऋग्वेदांत वारंवार आलेले आहेत. अर्वाचीन संस्कृतात मूळ या अर्थी जात शब्द योजिलेला सर्वांच्या परिचयाचा आहेच. या यूथावस्थेकाली मुलांची नावे त्या त्या कळपाच्या नावावरून पडत. कळपावरून पडलेल्या या नावांना यूथनामे अशी संज्ञा आहे. यूथनामांनाच पुढे किंचित् फरकाने गोत्रनामे ही संज्ञा मिळाली. मूल कोठले असे विचारल्यास ते अमुक अमुक यूथातले ऊर्फ कळपातले असे सांगण्याचा रिवाज असे. समजा की, एखाद्या यूथाचे नाव कदंब असले तर त्यातील सर्व मुलांना कादंब हे यूथनाम मिळे. कादंब म्हणजे कदंबाचा. मराठीत चा प्रत्यय शब्दाच्या शेवटी लावून आपण व्यवहार करतो. प्राचीन काळी मूळ शब्दाच्या आद्य स्वराची वृद्धी करून म्हणजे आद्यस्वरापूर्वी आ हा आगम करून तोच अर्थ प्रदर्शित करीत. कळपांतील सर्व मुलांना यूथनाम एकच असे. त्यावरून मूल अमुक कळपातले एवढाच बोध होई. एक मूल दुसऱ्या मुलापासून निवडून काढण्याला हे यूथनाम उपयोगी पडत नसे. सबब दुसरे एक नाव मुलाचे अन्यव्यक्तिव्यावर्तक

ठेवीत. ते नाव बापाच्या म्हणजे पुरुषाच्या नावावरून ठेवीत नसत; कारण की, अमुक मुलाचा अमुकच बाप असा निश्चय सरमिसळ व्यवायामुळे करता येत नसे, परंतु अमुक मूल अमुक स्त्रीच्या पोटी जन्मले हे निश्चित असल्यामुळे आईवरून मुलाला अन्य व्यावर्तक नाव मिळे. जसे ममता या स्त्रीच्या मुलाला मामतेय, विनता या स्त्रीच्या मुलाला वैनतेय इत्यादी. संभवपर्वात व हरिवंशाच्या पहिल्या तीन अध्यायात प्रजापतीच्या संततीचे वर्णन व्यास करीत आहेत खरे, परंतु प्रजापतीच्या संततीची नावे जी व्यासांनी परंपरागत पुराणावरून दिली आहेत, ती सर्व आयांच्या नावावरून पडलेली नावे आहेत. आयांच्या म्हणजे प्रजापतींच्या स्त्रियांच्या नावावरून पडलेल्या ह्या नावांची एक यादीच देतो.

मातृनाम	**अपत्यनाम**
अदिति	आदित्येयाः आदित्याः
दिति	दैत्याः दैतेयाः
कृत्तिका	कार्तिकेयः
दनु	दानवः
कद्रू	काद्रवेयाः
विनता	वैनतेयः
काला	कालेयाः
निर्ऋति	नैर्ऋत्येयाः
सिंहिका	सैंहिकेयाः
पुलोमन्	पौलोमाः
कालका	कालकेयाः
वसु	वासवः वसवः
साध्या	साध्य
विश्वा	विश्व
मरुत्मती	मरुत्मंतः
भानुः	भानवः
मुहूर्ता	मुहूर्ताः

यापैकी एकही अपत्यनाम प्रजापतींच्या नांवापासून झालेले नाही. एकोनएक नावे आयांच्या नावावरून पडलेली आहेत. याचा अर्थ असा की, आर्यसमाजात प्रजापति-संस्था स्थापन होण्यापूर्वी अपत्ये स्त्रियांच्या नावाने ओळखिली जात, म्हणजे प्रजापती निर्माण होण्याच्या पूर्वी वंशावतरण स्त्रियांच्या अधीन असे, पुरुषांच्या नसे. म्हणजे स्त्रिया

वंशप्रवर्तक असत, पुरुष नसत हे वंशप्रवर्तकत्व स्त्रियांना कसे मिळत गेले ते पाहणे मोठे मनोरंजक आहे.

आयांवरून मुलांना व्यावर्तक नाव ठेवण्याची आवश्यकता ज्या काली भासू लागली त्या काली मूळच्या सरमिसळ समाजात एक क्रांती घडून आली. सर्व मुले यूथातील सर्व स्त्रियांची सामायिक समजण्याची चाल मागे पडून अमुक मूल अमुक स्त्रीचे असे वैशिष्टयी-करण सुरू झाले, सामायिक मातृत्व जाऊन वैयक्तिक मातृत्व उदयास आले. मायिक यूथात ऊर्फ कळपात अपत्यांच्या माता ज्या स्त्रिया त्यांच्या करवी प्रथम अस्पष्ट विभाजन प्रचलित झाले. आई व तिची अपत्ये हे अस्पष्ट कुटुंब झाले. यूथातील प्रजननक्षम अशा सर्व स्त्रियांची अशी अस्पष्ट कुटुंबे झाली. अद्याप ही सर्व कुटुंबे पृथक् पृथक् विभक्त होऊन एकापासून दूर राहू लागली नव्हती. सर्व कुटुंबे यूथातच असत. स्त्रियांशी समागम यूथातील वाटेल तो पुरुष करीतच असे. पुढे स्त्रिया-स्त्रियांत आपापल्या अपत्यांच्या जोपासनेसंबंधाने व इतर अशा मायेच्या कारणांनी वेबनाव वाढून स्त्रिया आपापल्या मुलांबाळांसह स्वतंत्र झोपडी करून स्वतंत्र संसार थाटू लागल्या. तथापि यूथातील वाटेल त्या पुरुषांशी स्वतंत्र कुटुंबातील स्त्रियांचा संबंध चालूच असे. पुरुषांनी मृगया करावी. रानावनातून श्वापदे मारून आणावी व ती कुटुंबस्थापक स्त्रियांच्या हवाली करून स्त्रिया तयार करतील ते अन्न खाऊन खुशाल असावे असा मनू सुरू झाला. ह्या स्वतंत्र कुटुंबे स्थापन करणाऱ्या स्त्रिया प्रथम प्रथम एकाच आईच्या पोटी जन्मलेल्या सोदर बहिणी बहिणी असत. सामायिक यूथसंस्था फोडून विभक्त कुटुंबसंस्था जी प्रथम उदयास आली ती यूथातील सोदर बहिणींच्या हस्ते उदयास आली या विधानाला पोषक असे प्रमाण भारत व हरिवंश यातील संभवपर्वात ठळक असे सापडते. दक्षाला ज्या साठ कन्या झाल्या (हरिवंश अध्याय ३) त्यापैकी दहा कन्या त्याने धर्म ऋषीला दिल्या, तेरा कश्यपाला दिल्या, सत्तावीस सोमाला दिल्या, चार अरिष्टनेमीला दिल्या, आणि दोन दोन भृगु, आंगिरस आणि कृशाश्व यांना प्रत्येकी दिल्या. येथे असा प्रश्न उद्भवतो की, दक्षाने ज्या पुरुषांना आपल्या कन्या दिल्या, ते पुरुष एकंदर सात होते, तर त्या सातांना कन्यांचा सारखा विभाग करून कां दिला नाही ? कोणाला दोन दोन, कोणाला चार, कोणाला तेरा, कोणाला सत्तावीस असा विषम विभाग कां केला ? ह्या प्रश्नाला समर्पक व समाधानकारक असे सर्वात उत्तम उत्तर एकच संभवते, ते हे की यूथांतील सोदर बहिणी बहिणी ज्या मुली होत्या त्या सोदरत्वास्तव बद्ध मायेने झालेल्या असल्या-मुळे त्यांचा संसार एकाच कुटुंबात झाला असता सर्वांच्या मनाजोगता होईल असा कयास करून दक्षाने ही विषम वाटणी केली. तात्पर्य, सांगावयाचा मुद्दा एवढाच की, यूथातून विभक्त होऊन स्वतंत्र कुटुंबस्थापना जी प्रथम झाली ती सोदर बहिणींच्या हस्ते झाली. यूथातील सर्व अपत्ये यूथातील सर्व स्त्रियांची समजण्याचा जो पूर्वीचा प्रघात होता, तोच प्रघात सोदर बहिणींच्या कुटुंबात काही काळ चालू होता. याला पोषक

प्रमाण कृत्तिकांचे. कार्तिकेय जो षडानन तो ह्या सात कृत्तिका बहिणींचा सामायिक मुलगा म्हणून वर्णन केलेले आहे. हे सामायिकत्व पुढे कालांतराने नष्ट होऊन अपत्यांची मालकी त्या बहिणींची वैयक्तिक झाली. यूथावस्थ समाज असताना त्या समाजात बहुपतित्व व बहुपत्नीत्व असे दोन्ही प्रकार स्त्री-पुरुषसंबंधाचे असत. यूथातून सोदर बहिणी विभक्त झाल्यावर त्यांनी जे कुटुंब स्थापिले त्यांत सोदर भगिन्यात्मक बहुपत्नीत्व होते हे सांगावयाला नकोच. हे भगिन्यात्मक बहुपत्नीक कुटुंब मात्रात्मक बहुपतिकही होते; कारण यूथात एकाच समयी बहुपत्नीत्व व बहुपतित्व जसे विद्यमान असे, तसेच यूथातून विभक्त होणाऱ्या सोदर बहिणींच्या स्वतंत्र कुटुंबातही बहुपत्नीकत्व व बहुपतिकत्व असे. यूथात ज्या चाली होत्या त्याच चाली सोदर बहिणींच्या स्वतंत्र कुटुंबात दृष्टीस पडल्यास नवल नाही. पुरातन चाली एकदम नाहीशा होत नाहीत, आस्ते आस्ते नाहीशा होतात, व बहुतकालपर्यंत व कधीकधी तर वर्तमानकाळपर्यंत आपले अवशेष अशांशाने मागे ठेवतात. इतकेच की, ह्या अंशाशाने मागे राहिलेल्या चाली इतर चालींच्या दडपणाखाली गुदमरून गेलेल्या असतात.

३. सोदर भगिनींनी सोदर भ्रात्यांच्या समागमाने स्वतंत्र कुटुंबसंस्था स्थापिल्यावर त्याही संस्थेत पुढे फेरफार झाले. साऱ्याच बहिणीना सारेच भाऊ किंवा साऱ्याच भावांना साऱ्याच बहिणी सारख्याच आवडत असतील असे नाही. आवडनिवड रूपामुळे, स्वभावामुळे व कामसूपणामुळे व्हावयाला लागून, इतर भावांहून सर्वतोप्रकारे श्रेष्ठ अशा एखाद्या भावावर बऱ्याच बहिणींचे मन बसून, त्यांनी त्या एकाच्याच समागमात कुटुंबसंस्था चालविण्याचा संकेत केला. अशा स्थितीत स्वस्त्रीय बहुपत्नीक व एकपतिक कुटुंबसंस्था निर्माण झाली. याची ठळक उदाहरणे म्हटली म्हणजे दक्षाच्या साठ कन्यांची. ह्या साठांपैकी काहींनी धर्माशी, काहींनी सोमाशी, काहींनी कश्यपाशी पत्नीभावाने राहण्याचे पत्करिले. अशा तऱ्हेने बहुपत्नीक व एकपतिक कुटुंब अस्तित्वात आले. पक्षी इतर बहिणीहून गुणांनी सर्वतोप्रकारे श्रेष्ठ अशा एखाद्या बहिणीवर बऱ्याच भावांचे मन जाऊन, त्या भावानी त्या एकाच अप्रतिम बहिणीच्या समागमात राहून कुटुंब चालविण्याचा इरादा केला. अशा स्थितीत एकपत्नीक व बहुपतिक कुटुंब ज्याला म्हणतात ते निर्माण झाले. याचे ठळक उदाहरण म्हटले म्हणजे हरिवंशाच्या दुसऱ्या अध्यायात वर्णिलेले प्रचेतसू बंधूंचे. ह्या दहा प्रचेतसू भ्रात्यांनी मारिषा नामक वृक्ष-कन्येशी समागम केला व त्या समागमापासून दक्षप्रजापति जन्मास आला. ह्या दोन प्रकारच्या कुटुंब संस्था निर्माण व्हावयाला इतरही कारणे झालेली असतील. इतर जमावांशी लढाई करताना यूथातील बरेच पुरुष मरून गेल्यास, राहिलेल्या एखाद्याशीच पत्नीभावाने राहण्याचा प्रसंग येऊन एकपतिक व बहुपत्नीक कुटुंब बनण्याचा संभव आहे. तसेच लढायांत स्त्रिया इतर यूथांनी पाडाव केला गेल्यास राहिलेल्या एखादीशीच संसार करण्याचे कपाळी येऊन बहुपतिक व एकपत्नीक कुटुंब घडले जाण्याचा संभव आहे.

असो. अशा तऱ्हेने प्राचीन आर्य लोकांत दोन प्रकारची कुटुंबे जन्मास आली. एकात अनेक बहिणी एका भावाला पती म्हणून राहू लागल्या व दुसऱ्यात अनेक भाऊ एका बहिणीला पत्नी म्हणून राहू लागले. पहिल्याला बहुपत्नीक अशी संज्ञा सोईखातर देऊ व दुसऱ्याला बहुपतीक अशी संज्ञा देऊ. पैकी दुसऱ्या प्रकारच्या कुटुंबात मुलाचा बाप अमुकच अशी निश्चिती नसल्यामुळे मुलाला नाव आईवरून मिळे, आणि पहिल्या प्रकारच्या कुटुंबात पती एकच असल्यामुळे, मुलाच्या बापाचा निश्चय यद्यपि संशयित नसे, तत्रापि जुनी चाल म्हणून बराच कालपर्यंत आयांच्या नावावरून मुलांचे नामकरण होई. ह्या दुसऱ्या प्रकारात मागे दिलेली आदितेय, वैनतेय, दैतेय इत्यादी नावे पडतात. अदिति, दिति, कद्रू इत्यादी यद्यपि कश्यप प्रजापतीच्या स्त्रिया होत्या, व मुलांच्या बापासंबंधाने यद्यपि कोणत्याही प्रकारची अनिश्चितता नव्हती. तत्रापि पुरातन रूढीला अनुसरून कश्यपबीजाने अदितीच्या पोटी झालेल्या प्रजेला आदितेय किंवा आदित्य असे नाव आईच्या नावावरून पडले, म्हणजे वंश माता जी अदिति तिच्या नावाने प्रख्यात झाला, बाप जो कश्यप त्याच्या नावाने झाला नाही. ह्याचा अर्थ असा की, माता जी अदि ति कुटुंबात प्रधान गणली गेली, पिता जो कश्यप त्याला पूर्ण गौणत्व दिले गेले. पित्याला गौणत्व कां मिळाले त्याला सबळ कारण आहे. प्रजापतिसंस्था म्हणजे एकपतित्वाची संस्था आर्य लोकांत जी सुरू झाली ती येथून तेथून साऱ्या आर्य लोकांत एकदम सुरू झाली नाही. आर्य लोकांतील काही थोड्या टोळ्यांमध्ये सुरू झाली. बाकीच्या बऱ्याच टोळ्यांत बहुपतित्वाची चाल जय्यत प्रचलित होती, व जुनी म्हणून पुराणप्रिय आर्यांनी ती बहुतकालपर्यंत सोडली नाही आर्य लोकांत बहुजनसंमत अशी जी ही बहुपतिकत्वाची चाल तिच्या अमलात अपत्यनामे मातृनामावरून ठेवण्याखेरीज गत्यंतर नव्हते. त्यामुळे बहुजनसमाजात मातृनामोत्पन्न अपत्यनामांची संख्या इतकी बेसुमार अधिकतर होती की, त्यांच्या बहुसंख्येपुढे पितृनामोत्पन्न अपत्यनामांची डाळ शिजवायला बहुत प्रयास पडले असावेत. प्रयास किती पडले असतील त्याचा अंदाज करावयास काही प्रमाणे देतो. अतिप्राचीन आर्यकाळ व कौरव-पांडवांचा काळ यामध्ये काळाचे बरेच अंतर आहे. तथापि आर्य लोकांतील कित्येक समाजात मातृनामोत्पन्न अपत्यनामांची रेलचेल असलेली भारतेतिहासावरून दृष्टीस येते. कौंतेय, पार्थ, राधेय, गांगेय, सौभद्र, माद्रेय, द्रौपदेय इत्यादी पांडव कुळातील व्यक्तींची नावे मातृनामोत्पन्न आहेत. कृष्णाला देवकीनंदन हे नाव वासुदेव या नावाचा अपरपर्याय म्हणून दिलेले वारंवार आढळते. प्रजापतिसंस्था निर्माण होऊन हजारो वर्षे लोटल्यावर झालेल्या पांडवांच्या काळची ही कथा; मग खुद्द प्रजापतिसंस्था म्हणजे एकपतित्वाची संस्था ज्या पुरातन काळी निर्माण झाली त्या काली मातृनामजन्म अपत्यनामे सर्वत्र प्रचलित असल्यास व त्यांच्या पुढे पितृनामजन्य अपत्यनामाचा टिकाव न लागल्यास नवल कसले? पांडवकालानंतर उपनिषदादी ग्रंथात, गुरुपरंपरेचे ब्राह्मणाचे वंश दिलेले आहेत. त्यात मातृनामजन्य अनेक नामे नमूद करून

ठेविली आहेत. ती सर्वांच्या परिचयाची असल्यामुळे, त्यांनी येथे जागा अडवीत नाही. त्यावरून एवढे मात्र स्पष्ट होते की, पांडवांच्या पुढील काळात स्त्रिया गोत्रप्रवर्तक ऊर्फ अपत्यनामप्रवर्तक असत व त्या ब्राह्मणात असत. उपनिषत्कालानंतर पाणिनीचा काल आला, अपत्यार्थक प्रत्ययमीमांसा करताना पीलाया वा (४–१–११८) या सूत्राने पीलाया अपत्यं पैलः, पैलेयः या मातृनामजन्य अपत्यनामांचा विशिष्ट सूत्र देऊन पाणिनी उल्लेख करतो. व्द्यचः (४–१–१२१) या सूत्राने दत्ताया अपत्यं दात्तेयः असे अपत्यनाम सिद्ध होते. या दात्तेय नामक लौकिक गोत्रनामावरून म्हणजे अपत्यनामावरून कोकणस्थातील दाते हे आडनाव निघालेले आहे. पैल, पैलेय, दात्तेय ह्या अपत्यनामावरून स्पष्ट होते की, पाणिनिकाली मातृनामावरून अपत्यानामे थोडी बहुत प्रचलित होत असत. पाणिनीय अपत्याधिकारात बहुतेक लौकिक गोत्रप्रवर्तकांची नावे पुरुषांची आहेत; परंतु त्यात पीला, दत्ता वगैरे स्त्रीनामे अपवादादाखल तरी सापडतात. म्हणजे पाणिनिकाली काही कुटुंबे बहुपतिक असावी व त्यात अर्थातच मातृनामावरून अपत्यनाम बनविण्याची चाल अगतिकत्वास्तव प्रचलित असावी. पाणिनीनंतर शातवाहनांचा काल येतो. वासिष्ठीपुत्र, गौतमीपुत्र इत्यादी मातृनामजन्य अपत्यनामे शातवाहन राजकुलात प्रचलित असलेली सर्वांच्या ओळखीची आहेत. ही मातृनामजन्य अपत्यनामे गमतीखातर ठेविली असतील हे संभवत नाही. शातवाहनकुल आंध्रजातीय व आंध्र-भृत्य होते आणि आंध्र लोकात बहुपतिकत्वाची चाल एका काळीं होती याविषयी वाद नाही. शातवाहनांच्या नंतर मातृनामावरून अपत्यनाम पडल्याचा ठळक असा उल्लेख म्हटला म्हणजे भवभूतीने केलेला जातुकर्णीपुत्राचा. जातुकर्णीपुत्र म्हणजे जातुकर्णी स्त्रीचा पुत्र. जातुकर्णीच्या नवऱ्याच्या नावावरून जातुकर्णीच्या पोटी झालेल्या पुत्राचे नाव पडलेले नसून, स्वतः खुद्द जातुकर्णीच्या नावावरून ते पडलेले आहे, ही बाब लक्ष्य आहे. असो. भवभूतीपर्यंत स्त्रिया क्वचित् अपत्यनामप्रवर्तक असत, एवढे यावरून निश्चित आहे. तात्पर्य, अतिप्राचीन आर्यकालीन मातृनामोत्पन्न अपत्यनामे ठेवण्याची चाल हजारो वर्षे या देशात प्रचलित होती, व ती निखालस निर्मूलित व्हावयास आपला हा सध्याचा काल लागला. ह्यावरून प्राचीन काली मातृप्राधान्य जाऊन कुटुंबात पितृप्राधान्य यावयास किती प्रयास पडले असतील व प्रजापतिसंस्था म्हणजे एकपतित्वाची संस्था प्रचलित व्हावयास किती अडचणी आल्या असतील त्याचा अंदाज होण्यासारखा आहे.

४. कुटुंबात मातृप्राधान्य जाऊन पितृप्रधान्य यावयाला यद्यपि पराकाष्ठेचे प्रयास पडले, तत्रापि आर्य लोकांत प्रजापतिकाली पितृप्राधान्याची जी एकदा स्थापना काही टोळ्यात झाली तिची उपयुक्तता समाजाच्या ध्यानात उत्तरोत्तर जास्त जास्त येऊन ती संस्था कालांतराने आर्य लोकांत प्रथम शिष्टमान्य, नंतर बहुजनमान्य आणि शेवटी धर्ममान्य होऊन बसली. अशा काळी–म्हणजे पितृप्राधान्य बहुतेक पूर्णपणे स्थापित झाल्याच्या काळी–महाभारतनामक इतिहासाचा कर्ता जो व्यास नामक कोणी पुरुष

जो शकपूर्व चौथ्या पाचव्या शतकाच्या सुमारास होऊन गेला असावा, त्याला भारतीय इतिहास रचण्याची आवश्यकता जेव्हा भासली तेव्हा त्याच्यापुढे असा प्रश्न पहिल्या प्रथम येऊन उभा राहिला की, भारतीय इतिहासाचा प्रारंभ कोठून करावा ? अतिप्राचीन सरमिसळ समागमाच्या काळापासून करावा की मातृप्रधान कुटुंबसंस्थेच्या काळापासून करावा, की पितृप्रधान जी प्रजापतिसंस्था तिच्या काळापासून करावा ? प्रथमपक्षी म्हणजे सरमिसळ समागमाच्या काळापासून इतिहासाचा प्रारंभ करावा म्हटले तर कोण कोणाचा कोण हेच ओळखण्याची तत्कालीन समाजसंबंधाने अडचण पडू लागली. सबब तेथून इतिहासाचा प्रारंभ करणे अव्यवहार्य दिसले. द्वितीयपक्षी म्हणजे मातृप्रधान कुटुंबसंस्थेच्या काळापासून इतिहासकथनास प्रारंभ करता आला नसता असे नाही; परंतु मातृप्रधान कुटुंबात यद्यपि भाऊ, बहीण, आई व मामा ही चार नाती स्पष्ट दिसत होती तत्रापि बापाचा पत्ता अद्याप लागला नव्हता, त्यामुळे एकापुढे एक वंश सांगण्याची पंचाईत पडू लागली. तेव्हा, दुसराही पक्ष ह्या इतिहासकाराने सोडून दिला. शिल्लक राहिला तिसरा पक्ष पितृप्रधान कुटुंबसंस्थेचा. ह्या संस्थेच्या काळापासून वंशपरंपरा जिला म्हणतात ती समाजात ठळकपणे उमटलेली दिसत होती. पणजा, आजा, बाप, मुलगा, नातू, पणतू अशी एकाला एक लागून वंशपरंपरा स्पष्ट ओळखता येत असल्यामुळे इतिहासरचनेचे कार्य सुरळीत भासले आणि म्हणूनच व्यासांनी प्रजापतिसंस्थेपासून भारतेतिहासाचा आदि केला आहे. मरीचि, अंगिरस, अत्रि, पुलस्त्य, पुलह, ऋतु, वशिष्ठ हे सहा किंवा सात प्रजापती, व्यासांच्या इतिहासदृष्टीने सर्व सृष्टीचे उत्पादक होत. यांच्यापासून देव, दानव, राक्षस, किन्नर, यक्ष, गंधर्व, अप्सरा, मानव, पशू, पक्षी, वृक्ष, नद्या व पर्वत उत्पन्न झाले असे व्यासांचे मत होते. याच्यापूर्वी काय होते ते व्यासांना माहीत नाही. फक्त याच्या पूर्वी ब्रह्मदेव होता व त्याने मरीच्यादी सहा किंवा सात प्रजापती केवळ मनःसंकल्पाने उत्पन्न केले. ह्या मरीच्यादींना व्यास ब्रह्मदेवाचे मानसपुत्र म्हणून म्हणतो. आधुनिक दृष्टीने बोलावयाचे म्हणजे ज्यांची उत्पत्ती कोणापासून म्हणजे कोणत्या विवक्षित स्त्री-पुरुषांपासून झालेली सांगता येण्यास साधन नाही, त्यांना मानसपुत्र म्हणून व्यास म्हणतो इतकेच. तात्पर्य, प्रजापतीच्या पूर्वीची माहिती व्यासाला फारशी नव्हती व ती असण्याचा संभवही नव्हता. पूर्व पुराणांतून, वेदांतून व दंतकथांवरून व्यासांना जी सर्व माहिती मिळाली तिच्यावरून त्यांनी असा कयास बांधला की प्रजापती हे मनुष्यसृष्टीचे आदि होत. प्रजापतीपासून कौरवपांडवांच्या काळापर्यंतची वंशपरंपरा बहुतेक बिनतूट अशी पुराणांवरून, वेदांवरून व दंतकथावरून जी त्यांना उपलब्ध झाली ती त्यांनी प्रामाणिकपणाने जशीच्या तशी, विशेष फेरफार न करता दिलेली आहे, अशी सर्व भारत ग्रंथ पाहून माझी खात्री झालेली आहे. व्यासांच्या प्रामाणिकपणाबद्दल एकच एक मोठ्यांतले मोठे प्रमाण म्हणजे, स्वकालीन नीतिदृष्ट्या गर्ह्य वाटणाऱ्या अशा नाना प्राचीन चाली, कोणाचीही व कशाचीही पर्वा भीडमुर्वत न

धरिता, त्यांनी पुरातन इतिहास म्हणून, प्रांजलपणे लिहून ठेवण्यास माघार घेतली नाही, हे होय. सरमिसळ समागम, अतिथीला स्वस्त्रीसमर्पण, पशूसमागम, गुरुपत्नीगमन, बहुपतित्व, अल्पकालीन विवाह अटींचे विवाह इत्यादी नीतिबाह्य चालींचा निर्देशच नव्हे तर तपशीलवार वृत्तान्त स्थलोस्थली जो त्यांनी दिला आहे त्यावरून प्रामाणिक इतिहासकाराचे अवघड काम त्यांनी किती उत्कृष्टपणे पार पाडिले आहे, ते विशद होते. गर्ह्य व निंद्य म्हणून वरील चालींची हकीकत जर व्यासांनी दाबून टाकली असती, तर जगाच्या इतिहासाची केवढी भयंकर हानी झाली असती तिचा अंदाज समाजशास्त्राचे परिशीलन करणाऱ्या विद्वानास यथायोग्य करता येतो. प्रजापति संस्था निर्माण झाल्यावर त्या संस्थेच्या पूर्वी ज्या विचित्र चाली समाजात रूढ होऊन बसल्या होत्या त्या समाजातून एकाएकी नाहीशा झाल्या नाहीत. त्यापैकी बहुतेक सर्व चाली नाना देश, नाना पोटसमाज यात प्रजापति संस्था निर्माण झाल्यानंतरही प्रचारात होत्या व पुरातनधर्म म्हणून लोकमान्य होत्या. त्यांचा तपशील न देण्याचे जरी व्यासांनी मनात आणले असते, तत्रापि त्यांनी पिढ्यानुपिढ्यांची परंपरागत मनोरचना त्यांच्या आड निःसंशय आली असती. जी भाषा, ज्या संस्था, जी परिस्थिती मनुष्याच्या मनाची रचना करते त्या भाषेला, संस्थांना व परिस्थितीला सोडून मनुष्य एक वाक्यही इतिहास म्हणून उच्चारू शकत नाही, अशी स्थिती मनुष्यमात्राच्या मनोरचनेची असल्याकारणाने गर्ह्य म्हणून अनेक प्राचीन चालींचा वृत्तान्त व्यासांनी जर दाबून टाकण्याचा प्रयत्न केला असता तर एकच निष्पत्ती फळास आली असती. ती ही की, महाभारत म्हणूस जो उत्कृष्ट इतिहास आज आपणास पाहावयास मिळतो तो मुदलातच लिहिला जाणे अशक्य झाले असते.

५. (१) पाशवावस्थेत वानरांतील एकपतिक सर्व भार्याक समाज, (२) मानवावस्थेतील बहुपतिक बहुभार्याक सरमिसळ करणारा समाज, (३) नंतर बहुस्वसृभार्याक बहुभातृपतिक समाज, (४) नंतर बहुस्वसृभार्याक एकभ्रातृपतिक समाज आणि एकभार्याक बहुभ्रातृपतिक समाज, (५) आणि शेवटी बहुभार्याक एकपतिक समाज ऊर्फ प्रजापतिसंस्था. अशा परंपरेने प्राचीन आर्यसमाज ज्या काळी परिणत झाला त्या काळापासून व्यासांनी आपल्या भारतेतिहासाचा प्रारंभ केला आहे. मरीचि, प्रजापति, अत्रिप्रजापति, अंगिरस प्रजापति, पुलस्त्य प्रजापति, ऋतुप्रजापति, वसिष्ठप्रजापति, कर्दमप्रजापति, धर्मप्रजापति, वीर प्रजापति, अरण्यप्रजापति, प्राचीन बहिप्रजापति, दक्षप्रजापति, अंगप्रजापति, रुचिप्रजापति, सूर्यप्रजापति, मनुप्रजापति इत्यादी अनेक प्रजापतींची नावे भारतात व हरिवंशात दिलेली आहेत. आर्य लोकांत पितृप्रधान कुटुंबसंस्था म्हणजे पित्याच्या नावावरून पुत्राचे नाव ज्या कुटुंबसंस्थेत पडते ती संस्था प्रथम जेव्हा सुरू झाली तेव्हाच्या प्रसिद्ध कुटुंबसंस्थापक ऊर्फ कुलसंस्थापक कुलपतींची ऊर्फ प्रजापतींची ही नावे आहेत. या प्रजापतिक कुटुंबसंस्थेत सर्व स्त्रिया एका प्रजापतीच्या भार्या असल्यामुळे, समाजात इतर

नर जे वयात येत त्यांना तीन मार्ग खुले असत. एक मार्ग म्हटला म्हणजे मूळ कुटुंबातून काही प्रिय स्त्रिया काढून नेऊन निराळे स्वतंत्र कुटुंब स्थापून स्वतः प्रजापती व्हावयाचे. दुसरा मार्ग म्हटला म्हणजे आजन्म अविवाहित राहावयाचे, व प्रजापतीच्या कुटुंबात भारभूत रिकामटेकडे न राहता अरण्यवास पतकरावयाचा. तिसरा मार्ग म्हटला म्हणजे प्रजापती कुटुंबाला सोडून देऊन दूरदेशी तत्प्रांतीय सरमिसळ समागम करणाऱ्या मागसलेल्या रानटी समाजातील स्त्रियांशी प्रजापती नात्याने राहून पृथ्वीभर वसाहती करावयाच्या. ह्या तिन्ही मार्गांची वर्णने भारतेतिहासात आली आहेत. मूळ प्रजापतिक कुटुंबाच्या शेजारी स्वदेशातल्या स्वदेशात निराळी विभक्त प्रजापतिक कुटुंबे स्थापिली जाऊन आर्यसमाज बहुसंख्य होऊन आर्यप्रजावृद्धी कशी झाली याचा तपशील प्रस्तुत स्थळी देण्याचे कारण नाही. असा प्रकार झाला नसता तर ऋषींनी कुटुंबे व पुढे प्रजा जी इतकी बहुसंख्य झाली, ती झालेली न दिसती. प्रजापतिसंस्था बहुसंख्य झाल्याचे एकच शाब्दिक प्रमाण येथे देतो. कुटुंबाच्या मुख्य धन्याला प्रजापती हे जसे नामाभिधान मिळाले, तसेच प्रजापतीपासून झालेल्या प्रजेला प्रजा व प्रज हे नाव मिळाले. हा प्रज व प्रजा शब्द इतका प्रसिद्ध आहे की, दोनचारशे वर्षांपलीकडील जुन्या मराठी कागदपत्रांत शेतकरी या अर्थाने प्रज शब्द वापरलेला आधुनिक इतिहाससंशोधकांच्या चांगला परिचयाचा आहे. ऋग्वेदात ज व प्रज हे शब्द येतात, हेही सांगावयाला नकोच. देशातल्या देशात राहून प्रजापतिक कुटुंबस्थापकांचा हा पहिला मार्ग झाला. तिसरा मार्ग स्वदेशत्याग करून दूरदेशी वसाहत करणाऱ्यांचा. ह्या दूरदेशी वसाहत करणाऱ्यांचा उल्लेख हरिवंशाच्या तिसऱ्या अध्यायात आलेला आहे. दक्षप्रजापतीला वरिणप्रजापतीची मुलगी असिवकी इच्या पोटी पाच हजार पुत्र झाले. त्यांना बेसुमार प्रजावृद्धी करण्याच्या नैसर्गिक छंदात निमग्न होण्याच्या बेतात असलेले पाहून, नारदाने अर्थशास्त्रीय उपदेश करून दूरदेशी घालवून दिले. नारद म्हणाला, तुम्ही प्रजावृद्धी करू इच्छिता खरे, परंतु वर्धमान प्रजेला अन्न पुरविण्याचे पृथ्वीला सामर्थ्य कितपत आहे ते प्रथम पाहा आणि मग प्रजावृद्धीच्या उद्योगाला लागा. नारदाचा हा उपदेश त्या पाच हजार पुत्रांना पटला व ते दूरदेशी जे अन्नशोधार्थ गेले ते पुन्हा परत आले नाहीत; बहुधा जिकडे गेले तिकडेच वसती करून कायमचे राहिले. अशा युक्तीने पाच हजार पुत्रांची वासलात लागल्यावर दक्षाने असिवकीच्या ठायी पुनः एक हजार पुत्र उत्पन्न केले, त्यांचीही वाट पूर्वीच्याचप्रमाणे नारदांनी लाविली. मूळ आर्य लोकांची फाटाफूट होऊन पूर्वेकडे, पश्चिमेकडे, दक्षिणेकडे व उत्तरेकडे रशिया, जर्मनी, इटली, ग्रीस, हिंदुस्थान, तिबेट इत्यादी पृथ्वीभागात आर्य लोक अतिप्राचीन काळी जे पसरले त्या प्रसाराचा हा इतिहास आहे. विदेशगमनाच्या तिसऱ्या मार्गाचा हा असा पौराणिक तपशील आहे पहिल्या व तिसऱ्या मार्गाचा खुलासा झाल्यावर, दुसरा मार्ग अविवाहित राहून अरण्यवास पत्करणाऱ्यांचा. त्याचा आता परामर्श घेऊ. युक्तीने प्रजापतीच्या कुटुंबातील

चार स्त्रियांना भुलवून स्वदेशातल्या स्वदेशात स्वतंत्र व विभक्त निराळी कुटुंबे स्थापण्याचे कौशल्य व करामत ज्यांच्या अंगी होती ते स्वदेशातच राहिले आणि ज्यांच्या अंगात विशेष धाडस व साहस होते त्यांनी परदेश पत्करला; परंतु भिडस्त व पापभिरू स्त्रियांशी विशेष लगट करण्याचा ज्यांना सौजन्यामुळे कंटाळा, प्रजापतीशी भांडण तंटा करण्याचा ज्यांचा मूळ स्वभाव नव्हे, असे जे थोडे सत्त्वशील पुरुष होते त्यांनी प्रजापतींच्या कुटुंबातून कोणालाही न दुखविता, देशातील निर्जन अरण्ये व गिरिकंदरे व नदीतटाके यात कुट्या व आश्रम करून राहण्याचा बिनबोभाट मार्ग स्वीकारला. हरिवंशाच्या पहिल्या अध्यायात ब्रह्मदेवाचे सनकसनंदनादि जे सात पुत्र सांगितले आहेत ते या सत्त्वशील वर्गापैकी अत्यंत पुरातन व इतिहासात दाखल झालेले पाहिले होते. ह्या सत्त्वशीलांच्या निरुपद्रवी मार्गाला ब्रह्मचर्याचा मार्ग असे जगविख्यात व सर्वश्रुत नाव पुढे कालांतराने मिळालेले आहे. एकपतिक, बहुभार्याक प्रजापतिक समाजात पंगू, दुबळ्या व सत्त्वशील अशा इसमांवर व तरुण लोकांवर अपत्नीक राहण्याचा बलिष्ठ प्रजापतींच्या अमलात जबरदस्तीने प्रसंग असाच सर्वत्र ओढवत असलेला पृथ्वीवरील अनेक रानटी समाजात दृष्टीस पडतो. The Plurality of wives becomes the privilege of small number of the strongest and the most feared, the Chiefs, the Sorcerers, or the priests, where there are any. In Australia, for example, the adult men take possession of the woman of all ages, and in consequence, the greater number of young men cannot become proprietors of a woman before the age of about thirty years. Among the Ancas or Arancanos of South America the poor of the people are frequently reduced to remain celibate, (Latourneau, P. 130). Polygamy is the luxury of the rich or chiefs (P. 133). बहुपत्नीत्व हा मूठभर सामर्थ्यवान, ज्यांची दहशत असते असे सरदार, मांत्रिक, आणि जेथे असतील तेथे धर्मगुरु यांचा खास अधिकार बनतो. उदाहरणार्थ ऑस्ट्रेलियात तरुण पुरुष सर्व वयाच्या स्त्रियांवर मालकी प्रस्थापित करतात. परिणामी युवकांना ते जवळ जवळ तीस वर्षांचे होईतो स्त्री मिळत नाही. दक्षिण अमेरिकेतील अनकास किंवा अरनकानोस यांच्यातील गरिबांना ब्रह्मचारीच राहावे लागते. (लिटोर्न्यू पृ. १३०). बहुपत्नीत्व ही श्रीमंतांची आणि राजेरजवाड्यांची चैनबाजी असते (पृ. १३३).

बलिष्ठ प्रजापतींच्या अरेरावी व आपल्पोट्या जुल्माने अपत्नीक रहाण्याचा दुर्धर प्रसंग ज्याच्यावर ओढवतो अशा लोकात धट्ट्याकट्ट्या परंतु बिनवजन तरुणाखेरीज पंगू व दुबळ्या लोकांचा समावेश होतो. पैकी पंगू व दुबळे दैवगतीने अनन्यगतिक असल्या-मुळे त्यांच्या हातून रानावनात व गिरिगव्हरात जाऊन राहण्याचा खडतर मार्ग अवलंबिला

जाणे संभाव्य सुद्धा नाही. सबब, उत्साही परंतु सत्त्वशील व पराक्रमी परंतु इंद्रियनिग्रही असे जे थोडे तरुण लोक ऋषिलोकांच्या प्राजापतिक समाजात असत त्यांनी हा ब्रह्मचर्याचा मार्ग स्वीकारलेला आहे. भारतेतिहासकार जे व्यास त्यांनी सनकनंदनादी सातांचाच जरी ग्रंथारंभी प्रामुख्याने उल्लेख केला आहे व तोही प्रजापतिसंस्थेच्या अनुषंगाने केला आहे, तत्रापि ह्या सनकसनन्दनाच्याही फार पूर्वीच्या प्राचीन काळापासून अपत्नीक अशा ब्रह्मचाऱ्यांची परंपरा चालत आलेली आहे. इतकेच की, जुलमी प्रजापतीच्या काळी ही संस्था विशेष उठावाने लोकांच्या नजरेत भरू लागली. शिवाय सनकसनंदनादी योगसंपन्न पुरुष प्रजापतिकाली उत्पन्न जे झाले ते एकाएकी आकाशातून ज्ञान घेऊन पृथ्वीवर उतरले अशीही विपरीत समजूत करून घेण्यात समंजसपणा नाही. ज्ञानाची व योगाचा कित्येक पिढ्यांची काहीतरी पूर्वपरंपरा असल्याशिवाय, सनकसनंदनासारखे योगी व ज्ञानी निपजत नसतात. तात्पर्य, ब्रह्मचर्यसंस्था प्रजापतिसंस्थेच्या समकालीनच नव्हे तर तीहून बरीच जुनी आहे. ब्रह्मचारी या शब्दाचा मूलार्थ ब्रह्मात चालणारा असा आहे. ब्रह्मात चालणारा म्हणजे घरदार सोडून मोठ्या व विस्तीर्ण जगात एकाकी भ्रमण करणारा. ब्रह्मन म्हणजे मोठे, ब्रह्मन म्हणजे समाजाच्या राहण्याच्या स्थलाहून मोठे असे जे अफाट पृथ्वीफलक ते ब्रह्मन. म्हणजे विस्तीर्ण व अमर्याद जग, त्यात सचार करणारा तो ब्रह्मचारी. जबरदस्त प्रजापतीच्या जुलमाने वैतागून जाऊन अफाट जगाचा ज्याने रस्ता सुधारला तो ब्रह्मचारी, घर सोडून अनिकेतन जो बनला म्हणजे प्राजापतिक कुटुंबाबाहेर जो पडला तो ब्रह्मचारी. ब्रह्मचारी अरण्यात व गिरिगव्हरात एकान्तात राहू लागल्याकारणाने, इतर जमावांशी मारामाऱ्या, घरघुती तंटेबखेडे, स्त्रीसंबंधक मात्सर्यादी दोष, अन्नार्थ वन्य व ग्राम्य पश्वादींची हिंसा, पोराबाळांच्या पोटापाण्याची तरतूद करण्याची जबाबदारी इत्यादी काळज्यांतून मुक्त होऊन, त्यांना समाजाचे, लोकांचे व जगताचे चिंतन करण्याला मनमुराद अवधी व स्वास्थ्य मिळाले, आणि ह्या स्वास्थ्याचा आत्मानंदार्थ व लोकोपकारार्थ त्यांनी त्या त्या कालाला व परिस्थितीला अनुरूप असा चांगला उपयोग केला. ऋषिसमाजात ज्या ज्या म्हणून सुधारणा, जी जी म्हणून शास्त्रे व व जे जे म्हणून धर्म उदयास आले, त्यांचे त्यांचे आद्यप्रवर्तक हे ब्रह्मचारी तपस्वी लोक होते. त्या प्राचीन काळी ब्रह्मचर्याखेरीज इतर कोणत्याही आश्रमाने इतके परिपूर्ण स्वास्थ्य मिळण्यासारखे नव्हते. ते स्वास्थ्य प्रजापतींच्या जुलमाने आर्य समाजातील काही सत्त्वशील पुरुषांस मिळून ब्रह्मचर्यसंस्था उदयास आली. असली ही थोर संस्था तत्कालीन किंवा अर्वाचीन इतर रानटी समाजात कोठेही निघाल्याचे इतर कोणत्याही इतिहासात नमूद नाही. रानटी आर्य लोकांत व इतर रानटी लोकांत जो मोठा भेद प्रथमदर्शनी अवलोकनात येतो तो हाच होय. इतर रानटी लोकांत जुलमी प्रजापतीच्या जबरदस्तीला कंटाळून घराबाहेर व प्रजापती कुटुंबाबाहेर जे तरुण लोक पडतात ते फार तर शेजारी किंवा दूरदेशी स्वतंत्र व विभक्त प्रजापतिसंस्था स्थापतात; परंतु आजन्म अपत्नीक व ब्रह्मचारी राहून आत्मानंदात किंवा

लोकोपकारात आयुष्य खर्च करीत असलेले आढळत नाहीत, निदान प्रवाशांनी व निरीक्षकांनी तसा दाखला कोठे टिपून ठेवलेला आढळात नाही. आर्य लोकांतील ह्या ब्रह्मचाऱ्यांजवळ आर्य लोकच केवळ नव्हेत, तर देव म्हणून जे श्रेष्ठ लोक होते तेही भीत अशी शेकडो वर्णने भारतात आहेत. ब्रह्मचाऱ्याजवळ अशी कोणती जादू होती की, जिच्यामुळे मानवच नव्हेत तर देवसुद्धा त्यांना वचकत ? ही जादू दुसरी तिसरी कोणतीही नसून सर्वाभूती समदृष्टी ही होय. समदृष्टित्वामुळे, ब्रह्मचाऱ्यांना सर्व लोक रानातील अनार्य, व म्लेंछ लोक देखील, वश असत, व त्यांची आज्ञा शिरसामान्य करीत. असे हे हत्यार जवळ असल्याकारणाने, प्रजापति, अधिराजे व इंद्रादी देवदेवेश्वरही ब्रह्मचाऱ्यांना वचकून असत आणि वचकासारखी वजनदारी पृथ्वीवर दुसरी कोणतीच नाही. ब्रह्मचाऱ्यांच्या वचकाचा आदर प्रजापतिकालानंतर इतका वाढला की, संपूर्ण आर्य समाजाचे अध्यापकत्व ब्रह्मचाऱ्याकडे आले, व ब्रह्मचाऱ्याचे अनुकरण आर्यलोकांतील तरुण स्त्रीपुरुषांनी नियमाने केलेच पाहिजे, असा दंडक निर्माण झाला. प्रत्येक आर्य प्रथम ब्रह्मचर्याश्रमातून तावून सुलाखून पुनः जन्म घेई व द्विज या सन्मान्य पदवीस आपणास पात्र करून घेई.

७. येणेप्रमाणे प्रजापतिसंस्थेपासून प्राचीन आर्य समाजात तीन मोठे मोठे परिणाम झाले. प्राजापतिक कुले विभक्तपणे स्थापिण्याचा क्रम सुरू झाला, हा पहिला परिणाम. दूरदेशी वसाहत करण्याचा प्रघात पडला हा दुसरा परिणाम. बहुभार्यक व एकपतिक प्रजापतिसंस्थेत पुढे कोणकोणते फेरफार कसकसे होत गेले, हा तपशील भारतेतिहासावरून महर्षि व ब्रह्मचारी जे व्यास त्यांच्या अनुसंधानापुढील कित्येक टिपणांतून यथास्थल नमूद होईल.

✣

प्रकरण ३ रे

आतिथ्याची एक आर्ष चाल

३. आतिथ्याची एक आर्ष चाल

(१) अथेन्स शहरातील तत्त्वज्ञ साक्रेटिस (सुक्रतुस) याने आपली स्त्री झांटिप हिला आपला स्नेही अल्कि बियाडिस याला संभोगार्थ दिली, तसेच रोम शहरातील प्रसिद्ध मुत्सद्दी केटो याने आपली स्त्री मर्शिया हिला आपला स्नेही होर्टेन्शियस याला त्याच कार्याकरिता दिली, असे प्लूटार्क लिहितो (प्लूटार्ककृत केटो). मित्राला स्वस्त्री उपभोगार्थ देण्यात कोणत्याही नीतीचा भंग झाला असे तत्कालीन ग्रीक व रोमन समाजाला वाटत नव्हते, हा ह्या उदाहरणाचा अर्थ. आपल्या इकडे भारतवर्षात प्राचीन काळी या मुद्द्यासंबंधाने काय स्थिती होती ती भारतादी ग्रंथावरून निश्चित करू. उद्योगपर्वाच्या ४५ व्या अध्यायात खरे मित्रत्व कशाला म्हणतात ते सनत्सुजात सांगतात, आणि खऱ्या मित्रत्वाचे जे सहा गुण त्यांपैकी खालील गुणांचा निर्देश करतात—

" संकटसमयी मित्राला आपली स्त्रीदेखील निर्मळ अंतःकरणाने अर्पण करावी." (इष्टान् पुत्रान् विभवान् स्वाञ्श्च दारान्)

सनत्सुजात म्हणजे कोणी अलबत्ये गलबत्ये वाचाट माणूस नव्हते. महान् तपस्वी व तत्त्ववेत्ते म्हणून ते भारतात प्रसिद्ध होते. ते ही मित्रनीती सांगत आहेत. तेव्हा एकेकाळी भारतीयांमध्ये मित्राला स्वस्त्रीसंभोगार्थ देण्यात नीतिभंग होतो असे मानीत नव्हते, असे विधान सप्रमाण करता येते. या विधानाचे पोषण पाणिनीच्या एका सूत्राच्या आधाराने करता येते. द्विगोर्लुगनपत्ये (४–१–८८) या सूत्राच्या अनुषंगाने द्वैमित्रिः हा तद्धित पाणिनि सांगतो. द्वयोर्मित्रयोरपत्यं द्वैमित्रिः । दोन मित्रांच्या अपत्याला द्वैमित्रि म्हणतात. एका मित्राने आपली बायको काही काल ग्राम्यधर्मार्थ आपल्या मित्राला दिली आणि मित्रापाशी राहून त्या बायकोला अपत्य झाले, तर बायको शास्त्रतः एकाची व मूल झाले दुसऱ्या मित्राच्या समागमापासून, अशा स्थितीत पितृत्व सामान्य

जनप्रवादाने दोघाही मित्रांकडे येई. शास्त्रतः नवऱ्याकडे, समागमतः दुसऱ्या मित्रांकडे सबब मुलाला द्वैमित्रि म्हणत. पाणिनिकाली मित्राला ग्राम्यधर्मार्थ स्वस्त्री देण्याची चाल होती, हे सिद्ध. ग्रीस व रोम या देशांत जी चाल होती तीच चाल पाणिनिकाली भारतवर्षात होती.

(२) दोघा जीवश्च कंठश्च मित्रांमध्ये स्त्रीविनिमय होणे जसे नीतिबाह्य समजत नसत तसेच अनोळखी अतिथीला स्वस्त्री किंवा स्वदासी देण्यात एकेकाळी धर्म समजत असत.

शांतिपर्वाच्या १६८ व्या अध्यायात गौतम नावाच्या ब्राह्मणाला अतिथिसत्कार म्हणून इतर वस्तूंबरोबर कोण्या शबराने एक गतभर्तृका दासी दिल्याचा वृत्तान्त आहे. कोणी सन्मान्य अतिथी आला असता, त्याला दासी देण्याची चाल भारतवर्षात पुरातन काळी सर्वसामान्य होती, व अलीकडे पेशवाईतही ही चाल प्रचलित होती. पेशवाईतील कित्येक सरंजामदारांत अतिथिसत्काराची अशी चाल होती म्हणून सांगतात की अतिथीची चंची तांबुलादी द्रव्यांनी नित्य भरून ठेवावयाची व सेवा करण्याकरिता रात्रौ एखादी ठेंगणी ठुसकी दासी अतिथीकडे पाठवावयाची. कृष्ण, अर्जुन इत्यादी अतिथींना दासी दिल्याचे उल्लेख अनेक आहेत. आता केवळ दासी अतिथीकडे पाठविण्यात विशेष मातब्बरी दिसत नाही; कारण दासी म्हणजे बोलून चालून गुलाम. परंतु वरधन्याने किंवा गृहस्थाने आपल्या यज्ञपत्नीला अतिथीची ग्राम्यधर्माने सेवा करण्यास सांगितल्याचाही दाखला भारतात पाहावयास मिळतो.-अनुशासन पर्वाच्या दुसऱ्या अध्यायात सुदर्शनाची कथा आहे. सुदर्शन आपली भार्या ओघवती हिला सांगतो की, " गृहस्थाश्रमधर्माने माझी वागावयाची प्रतिज्ञा आहे, सबब अतिथीला प्रतिकूल असे कोणतेही वर्तन तू करू नयेस; इतकेच नव्हे तर प्रसंगी स्वतःचे शरीरही अतिथीला देण्यास मागेपुढे पाहू नकोस. " नवऱ्याची ही आज्ञा बायकोने शिरसावंदन केली. पुढे लवकरच परीक्षेची वेळ आली. सुदर्शनाच्या गैरहजेरीत एक ब्राह्मण अतिथी आश्रमात आला. अर्घ्यपाद्यादिपूजा यथाविधी घेतल्यावर अतिथीने सुदर्शनस्त्रीस संभोगेच्छा असल्याचे दर्शविले, तेव्हा अतिथीचा अवमान करावयाचा नाही या धर्माने ओघवतीने ब्राह्मणाची इच्छा पूर्ण केली. इतक्यात सुदर्शनऋषि घरी परत आले व त्यांना हा आतिथ्यप्रकार कळला. तेव्हा आपण आज धन्य झालो असे त्यांनी उद्गार काढिले व आपल्या बायकोची पातिव्रत्यधर्माबद्दल पाठ थोपटली. पितामह भीष्म धर्मराजाला सांगतात की ह्या सत्कृत्यामुळे सुदर्शनाची कीर्ती भुवनत्रयांत अक्षय्य पसरली व त्याला इंद्रलोक प्राप्त झाला. एके काली स्वस्त्रीही अतिथीला अर्पण करण्याची चाल भारतीय आर्यांत होती, याला या कथेतून दुसरा आधार धुंडाळण्याची जरूर नाही. ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, पॉलिनेशिया, मोंगोलिया आणि इतर बहुतेक सर्व देशांतील प्राचीन व अर्वाचीन रानटी व सुधारलेल्या समाजातील अतिथिपूजनाची ही चाल प्राचीन भारतीय आर्यांत व अनार्यांतही आढळावी हे काही एका संस्कृतीतील मनुष्यस्वभावास अनुरूपच आहे.

(३) सुदर्शनकालीन अतिथीला स्वस्त्रीसमर्पण करण्याच्या ह्या चालीला पुढे आस्ते आस्ते आळा पडल्याचाही दाखला भारतात नमूद आहे. शांतिपर्वाच्या २६६ व्या अध्यायात चिरकारीची कथा भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितलेली पाहावी. चिरकारीचा पिता गौतम अन्यत्र गुंतला असता इंद्र गौतमाश्रमात अतिथी म्हणून आला आणि चिरकारीच्या मातेशी संभोग करून चालता झाला. हे वृत्त गौतमास कळल्यावर गौतमाने चिरकारीस आपल्या मातेचा वध करण्यास पहिल्या झटक्यासरशी सांगितले व आपण रागे रागे अरण्याचा रस्ता धरिला. इकडे मातेचा वध न करिता, चिरकारी तसाच राहिला. अरण्यांत राग शांत झाल्यावर गौतमाला स्वस्त्रीचा पुत्राने वध केला असेल या निश्चितीने फार वाईट वाटले. तो म्हणाला, अतिथिसमागमांच्या असल्या अस्पष्ट अपराधाकरिता स्त्रीचा वध करणे अधर्म्य होय. नंतर पश्चात्ताप होऊन घरी आल्यानंतर, पुत्राने स्त्रीस ठार मारिले नाही असे पाहून, त्या ऋषीने चिरकारीची प्रशंसा केली. ह्या गौतमाच्या कथेत व मागील सुदर्शनाच्या कथेत अंतर आहे. सुदर्शन व गौतम दोघेही अतिथीला स्वस्त्रीसमर्पण करणे हा धर्म समजतात; परंतु ह्या धर्माने सुदर्शनाला कृतकृत्यता वाटते, तर गौतमाला पहिल्या झटक्याला क्रोध येतो. विचारांती स्वस्त्रीने अतिथिधर्म पाळण्यात जे केले ते धर्म्यच केले असे गौतमाला वाटले. याचा अर्थ इतकाच की ही अतिथिपूजनाची चाल समाजांत किंचित् गर्ह्य समजली जाऊ लागली होती, परंतु ह्या चालीचा पगडा अद्याप व्हावा तितका शिथिल झाला नव्हता.

(४) यापुढील पायरी म्हणजे अतिथीला स्त्रीनिवेदन न करण्याची. ह्या पायरीचे उत्कृष्ट उदाहरण म्हटले म्हणजे सर्वप्रसिद्ध जमदग्नीचे. जमदग्नीची बायको रेणूका हिने चित्ररथ गंधर्वाकडे नुसते सकामदृष्टीने पाहिले, तेणेकरून कोपाविष्ट होऊन जमदग्नीने आपला मुलगा परशुराम याजकडून तिला ठार केले. मानसिकही व्यभिचार ज्याला खपला नाही, त्या जमदग्नीने अतिथीला स्वस्त्रीसमर्पण कितपत सहन केले असते ते सांगावयाला नकोच. सुदर्शनाच्या कथेत अतिथीला संभोग देणे हे दोघा नवराबायकोंना संमत होते. गौतमाच्या कथेत स्वस्त्रीदान नवऱ्याला पसंत नव्हते, परंतु बायकोला व मुलाला पसंत होते. परशुरामाच्या कथेत बापाला व मुलाला दोघांनाही स्वस्त्रीसमर्पण नापसंत होते, स्वतः स्त्रीला पसंत होते किंवा नाही ते सांगवत नाही.

(५) या पुढील पायरी राम व सीता यांची. रावण अतिथीचा वेश घेऊन सीतेपुढे आला व तिला तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने घेऊन पळाला. अतिथीला स्वशरीर समर्पण करण्याची चाल जर सीतेला मान्य असती, तर रामायणाचा पुढील कथाभाग झालाच नसता. रामाला व लक्ष्मणाला व तत्कालीन तमाम भारतीय समाजाला ही स्त्रीसमर्पणाची चाल बरीच गर्ह्य वाटू लागत चालली होती. तथापि पाणिनिकाली ह्या चालीचा किंचित् अवशेष तुरळक तुरळक राहिलेला होता हे द्वैमित्रि या तद्धितावरून ताडता येते.

(६) मित्राला अगर अतिथीला ऊर्फ पाहुण्याला दासी किंवा स्वस्त्री आदराने समर्पण करण्याची चाल सुदर्शनाच्या कालापासून तो पाणिनीच्या कालापर्यंत एका प्राचीनतम चालीचा अवशेष म्हणून राहिलेली आहे. प्राचीनतम रानटी टोळ्यांत स्त्री हा अर्थ इतर गाई, बैल, घर इत्यादी जिनगीप्रमाणे मालकाच्या म्हणजे पुरुषाच्या मालकीचा समजत असत. स्त्री ह्या वस्तूचा जिनगीत समावेश होत असे. अगदी अलीकडील जो कालिदास तो " कन्या हि अर्थो परकीय एव " असे म्हणताना स्त्रियांना पर्यायाने अर्थांत म्हणजे जिनगीत गोवितो. जिनगीचा म्हणजे मालकीच्या वस्तूचा मालक वाटेल तो विनियोग करू शकतो. म्हणजे विकणे, मारणे, ठार करणे, दान देणे, घालवून देणे, इत्यादी चाहेल तो विनियोग स्त्री या अर्थाचा रानटी माणूस करू शके. स्त्री हा जिन्नस मालकीचा समजला गेल्यावर तिला मित्रास किंवा आदरणीय पाहुण्यांस संभोगार्थ देऊन टाकण्याचा अधिकार सहजच उत्पन्न होतो.

(७) स्त्रियांवर पुरुषाची मालकी केव्हा उत्पन्न झाली ? मनुष्य हा पशुकोटीतील प्राणी आहे व त्याचे अगदी जवळचे सगेसोयरे पशू म्हटले म्हणजे वानर होत. वानरांतील हुप्या इतर लहानमोठ्या वानरांना मारून किंवा हाकलून कळपातील सर्व माद्यांवर प्रजापतित्वाचा हक्क बजावतो. म्हणजे हुप्या बहुपत्नीक असतो. पाशवदशेत माणूसही बहुपत्नीक असावा असे उपमानप्रमाणाने म्हणावे लागते. पुढे कालांतराने लढाया, मारामाऱ्या, मित्रत्व इत्यादी कारणांनी पाशव दशेतील बहुपत्नीक माणसांच्या स्वसंरक्षणार्थ जूट, जमाव किंवा टोळ्या झाल्या. या टोळ्यांत सर्व नर सर्व माद्यांचे म्हणजे सर्व पुरुष सर्व स्त्रियांचे मालक बनले. टोळीतील सर्व स्त्रिया सर्व पुरुषांना सारख्याच उपभोग्य झाल्या. समजा की टोळीतील एखादा पुरुष किंवा काही पुरुष कोणत्याही कारणाने दूरदेशात परागंदा झाले, आणि कालांतराने पुनः स्वतःच्या टोळीची व त्यांची गाठ पडली, तर ह्या पाहुण्यांना टोळीतील स्त्रियांशी शरीरव्यवहार करण्यास कोणतीच अडचण टोळीतील स्त्रीपुरुष समाजाकडून पडणार नाही; कारण पाहुणे आपल्याच टोळीपैकी आहेत, अशी भावना असते. मुळात पाशव माणूस बहुपत्नीक होता. तो टोळ्या करून राहू लागल्यावर बहुपत्नीकत्व व बहुपतित्व टोळ्यांत उत्पन्न झाले. अशा समाजात पुढे आवडनिवड उत्पन्न होऊन मिथुनधर्माने राहण्याची चाल आस्ते आस्ते मागे पडली, परंतु नैसर्गिक पुराणप्रियतेमुळे पूर्वीची बहुपत्नीत्व ही चाल एकाएकी मोडवेना. सबब, जुना मित्र किंवा परागंदा झालेला दूरदेशस्थ पाहुणा आल्यास त्याला स्वतःची नवीन मिथुनधर्मस्थ स्त्री जुन्या यूथधर्मातील सामान्य पतित्वाच्या चालीला मान देऊन आदराने समर्पण करण्यात लोक भूषण व संभावितपणा मानू लागले. ही चाल पाणिनीपर्यंत व पेशवाईपर्यंत थोडीफार अवशिष्ट राहिली. समाजशास्त्रांतील एक नियमच आहे की, चाली मरता मरत नाहीत, मोठ्या पराकाष्ठेच्या चिवट असतात.

(८) केवळ पाशवावस्थेत एक पुरुष व अनेक स्त्रिया असा समाज असे. नंतर यूथा-

वस्थेत अनेक पुरुष व अनेक स्त्रिया सरमिसळ राहून समाज बटला. पुढे आवडनिवड सुरू होऊन मिथुनावस्था हळूहळू अमलात आली आणि शेवटी एक पुरुष आणि एक स्त्री अशी व्यवस्था बहुत प्रयासाने प्रचलित झाली. ती अद्याप भारतीय समाजात पूर्णपणे अमलात यावयाचीच आहे. हाच अर्थ शांतिपर्वाच्या २०७ व्या अध्यायात पुराणेतिहासज्ञ जे भीष्म त्यांनी खालील श्लोकांत वर्णिला आहे.

> कृतयुगे ... ... ॥
> न चैषां मैथुनो धर्मो बभूव भरतर्षभ ॥
> संकल्पादेवैतेषां अपत्यमुपपद्यते ॥ ३७ ॥
> ततस्त्रेतायुगे काले संस्पर्शाज्जायते प्रजा ॥
> न ह्यभून्मैथुनो धर्मस्तेषामपि जनाधिप ॥ ३८ ॥
> द्वापरे मैथुनो धर्मः प्रजानामभवन्नृप ॥
> तथा कलियुगे राजन् द्वंद्व मापेदिरे जनाः ॥ ३९ ॥

(१) कृतयुगी स्त्री-पुरुषांच्या मनात आले म्हणजे समागम होत असे. आई, बाप, भाऊ, बहीण, हा भेद नव्हता. हीं यूथावस्था होय. (२) त्रेतायुगात स्त्रीपुरुषांनी अन्योन्य स्पर्श केला म्हणजे समाज त्या स्त्रीपुरुषांना तेवढ्यापुरता समागम करण्यास परवानगी देई. ही आवडीनिवडीची किंवा इष्टा-निष्टावरणावस्था होय. (३) द्वापरयुगी मैथुन-धर्म सुरू झाला. म्हणजे टोळींत जोडप्याजोडप्यांनी स्त्रीपुरुष राहू लागले, परंतु अद्याप या जोडप्यांना स्थिरावस्था प्राप्त झालेली नव्हती. (४) आणि कलियुगात द्वंद्वावस्था परिणतीस आली, म्हणजे विवाहसंस्था म्हणून जीस म्हणतात ती उदयास आली. इतक्या प्राचीन काली समाजशास्त्रीय परंपरा इतकी नामी सांगणाऱ्या भीष्माविषयी सध्या देखील परम आदर उत्पन्न होतो !

(९) (१) भीष्मांनी वर्णिलेली कृतयुगातील संकल्पावस्था—म्हणजे वेळेस वाटेल त्या स्त्रीपुरुषांचा वाटेल त्या स्त्रीपुरुषांशी समागम होणे—केवळ काल्पनिक अशी भीष्मांनी आपल्या डोक्यातून काढलेली नाही. अशी संकल्पावस्था अद्यापही वन्य मनुष्यांत आढळते. The indigenous Indians of California, who are among the lowest of human races, couple after the manner of inferior mammals, without the least formality, and according to the caprice of the moment. कॅलिफोर्नियातील मूळ इंडियन, जे सर्वांत खालच्या पातळीवरील माणसे आहेत, ते अतिशय कनिष्ठ सस्तन प्राण्याप्रमाणे संभोग करतात. त्यांना काहीही सभ्यता नसते आणि मनाला येईल तेव्हा ते संभोग करतात. (Evolution of Marriage by Letourneau Page 43, 3rd edition).

(२) त्रेतायुगात अन्योन्यस्पर्श म्हणजे हाताने किंवा अंगुलीने परस्परस्पर्श करून

संभोगेच्छा दर्शविण्याची चाल टोळीतील समाजास मान्य झाली. ह्या हस्तादिकांच्या स्पर्शनावरून कालांतराने भारतीयांत जी विवाहसंस्था परिणत झाली तीतील विवाहास पाणिपीडन किंवा हस्तग्रहण हे नाव पडलेले आहे. आश्वलायन गृह्यसूत्रातील पहिल्या अध्यायाच्या सातव्या खंडात विवाहविधीची प्रक्रिया सांगितली आहे. तीत, (१) गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं इति अंगुष्ठमेव गृह्णीयाद् यदि कामयति पुमांस एव मे पुत्रा जायेरन्निति, (२) अंगुलीरेव स्त्रीकामः, आणि (३) रोमान्ते हस्तं सांगुष्ठ मुभयकामः, असे तीन प्रकार स्पर्शाचे ऊर्फ पाणिपीडनाचे दिले आहेत. म्हणजे मुलगे पाहिजे असल्यास नवऱ्याने नवरीचा अंगठा धरावा, मुलगी पाहिजे असल्यास फक्त अंगुळ्या धराव्या, आणि दोन्ही पाहिजे असतील तर केसापर्यंतचा हात अंगठ्यासह धरावा. आश्वलायन गृह्यसूत्रातील ह्या तिन्ही तऱ्हा त्रेतायुगातील स्पर्शावस्थेतील आहेत. त्रेतायुगात एक रानटी टोळी पुरुषप्रधान असून तिच्यात धरून आणिलेल्या स्त्रीचा अंगठा पकडण्याची चाल होती. दुसरी टोळी स्त्रीप्रधान असून तिच्यात वेठबिगार करून नवरी मिळविणारा नवरा नवरीच्या फक्त अंगुल्या अलगत धरी, आणि तिसरी एक टोळी स्त्रीपुरुषांचे समानत्व मानणारी होती. तीत नवरीचे मनगट नवरा खुशाल धरी. हे तिन्ही समाज एकवटून वैदिक समाज बनला, आणि अर्थात् या तिन्ही चाली वैदिक समाजात प्रचलित असलेला गृह्यसूत्रकार जो शौनक त्याने नमूद करून ठेविल्या. पुरुषप्रधान समाज अंगुष्ठ धरी, सबब अंगुष्ठ धरिले असता मुलगे होतात अशी भावना झाली. स्त्रीप्रधान टोळी अंगुल्या धरी, सबब अंगुल्या धरिल्या असता मुली होतात असा समज फैलावला, आणि तिसरी टोळी, अंगुष्ठ, अंगुली व मनगट धरी, त्यावरून मनगट धरिले असता मुली व मुलगे दोन्ही होतात अशी समजूत रूढ झाली.

(३) द्वापारयुगी मिथुनावस्था समाजाला आली. काही काल स्थिर राहणाऱ्या जोडप्यांनी प्रजोत्पादन करण्याची पद्धती उदयास आली. त्रेतायुगात सर्व मुले सर्व समाजाची ऊर्फ सबंध टोळीची समजत. सर्व बाप्ये हे सर्व मुलांचे बाप आणि सर्व स्त्रिया सर्व मुलांच्या आया एवढाच संबंध त्रेतायुगात अस्तित्वात होता. द्वापरयुगात मिथुनावस्था प्रचलित झाल्यावर मुलाचा बाप अमुक व आई अमुक इत्यादी वैशिष्टीकरण आस्ते आस्ते उद्‌भूत झाले. आणि—

(४) कलियुगात द्वंद्वावस्था म्हणजे विवाहसंस्था प्रचलित झाल्यावर पिता, पुत्र, भ्राता, भगिनी, चुलता, मामा, आई, पणजी इत्यादी वर्तमानकालीन नाती क्रमाक्रमाने समाजाच्या अनुभवास येऊ लागली. एकंदरीत भीष्मांनी वर्णिलेल्या निरनिराळ्या युगांतील स्थिती ऐतिहासिक आहे, व इतक्या प्राचीन काली ती इतक्या उत्कृष्ट तऱ्हेने मांडल्याबद्दल त्या थोर बुद्धिमान पुरुषाचे आपण ऋणी आहोत. द्वापरयुगी मिथुनधर्म प्रचलित झाला म्हणून सांगितले. तत्संबंधी तपशीलवार विवेचन पुढील निबंधात करू.

❖

प्रकरण ४ थे

अग्नि व यज्ञ

(१) भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास व पारंपरिक तपशील सांगावयाचा म्हटला म्हणजे अग्नि ह्या पदार्थाचा थोडासा सामाजिक इतिहास सांगावा लागतो. अग्नीला साक्ष ठेवून सध्याचे भारतवर्षीय त्रैवर्णिक हिंदू लोक विवाहसंपादन करतात. अग्नीची साक्ष नसेल, तर तो विवाह धर्म्य समजला जात नाही. येथे असा प्रश्न उद्भवतो की, अग्नीचा व विवाहाचा संबंध काय ? विवाहाग्नी, गृह्याग्नी, आवसथ्याग्नी, औपासनाग्नी इत्यादी शब्दांत विवाह व अग्नी, गृह व अग्नी, उपासना व अग्नी ह्या द्वंद्वाचा नित्य संबंध सांगितलेला आढळतो तो काय म्हणून ? अग्नीने रानटी आर्यांचे असे कोणते कार्य केले होते की जेथे तेथे त्यांनी अग्नीचे आवाहन करावे ? इत्यादी प्रश्नांना उत्तर द्यावयाचे म्हणजे रानटी आर्यांची पुरातन काळी सामाजिक व भौम स्थिती काय होती ते पाहावे लागते.

(२) ऋषींचे अतिप्राचीन पूर्वज वानरीय पाशवावस्थेत असताना, वानरांप्रमाणेच त्यांनाही झाडे, पर्वतांचे कपरे, गुहा वगैरेंच्या आश्रयाने राहून हिंस्र पशूंपासून, वादळां-पासून व थंडीवाऱ्यापासून आपला बचाव मोठ्या संकटाने करावा लागे. अशा दुरवस्थेत पशूंहून व पक्ष्यांहूनही कष्टतर स्थिती पशुतुल्य ऋषिपूर्वजांची असे. जी दुरवस्था गाई, बकरी किंवा हरणे यांची व्याघ्रसिंहादी हिंस्र श्वापदांच्या पुढे होते, त्याहूनही अधम अवस्था पाशवावस्थेतील मनुष्याची असे. हरणे वगैरेंचा बचावकरिता शिंगे, दाढा, टापा वगैरे सहज शस्त्रे तरी असतात, मनुष्यांना तीही नाहीत. फक्त अकलेचे शस्त्र तेवढे मनुष्याजवळ जास्त, तेही बाह्य साधनाभावी प्रसंगी अत्यंत पंगू ठरते. अशा पंगू व दुबळ्या स्थितीत प्राचीन ऋषिपूर्वजांत मृत्युसंख्या किती भयंकर असेल तिची कल्पनाच करावी. अरण्यातील वानरांची वाढ ज्या अल्प प्रमाणावर होत असलेली आपण पाहतो तेच किंवा त्याहूनही अल्पतर प्रमाण पाशवावस्था माणसाच्या लोकसंख्येच्या वाढीचे असे. यूथातील लोकसंख्या जेमतेम आहे तितकी टिकली म्हणजे महद्भाग्य. मनुष्याची

अशी किरकोळ संख्यावृद्धीची किती हजार वर्षे गेली असतील ते सांगवत नाही. कालांतराने हजारो टक्केटोणपे खाऊन व लाखो अवलोकनें करून व करोडा वेळा फसवून मनुष्याच्या, म्हणजे सर्वच मनुष्यांच्या नव्हे तर वैदिक ऋषि ज्यांच्यापासून जन्मले त्या पाशवप्राय ऋषिपूर्वजांच्या, उष्णकाली अरण्यात सहज पेटणाऱ्या दावाग्नीने दग्ध झालेल्या वनस्पतींच्या निखाऱ्यांची धग सहन न होऊन कृमिकीटक व गजव्याघ्र जीव घेऊन पळतात, ही बाब लक्षात आली व तिचा अनुभव घेऊन पाहण्याची कित्येक कल्पक ऋषिपूर्वजांना सुदैवाने बुद्धी झाली. रानातील जळकी कोलिते हत्ती, वाघ, सिंह, हरणे इत्यादींच्या अंगावर फेकिली असता, ती श्वापदे मनुष्याच्या वाऱ्याला उभी रहात नाहीत, हा अनुभव ऋषिपूर्वजांनी प्रथम मिळविला. स्वसंरक्षणार्थ व शत्रुनिर्दालनार्थ कोलितांचा उपयोग करण्याचा शोध लागल्या दिवसापासून, पशुप्राय ऋषिपूर्वजांची उत्तरोत्तर आस्ते आस्ते संस्कृतीत प्रगती होत गेली. दावाग्नीने भडकणाऱ्या रानांचे उल्लेख ऋग्वेदात आढळतात. जाळून पोळून राखरांगोळी करणाऱ्या व मागे सर्व रान काळेकुट्ट करून टाकणाऱ्या अग्नीला कृष्णवर्मा हे उपपद ऋग्वेदात बहुत स्थली दिलेले आहे. कोलितांचा ऊर्फ कुलिशांचा ऊर्फ जळक्या कोळशांचा श्वापदांना भेवडविण्याच्या कामी उपयोग करण्याची क्लृप्ती यद्यपि वनचर ऋषिपूर्वजांना गावली तत्रापि त्या क्लृप्तीचा उपयोग उन्हाळ्यात रानांना वणवा लागेल तेव्हाच तेवढा करता येण्याजोगा असे. आयती कोलिते मिळण्याचे असले सुप्रसंग फारच क्वचित् व फार झाले तर दोन अडीच महिने मिळण्याचा संभव असल्यामुळे वर्षाच्या बाकीच्या दहा महिन्यांत ऋषिपूर्वज इतर पशूंइतकेच दुबळे असत. ह्या दुबळेपणात शेकडो वर्षे काढल्यावर, वणव्याने पेटलेले ओंडके डोंगरातील गुहांतून जळके राखून ठेवण्याची क्लृप्ती सुचली. ह्याच क्लृप्तीला अनुलक्षून ऋग्वेदात गुहाहितः, गुहायां निहितः ही विशेषणे अग्नीला लावलेली आहेत.गुहाहित म्हणजे गुहांत राखून ठेवलेला अग्नी, डोंगरकपारीतील गुहेच्या बाहेर मैदानात किंवा नदीतीरी किंवा इतरत्र हवा तेथे वाटेल तेव्हा वाटेल त्या ऋतूत उपयोगास आणता येत असे. हीही अडचण अकलेच्या जोरावर रानटी ऋषिपूर्वजांनी कालांतराने काढून टाकली. ऋषिपूर्वजांचा अत्यंत पहिला पूर्वज कोणी अंगिरस या नावाचा पुरुष होऊन गेला. त्याने गुहेत जतन करून ठेवलेल्या अग्नीस गुहेच्या बाहेर आणून लोकांत आणून सोडले म्हणून ऋग्वेदात अनेकदा उल्लेख आलेले आहेत. ते ऋग्वेद वाचणाऱ्यात इतके प्रसिद्ध आहेत की, त्यांचे संदर्भ देऊन कालहरण करीत नाही. जेव्हा ऋषिपूर्वज गुहांतून म्हणजे डोंगरातील भुयारातून वसती करून असत व खाली मैदानातून झोपड्या करून राहण्याची कला त्यांच्यात निर्माण झाली नव्हती, तेव्हा सतत उपयोगी पडावा म्हणून ते अग्नीचे रक्षण सहजच गुहातून करीत. पुढे झोपड्यातून राहण्याची कला माहीत झाल्यावर गुहेत अग्नी न ठेविता, ते तो झोपड्यातून ठेवू लागले. ही झोपड्यातून अग्नि ठेवण्याची क्लृप्ती समाजात प्रथम अंगिरसाने काढिली. गुहेत जोपर्यंत अग्नी ठेविला जात असे, तोपर्यंत शत्रूंवर फेकण्यासाठी कोलिते आणण्यास

वारंवार गुहेकडे जावे लागे आणि प्रसंगी गुहेतील अग्नी वेळेवर हाती येण्यापूर्वी हिंस्र पशू व त्याहून हिंस्र असे जे दस्यू ते ऋषिपूर्वजांना इजा करून निघून जात. झोपड्यातून अग्नी ठेवण्याची जेव्हा क्लृप्ती निघाली, तेव्हा शत्रूला वाटेल तेव्हा तोंड देण्याचे सामर्थ्य ऋषिपूर्वजांत आले. ह्यापूर्वी शत्रूंवर अग्नीचा उपयोग इतर श्रेष्ठ लोकांनी केलेला ऋषिपूर्वजांनी पाहिलेला होता. रानटी ऋषींहून जास्त सुधारलेले देव म्हणून कोणी लोक असत. यथा वै मनुष्या एवं देवा अग्र आसन् (तै. सं. का. ७ प्र.–४–अनुवाक २). ते दस्यूंचा पाडाव आग टाकून करीत. अयं अग्निः पृतनाषाट् सुवीरो येन देवासो असहन्त दस्यून् (ऋग्वेद सूक्त २६३ नववी ऋचा). हा अग्नी दस्यूंची सैन्ये मारून काढितो, याच्या साहाय्याने देवांनी दस्यूंचा पुरातन काली पाडाव केला, असे वर्णन वैदिक ऋषींनी केलेले आहे. शत्रूंच्या अंगावर देव आग पाखडीत त्यांना पिटाळून लावीत हे रानटी ऋषिपूर्वज शेकडो वर्षे पाहत होते; परंतु ही आग ते कशी निर्माण करीत व कोठून आणीत ते ऋषिपूर्वजांना कळत नसे. देवांनाही रानटी ऋषिपूर्वजांना अग्नी उत्पन्न करण्याचे गुह्य आपण-होऊन परोपकारबुद्धीने कधी सांगितले नाही, सांगितले असते तर देवांचा श्रेष्ठपणा राहिला नसता. कदाचित् देवांनी मानवांना ते गुह्य सांगण्याचा प्रयत्न केला असता, तरी ते रानटी माणसांना कळले असते की काय याचा संशय आहे. उदाहरणार्थ, सध्याचा गनकॉटन घ्या. सध्याचा युरोपियन माणूस गनकॉटन निर्माण करू शके व त्याच्या जोरावर कमतर सुधारलेल्या लोकांचा पाडाव करतो. अरब, अफगाण, हिंदू, चिनी हे लोक युरोपियन माणसाचा हा प्रभाव पाहतात, परंतु गनकॉटन तयार कसा करावा हे या लोकांना माहीत नसते. यद्यपि परोपकारबुद्धीने युरोपियन माणसाने गनकॉटन कसा तयार करतात याची माहिती रानटी हिंदू, मुसलमान किंवा चिनी माणसाला दिली, तत्रापि हिंदू वगैरे कमतर सुधारलेल्या लोकांना गटकॉटन तयार करता येणे निखालस अशक्य असते; कारण गनकॉटन नावाचा अग्नि निर्माण करण्याला जे शास्त्रीय ज्ञान व शास्त्रीय अवजारे व हत्यारे व औते लागतात त्याचे स्वप्नही हिंदू, अरब, अफगाण वगैरे सध्याच्या रानटी द्विपादांना नसते. अर्थात्, गनकॉटन करण्याचे गुह्य यद्यपि व्याख्यानांनी, पुस्तकांनी किंवा साक्षात् कारखान्यातून पढवून या लोकांना सांगितले तथापि तो स्वदेशात स्वतंत्रपणे तयार करण्याची ऐपत या लोकांना नसते. तोच प्रकार रानटी ऋषिपूर्वजांचा असे. देव शत्रूवर आग पाखडीत व त्यांचा पराभव करीत हे ऋषिपूर्वज पाहत, परंतु ही आग कशी तयार करावी, अग्नी वेळ पडेल तेव्हा कसा उत्पन्न करावा, कोणती इंधने उपयोगात आणावी वगैरे वनस्पतिज्ञान, पुढील तजवीज अगाऊ करून ठेवण्याची नैतिक बुद्धी ज्वालाग्राही इंधनाचा साठा करण्यास लागणारी निवाऱ्याची घरे, वगैरे पूर्वतयारी रानटी ऋषिपूर्वजांजवळ नसल्यामुळे, देवांच्या क्लृप्त्या माणसांना पेलता येण्यासारखा नव्हत्या. पुढे वन्य ऋषिपूर्वज गुहा सोडून झोपड्या करून जेव्हा राहण्याच्या पायरीला आले, जळाऊ इंधने कोणती हे अनुभवजन्य शास्त्रज्ञान

जेव्हा त्यांना त्यांच्या स्वतःच्या मेहनतीने आले, आणि पुढील संकटांना तोंड देण्याकरिता अगाऊ जय्यत तयारी करून असावे लागते, हे नीतिज्ञान जेव्हा त्यांनी संपादन केले, तेव्हा अग्नीचे स्वामित्व ऋषिपूर्वजांना येऊन, त्यांची सुधारणेच्या कामात उत्तरोत्तर प्रगती होत गेली. अगदी प्रथम ऋषिपूर्वज अग्नी कसा तयार करीत त्याचे दिग्दर्शन ऋग्वेदात केलेले सापडते. अग्नी हा दहा बहिणींचा पुत्र होय, अशी कव्योक्ती आहे. दश स्वसारो अग्रुवः समीचीः पुमांसं जातमभि संरभंते (ऋग्वेदसूक्त २६३ ऋचा १३). हाताच्या आंगुळया ह्याच कोणी ज्या दहा बहिणी, त्यांना त्यांच्या स्वतःच्या मेहनतीने जेव्हा पुत्र झाला तेव्हा अत्यानंद झाला. दोन शीघ्र ज्वालाग्राही लाकडाच्या काटक्या घेऊन व त्या दोन्ही हातांच्या बोटांनी खालीवर घासून ऋषिपूर्वज इतर आधुनिक रानटी लोकांप्रमाणे अग्नी उत्पन्न करीत, या क्लृप्तीचे वर्णन वरील ऋचेत आलेले आहे. ह्या ज्वालाग्राही लाकडाच्या काटक्यांचे रानटी ऋषिपूर्वज समिध् ओषधि इत्यादी नावे देत. समिध् म्हणजे चांगली जळणारी काटकी व ओषधि म्हणजे उष्णता धारण करणारी काटकी. दणक ज्वालाग्राही काटक्या एकमेकांवर घासून यद्यपि वाटेल तेव्हा अग्नी निर्माण करता येत असे, तथापि अचानक हिंस्र पशूंचा किंवा दस्यूंचा घाला आला असता, त्याचा उपयोग व्हावयाला विलंब लागे व इजा व्हावयाची ती होऊन जाई. ही अडचण टाळण्याकरिता कित्येक ऋषिपूर्वजांनी झोपड्यांच्या आत किंवा जवळ लहान-मोठ्या खाचा खणून त्यात लाकडाचे ओंडके व झाडांची सबंध खोडे सतत जळत ठेवण्याची युक्ती काढली. या खाचांना ते कुंडे म्हणत, कुंडात धगधगीत निखारे साही ऋतूंत रात्रंदिवस तयार असत. त्यांच्या साह्याने आर्यपूर्वज येईल त्या दस्यूचा किंवा पशूंचा निःपात करीत. येणेप्रमाणे कुंडातील अग्नी हे एक ऋषिपूर्वजांना जवळ अप्रतिहत हत्यार बनून गेले. ह्या हत्याराला ऋषिपूर्वज कधीही व कोठेही विसरत नसत; कारण ह्या हत्यारावर त्यांच्या मालमत्तेच्या व जिवाच्या सुरक्षिततेची सारी मदार अवलंबून असे. भयंकर अशा निबिड महारण्यात जावयाचे असो किंवा विस्तीर्ण नद्या-होड्यातून पार व्हावयाचे असो, ऋषिपूर्वज बरोबर अग्नी घेतल्याशिवाय झोपड्याबाहेर एक पाऊलही टाकीत नसत. अरण्यात एकटे राहण्याचा प्रसंग आल्यास, बरोबरच्या अग्नीने एखादे वाळलेले खोड, किंवा बुंधा पेटवून त्याच्या शेजारी अशन, प्राशन, शयन व आसन ऋषिपूर्वज निर्धास्तपणे करीत आणि सिंह, हत्ती, वाघ किंवा लांडगा हिंस्रबुद्धीने जवळ आल्यास आगीतील कोलिते किंवा जळजळीत निखारे त्यांच्या अंगावर टाकून त्यांना पळवून लावीत किंवा ठारही करीत. अद्यापही हा परिपाठ हिंदुस्थानात जिवंत दृष्टीस पडतो. बैरागी नावाचे जे नाना जातीय तपस्वी हिंदुस्थानात ठिकठिकाणी अरण्यातून व ओसाड प्रदेशातून हंगामी वस्ती करून राहतात, ते उतरण्याची जागा पसंत केल्याबरोबर पहिले काम जे करतात ते अग्न्यावाहनाचे. म्हणजे धुनी पेटवून तीत आपले त्रिशूळ उलटे करून ठेवतात आणि कोणत्याही व कसल्याही श्वापदाची क्षिती बाळगीत

नाहीत; कारण त्रिशूळाच्या लाल इंगळासारख्या टोकांनी धिटाईने जवळ येणाऱ्या व्याघ्रादींना भाजून काढण्याचे सामर्थ्य आपल्याजवळ जय्यत तयार आहे अशी त्यांना खात्री असते. अर्वाचीन बैराग्यांजवळ जसे लोखंडी त्रिशूळ असतात तसे रानटी आर्य पूर्वजांजवळ नसत, कारण खाणीतून लोखंड काढण्याची कला अद्याप त्या वनचरांना अवगत झाली नव्हती. लोखंड व पोलाद माहीत नसल्यामुळे चकमकीचाही शोध अत्यंत प्राथमिक आर्यपूर्वजांना लागला नव्हता. आर्यांच्या सबंध यज्ञप्रक्रियेत म्हणजे यजुसंहितेत चकमकीपासून अग्नी सिद्ध करण्याचे अवाक्षरही नाही. लाकडाच्या अरण्याचा, समिधांचा व शेणकुटाचा उल्लेख वारंवार केलेला आढळतो, परंतु लोखंड व गार यांनी बनलेली जी चकमक तिने अग्नी सिद्ध करण्याचा उपदेश कोठेही केलेला नाही. याचा अर्थ इतकाच की आर्य वनचर अद्याप लोहयुगात येण्यास बराच अवकाश होता, फक्त ज्वालाग्राही लाकडे घर्षणाने पेटवून अग्नी सिद्ध करण्याची कला त्यांना नुकती कोठे सापडली. या युगाला दारुयुग म्हटले असता वावगे होणार नाही. चुडा व उल्का पेटवून रात्री उजेड करण्याचेही ह्या काली त्यांना ज्ञान झाले होते. उल्का ऊर्फ चुडांच्या उजेडाने शत्रूंनी गुहांतून लपवून ठेविलेल्या गाई शोधून काढिल्याचे उल्लेख ऋग्वेदात येतात.

(१) तवूंष्यग्ने जुह्वा पतंगानसंदितो विसृज विष्वगुल्काः (ऋग्वेद ३००-२).

(२) अस्माकमत्र पितरो मनुष्या अभि प्रसेदुर्ऋतमाशुषाणाः ।
अश्मव्रजाः सुदुघा वव्रे अंत रुदुस्रा आजन्नुषसो हुवानाः ॥ १३ ॥

(३) ते मर्मृजत ददृवांसो अद्रिं तदेषामन्ये अभितो विवोचन् ।
पश्वयंत्रासो अभि कारमर्चन् विदंत ज्योति श्चकृपंत धीभिः ॥ १४ ॥

(ऋग्वेद सूक्त २९७)

ह्या तीन ऋचातील (१) उल्का, (२) अश्मव्रजाः व (३) विदंत ज्योतिः ही तीन शब्दस्थाने प्रकृतार्थाला उपयुक्त आहेत. पणि नावाच्या शत्रूंनी अंगिरसाच्या अश्मव्रज गाई चोरून नेऊन डोंगराच्या गह्वरात दडवून ठेविल्या. त्या गाईंना अग्नीच्या ज्योतीच्या उजेडाने अंगिरसांनी शोधून काढिले, असा दुसऱ्या व तिसऱ्या ऋचात मजकूर सांगितला आहे. अग्निं अर्चयन्तः ज्योतिः अविदन् म्हणजे अग्नीची सिद्धता करून अंगिरसांनी ज्योत तयार केली, आणि अंधारातील गाई त्या ज्योतीच्या उजेडाने शोधून काढिल्या. येथे ज्योत म्हणजे चूड, चुडेचा उजेड असा अर्थ घेणे युक्त दिसते. पहिल्या ऋचेत उल्का म्हणजे चूड, कोलीत हा शब्द तर साक्षात् आलेला आहे. तात्पर्य, चूड पेटवून उजेड पाडण्याची कला ऋषिपूर्वजांना माहीत झालेली होती. तसेच मोठमोठ्या दगडांची आवारे करून त्यांत गाई वगैरे मालमत्ता ठेविण्याचाही प्रघात ऋषिपूर्वजांत असे. वरील ऋचांत अश्मव्रजाः हे उस्रांचे म्हणजे गाईचे विशेषण आहे. व्रज म्हणजे गोठा, अश्मव्रज म्हणजे दगडांचा गोठा. मोठमोठे हत्तीसारखे दगड सभोवार रांगेने रचून ऋषिपूर्वज गाईंना

निवाऱ्याची जागा तयार करीत. त्या जागांना ऊर्फ गोठ्यांना ते अश्मव्रज म्हणत. अश्मव्रजा म्हणजे इतर देशांत स्टोनहेंज म्हणून ज्यांना म्हणतात ते. येणेप्रमाणे झोपड्या, अश्मव्रज, अग्नी व गाई ह्या चार वस्तू तत्कालीन ऋषिपूर्वजांच्या संस्कृतीची मुख्य चिन्हे असत. अग्नी पाहेल त्या वेळेस मिळावा म्हणून कुंडातून सतत धुमत ठेविलेला असे. अग्नि-कुंडाच्या भोवतालील जागा गाईच्या शेणाने सारवून बसण्याउठण्यास सोईस्कर अशा केलेल्या असत. दिवसा उपजीविकेची कामेधामे करून रात्री ह्या अग्निकुंडाच्या भोवती ऋषिपूर्वज उबाऱ्याला बसत आणि शिळोप्याच्या करमणुकी करत किंवा मद्यमासांची सिद्धता करीत. सोमवल्लीची दारू व गाईबैलांचे किंवा इतर श्वापदांचे मांस ह्या अग्नि-कुंडाच्या सान्निध्याने व साहाय्याने निष्पन्न करीत. नंतर मद्यमांसावर यथेच्छ हात मारून, निरनिराळ्या छंदांतळी गाणी म्हणून ते एकमेकांना रिझवीत किंवा आपल्या इष्ट देवतेची करुणा भाकीत. ह्या काली ऋषिपूर्वजांचा मोठा आवडता देव म्हटला म्हणजे महदुपयोगी जो अग्नी तो असे. अग्नीच्या साह्याने उघड्या मैदानात झोपड्या करून सुखाने राहता येऊ लागले, अग्नीच्या साह्याने सुग्रास पाकनिष्पत्ती करिता येऊ लागली. अग्नीच्या साह्याने हिंस्र पशू व दुष्ट शत्रू यांचा प्रतिकार करता येऊ लागला, अग्नीच्या योगाने दाट जंगलाची चरती कुरणे करता आली, सबब अग्नी ह्या अजब व अतर्क्य वस्तूवर आर्यपूर्वजांचे निरतिशय प्रेम ऊर्फ भक्ती बसली आणि अग्नी हा सुखकर्ता, दुःख-हर्ता व विघ्ननिवारिता असा भासू लागला. अग्नी या सर्वतोपरी अत्यंत उपयुक्त वस्तूवर आर्यपूर्वजांची इतकी भक्ती बसली की खाणे, खेळणे, बसणे, उठणे, निजणे व प्रजोत्पादन करणे ते सर्व अग्नीच्या साक्षीने ते करू लागले. हे शेवटले व अत्यंत महत्त्वाचे जे प्रजोपादनाचे कर्म ते अग्निकुंडाभोवताली उबाऱ्याच्या भूमीवर आर्यपूर्वज उरकीत, हे विधान अत्यंत महत्त्वाचे आहे; कारण, यज्ञ म्हणून जी संस्था आर्यपूर्वजांत पुढे उदयास आली तिचा उगम अग्नीकुंडाभोवती प्रजोत्पादनाचे जे कार्य चाले त्याच्याशी संबद्ध आहे. अग्नीपाशी ऋषिपूर्वज वारंवार आग्रहाने काय मागतात ते ऋग्वेदाच्या पाचव्या व सहाव्या मंडळातील चाळता चाळता सहज आढळणाऱ्या काही वाक्यांचे अवतरण करून दाखवितो.

(१) स्यान्नः सू नु स्तनयो विजावा
(२) शग्धि वाजस्य सुभग प्रजावतः
(३) अयं अग्निः सुवीर्यं स्येशे
(३) अग्ने तोकं तनयं वाजि नो दाः
(५) गो माँ अग्ने ऽ विमाँ अश्वी यज्ञो
नृवत्सखा सदमिदप्रमृष्यः
इळावाँ इषो असुर प्रजावान् ।
दीर्घो रयिः पृथुबुध्नः सभावान् ॥
(६) त्वदेति द्रविणं वीरपेशाः ।

ह्या सहाही वाक्यांत अग्नीने उपासकांस प्रजा द्यावी, पुत्र द्यावे, वीरसंतती द्यावी, अशी प्रार्थना केली आहे. पाचव्या वाक्यात तर आमचा हा यज्ञ प्रज्ञावान् होवो, अशी उत्कंठा दर्शविली आहे. प्रजा किंवा पुत्र दोन प्रकारचे असत. (१) पुंस्पुत्र व (२) स्त्रीपुत्र. पुत्र ह्या पुल्लिंगी शब्दाने मुली व मुलगे ह्या दोन्हींचा बोध ऋषिपूर्वजांच्या भाषेत होई. अग्नी प्रजा कशी देई, व यज्ञ पुत्रवान् व प्रजावान् कसा होई ही पृच्छा तृप्त व्हावयाची म्हणजे ऋषिपूर्वजांच्या समाजात पुरातनकाली जी एक चाल प्रचलित असे तिचे वर्णन करणे जरूर आहे. ऋषिपूर्वज थंड हवेच्या प्रदेशात राहत असत. दिवसा श्रमसाहस व स्वारी-शिकार केल्यावर उबाऱ्याकरिता धगधगीत धुमीच्याभोवती येऊन बसत आणि तेथे ते पाशवावस्थ स्त्रीपुरुष ऋषिपूर्वज यभनक्रिया करीत. धुमीभोवती ऊर्फ अग्निकुंडाभोवती अतिप्राचीन आर्य स्त्रीपुरुष यभनक्रिया करीत. या विधानाला पोषक असे कृष्णयजुर्वेदातील व शुक्लयजुर्वेदातील साक्षात् काही मंत्र देतो व काही मंत्राचे तात्पर्य देतो. यजुर्वेदातीलच मंत्रावतरण करण्याचे कारण असे की ह्या वेदाचा मुख्य विषय त्याच्या नावाप्रमाणे यजुस् म्हणजे यज्ञ हा आहे. यजुर्वेदात अग्नी चेतवून यज्ञ कसे करावे, कां करावे व यज्ञांची फलनिष्पत्ती काय, ह्या तीन बाबींचे ख्यापन केलेले आहे, व प्राधान्येकरून अग्नीचे स्तोम गायिलेले आहे.

(३) ऋषींच्या अंगिरस नावाच्या प्राचीन पूर्वजाने गुहेतून अग्नी मैदानातील झोपड्यात आणिला इत्यादी वर्णन मागील कलमात केले आहे. झोपड्यात अग्नी आल्यापासून ते जीवनयात्रेची साधने वृद्धिंगत होऊन सहजच पूर्वी जितकी होणे मुष्कील होते, तीहून जास्त प्रजावृद्धी होऊ लागली, यामुळे अंगिरसाला प्रजापति हे अभिधान सार्थ मिळाले. अग्निसिद्धीचा शोध व प्रजापतिसंस्था स्थापन ही दोन्ही समकालीन झाली. झोपड्यांत अग्नी सिद्ध करता येऊ लागल्यानंतर थोड्या अवधीने प्रजापतिसंस्था स्थापन झाली, अनेक स्त्रिया व एक प्रजापती असा तत्कालीन समाज असे. स्त्रियांच्या पोटी झालेल्या सर्व प्रजेचा मालक यूथाचा वृषभ म्हणजे रेतःसिंचन करणारा जो प्रजापती तो असे. अनेक प्रजापती ऋषिपूर्वजांच्या समाजात निर्माण झाले. प्रजापती यूथातील स्त्रियांशी समागम अग्निकुंडाच्या समीप करी. त्या काली गाद्यागिर्द्या वगैरे संपन्न साधने आंथरा-पांघरावयास नसत. रानटी आर्यपूर्वज बर्हि नावाचे तृण अग्निकुंडाभोवती पसरून त्याच्या-वर शयन व अभिमैथन करीत. तैत्तिरीयसंहितेच्या प्रथम कांडाच्या सातव्या प्रपाठकाच्या चौथ्या अनुवादात खालील वाक्य आले आहे : " बर्हिषा वै प्रजापतिः प्रजा असृजत। " या वाक्याचा खरा वाच्यार्थ असा आहे की, बर्हिस नामक गवत आंथरून त्याजवर प्रजापतीने प्रजा उत्पन्न केल्या. रानटी ऋषिपूर्वज बर्हीचा बिछाना करीत, सबब प्राचीन रूढी म्हणून ती पूज्य होऊन बसली व तिचे वर्णन यजुर्वेदकालीन यज्ञकर्ते ऋषी पूज्य-भावाने करू लागले. बर्हीच्या देवयज्येने प्रजापती प्रजावान् झाला, या विधानाचा अर्थ यजुर्वेदकालीन ऋषींना समजेनासा झालेला होता. काही अतर्क्य दैवी रीतीने बर्हि घेऊन

प्रजापती प्रजा उत्पादन करीत, असा अर्थ यजुर्वेदकालीन ऋषी समजत, परंतु खरा अर्थ आम्ही वर जो सांगितला तो आहे. बर्हि आंथरून रानटी ऋषीपूर्वज त्यांचा बिछान्यावजा उपयोग करीत. उत्तानार्थ हाच आहे. याला याच अनुवाकात एक प्रमाण आहे. या अनुवाकात पुढे खालील वाक्य आले आहे. सोमस्याहं देवयज्यया सुरेता रेतो धिषीय इत्याह सोमो वै रेतोधाः तेनैव रेत आत्मन्धत्ते। सोमाच्या देवयज्येने प्रभूतरेतस् होऊन रेत धारण करीन असे यजमान म्हणतो, कां की सोम रेत उत्पन्न करणारा आहे. त्या सोमरसाने यजमानाच्या ठायी रेत साठते. येथे उत्तानार्थ असा आहे की सोमनामक मादक रस प्राशन केला असता माद येऊन रतिक्रिया मनसोक्त होत असे. सबब प्राचीन ऋषिपूर्वज तो सोमरस यथेच्छ पीत व त्याच्या अमलात मनमुराद निर्भयपणे स्त्रीसमागम करीत. सोमरसाचा हा जो माद आणून यथेच्छ रतिकर्म संपादण्यास समर्थ करण्याचा गुण सोम या देवतेचा आहे असा यजुर्वेदकालीन ऋषींचा समज होता. असाच समज बर्हीसंबंधाने त्या ऋषींचा होता. रानटी ऋषिपूर्वज आगटी व धुमी पेटविताना पेटविल्यावर काटक्या, समिधा, डावल्या, गवत, मद्य इत्यादी ज्या ज्या साधनांचा उपयोग करीत, ती ती सर्व साधने त्या रानटी ऋषीचे वंशज जे ऋक्कालीन व यजुकालीन ऋषी त्यांना देवतारूप वाटत. रानटी साधनांच्या साहाय्याने रानटी पूर्वजांनी घरे, दारे, संपत्ती, गाई, गुरे व विशेषतः प्रजा संपादन केल्या. त्या रानटी साधनांचा रानटी पूर्वज जो सहज उपयोग करीत त्या उपयोगाची नक्कल यज्ञ करणारे यजुःकालीन ऋषी हुबेहूब उठवून देत, आणि ती नक्कल बिनचूक केली म्हणजे फलप्राप्ती हटकून होईल अशी आशा बाळगीत. रानटी पूर्वज लाकडांवर लाकडे घासून अग्नी उत्पादन करीत म्हणून त्या रानटी पूर्वजांचे सुधारलेले वंशजही लाकडावर लाकडे घासून यज्ञार्थ अग्नी संपादन करण्याची नक्कल उठवून देत. सुधारलेल्या वेदरचनाकालीन ऋषींना गोवऱ्या, चकमकी इत्यादी साधने उपलब्ध असत, परंतु त्या नव्या साधनांनी अग्नी भरदिशी न निष्पादिता, ते भोळ्या श्रद्धेने पूर्वजांनी ज्याप्रमाणे लाकडे घासून अग्नी सिद्ध केला त्याप्रमाणे अग्नी सिद्ध करीत. हेतु असा की, पूर्वजांना जी फलप्राप्ती ज्या प्रक्रियेने झाली ती फलप्राप्ती त्या प्रक्रियेवाचून होणार नाही. येथून तेथून सर्व यजुःसंहिता रानटी पूर्वजांच्या कृतीची नक्कल कशी करावी या एका बाबीने भरली आहे. अमुक कार्य करताना किंवा अमुक सामग्री मिळविताना पूर्वजांनी जागती किंवा शक्करी छंद म्हटला, सबब ते कार्य किंवा ती सामग्री मिळविण्याची कामना असल्यास जागती किंवा शक्वरी छंदच म्हटला पाहिजे, नाहीतर कार्य बिघडेल, असे इशारे यजुःसंहितेत जागजागी दिलेले आहेत. तात्पर्य, रानटी पूर्वजांची नक्कल अणुरेणूचीही चूक न होता उठली तरच इष्टकामना परिपूर्ण होईल अशी यजुःकालीन याजकाची समजूत असे. प्रस्तुत कलमातील विवेचन रानटी पूर्वजांच्या प्रजोत्पादनासंबंधाचे आहे, करिता रानटी पूर्वजांच्या प्रजोत्पादनक्रियेची नक्कल यजुःकालीन ऋषी कशी हुबेहूब करीत त्याचा एक मासला देतो. प्रथमा-

रंभी रानटी ऋषिपूर्वज बहुतेक पशूंसारखे उघडे नागडे असत, पशुपक्षी ज्याप्रमाणे रतिकर्म उघड्यात किंवा झाडाझुडपांवर उरकतात त्याप्रमाणे हे पाशवावस्थ ऋषिपूर्वजही रतिकर्म उघड्यात किंवा झाडाझुडपांवर उरकीत. लिंगाला किंवा योनीला हात लावणे, अभद्र शब्द उच्चारणे इत्यादी अर्वाचीन दृष्टीला दिसणारे गलिच्छ प्रकार ह्या पशुतुल्य लोकांत असत. नंतर सुधारणा होऊन लोकांना अग्नी तयार करता येऊ लागला, तेव्हा अग्नीभोवती हे रानटी लोक रतिकर्म संपादित. वाटेल त्या स्त्रीला वाटेल त्या पुरुषाने रत्यर्थ धरून न्यावे हा त्या काली धर्म समजला जात असे. ज्या स्त्रीला कोणी धरून न नेई ती स्त्री हिरमुसली होई व रडे की आपणास कोणी धरून नेत नाही किंवा रतिसुख देत नाही. अशा स्त्रीस पश्वादीशी अभिगमन करण्याची मोकळीक असे. अशी ही स्त्रीपुरुषसमागमाची पद्धती रानटी ऋषिपूर्वजांत असे. ह्या पद्धतीची नक्कल रानटी ऋषींचे सुधारलेले यजुःकालीन वंशज येणेप्रमाणे करीत. अश्वमेध नावाचा एक यज्ञ असे. या यज्ञाची प्रक्रिया, फलश्रुती व दंतकथा यजुःसंहितेत दिल्या आहेत. पैकी सातव्या कांडाच्या चौथ्या प्रपाठकाच्या एकोणिसाव्या अनुवाकात राजपत्न्यांचा विलाप दिला आहे. शुक्लयजुःसंहितेत हाच विलाप तेविसाव्या अध्यायात दिला आहे. ह्या अनुवाकाला भाष्यकार विलाप म्हणतो, परंतु याला विलास हे नाव उत्तम शोभेल. ह्या विलासात्मक प्रकरणाचे कृष्ण व शुक्ल संहितांत कित्येक पाठ इतके भिन्न आहेत की त्यावरून एक निश्चित अनुमान करता येते, ते असे :–दोन्ही संहिता जेव्हा रचिल्या गेल्या तेव्हा खरे मूळ पाठ कोणते ते संहिताकारांनाही निश्चयात्मक माहीत नव्हते. उदाहरणार्थ, कृष्णयजुःसंहिताकार गृह असा पाठ देतो व शुक्लयजुःसंहिताकार गुद असा पाठ देतो. प्राचीन रानटी ऋषिपूर्वजांचा खरा मूळ पाठ काय होता तो दोन्ही संहिताकारांना माहीत नव्हता. निजल्गुलिति व निगल्गलीति, प्रसुलामि व प्रतिलामि इत्यादी पाठांतरांनाही हाच न्याय लागू आहे. तात्पर्य; ह्या प्रकरणात पूर्वपरंपरागत जी वाक्ये दिली आहेत ती अगदी अपभ्रष्ट होऊन गेलेली आहेत. यावरून असे अनुमान बांधता येते की, यजुःसंहितेचे कृष्ण व शुक्ल असे पाठ जेव्हा रचिले गेले तेव्हा ही पूर्वपरंपरागत वाक्ये इतकी जुनाट व भ्रष्ट होऊन गेली होती की संहिताकारांना खरे पाठ कोणते ते ठरविता येईना. सबब जसे लोकांच्या तोंडून त्यांनी पाठ ऐकिले तसेच्या तसेच भ्रष्ट व अर्थहीन पाठ देणे त्यांना भाग पडले. उवट व सायण यांना तर ह्या प्रकरणातील बरेच शब्द व वाक्ये कळली नाहीत. इतकेच नव्हे तर प्राचीन समाजाच्या चालीरीतींचे ज्ञान नसल्यामुळे वाक्याचे भलतेच अर्थ त्यांनी लिहून ठेविले आहेत. उदाहरणार्थ, माता च ते पिता च ते अग्रं वृक्षस्य रोहतः या वाक्यातील वृक्ष या शब्दाचा अर्थ उवट मंचक असा करतो व सायण तल्प असा करतो. उवटकाळी व सायणकाळी स्त्रीपुरुषसमागम मंचकावर किंवा तल्पावर होत असे, सबब वृक्ष म्हणजे मंचक किंवा तल्प असा अर्थ त्यांनी केला ते रास्तच आहे. पाशवावस्थेतील वनचर मनुष्य वानरादी इतर पशुपक्ष्यांप्रमाणे प्रशस्त वृक्षांच्या शाखावर समागम करीत ही कल्पना

जर त्यांना अवगत असती, तर त्यांनी वृक्ष या शब्दाचा वाच्यार्थच घेतला असता, यात संशय नाही. असो. प्रकृत स्थल शब्दविषयक किंवा वाक्यविषयक विवेचन करण्याचे नव्हे. शब्द वाक्यविषयक जी थोडीशी टीका येथे केली ती एवढ्याच करिता की, शुक्ल व कृष्ण यजुःसंहितांच्या या प्रकारणांतील चालीरीती अत्यंत प्राचीनतम आहेत हे उत्कट-त्वाने भासमान व्हावे. या प्राचीनतम चालीरीतींची नक्कल अश्वमेध यज्ञात यजुःसंहिता-रचनाकालीन व तदुत्तरकालीन याजक व यजमान संभावितपणे करीत असत व त्या अश्लील नकलेला कोणी नावे ठेवीत नसत. नक्कल जशीची तशी वठली पाहिजे नाही तर इष्टफलप्राप्ती चुकेल, असा सर्व समाजाचा समज असे. आता नकलेचा तपशील दोन्ही संहितात जसा दिला आहे तसाचा तसाच इथे मराठीत पूर्वापरसंबंध दाखविणारी वाक्ये घालून नमूद करतो. प्रथम कृष्णयजुःसंहितेतील पाठ घेतो.

(४) साम्राज्य, राष्ट्र, संपत्ती व वीर्यशाली प्रजा प्राप्त व्हावी एतदर्थ अश्वमेध यज्ञ करण्याचा प्रघात असे. यज्ञात स्त्रीपुरुष असा सर्व प्रकारचा समाज जमे. अध्वर्यु, उद्गातृ, होता असे ऋत्विज पुरुष असत व महिषी, यजमान-पत्नी इत्यादी स्त्रिया असत. पैकी वीर्यशाली प्रजा उत्पन्न व्हावी या कामनेच्या सिद्धयर्थ खालील नाटक केले जात असे. अश्वमेधातील घोडा मृत होऊन पडल्यावर तेथे राजपत्न्यांना बोलावून आणीत. राजपत्न्यां-पैकी मुख्य जी पट्टराणी ती आपल्या आईला किंवा सपत्न्यांना उद्देशून म्हणे की, बायांनो, हा मेला घोडाच माझ्याशी निजेल; कारण, मला अभिगमनार्थ दुसरा कोणीच की गे नेत नाही. पट्टराणीची ही तक्रार ऐकून, घोडा खडबडून जागा होतो व पट्टराणीला म्हणतो, ये, येथे हे क्षौमवस्त्र म्हणजे सोवळ्याचे वस्त्र अंगावर घेऊन आपण निजू. त्याला रुकार देऊन पट्टराणी म्हणते, मी तुजपाशी गर्भधारणार्थ आले, तूही मजकडे गर्भ पेरण्यास ये, आपण पाय पसरून निजू. घोडा आणि पट्टराणी ही एकमेकांशेजारी पडल्यावर प्रतिप्रस्थाता म्हणतो की, हा घोडा रेतःसिंचन करो व तुझी योनी रेतोधारण करो. असा मंत्र म्हणून, ऋत्विज घोड्याचे लिंग राणीच्या योनीजवळ आणी, आणि म्हणे की, मांडीवर मांडी ठेव, आणि लिंग योनीत घाल. स्त्रियांना लिंग जीव की प्राण आहे. लिंग भोकाला झवते, ते स्त्रियांना प्रिय असते; कारण ते योनी कुटते, आणि स्त्रियांच्या काळ्या भोकातील दाण्याला हाणते. हे नाटक झाल्यावर राणी म्हणते, बायांनो, मला कोणीच झवत नाही, सबब हा घोडा मजपाशी निजतो. त्यावर इतर स्त्रिया म्हणतात, रानात फाट्यांचा भारा उचलताना ढुंगण जसे पुढे करतात तशी तू आपली योनी पुढे उचल व तिचा मधला भाग वाढव. हे सर्व पट्टराणीने केले, तेव्हा घोडा निजला. मग, राणी इतर बायांना पुनः म्हणाली, बायांनो! मला कोणीच झवत नाही, सबब घोड्याजवळ मी निजल्ये. त्यावर एका बाईने खालील टीका केली : हरणी रोजचे रानातले गवत टाकून शेतातले चोरून जव खाते, परंतु त्याने तिचे पोट भरलेले तिला वाटत नाही. शूद्र स्त्री वैश्याशी चोरून रमते, परंतु त्या रमण्याने तिचे समाधान होत नाही.

ह्या टीकेला राणी उत्तर देते की, घोडा माझ्याशी संग करतो, त्याचे कारण एवढे की, दुसरा कोणीच मला झवत नाही. त्यावर दुसरी एक स्त्री टीका करते की तुझी ही योनी एखाद्या पाखरिणीसारखी हुळहुळून हलते आहे, तिच्यात रेत पडले आहे व ती गुलगुल वाजत आहे, मग तक्रारीला जागा कोठे राहिली ? ह्याही टीकेला राणी उत्तर करते की, तक्रार करू नको तर काय करू ? मला कोणीच पुरुष झवत नाही. सबब मी घोड्यापाशी जात्ये. यावर तिसरी एक म्हणते, तुला घोडा सापडला हे नशीबच समज. तुझ्या आईला तोही लाभला नाही. तुझी आई व तुझा बाप झाडावर चढत आणि नंतर तुझा बाप, योनी सोलून काढितो म्हणून, तुझ्या आईच्या योनीत आपल्या हाताची मूठच ठाशी, त्याहून घोडा बरा नव्हे ? तैत्तिरीय संहितेतील मंत्रांचा तपशील हा असा आहे. सायणाला ह्या मंत्राचा अर्थ व पूर्वापारसंबंध व शब्द बिलकुल काहीच कळले नव्हते.

५. कृष्णयजुर्वेदसंहितेतील नाटकाचा तपशील हा असा आहे. आता शुक्लयजुःसंहितेतील ह्याच नाटकाचा तपशील देतो. संज्ञापित घोड्यापाशी सर्व राजपत्न्या आल्यानंतर एकमेकींना म्हणतात की, बाई गे, मला कोणीच की गे धरून नेत नाही. हा घोडा देखील माझ्याशी न निजता कांपील नगरातील त्या सुभद्रीटलीशी रममाण झाला आहे. इतके म्हणून सर्व राजपत्न्या घोड्याचे येणेप्रमाणे आवाहन करतात : तू स्त्रीगणांचा पती आहेस. तू प्रियकरांतला प्रियकर आहेस, तू सुखनिधी आहेस, तेव्हा हे माझ्या वसो, मी तुझ्यापाशी येऊन गर्भ धारण करते. तू मजपाशी येऊन गर्भ घाल. आपण दोघेजण चारी पाय पसरून व पांघरूण घेऊन, या स्वर्गासारख्या सुखकर स्थली निजू. तू रेतःसंपन्न आहेस, तू माझ्या ठायी रेत घाल. राजपत्न्यांनी घोड्याची ही अशी प्रार्थना केल्यावर पत्न्यांचा पती जो राजा तो स्वतः घोड्याला कानगोष्ट सांगतो की, ह्या माझ्या पट्टराणीच्या मांड्या वर उचलून त्यांच्यावर तू आपल्या मांड्याच्या पाठीमागील भाग ठेव आणि हिच्या योनीत आपले शिश्न ढकल, कारण शिश्नावर स्त्रियांचा सर्व जीव व भोग अवलंबून असतो. यजमान जो राजा त्याचे स्वतःचे हे भाषण झाल्यावर यज्ञाचा मुख्य ऋत्विज जो अध्वर्यु तो राजपत्न्यांपैकी कुमारी म्हणून जी पत्नी तिच्या योनीकडे बोट करून म्हणतो, चांगले आहळ, चांगले आहळ, म्हणून ही तुझी योनी वसवसती आहे. सबब लिंग तुझ्या भोकात हाणतो म्हणजे तुझी योनी रेताने भरून जाऊन गलगल शब्द करील. अध्वर्यूच्या ह्या वक्तृत्वाला उत्तर म्हणून कुमारी म्हणते, आहळ, आहळ, म्हणून हे तुझे लिंग हलते आहे, ते तुझे सच्छिद्र लिंग तुझ्या तोंडासारखे दिसत आहे, सबब फार तोंड करू नकोस. अध्वर्यु व कुमारी यांचे हे संभाषण झाल्यावर ब्रह्मा नामक याजक राजमहिषीला म्हणतो, तुझे आईबाप झाडावर चढत आणि मग तुझा बाप तुझ्या आईला म्हणे की, तुझी योनी मारून टाकतो आणि नंतर तिच्या योनीत आपले लिंग ठाशी. यावर महिषी ब्रह्माला म्हणते, तुझी आईबापे झाडावर चढूनच क्रीडा करीत. तेव्हा फार तोंड वासू नकोस, गप्प बैस. ब्रह्मा व महिषी यांच्यानंतर उदात्त नामक ऋत्विज

व वावाता नामक राजपत्नी यांची सोंगे यज्ञभूमीवर येतात. यज्ञभूमीवर एक जवान होता. त्याला उद्गाता सांगतो की, ह्या वावातेला दगडावर टेकून जशी मोळी उचलतात तशी उचल म्हणजे हिची योनी वाऱ्यात धान्य पाखडताना जशी सुपली पुढे येते, तशी पुढे येईल. यावर यज्ञभूमीवर एक स्त्री उभी होती, तिला वावाता म्हणाली, या उद्गात्याला दगडावर टेकून जशी मोळी उचलतात तसा उचल म्हणजे याचे लिंग वाऱ्यात धान्य पाखडताना सूप जसे वर उचलले जाते तसे वर उचलेल. नंतर चौथा जोडा होता नामक ऋत्विज व परिवृक्ता नामक राजपत्नी यांचा रंगभूमीवर येतो. होता म्हणतो, हिच्या आखूड योनीत ठोले लिंग जेव्हा हा मनुष्य ठासतो, तेव्हा गाईच्या पावलांभर पाण्यातील जशी माश्यांची जोडी न बुडता बाहेर राहते तशी याच्या अंडांची जोडी हिच्या योनी-बाहेर लोंबकळत रहाते. याला उत्तर म्हणून परिवृक्ता म्हणते, अहो तुम्ही शहाणे लिंग-पूजक हो! तुम्ही जेव्हा योनीत बुळबुळीत लिंग सारता, तेव्हा खरेच तुम्हाला सांगते की, तुमच्या मांड्याखालून योनी लिकलिकते. पाचवी जोडी क्षत्ता व पालागली यांची. क्षत्ता पालागलीला म्हणतो, हरीण रानातले गवत टाकून शेतातले जव जेव्हा चोरून खाते तेव्हा त्याला पोट भरलेसे वाटत नाही. शूद्रीण जेव्हा वैश्याशी चोरून रत होते तेव्हा तिचे समाधान होत नाही. पालागली क्षत्त्याला उत्तर करते, खरेच आहे. हरीण चोरून जव खाते तेव्हा त्याला पोट भरलेले वाटत नाही. शूद्र पुरुष वैश्य स्त्रीशी जेव्हा रममाण होतो तेव्हा त्याची तरी तृप्ती कोठे होते ?

(६) असे हे एकंदर नाटक व नक्कल आहे. ही नक्कल क्षुद्र व बीभत्स आहे हे अश्वमेध करणारे राजे व ऋत्विज जाणीत. दधिक्राव्णो अकारिषम् या मंत्रात आपण केले ते नाटक बीभत्स होते असे ते स्पष्टच कबूल करतात. परंतु हा बीभत्सपणा पूर्वपरंपरेला अनुसरून करणे अवश्य असल्यामुळे यज्ञपुरुष आपले बरेच करील, वाईट करणार नाही, अशी त्यांची खात्री होती. बीभत्स भाषणे केल्याबद्दल यज्ञ याजकाचा काय फायदा करीत असेल तो असो, समाजशास्त्रज्ञांचा मात्र या बीभत्स नाटकापासून एक निश्चित फायदा होतो. त्यांना वैदिक ऋषींच्या रानटी पूर्वजांच्या चालीरीतींचे ज्ञान होते व ही बीभत्स भाषणे नमूद करून ठेवल्याबद्दल संहिताकाराचे ते ऋणी बनतात. यज्ञभूमीवर मैथुनविषयक बीभत्स नाटक पूर्वजापासून चालत आलेली परंपरा म्हणून वैदिक ब्राह्मण, क्षत्रिय करीत, नित्यव्यवहारातील परिपाठ म्हणून करीत नसत. वेदकालांत राजे व ब्राह्मण संभावित शिष्ट असत व असभ्य भाषा वापरण्याला भीत असत, परंतु यज्ञ प्रकरणात धार्मिक परंपरा म्हणून बीभत्स शब्द, हावभाव व वागणूक करणे त्यांना श्रेयस्कर व इष्ट वाटत असे. परंपरा म्हणून समाजात हे असले प्रकार अवशिष्ट राहतात व खपतात. उदाहरणार्थ, विवाहसमयी नवऱ्या मुलाच्या अंगावर पायतणे फेकण्याची कित्येक युरोपियनांची चाल, किंवा होळीत अचकट विचकट शब्द उच्चारण्याची ब्राह्मणादी हिंदूंतील चाल, किंवा लगतच्या दोन गावातील मुलींनी गावशिवेवर जाऊन एकमेकींचे बापजादे व आया

माया उद्धरण्याची गावंढ्याची चाल. ह्या चाली परंपरा म्हणून चालत आलेल्या आहेत व समाजाला खपतात इतकेच. या चाली काय दाखवितात? पुरातन युरोपियनांच्या एका टोळीतील पुरुष दुसऱ्या टोळीतील स्त्रीला बळजबरीने पळवून नेत असता, हिचे भाऊबंद त्या धर्षक पुरुषाला बडवीत, असे अनुमान पहिल्या चालीवरून आपण काढितो. होलाका म्हणून एक संस्था रानटी ऋषिपूर्वजांत असे. त्या संस्थेत ते रानटी पुरुष लिंग व योनी यांना अनुलक्षून टोळीतील सर्व स्त्रीपुरुषांची व्यंगे उघड स्पष्टपणे पुकारीत हे अनुमान दुसऱ्या चालीवरून निघते. कुणबी वगैरे गावंढ्यांच्या पूर्वजात तरुण कुमारिका एकमेकींच्या उखाळ्यापाखाळ्या काढून अभद्र भाषण करीत, असे अनुमान तिसऱ्या चालीपासून उद्‌भवते. हाच न्याय शिष्ट व संभावित अशा वैदिक ब्राह्मण-क्षत्रियाच्या रानटी पूर्वजांना लावावयाचा आहे. रानटी ऋषिपूर्वज यज्ञभूमीवर म्हणजे अग्निकुंडाभोवती म्हणजे धगधगीत धुमीच्याभोवती उबाऱ्याला जमत, लिंग व योनी यांचे वाचक शब्द एकमेकांना उद्देशून हरहमेश बोलत आणि नाकाडोळ्यांप्रमाणेच हे दोन्ही अवयव त्या रानटी लोकात उघडे असल्याने तत्संबंधाने गुह्य व गुह्योत्पन्न लज्जा उत्पन्न झालेल्या नसल्यामुळे या अवयवांचे वाचक शब्द उच्चारण्यात कोणताच विपरीतपणा नाही असे समजून आपण सध्याचे लोक ज्यांना अश्लील म्हणतो ते शब्द सहजासहजी उच्चारीत. लिंग व योनी यांचे वाचक असे बीभत्स शब्द सध्याही पृथ्वीवरील कितीतरी रानटी लोकांच्या नित्याच्या बोलण्यात हरघडी येतात, हे समाजशास्त्राच्या अभ्यासकांना नवीन सांगावयास पाहिजे असे नाही. फार दूर जावयास नको, सध्या ज्या स्थली बसून मी लिहीत आहे, त्या स्थलाशेजारून भिल्ल, वडार, वंजारी, कुणबी इत्यादी कनिष्ठ दर्जाचे रानटाऊ लोक गाड्या हाकताना, बाजार करताना, लावण्या म्हणताना व शिळोप्याच्या गप्पा गोष्टी करताना मी पाहात व ऐकत आहे. दर वाक्यास एकतरी अश्लील शब्द त्यांच्या बोलण्यात आला नाही, असे फारसे घडत नाही. ब्राह्मणादि उच्च व सभ्य लोकांशी बोलताना अश्लील भाषा तोंडातून काढावयास ते किंचित् भितात, परंतु आपापसात बोलताना त्या बोलण्यात ताळतंत्र फारच थोडा असतो आणि हा असा प्रकार होणे अगदी स्वाभाविक आहे. उपजीविकेकरिता काबाडकष्ट करणे आणि करमणुकीकरिता जननेंद्रियांची आराधना करणे, या दोन विषयांइतका तिसरा विषय रानटी लोकांच्या परिचयाचा नसतो. हाच प्रकार रानटी ऋषिपूर्वजांचा असे. ह्या रानटी ऋषिपूर्वजांच्या बोलण्यांत जननेंद्रियांना अनुलक्षून फार शब्द सहजासहजी येत. हे रानटी ऋषिपूर्वज धुमीभोवती जमत, जननेंद्रियांसंबंधाने ज्या अडचणी येत त्याचसंबंधाने संभाषण करीत, तेथेच गर्भाधानही उरकीत आणि या तिन्ही क्रियांना मिळून ते यज्ञ हा शब्द लावीत. अग्नीत टाकिलेल्या हविर्द्वारा देवांची आराधना करणे हा यज्ञाचा जो अर्थ वैदिक लोक करीत, तो अर्थ रानटी ऋषिपूर्वजांना माहीत नव्हता. यज्ञ म्हणजे आगटीभोवती जमणे, काटक्या व मारलेल्या जनावरांची चरबी टाकून ती आगटी चेतवणे,

सोमाची दारू पिणे, जननेंद्रियासंबंधाने बोलणे करणे व मैथुन करणे, या क्रियासंततीला ते रानटी लोक यज्ञ हा शब्द लावीत. मूळ यज्ञ हा शब्द यज़् + न् असा होता, यज् न् हे वाक्य होते. न् किंवा न्त हे अनेकवचनी प्रथमपुरुषवाचक सर्वनाम रानटी ऋषिपूर्वजांच्या भाषेत असे, क्रियाशब्दाच्या पुढे ते सर्वनामे योजीत. यज् न् या त्यांच्या वाक्याचा अर्थ ते यजतात, असा होता. यज् हा क्रियाशब्द दोन क्रियापदांचा जोड आहे. यज्, इज् या जोडक्रिया शब्दांत इ किंवा य या क्रियाशब्दाचा अर्थ गमन करणे, जाणे, जमणे असा होता व या क्रियाशब्दाचा अर्थ जन्मविणे, यभनक्रिया करणे असा होता. एका ठिकाणी जमून यभनक्रिया किंवा जननक्रिया करणे या जोडक्रियेला यज् किंवा इज् हा जोड क्रियाशब्द त्यांच्या भाषेत होता. तात्पर्य यज्ञ म्हणजे ते जमतात व यभनक्रिया करतात असा यज् न् या वाक्याचा अर्थ त्या रानटी लोकांत होता. ह्या यज् न् वाक्याचा उच्चार असा कालांतराने झाला व रानटी लोकांची प्राथमिक भाषा मेल्यावर यज्ञ हे वाक्य नाम म्हणून पुढील भाषेत प्रचलित झाले. कालांतराने रानटी ऋषिपूर्वजांचे वंशज उत्तरोत्तर सुधारत गेले, घरेदारे करून राहू लागले व मैथुनक्रिया यज्ञभूमीवर म्हणजे जमातीच्या उघड्या जागेवर लोकान्तांत न करता एकान्तांत करू लागले. त्या सुधारलेल्या वंशजात इंद्र, वरुण, सूर्य यांची आराधना अग्नीत हवि टाकून करण्याची पद्धती निर्माण झाली. अग्नी व अग्निकुंड हे आर्यसंस्कृतीचा मूळ उगम. सबब देवांची आराधना ही अग्नीच्या व अग्निकुंडाच्या सान्निध्याने व द्वारा सहज होऊ लागली व पूज्य बापजादे जी जी कार्ये अग्नीभोवती उरकीत ती ती सर्व कार्ये तशीची तशीच अग्नीसमक्ष उरकण्याने इष्टकाम सिद्धी बापजाद्यांना जशी पूर्वी मिळाली तशी सध्याही आपणाला मिळेल अशी भावना सहजच चालू राहिली. बापजादे आगटीभोवती एकत्र जमत, अभद्र शब्द उच्चारीत व तेथेच यभन-क्रिया उरकीत, सबब त्यांचे सुधारलेले वंशजही यज्ञप्रक्रियेत अग्नीजवळ जमण्याची, अभद्र शब्द उच्चारण्याची व यभनक्रिया करण्याची नक्कल अश्वमेधयज्ञात जशीच्या तशी उठवून देत. रानटी बापजाद्यांना आगटीभोवती यभनक्रिया करून खरीच पुत्रसंतति मिळे, तशीच पुत्रसंतती बापजाद्यांची यज्ञभूमीवर नुसती नक्कल केल्याने आपणास मिळेल अशी भावना वैदिक ब्राह्मणक्षत्रियांची असे. अश्वमेध यज्ञ केला म्हणजे वीरप्रजा हटकून मिळेल किंवा पंचहविरुपेतचयन केले म्हणजे हजार पुत्र मिळतील, अशी श्रद्धायुक्त भावना वैदिक ऋषींची असे. पूर्वजांनी अग्नीची अशी अशी उपासना करून अशी अशी इष्टसिद्धि करून घेतली, सबब ज्याला ज्याला तशी इष्टसिद्धी हवी असेल त्याने त्याने तशी आराधना करावी असा उपदेश यजुर्वेदात बहुतेक प्रत्येक इष्टीच्या व यज्ञाच्या मंत्रात केलेला आढळतो. एतत्संबंधाने तैत्तिरीयसंहितेच्या पाचव्या कांडातील सहाव्या प्रपाठकाच्या पाचव्या अनुवाकातील खालील वाक्य मासल्याकरता देतो :–

एतं वै पर आट्णार : कक्षीवाँ
औशिजो वीतिहव्यः श्रायसस्त्रसदस्युः

पौरुकुत्स्यः प्रजाकामा अचिन्वत ततो
वै ते सहस्रँ सहस्रं पुत्रानविन्दंत । इ.

अट्णाराचा मुलगा पर, उशिजाचा मुलगा कक्षीवान्, श्रयसाचा मुलगा वीतिहव्य व पुरुकुत्साचा मुलगा त्रसदस्यु यांनी पुत्रसंततीच्या इच्छेने पंचहविर्युक्त चयन केले, त्यामुळे त्या प्रत्येकाला एकेक हजार पुत्र मिळाले, सबब पंचहविर्युक्त चयन जो कोणी करील त्यालाही तीच प्राप्ती होईल.

यज्ञभूमीवर पंचहविर्युक्त चयन करून पर, कक्षीवान् वीतिहव्य व त्रसदस्यु या चौघांना हजार हजार पुत्र कसे मिळाले ? पंचहवि दिल्याबरोबर आकाशातून एकदम एक हजार पोरे पडली की भूमीतून वर आली ? खरा प्रकार असा असे. शत्रूशी लढण्याला व स्वारी शिकारीची कामे करण्याला प्रजापती म्हणून जे यूथपती असत त्यांना तरुण जवानांची पराकाष्ठेची जरूर भासे. यज्ञ करून म्हणजे शेजारच्या जवानांची जमात करून व त्यांचा स्वयूथातील स्त्रियांशी समागम करून देऊन, करवेल तितकी जास्त प्रजा यूथातील स्त्रियांच्या ठायी हे प्रजापती उत्पन्न करून घेत, त्या प्रजेचे संगोपन करीत व आपले मनुष्यबळ वाढवीत. शत्रूंना जिंकून व दास करून मायेची प्रजा वाढावी तितकी वाढत नसे. सबब यज्ञ म्हणजे जमात करून पोरे उत्पन्न करण्याची प्रजापतींची ही पद्धत असे. प्रजापतिर्यज्ञं असृजत, प्रजापतिः प्रजाः असृजत इत्यादी जी वाक्ये तैत्तिरीयसंहितेत येतात त्यांचा अर्थ एवढाच आहे की धुमीभोवती जमात जमवून प्रजापती प्रजा उत्पन्न करून आपले मनुष्यबळ वाढवीत. धुमीभोवती प्रजोत्पादनादिक्रियार्थ एके ठिकाणी जमणे असा यज्ञ या शब्दाचा मूळ अर्थ रानटी ऋषिपूर्वजांच्या भाषेत होता. तोच यज्ञ हा पूर्वपरंपरागत वडिलार्जित शब्द रानटी ऋषिपूर्वजांचे सुधारलेले वेदकालीन वंशज अग्नीत हवी देऊन इष्टकामना सिद्ध्यर्थ देवांना आराधिणे या अर्थाने योजीत. अग्नी व यज्ञ या दोन वस्तूंचा असा हा इतिहास आहे. यज् न् ते जमून प्रजोत्पादन करतात, असा यज्ञ या शब्दाचा जसा मूळार्थ आहे, तसाच यजुस् या शब्दाचाही आहे. यज् या जोड धातूपुढे उस् अथवा उर् हे सर्वनाम येऊन यज् उर् असे रानटी ऋषिपूर्वजांच्या भाषेत वाक्य असे त्या वाक्यापासून यजुर् यजुस् हा शब्द निघाला आहे. न् (अन्, न्त) हे जसे प्रथम पुरुषाच्या अनेकवचनाचे सर्वनाम आहे, तसेच ते च उर् किंवा उस् हे ही प्रथम पुरुषानेकवचनार्थक सर्वनाम आहे. यजुस् म्हणजे ते यजतात. यज्ञ व यजुस् ही वाक्ये मुळातच अनेकवचनी असल्यामुळे अनेक लोकांनी जमून अग्निद्वारा ईश्वरोपासना करणे असा त्यांचा अर्थ आहे. इष्टि हा शब्द इज् (यज्) + ति असा मुळात वाक्यात्मक होता. इज् + ति म्हणजे तो अग्नीजवळ जाऊन प्रजोत्पादन करतो, असा एकवचनार्थक प्रयोग मुळात होता. इज़ + ति या वाक्यापासून ज् चा ष् होऊन इष्टि हा वैदिक शब्द जन्मास आलेला आहे. तात्पर्य यज्ञ यजुष्, इष्टि या तिन्ही शब्दांचा मूलसंबंध आगटी-भोवतालील प्रजोत्पादनकर्माशी होता. सबब विवाहादी प्रजोत्पादनसंबंधक विधानात

अग्नीची समक्षता वैदिक ऋषींना परंपरागत म्हणजे पूज्य म्हणून अत्यावश्यक वाटे.

७. अग्निचयन व प्रजोत्पादन यांचे साहचर्य रानटी ऋषिपूर्वजांत किती पराकाष्ठेचे निकट होते ते तैत्तिरीय संहितेतील एक उतारा देऊन आणिक स्पष्ट करितो.

नाग्निं चित्वा रामां उपेयाद्
अयोनौ रेतो धास्यामीति,
न द्वितीयं चित्वा अन्यस्य स्त्रियं
उपेयान्, न तृतीयं चित्वा
कांचन उपेयाद्, रेतो वा एतन्नि
धत्ते यदग्निं चिनुते, यदुपेयाद्रेतसा व्यृध्येत.
(तैतिरीयसंहिता, ५ कांड, ६ प्रपाठक, ८ अनुवाक)

एका ऋषीचे मत असे होते की, पहिल्यांदा अग्निचयन केले असता, स्त्रीसमागम करू नये, कारण अनुपयुक्त स्त्रीच्या ठायीं रेत स्थापिण्यात काही मतलब नाही, दुसऱ्यांदा अग्निचयन केले असता दुसऱ्यांच्या स्त्रीशी गमन करू नये, आणि तिसऱ्यांदा अग्निचयन केले असता कोणत्याच स्त्रीशी गमन करू नये; निषेधाचे कारण असे आहे की, अग्निचयन करणे म्हणजे रेत साठविणे आहे, तेव्हा स्त्रीसमागम केला असता रेताचा व्यर्थ क्षय होतो.

वरील निषेधांत स्वतःच्या मालकीच्या स्त्रीशी ती अनुपयुक्त योनी असता दुसऱ्यांच्या मालकीच्या स्त्रीशी व स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या कोणाच्याही मालकीची नाही अशा कोणत्याही स्त्रीशी अग्निचयनानंतर समागम करू नये, असे सांगितले आहे. म्हणजे हा निषेध प्रस्थापित होण्याच्या पूर्वी अग्नी सिद्ध केला असताही स्वस्त्रीशी किंवा दुसऱ्याच्या स्त्रीशी किंवा कोणत्याही स्त्रीशी समागम केला असता चाले, असा गर्भितार्थ निघतो. हा निषेध प्रस्थापित होण्याच्या पूर्वी चाल अशी असे की, अग्निकुंडाजवळ प्रजापती स्वस्त्रियांशी समागम करत, किंवा कोणाच्याच मालकीच्या नाहीत अशा दासस्थितीतील दासीशी समागम करीत. एके काळी अशी स्थिती होती. पुढे नीतिमत्ता वाढून, स्वपरभाव वृद्धिंगत होऊन काही सज्जनांना असे वाटू लागले की, पवित्र म्हणून मानिलेल्या अग्निकुंडावर स्वस्त्रीशी किंवा दुसऱ्याच्या स्त्रीशी समागम करणे नीतिमत्तेचे नव्हे. तेव्हा काही लोकांनी आपल्या अग्निचयनप्रक्रियेत स्त्रीसमागम निषिद्ध मानला, परंतु हा निषेध समाजातील सर्वच व्यक्तींना पसंत पडला असे नाही. काही लोकांचे असे म्हणणे पडले की, अग्निकुंडावर उबाऱ्याच्या जागी येऊन व स्त्रीसमागम करून आपली प्रजा-वृद्धी होत्ये व मनुष्यबळ वाढते, तेव्हा अग्निकुंडावर स्त्रीगमन करणे आपल्या समाजाच्या मनुष्यबळाला उपकारक आहे, सबब वरील निषेध अनुपकारक अतएव अमान्य समजावा. येणेप्रमाणे समाजात दोन पक्ष झाले, (१) अगमनपक्ष व (२) गमनपक्ष. गमन-पक्षाची विचारसरणी येणेप्रमाणे होती :–

अथो खलु आहुः अप्रजस्यं तद्
यन्नोपेयादिति, तस्मादुपेयाद्रेतसः
अस्कंदाय (५ कांड, ६ प्रपाठक, ८ अनुवाक)

आता यावर असे म्हणतात की, समागम केला नाही तर प्रजा खुंटेल, म्हणून रेत वाया जाऊ देऊ नये याकरिता उपगमन करावे.

येणेप्रमाणे गमन पक्षाचे म्हणणे पडले की, अग्निचयन केल्यावरही स्वस्त्रीशी, दुसऱ्याच्य स्त्रीशी किंवा वाटेल तिशी गमन करण्यास हरकत नाही. या विधिनिषेधरूप मंत्रांचे प्रकृत विषयाला उपयोगी असे तात्पर्य एवढेच घ्यावयाचे आहे की, रानटी ऋषिपूर्वज आगटीच्या उबाऱ्यात प्रजोत्पादन करीत असत.

८. अग्नी व प्रजोत्पादन यांचा नित्यसंबंध दाखविणारी हवी तितकी वाक्ये ऋग्वेद व यजुर्वेद यांच्यातून काढून दाखविता येतात. प्रजननं ज्योतिः (तै. सं. कांड ७, प्रपाठक १, अनुवाक १) या वाक्यात पुरुषजननेंद्रियाला अग्नीची ज्योत म्हटले आहे. गर्भो वा एष यदुख्यः (तै. सं. ५–६–१०) या वाक्यात अग्नीला गर्भ म्हटले आहे. गर्भ, योनी, रेत, मुष्क, अंजि, प्रजनन, प्रजापती, मेंदू, इंद्रिय, वृष, वृषण, वृषभ, वीर्य इत्यादी शब्द— ज्यांचा उच्चार करणे आपणा सर्वांनाच अश्लील व असभ्य वाटते–ते शब्दः यजुःसंहितेत अग्नीच्या सानिध्याने पदोपदी आलेले आढळतात. प्रजोत्पादक इंद्रिये ही अग्नी आहेत, अशी रानटी ऋषिपूर्वजांची कल्पना असे. शिवाय रानटी ऋषिपूर्वज यभनकर्म उघड्यात सर्वांदेखत करीत, त्यात काही लज्जास्पदता त्यांना वाटत नसे. अर्थात् यभनक्रियेचे वाचक शब्द व अवयव यांचा उच्चार करण्यात कोणताही अश्लीलपणा आहे, असे त्यांना वाटत नसे. नाक, डोळे ही उघडी ठेवण्यात आपणास जशी लाज वाटत नाही, त्याप्रमाणेच जननेंद्रिये उघडी ठेवणे रानटी ऋषिपूर्वजांना लज्जेची गोष्ट वाटत नसे. म्हणजे रानटी ऋषिपूर्वज एकेकाली बरेच नग्न असत व जननेंद्रिये, रेत, गर्भ इत्यादीवाचक शब्द त्यांच्या बोलण्यात हरघडी येत. तैत्तिरीय संहितेच्या पहिल्या कांडाच्या पाचव्या प्रपाठकाच्या नवव्या अनुवाकांत अग्नी, योनी व लिंग याजसंबंधाने ऋषिकल्पना अर्थात् ऋषिपूर्वज-कल्पना काय होत्या ते सांगितले आहे.

अग्निहोत्रं जुहोति, यदेव किं च
यजमानस्य स्वं तस्यैव तत् । रेतः
सिंचति प्रजनने प्रजननं हि वा अग्निः ।
यत्सायं जुहोति रेत एव तत्सिंचति ।
प्रैव प्रातस्तनेन जनयति तत् ॥

या वाक्यांचा भावार्थ असा : अग्निहोत्री यजमान अग्नीत दूध, दही, तूप वगैरे पदार्थ टाकतो ते फुकट जात नाहीत. योनींत टाकलेले रेत ज्याप्रमाणे तेथे जमा होते

त्याप्रमाणे अग्नीत टाकलेले पदार्थ रेतोरूप होतात, कारण अग्नी म्हणजेच जननेंद्रिय. सायंकाळी हवन करणे म्हणजे रेतसिंचन करणे आहे, आणि प्रातःकाळी हवन करणे म्हणजे सायंसिक्त रेतापासून झालेली प्रजा संपादणे आहे.

यज्ञभूमीवर ऋषिपूर्वजकाली काय प्रकार चाले तो विशद करणारे आणिक एक वाक्य तैत्तिरीय संहितेच्या सातव्या कांडाच्या पाचव्या प्रपाठकाच्या दहाव्या अनुवाकातील देतो :

यंति वा एते मिथुनाद् ये
संवत्सरं उपयंति अंतः वेदि
मिथुमो सं भवतः तेनैव
मिथुनान्न यंति ।

ह्या मंत्राचा भावार्थ असा आहे की, जे यजमान संवत्सर सत्राचे अनुष्ठान करतात त्यांची मैथुनशक्ती मंद होते, कारण वर्षभर ते ब्रह्मचर्याने राहतात. करिता मैथुनशक्ती पुनः प्रज्वलित व्हावी एतदर्थ ईश्वराच्या अघटित लीलेने वेदीच्या मध्ये एक जोडणे उत्पन्न होते. ते जोडणे कोणाचे म्हणाल तर एका ब्रह्मचाऱ्याचे व एका छिनाल वांडकीचे. त्या जोडप्याचा मैथुनव्यवहार पाहिला म्हणजे वर्षभर ब्रह्मचर्याने राहिलेल्या यजमानाची मैथुनशक्ती पुन्हा पूर्ववत् जोराने प्रगत होते. मैथुन या भाववाचक नामाचे कार्य मिथुन हा शब्द तैतिरीय संहितेत करतो.

यजमानाने वर्षभर ब्रह्मचर्याने राहावयाचे व्रत वैदिककाळी निघाले. तत्पूर्वी वेदीवर म्हणजे आगटीभोवती म्हणजे जमातींच्या जागी स्त्रियांच्या पाठी लागणारे पुरुष व पुरुषांच्या पाठी लागणाऱ्या स्त्रिया यथेच्छ रममाण होत. ज्या मालकाची आगटी असेल त्याच्या स्त्रिया आलेल्या पाहुण्याशी रममाण होत, व तोपर्यंत स्वतः यजमान अतिथि-सत्कारार्थ स्वतः ब्रह्मचर्याने राही. अतिथीला स्वस्त्री समर्पण करण्याची जी चाल वैदिक ऋषिलोकांत पुढे चालू होती तिचे दर्शक यजमानाचें हे काही कालपर्यंतचे ब्रह्मचर्य होय.

९. रानटी ऋषिपूर्वज आगटीच्या भोवतील जमातीच्या जागी केवळ प्रजोत्पादन कर्म करूनच स्वस्थ बसत नसत. तेथे ते मादक सोमरस पीत, गाणी गात व नाचत बागडत. रानटी ऋषिपूर्वजांच्या गाण्यापासून पुढे त्रिष्टुभू, अनुष्टुभू, गायत्री इत्यादी छंद निघाले व सामगायन म्हणून ज्याला पुढे संज्ञा मिळाली ते गान उत्पन्न झाले. रानटी नाचण्यापासून पुढे नृत्यकला उद्‌भवली, आणि रानटी पूर्वजांच्या चालीरीतीची जी नक्कल वैदिक काली साक्षेपाने होऊ लागली त्या नकलेपासून नाटक किंवा नाट्यकला म्हणून जिला पुढे प्रौढ नामाभिमान मिळाले ते जन्मास आले. अश्वमेध यज्ञातील घोड्यापुढील राजस्त्रियांचा विलाप अथवा विलास आणि त्या विलासातील स्त्रीपुरुषांची संभाषणे, हे एक छोटेसे बीभत्सरसात्मक नाटकच आहे. अश्वमेधाची समाप्ती करताना आरतीची जेव्हा वेळ येते,

तेव्हा ऋत्विज ऋचा म्हणतात, स्त्रिया गाणी गातात व दासी नृत्य करतात. डोक्यावर मद्याच्या घागरी घेऊन पायानी ताल धरीत धरीत इदं मधु (हें मद्य) हे शब्द गात गात आठ दासी यज्ञभूमीवर येतात, तेव्हा यजमनाला आपण मोठे पुण्यवंत व भाग्यशाली आहोत अशी कृतकृत्यता वाटली म्हणून तैत्तिरीय संहितेत लिहिलेले आढळते (कांड ७, प्रपाठक ५, अनुवादक ११, शेवट).

१०. भारतीय आर्यांत विवाह अग्नीच्या सामक्ष्याने कां व्हावा लागतो ते वरील तपशिलावरून स्पष्ट होते. कोणत्याही समाजातील विवाहाचे मुख्य प्रयोजन जे प्रजोत्पादन ते रानटी ऋषिपूर्वज आगटीभोंवतील यज्ञकुंडावर म्हणजे जमातीच्या जागी करत. सबब त्यांचे वंशज जे वैदिक व सद्यःकालीन भारतवर्षीय आर्य तेही आपले विवाह तातस्य कूपं या न्यायाने अग्नीसमक्ष करतात.

परिशिष्ट

(कृष्णयजुः संहिता, कांड ७, प्रपाठक ४, अनुवाक १९)

(१) अंबे अंबाल्यंबिके न मा नयति कश्चन। हे अंबे, हे अंबालि, हे अंबिके, मला कोणीही नेत नाही.

टीका :—या मंत्राचे तीन पाठभेद आहेत. एक पाठ कृष्णयजुः संहितेतील, दुसरा पाठ यजुः सहितेतील व तिसरा पाठ पाणीनीय अष्टाध्यायीतील.

यातील कृष्णपाठ—अंबे अंबाल्यंबिके

शुक्लपाठ–अंबे अंबिकेऽबालिके

पाणिनिपाठ–अंबे अंबाले अंबिके

अंबे व अंबिके ही दोन रूपे तिन्ही पाठांत एकसारखी आहेत. अंबे हे रूप तिन्ही पाठांत पाहिले आहे. अंबिके हे रूप कृष्णपाठात व पाणिनीय पाठात शेवटचे आहे व शुक्लपाठांत दुसरे आहे. कृष्णपाठात अंबालि असे रूप शुक्लपाठात अंबालिके असे रूप व पाणिनिपाठात अंबाले असे रूप आहे. अंबालि हे अंबाली शब्दाचे संबोधन आहे. अंबाले हे अंबाला किंवा अंबालि या शब्दाचे संबोधन आहे व अंबालिके हे अंबालिका शब्दाचे संबोधन आहे. शब्दरूपात व पाठक्रमात हे असे तीन प्रकार आहेत. यावरून स्वच्छच अनुमान निघते की, यजुःसंहिता शुक्ल असो, कृष्ण असो, तिचे पाठ नियत नाहीत. म्हणजे यजुःसंहिता शुक्ल व कृष्ण अशी जी सध्या उपलब्ध आहे ती मूळ जशी रचली गेली असेल तशीची तशी आपल्यापर्यंत पोहोचली नाही. तिच्यातील शब्दात व शब्दक्रमात रूपांतरे झालेली आहेत. शिवाय, पाणिनीय सूत्रावरून (६–१–११८) असेही दिसते की, पाणिनीला यजुःसंहितेत स्वरसंधीच्यासंबंधी जे नियम माहीत होते ते नियम सध्या उपलब्ध असलेल्या कृष्ण यजुःसंहितेत व शुक्ल यजुंसहितेत यद्यपि पाळिलेले आहेत तथापि युक्तीने पाळले आहेत.

आपो जुषाणो इत्यादि सूत्रात पाणिनी सांगतो की, अंबे, अंबाले, अंबिके या तीन शब्दांतील आद्य अकारापूर्वी एकार आला असता पूर्वरूप एकादेश यजुषि होत नाही. प्रकृतिभावच राहतो, म्हणजे संधी होत नाही. या नियमाप्रमाणे पाणिनीला संमत असलेल्या यजुःसंहितेत अंबे अंबाले अंबिके असा संधिरहित पाठ होता. तो पाठ सध्याच्या कृष्णयजुःसंहितेत म्हणजे तैत्तिरीय संहितेत अंबे अंबाल्यंबिके असा फिरवून म्हणजे अंबालेच्या ऐवजी अंबालि असे संबोधक रूप घालून, पाणिनीय उपदेशाची अवहेलना केलेली स्पष्ट दिसत आहे. पाणिनीने अंबे, अंबिले व अंबिके अशी तीन रूपे सांगितली आहेत, त्यांचा अर्थ सध्यांच्या तैत्तिरीयसंहिताकारांनी असा केला की अंबाले हे रूप असेल तरच पुढील अकाराचा पूर्वरूप-एकादेश होईल, अंबालि असे ज्या अर्थी आमचे रूप आहे त्याअर्थी हा नियम आम्हाला येथे लागूच नाही. पाणिनीय नियम टाळण्याची ही अशी चोरवाट नवीन तैत्तिरीयसंहिताकरांनी काढली खरी, परंतु पाणिनीच्या कचाट्यातून ह्या कच्च्या गुरूंच्या चेल्यांना निसटता आले नाही. अंबालि असे रूप मानूत अंबाल्यंबिके असा संधी त्यांना उजळ माथ्याने करता आला, परंतु अंबे व अंबालि या शब्दाचा प्रकृतिभाव ठेवून म्हणजे संधी न करून त्यांनी आपले हसे करून घेतले.

❈

लग्नसंस्था : (एक टिपण)

(भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास या विषयावर कै. राजवाडे यांनी लिहिलेली चार प्रकरणे आतापर्यंत दिली. आता त्या मालेपैकी आणखी प्रकरणे उपलब्ध नाहीत, पण याच विषयावर लग्नसंस्था या मथळ्याखाली त्यांनी लिहिलेले टिपण यापुढे दिले आहे. —संपादक)

१. ब्रह्मदेव आपल्या मुलीशी गेला.

२. यम व यमी ही बहीणभावंडे नवराबायको झाली.

३. चंद्र बृहस्पतीची बायको तारा इशी गेला (वन. २१९) गुरुतल्पग.

४. पाराशर्याने सुगंधीशी गमन केले.

५. कृष्णाला १६००० गोपी स्त्रिया होत्या.

६. तरी मोहिनीकरिता वृंदावनात कृष्णाने घर केलेच.

७. विभांडिकाने मृगीशी संग केला. (formication with beasts) (वन ११०) अश्वरूप धारण करणारी त्वाष्ट्री ही सूर्याची भार्या (आदि ६६). दमाने मृगीशी संग केला (आदिपर्व पृष्ठ ११). मृगवेशाने पत्नीशी व्यवहार, पांडूने मारिलेले मृगदंपत्य, मृग ऋषि होता (आदि ११८).

८. द्रौपदी–एक स्त्री सर्व भावांची बायको. जो भाऊ खोलीत असेल त्याची खूण बाहेर ठेवीत, म्हणजे दुसरा आत जात नसे.

९. सीता–एकेक बहीण एकेक भावाची बायको.

१०. चिरकारीची कथा : गौतमाने व्यभिचारी स्त्रीस-चिरकारीच्या मातुःश्रीस-मारण्यास चिरकारीला सांगितले, परंतु त्याने तिला मारिले नाही (शांतिपर्व २६६ अध्याय) आईची माया राखिली.

११. परशुरामाची कथा–याने आईला मारिले, बापाची आज्ञा मान्य केली.

१२. कुंतीने तीन वेळा व माद्रीने एकदा नियोग केला, व तो नवऱ्याच्या परवानगीने केला.

१३. कुंतीला कर्ण कन्या असताना झाला व तिने लोकलज्जेस्तव लपविला, असला पुत्र मान्य नव्हता.

१४. प्रत्येक हिंदू नवरी इंद्राग्नी इत्यादी ५ देवतांशी प्रथम लग्न करते व नंतर खऱ्या नवऱ्याशी लग्न करते. दमयंतीनेही असेच केले.

१५. वडील भावाच्या किंवा बहिणीच्या अगोदर धाकट्या भावाचे किंवा बहिणीचे लग्न करीत नाहीत, केलेच तर गौण मानतात.

१६. देवांनी मानवस्त्रीशी संग केला असता मानव तो अनुग्रहच समजत. ही समजूत अद्यापही आहे.

१७. सुदर्शनाची आतिथ्याची गोष्ट–याने आपली बायको रतिसुखार्थ पाहुण्याला दिली व त्याबद्दल त्याची अमरकीर्ति झाली (अनुशासन पर्व अ. २).

१८. ऋचिकाने गाधीला १००० घोडे शुल्क म्हणून सत्यवतीकरता दिले (अनुशासन पर्व अध्याय ३–४). स्वयंवरांतील पण इत्यादी शुल्कच आहेत.

१९. श्रूयते हि पुराणेपि जटिला नाम गौतमी ॥
ऋषीनध्यासितवतीसप्त धर्मभृतां वरा ॥ १४ ॥

तथैव मुनिजा वार्क्षी तपोभिर्भावितात्मनः
संगताभूद्दश भ्रातॄनेकनाम्नः प्रचेतसः ॥ १५ ॥

(आदिपर्व अध्याय १९८ संपूर्ण वाचा)

(polyandry एक बंधु स्त्रीशी एकान्तांत असता दुसऱ्याने त्याला पाहू नये असा पांडवांचा निर्बंध) (आदि २१२).

२०. प्रेष्याः संप्रददै कृष्णो नानादेश्यः सहस्रशः १६ ॥

(आदि पर्व, अध्याय २०१).

२१. उत्तंक व वेद यांची कथा–उत्तंकाला आश्रमस्त्रिया गुरुच्या अभावी गुरुपत्नीचा ऋतु सफल करण्यास सांगतात ते तो नाकारतो. आल्यावर गुरु त्याला शाबासकी देतो. परंतु आश्रमस्त्रियांना काहीच दोष देत नाही. त्यावरून गुरुपत्नीशी ऋतुकाली समागम करणे गुर्वभावी शिष्याला विहित धरलेले होते. हे गुरुपत्नीगमन म्हणजे एका प्रकारचे मातृगमनच होते. इ. इ. इ. (आदिपर्व).

२२. सत्यवतीला कन्यकावस्थेत व्यास झाला. कर्णाप्रमाणे कानीन

(आदिपर्व, अध्याय ६०).

२३. व्यास जनमेजयाच्या सभेत गेले असता त्यांना मधुपर्कपूर्वक गाय अर्पण केली, परंतु ती अवध्य म्हणून त्यांनी मारली नाही. म्हणजे गाय मारण्याची चाल पूर्वी एकदा होती. ती भारतकाली बंद झाली होती (आदिपर्व अध्याय ६०).

२४. पराशर ब्राह्मण व कुमारी सत्यवती निषादी यांच्या संगापासून जे व्यास कृष्णद्वैपायन झाले ते मातेच्या जातीचे न होता पित्याच्या जातीचे झाले, यावरून असे दिसतें की, ही निषादी मूळची अनार्य नव्हती. ब्राम्हण बीज व शूद्रक्षेत्र यापासून झालेला निषाद, याची मुलगी होती. त्या मुलीचे पाणिग्रहण ब्राह्मण पराशर याने केल्यामुळे त्याला जो मुलगा झाला तो ब्राह्मण झाला (आदिपर्व, अध्याय ६३).

२५. मानसपुत्र म्हणजे काय ?

२६. ब्रह्मा :– ब्रह्मा

१. मरीचि– २. दक्ष × दक्षा– भावाबहिणीचे लग्न.

कश्यप अदिति, दिति इ. इ. ५०

× १३. चुलत भावाबहिणीचे लग्न.

कश्यप married 13 out of 50 daughters of दक्ष.

धर्म

married 10 daughters of दक्ष, कीर्ति, लक्ष्मी इ. इ.

marriage between uncle & niece.

(आदिपर्व अध्याय ३६)

२७. नारदाची नारदी. अर्जुनाची सैरंध्री, सैर ध्रियते इति (सैर =penis). शिखंडी–शि stands for penis and खंड म्हणजे कापलेला. षंढ = खंड = खड् to cut, खच्ची केलेला. males assuming female dress & discharging female occupations.

✥

विकार-विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती

१. सहज विक्षेप अभिप्रायसूचक

मनात संकल्पविकल्प येतात. त्यांचे प्रदर्शन मनुष्यादी प्राणी अनेक तऱ्हांनी करतात. मुख, दंत, जिव्हा, नासिका, कर्ण, नेत्र, हस्त, पाद व इतर अंगे यांच्या विक्षेपांनी संकल्पविकल्प दाखविता येतात किंवा दिसले जातात. ह्या साधनाला विक्षेपसाधन म्हणतात. हे साधन सर्वांत साधे. ह्या विक्षेपसाधनाला जल, वायू, अग्नी, आकाश वगैरेंचे साह्य लागत नाही. मुखाने वेडावणे, दात काढणे, स्मित करणे, जिभल्या दाखवणे, मिशीवर हात फिरविणे, केस पिंजारणे, माथा तुकविणे, भुवया चढविणे, कपाळाला आठ्या घालणे, कान टवकारणे, गाल फुगवणे, नाक चढवणे किंवा फेंदारणे, डोळे मिचकावणे, फाडणे, लाल करणे, हातवारे करणे, आंगठा दाखविणे, बोटे मोडणे, मूठ दाखवणे, हात चोळणे, लाथ मारणे, वाकुल्या दाखविणे, शेपूट हलवणे, खुराने जमीन उकरणे, पंख फडफडविणे, फणा हपटणे, सोंड फिरविणे, लंगडशाई करणे, नाचणे, उडणे, बागडणे, धावणे, उताणे पडणे, कुशीवर पडून मेल्याचे सोंग घेणे, लोळणे, नमणे, नमस्कार करणे वगैरे संकल्पविकल्प दाखविण्याचे शेकडो प्रकार साध्या विक्षेपांत पडतात. बोलणे, सूर काढणे, हंसणे, हुंगणे, खाजवणे, टाळी वाजविणे, खाक वाजविणे, चुटक्या वाजविणे, शीळ घालणे, फू करणे, थुंकणे, खेकसणे, आरडणे बोंबलणे, शंख करणे, खिदळणे, गुरगुरणे, केंकाटणे, कोंकणे, भोंकणे, आरवणे, चिव-चिवणे, किचकिचणे, दात खाणे, जीभ टाळूवर हापटणे, सुस्कारणे, कोल्हेकुई करणे, हंबरणे, टिवटिवणे, मचमचणे, ललकारणे, गुणगुणणे, तणतणणे, फणफणणे, कटकटणे, हळहळणे, तळतळणे, थैमान करणे, चुंबन करणे, चाटणे, आलिंगणे, कुरवाळणे, चिमटे काढणे, गुद्दे मारणे, रट्टे देणे, लाथाडणे, ढकलणे वगैरे शेकडो प्रकारात स्वेतर व्यक्ती, पृथ्वी, जल, वायू, आकाश वगैरे बाह्य पदार्थांचे साह्य घेऊन

संकल्प-विकल्प दाखविले जातात. हा दुसरा प्रकार मिश्र आहे. हे दोन्ही प्रकार सर्वस्वी सहज म्हणजे जन्मसिद्ध असून मनुष्यातल्याप्रमाणेच पशुपक्ष्यादींत दृष्टीस पडतात. हे कोणी कोणाला शिकवावे लागत नाहीत; कारण प्राण्यांच्या त्या त्या अवयवांचे हे धर्मच आहेत. प्राणित्वाची घटनाच अशी आहे की आंतर किंवा बाह्य कारणांचा आघात झाला असता प्रत्याघात ह्या प्रकारांचे रूप घेऊन अवश्यमेव प्रगट होतो. उपरिनिर्दिष्ट सर्वच विक्षेप सर्वच प्राण्यांत प्रादुर्भूत होतात असे नाही. आनंदाने किंवा कृतज्ञतेने किंवा समाधानाने लांगूलविक्षेप कुत्र्यांत उत्कटत्वाने दृश्यमान होतो. लांगूलाभावास्तव मनुष्यात हा विक्षेप संभाव्यच नाही. हसणे मनुष्यास शक्य आहे; पण कान टवकारणे प्रायः नाही. प्रायः म्हणण्याचे कारण असे की कानाच्या शिरा हलविण्याचे सामर्थ्य क्वचित् मनुष्यांत आढळून आल्याचे ग्रंथांतरी लिहिलेले आठवते. सांगण्याचा मुद्दा एवढाच की वर नमूद केलेले विक्षेप प्राणिमात्रांत सहज ऊर्फ जन्मसिद्ध असतात. कृत्रिम ऊर्फ यत्न-सिद्ध नसतात.

२. ध्वनींच्या अनुकरणातून भाषोत्पत्ती

सहज विक्षेपांचे प्रत्यभिज्ञान होऊन यत्नाने त्यांची पुनरावृत्ती करण्याची बुद्धी होणे ही ह्यापुढची पायरी आहे. हा गुण मनुष्याइतका दुसऱ्या प्राण्यांत वर्धमान झालेला दिसत नाही, किंबहुना दुसऱ्या प्राण्यांत हा गुण बहुतेक नाहीच म्हटला तरी चालेल. विक्षेपांचे शास्त्र बनविण्याचे सामर्थ्य एकट्या मनुष्यप्राण्यानेच तेवढे दाखविलेले आढळते. पूर्वी केलेला विक्षेप ज्ञानतः पुनः करणे म्हणजे पुनरावृत्तिसामर्थ्य एकट्या मनुष्यातच दिसून येते. ही पुनरावृत्ती तो आपल्या स्वतःच्याच विक्षेपांची करतो असे नाही, इतर प्राण्यांच्या विक्षेपांचीही पुनरावृत्ती तो करू शकतो. म्हणजे अनुकरणसामर्थ्य त्याच्या ठायी विलक्षण आहे. विक्षेपांपैकी हालचालींचीच तेवढी पुनरावृत्ती मनुष्य करून थांबत नाही, तर त्या त्या प्राण्याच्या विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ती व अनुकरण करून त्या त्या प्राण्याची ओळख तो इतर मनुष्यांना पटवून देतो. मनुष्य शब्दानुकरण करू लागला म्हणजे त्या त्या प्राण्याला त्या त्या प्राण्याच्या शब्दावरून तो नाव देऊ लागतो. एथेच मनुष्याला प्राण्यांचे नामकरण करण्याचा शोध लागतो. कावकाव करणाऱ्या पाखराला काकः, किः खिः करणाऱ्या माकडाला किखिः, रू रू आवाज करणाऱ्याला रुरुः, भृंग आवाज करणाऱ्याला भृंगः, अशी शब्दांवरून प्राण्यांना नावे तो देतो. कृकवाकू, कोकिल, कुक्कुट, फेरव, कुक्कुर, करेडु, ककर, चिल्ल, कीर, कुरर, केकी, मयूर, तित्तिरिः, ही सर्व प्राणिनामे शब्दानुकरणजन्य आहेत. कित्येक नामांत कर वगैरे प्रत्यय लावलेले आहेत व कित्येकांत केवळ शब्दच प्राणिवाचक केला आहे. कर, कुर, र, इन्, रव इत्यादी प्रत्ययान्त जी प्राणिनामे आहेत ती करकरणे, कुर आवाज करणे, इन् जवळ असणे, रव आवाज करणे ह्या धातुनामांचा शोध लागल्यानंतरची असल्यामुळे ती प्रत्ययान्त

नामे काक, कुकवाकू, चिल्ल, कीर ह्या अप्रत्ययान्त नामांहून अर्वाक्तन आहेत हे उघड आहे. केवलशब्दजन्य प्राणिनामे सर्व नामांत अत्यन्त जुनाट ऊर्फ प्राथमिक होत. प्राथमिक म्हणजे केव्हाची? तर मनुष्याला हे प्राणी प्रथम भेटले तेव्हाची. कोणत्या मनुष्याला? संस्कृत किंवा वैदिक भाषा बोलणाऱ्या मनुष्याला की इतर पूर्वकालीन मनुष्याला?

हा प्रश्न सुटावयाचा म्हणजे त्या त्या प्राण्याचे मूळ वसतिस्थान किंवा जन्मस्थान कोणते त्याचा निश्चय झाला पाहिजे. समजा की हिमालयोत्तरप्रदेशात कावळा नाही व हिमालयदक्षिणप्रदेशात आहे. तसेच अशीही कल्पना करा की वैदिक भाषा बोलणारे ऋषींचे मूळस्थान हिमालयोत्तर मेरूपर्वतावर होते; तर काक हा शब्द हिमालयाच्या दक्षिणेस उतरल्यावर वैदिक ऋषींच्या भाषेत आला असे अनुमान सहजच निघते. हा काक शब्द ऋषींच्या पूर्वीच्या रानटी जातीत निर्माण झालेला ऋषींनी उचलला असेल व तो बराच जुना ठरेल. जुना म्हणजे एक लाख किंवा पाच लाख वर्षांचाही जुना ठरेल. भूस्तरशास्त्राप्रमाणे मनुष्य ह्या पृथ्वीवर वावरत असलेल्याला लाखो वर्षे लोटून गेली आहेत. ह्या लाखो वर्षांत त्याची प्रगती अत्यंत मंदगतीने होत असलेली अनुमानास येते. भाषणादि मुखविक्षेप तो आज लाखो वर्षांपासून करीत आला आहे व विशिष्ट ध्वन्यादी आघातांवरून वस्तूंना नामे देण्याचा शोध त्याला लाखो वर्षांच्या पूर्वीच लागलेला आहे. नवेनवे प्राणिशब्द कानावर पडताच भाषेत नवी प्राणिनामे वेळोवेळी तो बनवीत आल्याचे भाषेतिहासावरून व व्युत्पत्तीवरून दृष्टोत्पत्तीस येते. तात्पर्य, प्राणिशब्दजन्य प्राणिनामे अत्यंत जुनी. संस्कृत किंवा वैदिक भाषेतील अत्यंत जुनी असे म्हणण्याचा आशय नाही, तर मानववंशातील कोणत्या तरी त्या किंवा शेजारच्या शाखेतील माणसाच्या भाषेतील अत्यंत जुनी. वैदिक ऋषींना काक शब्द हिमालयदक्षिणप्रदेशात आल्यावर माहीत झाला असेल; परंतु ऋषींच्या पूर्वीचे जे रानटी लोक ह्या देशात होते त्यांच्या भाषेत तो रूढ व जुना होता.

अप्रत्ययान्त केवळ शुद्ध शब्दजन्य जी प्राणिनामे ती अत्यंत प्राथमिक धरण्याचे कारण असे आहे की शब्दज्ञान हे, स्पर्शज्ञान वगळले असता, सर्व ज्ञानांत अत्यंत प्राथमिक असते व ते कर्णेंद्रियावरती आघात भानगडीवाचून करते. एका आकाशतत्त्वाचे तेवढे साहाय्य ह्या ज्ञानाला पुरे होते. रंगावरून, गतीवरून किंवा क्रौर्यादि गुणांवरून जी ज्ञाने होतात त्यांना पृथ्वी, तेज, वायू इत्यादी अनेक मिश्र उपाधींचे साहाय्य लागते. स्वल्प-श्रमाने बहुत लाभ करून घेण्याचा प्राणिमात्राचा स्वभाव पहाता, शब्दजन्य प्राणिनामे सहज सुचणारी अतएव सर्वांत पुरातन समजणे न्याय्य होते. रात्र असो, दिवस असो, प्राणी दिसो वा न दिसो, शब्दावरून त्याचे अस्तित्व मनुष्याला प्रतीत होते. अस्तित्व प्रतीत झाल्यावर, तो शब्द करणाऱ्या प्राण्याची ओळख इतर मनुष्यांना पटविण्याकरिता किंवा तो प्राणी अंतर्धान पावला असता त्याच्या संबंधाने इतरांशी बोलताना, कर, कुर,

इन् इत्यादी प्रत्यय न लावता (कारण, प्रत्यय त्याकाली अस्तित्वातच आलेले नसतात.) त्या प्राण्याच्या शब्दाचे होईल तितके हुबेहुब अनुकरण करून त्या प्राण्याची आठवण इतरांना करून देण्याची खटपट मनुष्य करतो. येथे केवळ गुणाने गुणीचा निर्देश करण्याचा शोध मनुष्याला सहजगत्या होतो. गुण आणि गुणी ह्यांच्यामधील भेद ह्या काली त्याला होत नाही. शब्दांवरून प्राण्यांना ज्याप्रमाणे तो नामे देतो त्याचप्रमाणे तो रहातो त्या टापूतील एकोनएक ध्वनि ज्या सजीव पदार्थापासून साक्षात् निघतात किंवा निघाले अशी त्याची समजूत होते त्या ध्वनीवरून नदी, धबधबा, झाड, मेघ इत्यादी सजीव पदार्थांना तो नामे देतो. ह्या तऱ्हेने पदार्थदर्शक शेकडो ध्वनींचा साठा मनुष्याजवळ साचतो. मनुष्याचा हाच पहिला शब्दकोश होय. ह्या सजीव पदार्थदर्शक ध्वनींबरोबरच धडपडणे घोरणे, हुंगणे, फरफटणे, कुरकुरणे, थापणे, थापटणे इत्यादि क्रियाचेही ध्वनी तो ओळखू व नामाथू लागतो व त्या क्रियांचे नामकरण त्या ध्वनीनी करतो. विशिष्ट ध्वनींनी विशिष्ट पदार्थ व क्रिया यांचे विशिष्ट निर्देशन व प्रत्यभिज्ञान करून देण्याचे सामर्थ्य ज्या काली त्याला येते त्या काली भाषा म्हणून जिला म्हणतात तिची दोन मुख्य अंगे–नाम व क्रिया ह्यांचे दर्शक ध्वनी–यांचा अपूर्व शोध त्याला लागतो. येथेच परिपूर्ण भाषा निर्माण झाली. भाषा म्हणजे दुसरे तिसरे काही नाही. मुखातून निघू शकणाऱ्या शब्दांनी क्रियांचे व पदार्थांचे आविष्करण करण्याची कला. ध्वनी काढण्याला तोंड व ते ऐकण्याला कान ह्या दोन इंद्रियांची साधने या कलेला बस्स होतात आणि दोन्ही साधने बहुतेक प्रत्येक मनुष्यापाशी असतात.

३. अध्वनिपदार्थवाचक व जातिवाचक नामे

अनुकरणात्मक ध्वनींच्या द्वारा आपले मनोगत दुसऱ्यांना कळविण्याचा किंवा आपले भूत मनोगत वर्तमानकाली स्वतःचे स्वतःला प्रत्यक्ष करण्याचा हा शोध मनुष्यमात्राच्या प्रगतीच्या इतिहासात मोठा क्रांतिकारक झाला. ज्या समाजात हा शोध अद्याप झाला नव्हता त्या समाजावर हरएक प्रकारे वर्चस्व मिळाले. टेलिग्राफने मनोगत कळविता येणाऱ्या सध्याच्या पाश्चात्त्यांना तदनभिज्ञ हिंदू, निग्रो, चिनी इत्यादी पौरस्त्यांवर जे वर्चस्व मिळालेले आपण पहातो त्याच अपूर्व मासल्याचे वर्चस्व अनुकरणात्मक ध्वनीच्या भाषेचा शोध लावणाऱ्या समाजांना मिळाले. परंतु कोणत्याही शोधाप्रमाणे हा शोध अपुरा भासू लागला. ध्वनी ज्यापासून ऐकू येईल त्या पदार्थांचे व क्रियांचे नामकरण करता आले हा काही थोडाथोडका लाभ झाला असे नव्हे. परंतु ध्वनी ज्यांना नाही असे पदार्थ व वस्तू असंख्य राहिल्या. ह्या असंख्य अध्वनी वस्तूंचे व क्रियांचे प्रदर्शन येथपर्यंत हावभावाने होत असे. कावळा मांस खातो, हा आशय कळविण्याला अनुकरणार्थ काक हा शब्द उच्चारावा, अध्वनी जे मांस त्याचा तुकडा दाखवावा, खाण्याची क्रिया बक्, भक्, भक्ष या अनुकरणात्मक ध्वनीने ऐकवावी व वर्तमानकालाचा बोध हात

किंवा बोट खाली करून दर्शवावी, इतका खटाटोप करावा लागे. ध्वनी व हावभाव यांचे मिश्रण करून मनोगत कळविण्याची ही तऱ्हा शेकडो वर्षे चालली. ह्या मिश्र तऱ्हेत कान तोंड, डोळे व हात अशा चार साधनांचा उपयोग करावा लागे. ही तऱ्हा उजेडात बरीच कामास पडे. परंतु अंधारात ही फारच लुली व तोकडी भासे. ज्यांना ध्वनी नाही त्या पदार्थांचे व क्रियांचे प्रदर्शन ध्वनीने कसे करावयाचे ऊर्फ त्यांना नांवे कशी द्यावयाची ही अडचण विचारप्रदर्शनाच्या प्रगतीत अत्यंत संकटाची होती व ती काढून टाकण्याला मनुष्याला फार कालावधी लागला असावा. कालांतराने कोण्या कल्पकाला अध्वनी पदार्थांना व क्रियांना सध्वनी पदार्थांच्या व क्रियांच्या आधाराने नांवे देण्याची युक्ती सुचली. दाह किंवा उकाडा झाला असता मराठीत हुष् हुष् असा उद्गार आपण काढतो. वैदिक लोकांचे पूर्वज उष् उष् असा दाहदर्शक उद्गार काढीत. हाच दाहार्थक उद्गार पाणिनीने आपल्या धातुपाठात 'उष् दाहे' म्हणून दिला आहे. ह्या दाहार्थक उष् उद्गारावरून जळजळीत वाळूमधून उन्हाच्या तडाक्यात मनुष्याला वाहून नेणाऱ्या प्राण्याला उष्ट्र म्हणून शब्द निर्माण झाला. उष् म्हणजे दाह, त्यातून तारून नेणारा तो उष्ट्र. दाह करणाऱ्या वनस्पतिरहित ओसाड जागेला उषर व दाहाचा प्रतिकार करणाऱ्या डोक्यावरील आच्छादनाला उष्णीष नांव पडले. त्या प्राण्याच्या आवाजावरून उष्ट्र हे नाव पडलेले नाही. सबब असा तर्क करता येतो की आर्यांच्या अत्यंत प्राथमिक मूलस्थानात उष्ट्र प्राणी नव्हता. ह्या उद्गारावरून प्रभातवाचक उषा, संध्यारागवाचक उषस् व ऊनवाचक उष्ण हे तीन अध्वनी शब्द अस्तित्वांत आले. उषा, उषस्, उष्ण इत्यादी शब्दांत जे प्रत्यय संस्कृतभाषा बोलणारे लावीत ते प्रत्यय संस्कृतभाषा बोलणाऱ्यांचे हजारो वर्षांपलीकडील पूर्वज लावीत नव्हते. प्रत्ययाऐवजी ते प्रत्ययार्थक सबंध शब्दच योजीत.

आस्तेआस्ते प्रत्ययार्थक सबंध शब्दांचे संक्षेप होता होता साक्षात् प्रत्यय निर्माण झाले. परंतु सप्रत्यय भाषेचा काल फार अलीकडील आहे. सध्या ज्या हजारो, किंबहुना लाखो वर्षांपलीकडील भाषेसंबंधी बोलणे चालले आहे तो काल अप्रत्यय भाषेचा होता. प्राणी व वस्तू यांच्या ध्वनीच्या अनुकरणात्मक शब्दांनी बनलेल्या त्या लाखो वर्षांपूर्वील प्राथमिक अप्रत्यय भाषेचा वैदिक किंवा संस्कृत भाषा कदाचित् पंचवीस-तिसावा अपभ्रंश असण्याचा यद्यपि पूर्ण संभव आहे, तत्रापि त्या ध्वन्यनुकारक अप्रत्यय प्राथमिक भाषेचा मागमूस अद्यापही संस्कृत भाषेत बराच राहिलेला आहे. हा मागमूस पाणिनीने दाखवून दिलेला आहे. धन्य आहे ह्याच्या पृथक्करण शैलीची की बहुतेक सर्व संस्कृत शब्दांची धातुबीजे प्रत्ययोपसर्गांची टरफले सोलून काढून त्याने धुतल्या तांदुळाप्रमाणे मोकळी करून ठेविली आहेत. पाणिनीय धातुकोशातील धातू व इतर धातू यांची परीक्षा करता आम्हास असे आढळून आले आहे की सुमारे सातशे धातू ध्वन्यनुकरणोत्पन्न आहेत. कित्येक एकध्वन्यात्मक आहेत व कित्येक अनेक ध्वनींच्या संयोगापासून झालेले आहेत. याशिवाय बोलण्याच्या भाषेत चिमचिम, गपगप, फसफस,

घपघप इत्यादि ध्वन्यनुकारक धातू पाणिनीने व कोशकारांनी जे दिलेले नाहीत, परंतु संस्कृत ग्रंथांतून वारंवार जे भेटतात व जे केवळ बोलण्यात होते असे मराठीतील त्यांच्या अपभ्रंशावरून अनुमानता येते ते हजारो निराळेच. तात्पर्य, लाखो वर्षांपूर्वील आर्यपूर्वज प्राथमिक मनुष्याला किंवा मनुष्यसमाजाला हजारो ध्वन्यनुकारक शब्दांची भाषा अवगत होती आणि अशी स्थिती असणे काही विचित्र नाही. मुळीं बोलणे म्हणजे विकार, विचार, वस्तू व क्रिया ह्यांचे प्रदर्शन मुखातील ध्वनींनी करणे. जो जो म्हणून काही अनुभव आला त्याचे प्रदर्शन मुखध्वनीने करण्याच्या या कलेचे सारसर्वस्व म्हणजे सर्व ब्रह्मांड ध्वनिरूप करून दाखवावयाचे. कोणत्या प्राथमिक समाजाने ब्रह्मांडाचा कितवा भाग कोणत्या तऱ्हेने ध्वनिमय केला असेल हे त्या त्या समाजाच्या बहिःसृष्ट्यनुभवावर व प्रतिभेवर अवलंबून राहणार हे उघड आहे. सध्या आपल्या भोवतील प्राण्यांचे व पदार्थांचे जे आवाज आपण ऐकतो त्याहून भिन्न असे आवाज लाखो वर्षांपूर्वील प्राथमिक मनुष्यसमाजाने ऐकिले असतील हे सांगावयास नको. तत्कालीन दोन सोंडाचे हत्ती किंवा पन्नास हात लांबीच्या सुसरी कोणता ध्वनी करीत असतील अगर तत्कालीन नद्या, झाडे कोणता आवाज करीत असतील त्याची सध्या आपणास कल्पनाही नाही.

आपणास सध्या अज्ञात असलेल्या त्या ध्वनींवरून प्राथमिक मनुष्यांनी जे शब्द बनविले ते शब्द प्राथमिक ध्वन्यनुकरणात्मक नसून सादृश्यावरून बनविलेले साधित म्हणून ठरविण्याची चुकीही आपल्या हातून होण्यासारखी आहे. येथे ऐतिहासिक प्रमाण उपलभ्य नाही. ते लाखो वर्षांपूर्वीचे ध्वनी पुनरुज्जीवित करण्याचे साधन आपणाजवळ नाही. त्यामुळे मूळ शब्द कोणते व कृतक शब्द कोणते ते निवडता येणे परम दुर्घट आहे. उदाहरणार्थ, काळा, पांढरा, हिरवा वगैरे रंगवाचक शब्द घ्या. ह्या निर्जीव पदार्थांना नावे कशी मिळाली ? सादृश्यावरून मिळाली की ध्वनीवरून मिळाली ? काळा, पांढरा, हे जे साधे नित्य भेटणारे रंग आहेत त्यांची नामे प्राथमिक मनुष्याला निर्माण करण्याची आवश्यकता जरूर भासली असेल. त्याशिवाय अत्यन्त साधाही व्यवहार शक्य नाही. आमच्या मते काळा, पांढरा ही रंगनामे खालील तऱ्हेने अस्तित्वात आली असावीत. अत्यन्त कृष्णवर्ण अशा एखाद्या तत्कालीन प्राण्याचा आवाज काळ् काळ् असा असावा व काळा रंग शब्दाने दर्शविण्यास प्राथमिक मनुष्याने काळ् काळ् ध्वनी करणाऱ्या त्या काळ्याकुट्ट प्राण्याचा काल काल ध्वनी अनुकरला असावा. ध्वनीच्या आधारावर तो ध्वनी करणाऱ्या प्राण्याचा जसा बोध करून देण्याचा शोध मनुष्याने लावला, त्याचप्रमाणे तो ध्वनी करणाऱ्या प्राण्याच्या रंगावरून काळा, पांढरा, इत्यादी अध्वनी साध्या रंगांनाही नावे देण्याचा शोध त्याने केला. गुणींच्या ध्वनीवरून गुणांना नावे देण्याचा हा मनुष्यप्राण्याला लागलेला आणीक एक अपूर्व शोध होय. आतापर्यंत ध्वनी करणाऱ्या प्राण्यांना, वस्तूंना व क्रियांनाच तेवढी नावे देण्याची कला त्याला माहीत होती. ह्यापुढे अध्वनी गुणांचेही शब्दाने प्रदर्शन करण्याची कला त्याला हस्तगत झाली.

भा भा ध्वनी करणाऱ्या उज्वल व लखलखीत रंगाच्या पशुपक्ष्यांवरून प्रकाशाला भा हा शब्द मनुष्य लावू लागला. चोचीने, सोंडेने, पायाने किंवा दातांनी पदार्थ करकरा फाडण्याच्या किंवा खाण्याच्या ध्वनीवरून कर हा शब्द सोंडेला किंवा चोचीला किंवा स्वतःच्या हाताला लावण्याची बुद्धी मनुष्याला झाली व कृ करणे व कृ विदारणे हे दोन धातू निर्माण झाले. एणेप्रमाणे गुणांचे शब्दांनी प्रदर्शन करण्याची युक्ती सापडल्यापासून मनुष्याने शब्दांची केवळ टांकसाळ मांडिली.

द्रव्य, कर्म व गुण ह्यांचे दर्शक शेकडो शब्द मनुष्यापाशी साठले. तेव्हा त्यातील जाती ओळखण्याचा म्हणजेच व्यक्ती ओळखण्याचा आणीक एक शोध त्याला लागला. हिरवा, पांढरा, तांबडा, काळा इत्यादी अनेक वर्ण पाहून त्या सर्वांना सामान्य असा रंग हा शब्द त्याने मुकरर केला. रंज् हा मूळ लालभडक रंगाचा द्योतक शब्द होता. त्या शब्दाला सामान्यार्थक बनवून रंग हे जातिनाम मनुष्याने उत्पन्न केले, आणि अशी अनेक जातिनामे तयार केली. नंतर महत्कालान्तराने शास्त्रीय ज्ञानाचा अहंकार झाल्यावर जाती अगोदर की व्यक्ती अगोदर हा वाद तो घालू लागला. जातिकल्पना मनुष्याच्या डोक्यात स्वयंभू आहे आणि भूतभविष्य-वर्तमान सर्व व्यक्तींना व्यापून जाती असते, असा निरर्गल सिद्धान्तही तो ठोकून देऊ लागला. वस्तुतः जातिनामे भाषेच्या व बोलण्याच्या सोईकरता केवळ सांकेतिक आहेत व त्या नामांनी दर्शविलेला अर्थ मूर्त नसून केवळ मानसिक असतो हे त्याच्या लक्ष्यात परवा परवापर्यंत येईना. जातीचा मानसिक अर्थहि जसजशी माहिती वाढत जाते तसतसा बदलत जातो व कधी कधी अजिबात नष्ट होतो; सबब जातिकल्पना स्वयंभू, स्थिर व व्यक्तिप्राक् नाही, हेही तो ध्यानी धरीना. हा जाति-व्यक्तिवादाचा घोटाळा पुढला आहे; परंतु त्याचा उगम प्राथमिक मनुष्यसमाजात लाखो वर्षांपूर्वीच झालेला असल्यामुळे प्रस्तुत स्थली उल्लेख्य झाला. पुढे जरी असा हा घोटाळा जातिनामांनी केला, तत्रापि भाषेच्या व विचाराच्या प्रगतीला जातिनामे जशी सध्या तशीच किंवा त्याहूनहि जास्त पुरातनकाली उपकारक झाली. त्या पुरातनकाली मराठी भाषेची पूर्वज जी वैदिक भाषा तिची पंचवीस-तिसावी पूर्वज जी प्राथमिक अप्रत्यय भाषा ती निव्वळ सुट्या ध्वनींची होती. सार्थ ध्वनी एकापुढे एक काढणे हीच तत्कालीन भाषणशैली. नदीच्या काठावरील सिंहांनी मनुष्य मारिला, हा आशय–नदी कंठ स्थान सिंह मनुष्य झोप–हे शब्द एकापुढे एक उच्चारून कसातरी अर्धामुर्धा दर्शविला जात असे व बाकी राहिलेला अर्थ अंगविक्षेपांनी पूर्ण केला जाई. अनेकवचन बोटांनी किंवा हातांनी दाखविले जाई. अध्वनिपदार्थवाचक शब्द व जातिवाचक नामे अस्तित्वात आल्यावर कालदर्शक व संख्यादर्शक शब्द अस्तित्वात आले. नंतर लिंगभेद समजू लागला. शेवटी वाढ होत होत वारंवार येणाऱ्या संबंधदर्शक शब्दांचे संक्षेप होऊन प्रत्ययोपसर्गादीची निर्मिती झाली आणि लाखो वर्षांनी वैदिक भाषा जीस म्हणतात ती उत्क्रान्त झाली. तिच्यापासन किंवा तिच्या बहिणीपासून

जुनी महाराष्ट्री, महाराष्ट्री, अपभ्रंश व जुनी मराठी अशा परंपरेने आपण सध्या बोलतो ती अर्वाचीन मराठी उदयास आली. प्राथमिक, वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री, मराठी ह्या भाषांची म्हणजे मुखध्वनींनी विचारप्रदर्शन करणाऱ्या साधनांची परंपरा ही अशी आहे.

४. मूळभूत अनेक ध्वनिपरंपरा

ही परंपरा वैदिक आर्यांची झाली. पृथ्वीवर इतर अशाच पाच सात ध्वनिपरंपरा आहेत. असुर भाषा, द्राविड भाषा, चिनी भाषा, अमेरिकन इंडियनांच्या भाषा, आफ्रिकन भाषा इत्यादि विचारप्रदर्शनाची ध्वनिसाधने अनेक झाली आहेत आणि त्यांचे ध्वनी आर्यध्वनींहून भिन्न आहेत. भिन्नध्वनी असण्याचे कारण प्राथमिक अवस्थेत त्या त्या लोकांच्या कानावर आर्यांना भेटले त्याहून इतर प्राण्यांचे व वस्तूंचे भिन्न ध्वनी पडले हे होय. ह्या आर्येतर लोकांच्या ध्वनिसाधनांचा विचार येथे इतकाच स्पर्शून, आर्यांच्या दुसऱ्या एका विचारप्रदर्शक साधनाकडे वळू.

५. अभिप्रायदर्शक चित्रकर्म

मुखध्वनींनी विचारप्रदर्शन करावयाचे म्हटले म्हणजे ऐकणारी व्यक्ती बोलणाऱ्या व्यक्तीच्या आटोक्यात हजर असावी लागते. व्यक्ति गैरहजर असली तर ह्या ध्वनि-साधनाचा कांहीएक उपयोग होत नाही. ध्वनी धरून ठेवून गैरहजर इसम त्या स्थानी आला असता तो त्याच्या कानांवर पडावा, ही युक्ती त्या प्राथमिक अवस्थेत असंभाव्य होती. तथापि प्राथमिक अवस्थेत त्यांतल्या त्यांत मनुष्याला एक युक्ती सुचलीच. तो ज्या स्थली रहात असे—प्रायः डोंगरकपारी किंवा गुहा—तेथील भिंत्तिसदृश खडकावर किंवा खाल्लेल्या अथवा मारलेल्या प्राण्याच्या हाडावर आपल्या अवस्थेचे रेखाचित्र तो कोरी व त्या चित्रद्वारा आपले मनोगत आतेष्टांना कधीकाळी तरी कळेल अशी आशा बाळगी. ह्या कोरकामाप्रमाणेच रंगचित्राचेही काम प्राथमिक मनुष्याला माहीत होते, असे विंध्य-पर्वतांतील अवशेषांवरून उघड होते. गैरहजर मनुष्यांकरताच तेवढे कोरकाम किंवा रंगचित्र प्राथमिक मनुष्य काढी असे नव्हे. जेथे भाषेने संपूर्ण मनोगत शब्दद्वारा कळविता येत नसे, तेथे हजर मनुष्यांना काठीने किंवा बोटाने जमिनीवर रेवा व पाने, भूर्जपत्रे, इत्यादींवर रंगचित्रे काढून तो आपले मनोगत स्पष्ट करी. रंगचित्र व कोरीव रेखाचित्रे यांचा प्राथमिक मनुष्य शब्दांच्या बरोबरीने उपयोग करीत असावा असा बळकट अंदाज आहे. प्राथमिक मनुष्याचे जे रेखाकर्म किंवा रंगचित्रकर्म हिंदुस्थानात सापडते त्याचा संबंध आपणा वैदिक लोकांच्या पूर्वजांशी नाही. कारण आपण ह्या देशांतील मौल नव्हो. तथापि, आपणा आर्यांचे मूलस्थान हिंदुस्थानाबाहेर जेथे कोठे असेल तेथे आपल्या प्राथमिक पूर्वजांनी कोरीव व रंगीत चित्रे विचारप्रदर्शनार्थ काढिली असतील यात बिलकुल संशय नाही. ध्वनी ऊर्फ भाषा जशी मनुष्याला उपजत आहे तसेच कोरकाम

व रंगचित्रकर्म ही दोन्ही मनुष्याला स्वयंभू आहेत. तत्रापि, आपणा आर्यांचा संबंध हिंदुस्थानातील प्राथमिक कोरीव व रंगीत चित्रकर्माशी दुसऱ्या एका बाजूने पोहोचतो. वैदिक आर्यांच्या पूर्वी या देशात नागलोक रहात असत. ते जर येथील मौल असतील तर प्राथमिक अवस्थेतील त्यांचे हे चित्रकर्म असू शकेल. नागलोकांची चित्रकर्माबद्दल ख्याती असे. ह्यांचा शरीरसंबंध वैदिक आर्यांशी झालेला इतिहाससिद्ध आहे व नागवंशाचा अंतर्भाव आर्यवंशात करण्याची रुढीही आहे. कसेही असो, कोरीव किंवा रंगीत चित्रकर्माने मनोगत व्यक्त करण्याची कला ध्वनींनी मनोगत व्यक्त करण्याच्या कलेइतकीच बहुतेक प्राथमिक आहे. प्राथमिक अवस्थेत चित्रीकरणाचे हे साधन सामान्य रोजचे विचार प्रगट करण्याच्या उपयोगी पडे. प्राथमिक अवस्थेत ह्या स्वयंभू चित्रसाधनाचा अवलंब विचारप्रकटनार्थ केल्यावाचून आर्य राहिले असतील हे संभवत नाही.

६. चित्रांचे व ध्वनींचे पृथकरण

शब्दसाधनाला फक्त तोंड व कान ही दोन इंद्रिये लागतात. चित्रसाधनाला हात व डोळे ही दोन इंद्रिये लागून शिवाय एखादा चित्रक्षम बाह्य पदार्थ लागतो. शब्दसाधन अंधारात व उजेडात सारखेच उपयोगी पडते, परंतु गैरहजर माणसाला निरुपयोगी असते. जणू काय, चित्रसाधन गैरहजर माणसाच्याच करिता प्राथमिक मनुष्याने निर्माण केले. पहिल्या वस्तूचा कालांतराने स्वतःला किंवा इतरांना पुनः पुनः अनुभव आणून देण्यास चित्रकलेचे हे साधन प्राथमिक मनुष्याला फारच साहाय्यक झाले असावे. इतके की चित्राने तो निरोपही पाठवीत असावा. ह्या कलेचा जसजसा जास्त अनुभव येत चालला तसतशा त्यात सुधारणा होत गेल्या. फळ्यांवर किंव भूर्जपत्रांवर महत्त्वाच्या प्रसंगाची किंवा वीरांची चित्रे काढून ती गोत्रांतील आसपास जवळ दूर राहणाऱ्या मनुष्यांस दाखवीत हिंडणारे वक्ते उत्पन्न झाले व चित्रांच्या अनुषंगाने रसभरित कथा करू लागले. आपल्याकडे निरक्षर लोकांत चित्रकथी हा धंदा अद्यापही करतात. ही चित्रकथकांची संस्था अत्यंत जुनी आहे, इतकी जुनी की वेदादिग्रंथ तिच्या मानाने अत्यंत अर्वाचीन समजावे लागतात. ऋग्वेदांत चित्र हा शब्द येतो व त्याचा अर्थ आश्चर्यवत् पहाणे असा करतात. धातुपाठकार चित्रीकरण व कदाचित् दर्शन असे दोन अर्थ चित्रधातूचे देतो. ऐतिहासिक दृष्ट्या पहाता चित्रीकरण हा अर्थ जुना धरावा असे मत होणे रास्त आहे. चित् हा प्राथमिक अवस्थेतील अत्यंत जुना धातू. त्यापासून संज्ञा ज्या वस्तूची झाली ती वस्तू बाह्य पदार्थावर रेखाटणे या क्रियेला चित्र् हा शब्द लावू लागले. मन् विचार करणे यापासून दुसऱ्याच्या हृत्पटावर तो विचार काढणे याला मंत्र हा शब्द, किंवा तन् पसरणे पासून दुसऱ्यावर हुकुमत पसरणे या अर्थी तंत्र हा शब्द, याच मासल्याचे आहेत. चित्र, मंत्र, तंत्र हे शब्द चित्, मन् तन् या शब्दांहून अर्वाचीन. येणेप्रमाणे चित्रीकरणाची ही कला वैदिक लोकांच्या पूर्वजांत अती जुनी आहे व विचार प्रगट करण्याचे एक साधन

म्हणून मुख्यतः ती प्रथम अस्तित्वांत आली. शब्दसाधन व चित्रसाधन यांमध्ये दुसरा फरक असा आहे की ध्वनीचे अनुकरण शब्दसाधन करते व आकृतीचे अनुकरण चित्र करते. आकृती जशी दिसते तशी मनुष्य डोळयाने ग्रहण करतो. सृष्टीत आकृत्या बहुत मिश्र असतात, साध्या नसतात. तळ्यावरील झाडावर हातात दगड घेऊन उभ्या राहिलेल्या माकडाने चोचीत सर्प धरणारी घार मारिली, ही सर्व मिश्र अवस्था माणूस एकदम पहातो व तिचे मिश्र चित्र प्रथमतः काढतो. नंतर बहुत कालांतराने मिश्र अवस्थे-तील एक एक बाब तो पृथक् करावयाला शिकतो. प्रथम मिश्र व नंतर साधे, ही परंपरा चित्रीकरणात जशी दिसते तशी ध्वनीकरणांतही दिसते. पशुपक्ष्यादी प्राणी एकेक सुटा ध्वनी करीत नाहीत, अनेकध्वनिसंवलित ध्वनिपरंपरा करतात. ही ध्वनिपरंपरा मनुष्याच्या कानावर पडते व तिचे अनुकरण ध्वनिपरंपरेने मुखद्वारा साधण्याचा प्रयत्न तो प्रथम करतो आणि नंतर त्या मिश्र ध्वनिपरंपरेतील एखाद्या सुट्या ध्वनीची अनुकरणार्थ निवड करतो. मिश्रांतून सुट्याचा उदय होण्याला किती कालावधी लागला असेल त्याची कल्पनाच करावी. मिश्र चित्रांतून सुट्या चित्रावर यावयाचा काल व मिश्र ध्वनींतून सुट्या ध्वनीच्या अनुकरणावर यावयाचा काल एक होय. मिश्र ध्वनीवरून व मिश्र चित्रावरून सुट्या ध्वनीवर व सुट्या चित्रावर येण्याच्या यातना भोगताना, प्राथमिक मनुष्य फारच गडबडला, गोंधळला, घुटमळला व भांबावला असेल. स्पानिश घोडेस्वार पाहून घोडे आणि स्वार ह्या दोन वस्तू एकच असाव्या हा जसा गोंधळ असेरिकन इंडियनांचा प्रथमदर्शनी झाला व नंतर कालांतराने घोड्याचे स्वारापासून त्यांनी पृथक्करण केले, किंवा पाण्याचा थेंब पाहून तो अविभाज्य द्रव्य असावा अशी भ्रामक समजूत अनेक युगे चालून नंतर हैड्रोजन व आक्सिजन ह्या दोन द्रव्यांत त्याचे रसज्ञांनी पृथक्करण जसे नुकते परवा केले आणि हे पृथक्करण झाल्यावर जो हिरमुसलेपणा, अचंबा व हर्ष इंडियनांना व रसज्ञांना झाला तोच हिरमुसलेपणा, आचंबा व हर्ष मिश्र चित्रावरून व मिश्र ध्वनीवरून सुट्या चित्रांवर व सुट्या ध्वनीवर येताना प्राथमिक मनुष्याला झाला.

७. चित्रलिपीचा उदय

सुट्या ध्वनिसाधनाने तीन बाबींचा बोध होतो : (१) बाह्य वस्तू, (२) त्या वस्तूची मनातील कल्पना आणि (३) बाह्य वस्तू व आंतर कल्पना यांचा दर्शक स्वतः शब्द. प्राथमिक मनुष्य चित्राने प्रथम बाह्य वस्तू दाखवू लागला. मग त्या वस्तूला नाव म्हणजे शब्द म्हणजे ध्वनी त्याने दिला असो किंवा नसो. कालांतराने त्याच्या असे लक्षात आले की, चित्र जी वस्तू दर्शविते त्या वस्तूचा जो ध्वनी त्या ध्वनीचेही दर्शक चित्र होऊ शकेल. एथपासून चित्र ध्वनीचे म्हणजे वस्तुदर्शक शब्दाचे दर्शक झाले. घोड्याचे चित्र घोडा या वस्तूचे जसे दर्शक तसेच घोडा या शब्दाचे दर्शक झाले. पुढे असे सुचले की घोड्याचा सबंध सगळा आकार काढण्यापेक्षा नुसता घोड्याचा मुखवटा

काढला तरी तेवढा मुखवटाच घोडा शब्दाचा दर्शक होऊ शकेल. ह्या युक्तीने चित्रानी शब्द दर्शविण्याला उवडच जास्त सोईचे झाले. चित्रलेखनाने वस्तूही ध्यानात येई व शब्दही ध्यानात येई. चित्रलेखनात शब्दांचे समास देखील दाखविता येत. तडागांतर्गत-मच्छः ह्या शब्दसमासाचा किंवा कल्पनासमासाचा चित्रसमास तळ्याच्या चित्रात माशाचे चित्र काढून दाखविला जाई. एणेप्रमाणे चित्रलेखनाची कला अस्तित्वात आली.

८. मूळाक्षरांची लिपी

परंतु ही कला कालांतराने फार अवजड झाली. जेवढ्या म्हणून वस्तू व कल्पना मनुष्याला अवगत होत्या त्या हजारो वस्तूंची व कल्पनांची हजारो चित्रे काढावी लागत व त्यांचे अर्थ ध्यानात ठेवावे लागत. शिवाय निरनिराळे कलावंत एकाच वस्तूची निर-निराळीं चित्रे काढून घोटाळा माजवीत असतील तो निराळाच. सबंद प्राणी काढण्याचे सोडून दिले, तरी प्राण्यांच्या मुंडक्यांची, कानांची, खुरांची, चोचींची व शेपटांची चित्रे काढणे आणि हसणे, लाजणे, खाणे, पळणे इत्यादी क्रियांची चित्रे काढणे फार बेताल भासू लागले. ह्या भानगडीतूनही कल्पक मनुष्याने रस्ता काढला. साक्षात् मुंडकी, कान काढण्याऐवजी उभ्या, आडव्या, तिरप्या वाकड्या, वक्र, खाली, वर, पुढे व मागे, रेघा काढून वस्तू व शब्द दाखविण्याची युक्ती निघाली. रेघोट्यांत आकृतीचा चित्रपणा व वस्तुदर्शनत्व सहजच मागे पडत चालले व त्या फक्त शब्दांच्या व तद्द्वारा वस्तूच्या बोधक झाल्या. रेघोट्या शब्द दाखवीत, त्यामुळे त्यांची संख्या शेकडोंनी मोजावी लागे. शब्द फोडून त्यांतील निरनिराळे अवयव विवक्षित रेघांनी दर्शविण्याची क्लृप्ती ही ह्या-पुढील पायरी होय. तत्रापि हजार पाचशे खुणा ध्यानात ठेवाव्या लागतच. शेवटी शब्दावयव ज्या साध्या ध्वनीचे बनलेले असतात त्या साध्या ध्वनींच्या दर्शक अशा खुणा अस्तित्वात आल्या, म्हणजे मातृका म्हणून ज्यास संस्कृत शब्द आहे त्यांचा शोध झाला. ह्या मातृकांना म्हणजे मोजक्या विवक्षित खुणांना संस्कृतांत अक्षरे म्हणजे न बदलणाऱ्या कायमच्या खुणा असे अन्वर्थक नांव पडले. मूळाक्षरांचा शोध हा असा पायरीपायरीने व बहुत प्रयासाने लागलेला आहे, एकदम नव्याने कोणी निर्माण केला असा अर्थ नाही. मूळाक्षरे ही अगदी साध्या अत्यंत पृथक्कृत ध्वनीची तेवढी दर्शक आहेत, वस्तू किंवा कल्पना किंवा शब्द यांची दर्शक नाहीत. चित्रावरून अक्षरापर्यंत येता येता, वस्तू व कल्पना यांना अजिबात काट मिळून फक्त साधा पृथक्कृत ध्वनी तेवढा राहिला.

९. अक्षर व वर्ण

अक्षरसंस्थानाचा हा असा समाम्नाय म्हणजे परंपरा आहे. (१) सबंध प्रसंगाचे मिश्र चित्र, (२) सुटे चित्र, (३) चित्राचा भाग, (४) सरळ रेघा, (५) वक्र रेघा, (६) शब्ददर्शक रेघा, (७) शब्दावयवदर्शक रेघा, व (८) शेवटी साध्या मूळ-ध्वनीच्या सरळवक्र रेखामय खुणा ऊर्फ मूळाक्षरे, अशी लांब परंपरा आहे. चित्रणे व

लिहिणे यांची प्राक्सिद्धी झाल्यावाचून मूळाक्षरांची सिद्धी शक्य नाही. मूळाक्षरांच्या पूर्वी चित्र काढणे व रेषा काढणे या क्रियांचे ज्ञान मनुष्याला अवश्य आहे. अर्थात ज्यांना मूळाक्षरे माहीत आहेत ते लोक स्वतः तरी किंवा ज्यांच्यापासून त्यांनी मूळाक्षरे उसनी घेतली ते लोक लिहिण्याच्या टप्प्यावरून अगोदर गेले असले पाहिजेत. वर उल्लेखिलेल्या आठ पायऱ्या चढल्याशिवाय मिश्रध्वनीचे मूलध्वनीत पृथक्करण करता येणे संभाव्यसुद्धा नाही, मग शक्य कोठून असेल? सुलभ व सोईस्कर मूळाक्षरांच्या शोधावर येत असताना व आल्यावर नंतर मूलध्वनीचे पृथक्करण मनुष्याला शक्य झाले. वैदिक आर्यांनी ज्या काली अक्षरांचा शोध केला त्या काली अक्षरांना ते वर्ण या संज्ञेनेही ओळखीत. वर्ण व अक्षर हे दोन शब्द शकपूर्व १००० च्या सुमारास झालेल्या पाणिनीच्या अष्टाध्यायीत गृहीत धरलेले आहेत. वर्ण म्हणजे रंगाने काढलेली ध्वनीची खूण व अक्षर म्हणजे ध्वनीची न बदलणारी खूण. ऱ्हस्वं लघु व दीर्घं च, या दोन सूत्रांत ऱ्हस्वं या नपुसकलिंगी रूपांपुढे उच्चार हा पुल्लिंगी शब्द अध्याहृत समजता येत नाही, अक्षर किंवा वर्ण हे दोन नपुंसकलिंगी शब्दच अध्याहरणे भाग पडते. अक्षर व वर्ण ह्यांच्यात भेद असा आहे की लोखंडी शलाकेने फळा पाटी, दगड वगैरे कठीण भूमीवर खोदून जी आकृती निघते तिला अक्षर म्हणत व भूर्जपत्रादि मऊ भूमीवर रंगाने काढलेल्या आकृतीस वर्ण म्हणत. शलाकादी कठीण पदार्थांनी दगडावर रेखाचित्रे व रंगांनी रंगचित्रे काढण्याची कला अत्यंत प्राथमिक मनुष्याला माहीत होती, हे सुप्रसिद्ध आहे. तेव्हा पाणिनिकालीन आर्यांना ह्या लेखनाच्या दोन्ही तऱ्हा माहीत होत्या हे सांगणे नको. इतकेच नव्हे तर रेषांच्या खुणांनी संख्यादर्शक ध्वनी दर्शविण्याची कला ऋग्वेदकालीच माहीत होती, हे पंचकर्ण्यः व अष्टकर्ण्यः ह्या रूपांवरून सर्वमान्य आहे. सबब, अरेमियन लोकांपासून अक्षरे हिंदूंनी उसनी घेतली असावी इत्यादी तर्क सयुक्तिक दिसत नाहीत. उलट अरेमियन लोकांनी आर्यांच्यापासून अक्षरे काढण्याची व अक्षरसमाम्नायाची कला उचलली असावी, असे दिसते. शकपूर्व चौदाव्या शतकात आर्यांचा अंमल मितानी देशावर असण्याच्या सुमारास अरेमियन लोकांनी आर्य अक्षरसमाम्नाय बहुशः घेतला असावा आणि तोही मोडून तोडून अर्धाकच्चा केला असावा. मूलस्थानातून हिंदुस्थानात येऊन राहिल्यामुळे, मूलस्थानांत भौगर्भिक अदलाबदल झाल्यामुळे व मधील टापूत अद्याप शोध व्हावयाचा असल्यामुळे आर्यांच्या रेखाचित्रांचा व रंगचित्रांचा वगैरे पत्ता लागलेला नाही. तत्रापि पाणिनीपूर्वी आर्यांनी वर्णसमाम्नाय शोधून काढलेला होता यात बिलकुल संशय नाही. हीच पाणिनिकालीन वर्णमाला अपभ्रंश होत होत महाराष्ट्रात बालबोध या संज्ञेने प्रचलित आहे.

१०. विचारसूचक अभिनय

विचारप्रदर्शनार्थ साधन म्हणून ध्वनीपासून मनुष्याने एका पाठीमागून एकएक शोध

करून महत्कालांतराने भाषा निर्माण केली व चित्रांपासून अक्षरे निर्माण केली. ह्या दोन सृष्ट्या उत्पन्न करण्याच्या प्रारंभाच्याही पूर्वी तिसऱ्या एका साधनाचा मनुष्याने उपक्रम केला. ते साधन हावभाव ऊर्फ विक्षेप हे होय. ह्या साधनाचा प्रस्तुत लेखाच्या प्रारंभी उल्लेख केला आहे. या साधनाची प्राथमिक मनुष्यांत जी स्थिती होती तीच स्थिती सध्याही आहे. भाषा व अक्षरे यांच्या अबाढव्य प्रगतीमुळे विचारप्रदर्शन व व्यवहार करण्याच्या कामी हे साधन सुधारण्याची आवश्यकता नव्हती, आणि भाषा व अक्षरे यांच्या अभावी आवश्यकता असती तत्रापि भाषा व अक्षरे जे ब्रह्मांड काम करतात ते करण्याची या साधनाची क्षमताही नाही. तत्रापि बोलण्याला पोषक दुजोरा म्हणून याची विचारप्रदर्शनाच्या कामी ज्यांना भाषा कळत नाही त्या पशुपक्ष्यांशी व्यवहार करण्याच्या कामी, व भाषा आणि अक्षरे यांनी जे विचार व विकार प्रदर्शित करता येणे मुष्कील आहे ते विचारविकार दाखविण्याच्या कामी, ह्या साधनाचा मनुष्यप्राणी अतिशय उपयोग करीत आलेला आहे व त्यास त्याने व्यवहारक्षमताही आणलेली आहे. नैसर्गिक हाव-भावांचे परिणत व कृत्रिम रूप म्हटले म्हणजे ज्यास अभिनय म्हणतात तो होय. अनुकरणात्मक ध्वनीचे भाषा हे जसे परिणत व कृत्रिम रूप, किंवा अनुकरणात्मक रेषांचे अक्षर हे जसे परिणत व कृत्रिम रूप, तसेच अनुकरणात्मक सहज विक्षेपांचे अभिनय हे परिणत व कृत्रिम रूप आहे.

११. आकृति-निर्मिती

ध्वनी, रेषा व हावभाव या तीन साधनांइतकेच जुने एक चौथे साधन प्राथमिक मनुष्याला अनुकरणाने सुचले. ते हे की, पाहिलेल्या वस्तूची हुबेहूब आकृती बनविणे. रेषांचे साधन लांबी व रुंदी या दोन परिमाणांतून कार्य करते. हुबेहूब आकृतीच्या साधनाला लांबी व रुंदी लागून शिवाय आणीक खोलीही लागते. प्रथम प्रथम ह्या आकृती तो लाकडाच्या, मातीच्या किंवा दगडाच्या बनवी. राही त्या कपारीचे किंवा गुहेचे अनु-करण करून दोन उभ्या दगडावर तिसरा एक दगड ठेवणे, किंवा राही त्या झाडावरील माच्याचे अनुकरण करून पाण्यात माचे बांधणे, नदीतील रांजण पाहून त्या सारखे लहान मोठे रांजण व रांजण्या करणे, बेलफळे, नारळ इत्यादींच्या कवट्याप्रमाणे मातीची भांडी करणे, गुहेतील पाण्याच्या थिबकण्याने बनलेल्या स्तंभाप्रमाणे दगडाचे स्तंभ बनविणे, पशुपक्ष्यांच्या मृत्तिकामय, दारुमय किंवा पाषाणमय मूर्ती घडविणे, इत्यादी त्रिपरिमाणक आकृत्या बनवून त्यांची कल्पना इतर माणसांना करून देण्याचा हव्यास प्राथमिक मनुष्याला असे. ह्याचीच परिणती होत होत जमिनीवर व पाण्यावर स्वतःच्या उपयोगा-करता नाना प्रकारची भांडी बनविण्याची कला मनुष्याने निर्माण केली. ही कला परिणत दशेस यावयाला हजारो किंबहुना लाखो वर्षे लागली. हे पुनः पुनः सांगण्याचे कारण नाही.

१२. भाषा, वर्ण इत्यादींची दैवी उत्पत्ती

एणेप्रमाणे (१) ध्वनीपासून भाषा, (२) रंगीत किंवा साध्या रेखाचित्रापासून अक्षरमालिका, (३) नैसर्गिक हावभावापासून कृत्रिम अभिनय, व (४) पाहिलेल्या आकृतींपासून बनावट भांडी, अशा चार कृत्रिम व्यावहारिक कला मनुष्याने आपल्या अकलेने संपादन केल्या. शेकडो टक्केटोणपे खाऊन व हजारो प्रयोगात फसून मनुष्याला ह्या चार नित्योपयोगी कला परम कष्टाने व निढळाच्या घामाने साध्य झाल्या. कोण्या काल्पनिक स्वर्गात किंवा नरकात राहणाऱ्या देवासुरांनी दिल्या अश्यातला बिलकुल भाग नाही. शंकराच्या डमरूतून ध्वनी निघाले, चित्रलेखानामक गंधर्वकन्येने चित्रे काढण्याचे कसब शिकविले, कोण्या किन्नराने अभिनय पढविला किंवा विश्वकर्म्याने भांडी बनविण्याचा धडा घालून दिला वगैरे बोलणी केवळ भाकडकथा होत. ह्या सर्व भाकडकथांचा अर्थ इतकाच आहे की भाषा, अक्षरमालिका, अभिनय व भांडी निर्माण करण्याची परंपरा काय आहे याचा ऐतिहासिक उलगडा करण्याचे ज्ञान परवापरवापर्यंत भारतीय मनुष्यात नव्हते. ज्या बाबींचा उगम, घटना, वृद्धी व परिणती कळत नव्हत्या त्या बाबी कोण्यातरी दैवी शक्तीच्या प्रसादाने प्राप्त झाल्या, असा अर्थ अज्ञ मनुष्य सदैव व सर्वत्र लावीत असलेला दृष्टीस पडतो. हे सर्व आपलेच स्वतःचे कर्तृत्व आहे, हा शोध मनुष्याला परम कष्टाने लागलेला आहे. आता शंकराच्या डमरूचे किंवा देवांच्या विश्वकर्म्याचे किंवा वागधिष्ठात्या सरस्वतीचे किंवा पशुपक्ष्यांचे नामकरण करणाऱ्या नोहाचे दैवी अर्थाने काहीएक प्रयोजन उरलेले नाही. ऐतिहासिक दृष्टीने यांच्यातूनही इतिहास निघण्यासारखा आहे.

१३. वास्तव व भ्रांत कलांचा विकास

ध्वनी, रेषा, हावभाव व आकृती यांना भाषा, अक्षर, अभिनय व भांडी यांचे रूप देऊन या चारी नैसर्गिक व अनुकारक शक्त्यांचा उपयोग रोजच्या व्यवहारातील विचार-प्रदर्शनाच्या कामी मनुष्याने केला. साध्या, सरळ, पोटभरू व्यवहाराला ही भाषादी साधने साळसूदपणे पुरी पडतात, हे खरे आहे. परंतु विचारांचे किंवा विकारांचे जेव्हा काहूर उठते आणि सुखदुःखादींचा जेव्हा कल्होळ माजतो, तेव्हा साधी बोलणी आणि सुधी लिहिणी कुचकामाची ठरतात आणि तीव्रतर साधनांचा आश्रय केल्यावाचून वादळाची शांती होत नाही. विचारांचा व विकारांचा हा तीव्र आवेग दर्शविण्यास मनुष्याने अगदी अज्ञातपूर्व अशी नवीन साधने शोधून काढली असे नाही. पूर्वीचा पाया ज्याला बिलकूल नाही, असे नवीन काहीच शोधून काढणे शक्य नाही. पाया पूर्वीचाच, साधने तीच, फक्त भरदारीत फरक. साध्या बोलण्याला जो ध्वनी लागतो त्यालाच दीर्घ व भरदार करून कोणत्याही आवेगाचे प्रदर्शन तीव्रपणे करणे म्हणजेच गाणे. साध्या मूळाबरहुकूम चित्ररेखांना आवेगाचे तीव्र रूप भरदार, काल्पनिक व नाजूक रंगांनी देणे

म्हणजेच चित्र काढणे. साध्या हावभावांचा अतिशय करणे म्हणजेच नाचणे. आणि साध्या नित्याच्या घन आकृतींना तीव्र आवेग दाखवावयास लावणे म्हणजे मूर्ती करणे. एणेप्रमाणे ध्वनी, रेखा, हावभाव व आकृती या प्रत्येकापासून मनुष्याने साधेपणा व अतिशायन ह्या ऐच्छिक भेदांवर दोन दोन निरनिराळ्या कला उत्पन्न केल्या. त्यांचा नकाशा असा मांडता येईल :—

गुण	साधेपणा ऊर्फ व्यवहार	अतिशायन ऊर्फ तीव्रता
१ ध्वनी	भाषा	गान
२ रेखा	अक्षर	चित्रण
३ हावभाव	अभिनय	नृत्य
४ आकृती	भांडे	मूर्तिकरण

साधेपणाने नित्याचा अनेकविध अनंत व्यवहार होत असतो. अतिशायनाने तीव्र अनुभवांचे प्रदर्शन होते. वारंवार असे प्रसंग येतात की रोजच्या साधेपणाचा वीट येतो व आकस्मिक तीव्र अतिशायन सर्वांनाच सदा साध्य नसते. सबब साधेपणा व अतिशायन यांचे कमजास्त मिश्रण करून कल्पक मनुष्याने आणीक चार कला निर्माण केल्या. भाषेतील निवडक शब्द व गाण्यातील ठेकेदारपणा यांच्या मिश्रणाने मनोहर काव्य ज्याला म्हणतात ते जन्मास आले. अक्षरे व चित्रण यांच्यापासून सुबोध चित्रमय ऊर्फ सचित्र ग्रंथ उदय पावले. अभिनय व नृत्य या दंपत्यापासून नाटक हे दिवटे पोर निपजले. आणि भांडे व मूर्तिकरण या जोडप्याने स्थापत्य हे बडे प्रकरण जन्मविले. सगळ्यांनाच तानसेन होता येत नाही, पण स्रग्धरा किंवा मालिनी बहुतेक सर्वांना कंठारूढ करता येते. अजंठा फार थोड्यांच्या आटोक्यात असतो. पण चित्रमयजगत् इच्छा असल्यास घरोघर पाहता येते. तांडव एकट्या शंकरालाच शक्य आहे, पण ललिते आणि तमाशे गांवढ्यांचे मन रिझवितात. भिवा सुताराला बरोबर मजुरीला आणता येत नाही, पण एखादी जाळीदार मेहरप किंवा सुंदर वृंदावन थोड्या खर्चात कोणालाही साध्य आहे. साध्यासाध्यतेच्या व शक्याशक्यतेच्या दृष्टीने या ज्या चार कला निर्माण झाल्या त्यांचा नकाशा असा :—

१ ध्वनी	भाषा	×	गान	=	काव्य
२ रेखा	अक्षर	×	चित्रण	=	चित्रमय ग्रंथ
३ हावभाव	अभिनय	×	नृत्य	=	नाटक
४ आकृती	भांडे	×	मूर्तिकरण	=	स्थापत्य

गाणे, चित्रिणे, नाचणे व मूर्तिकरणे, किंवा काव्य, सचित्र ग्रंथ, नाटक व स्थापत्य हा आठही कलांत अंतःकरण जे मन व मनाचा मालक जो मनुष्य त्याची कर्तबगारी

प्रधान असते. मनुष्याची कर्तबगारी व लुडबूड ज्यात अप्रधान असते अशाही चार बिना ध्वन्यादींच्या पायावर मनुष्याला पैदा करता आल्या. प्रायः बाह्यसाधनावर विशेष मदार ठेवून ह्या बिना मनुष्याने बनविल्या. कातडी, बांबू, धातू, केश, तारा इत्यादींच्या-वर आघात केला असता ध्वनी निघतो व तो ध्वनी योग्य तऱ्हेने वळविला तर त्याच्या-पासून सुस्वर उत्पन्न होतात. बाह्य पदार्थांपासून सुस्वर काढण्याच्या ह्या कलेला वादन म्हणतात. वस्तूंची हाताने चित्रे काढण्यापेक्षा प्रकाशाच्या द्वारा ती काढून घेण्याची प्रकाशलेखनकला महशूर आहे. नटांची मातब्बरी सफा काढून टाकून केवळ बाहुल्यांच्या-कडून अभिनय व नर्तन करविण्याची कळसूत्राची कला अत्यन्त पुरातन आहे. मूर्तीच्या आंगलटीत व मुखचर्येत विचार व विकास साठविण्यापेक्षा वृक्ष, वेली, उपवने, उद्याने, मैदाने व टेकड्या यांच्या विशिष्ट रचनेने विचार व विकार चेतविण्याची भूमिरचनेची कला भरतखंडात फार जुनी आहे. वाद्यात फोनोग्राफ, चित्रणात प्रकाशलेखन व कळ-सूत्रात सिनेमा ही रूपे आधुनिकशास्त्रज्ञानोत्पन्न अतएव सद्यस्क आहेत. ह्या तिहींखेरीज बाकींची सर्व रूपे आपल्या ह्या महाराष्ट्रात प्राचीन कालापासून उमद्या स्थितीत असलेली आढळतात. ह्या बाह्य कलांचा जोड पूर्वीच्या आठ कलांना दिला असता नकाशा व परंपरा अशी बनते—

मूळ मनुष्याधीन साधन	साधा व्यवहार	अतिशायन	व्यवहार × अतिशायन	बहिःसाधन
१ १ ध्वनि	२ भाषा	३ गान	४ काव्य	५ वाद्य
६ २ रेखन	७ अक्षर	८ चित्रण	९ चित्रमय ग्रंथ	१० प्रकाशलेखन
११ ३ हावभाव	१२ अभिनय	१३ नृत्य	१४ नाटक	१५ कळसूत्री बाहुल्य
१६ ४ घन आकृती	१७ भांडी	१८ मूर्तिकरण	१९ स्थापत्य	२० भूमिरचना

ह्या वीस रस्त्यांनी मनुष्य विचार व विकार प्रगट करीत असतो. पैकी १ ध्वनि, ६ रेखन, ११ हावभाव व १६ घनाकृती, आणि २ भाषा, ७ अक्षर, १२ अभिनय व १७ भांडी या आठ मूळ व्यावहारिक साध्या साधनांच्या कार्यासंबंधाने मागे उल्लेख केला आहे. प्रकृत लेखात भांडे या शब्दाचा अर्थ विचारविकारप्रदर्शनार्थ किंवा व्यवहारोपयोगार्थ बनविलेली प्रतिमा, मूर्ती, घर, छप्पर, हौद इत्यादि कोणतीहि घन आकृती असा समजावयाचा आहे. अतिरेक होऊन विकार व विचार मनात मावतनासे झाले, द्रवून उतू जाऊ लागले व साध्या साधनांच्या द्वारा प्रदर्शित करता येतनासे झाले

म्हणजे अतिशायनाच्या ज्या ३ गान, ८ चित्रण, १३ नृत्य व १८ मूर्तीकरण ह्या कला, त्यांचा आश्रय मनुष्य करतो. मनाचे द्रवून जे उतू जाणे त्यालाच रस म्हणतात. शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, रौद्र, भयानक, बीभत्स व शांत ह्या नऊ तऱ्हांनी द्रवून मन उतू जाते व ह्या नवाही उतांचे प्रदर्शन गान, चित्रण, नृत्य व मूर्तीकरण या चार अतिशायनांनी मनुष्य साधतो. शब्द व भाषा यांचा व गानाचा काहीएक संबंध नाही. गान हजारो शब्दांनी बोलत नाही, फक्त सप्त स्वरांनी नवरस बोलते. चित्रण अक्षरांनी म्हणजे बावन मातृकांनी अर्थ दाखवीत नाही. फक्त पाच रंगांच्या न्यूनाधिक्याने नवरसांचे आविष्करण करते. नृत्य म्हणजे साधे अभिनय नव्हत, अंगांच्या उद्धत हावभावांनी नवरसांचे प्रकटीकरण म्हणजे नृत्य अथवा खरे म्हटले म्हणजे तांडव; आणि मूर्तीकरण म्हणजे केवळ भांडी घडणे नव्हे, तर घनाकृतीच्या उठावांनी नवरसांचे प्रदर्शन करणे. अतिशायनाच्या ह्या गानादी चार कला, साध्या व्यवहाराच्या भाषादी चार कला, व मूळ ध्वन्यादी चार साधने, मिळून विचारविकारप्रदर्शनाच्या बारा साधनांची कार्ये केवळ इयत्तेच्या चढउताराने बनलेली आहेत. आता तक्त्यात काव्यादी जी चार साधने मांडिली आहेत ती साधेपणा व अतिशायन यांच्या मिश्रणाने अंतर्बाह्य बनलेली आढळतात. गानाचा ठेका व भाषेचे शब्द मिळून काव्याचे गद्यपद्य बहिःस्वरूप बनते; व शब्दांचा अर्थ आणि अतिशायनोद्भूत नवरस मिळून काव्याचे अंतःस्वरूप घडते. अक्षरे व चित्रे यांचा मिलाफ म्हणजे चित्रमय ग्रंथांचे बहिःस्वरूप; व अर्थ आणि वस्तूंचे साक्षाद्दर्शन हे त्यांचे अंतःस्वरूप. अभिनयातील हातवारे व नृत्यातील औद्धत्य हे नाटकाचे बहिःस्वरूप; व हातवाऱ्यांनी दर्शविलेले विकारविचार आणि औद्धत्यातिशायनाने दर्शविलेले नवरस हे त्याचे अंतःस्वरूप. भांडे हे स्थापत्याचे बहिःस्वरूप; आणि नवरसांचा मूर्त उठाव हे अंतःस्वरूप. ह्या चार मिश्र कलांची अत्यंत शुद्ध रूपे म्हटली म्हणजे ही. इतर नाना कलांचे मिश्रण होऊन ह्या मूळच्या शुद्ध मिश्र कला अनेकधा मिश्र झालेल्या प्रायः पहाण्यात येतात. उदाहरणार्थ नाटक. ह्यात गद्य, पद्य, काव्य, वाद्य, चित्र, मूर्ती इत्यादि अनेक मिश्रणे झालेली आहेत. दुसरे उदाहरण स्थापत्याचे. स्वतः फक्त एकट्या भांड्याच्या मूर्तीने नवरसांचे प्रदर्शन करणे हे स्थापत्याचे मूळ कार्य. त्यात भिंतीवरील चित्रे, नक्षी, अक्षरे, अर्धमूर्ती, पूर्णमूर्ती, लेप, रांगोळ्या इत्यादींचे मिश्रण झालेले प्रायः आढळते. असो. या बाराहि कलांत मनुष्याच्या कर्तृत्वाचे प्राधान्य विशेष असते. वाद्यादी ज्या चार विचारविकारप्रदर्शनाच्या कला राहिल्या त्यात मनुष्याधीन साधनापेक्षा बाह्य वस्तूंचे साधनाधिक्य जास्त सापडते. बाब स्पष्ट आहे, सबब ह्या वीस साधनासंबंधी प्रपंच एथेच थांबवून, मनुष्यनिर्मित दुसऱ्या एका विचित्र साधनाचे वर्णन करतो. हे साधन पूर्ण विकारमय आहे, आणि विकारमय असून आश्चर्य की अत्यन्त गूढ विचार प्रदर्शित करण्याचा हे खटाटोप करते. इतर कलांच्याप्रमाणे ह्याही कलांचा पाया तोच आहे, म्हणजे ध्वनी, रेखन, हावभाव व घनाकृतीच आहे. फक्त

पायाच्या उगमात तेवढा भेद. गानादि कलांत पायाचा उगम ज्ञात असतो, वर्णयिष्यमाण कलात नसतो. आकाशवाणी, अरण्यरुदन, पिशाचगायन, स्मशानकोलाहल वगैरे ध्वनी कित्येक मनुष्यांना कधीकधी ऐकू येतात. ते कोठून व कसे येतात ते कळत नाही. त्याने मनुष्य गांगरतो, दचकतो, हैराण होतो व कधीकधी आजारीहि पडतो. ह्या ध्वनीची बाधा दैवी समजून त्यांचा प्रतिरोध करण्याकरिता मनुष्य श्रुतध्वनीच्या सदृश किंवा विदृश ध्वनी तोडगे म्हणून निर्माण करतो. ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं, क्रां क्रीं क्रूं, फट्, वषट्, स्वाहा वगैरे असले असंख्यात ध्वनी तोंडावाटे काढून व इतर सार्थ किंवा अनर्थ संस्कृत, प्राकृत व खेडगुजरी शब्द किंवा शब्दमाला गुणगुणून मांत्रिक दैवी ध्वनीची बाधा पिटाळून लावतात. ह्या ध्वनींना मंत्र ही संज्ञा आहे व साधनाला मंत्रसाधन हे अभिधान आहे. अज्ञातोद्गम किंवा काल्पनिक ध्वनी जसे कित्येकांना ऐकू येतात तशीच आकाशनगरे, गंधर्वपुऱ्या, सूर्यमुखे वगैरे चित्रेही कित्येक मनुष्यांना आकाशात म्हणजे अवकाशात दिसतात. हीच काल्पनिक चित्रकला होय. कित्येक मनुष्यांच्या अंगात संचार होऊन ती नाना प्रकारचे वेडेविद्रे हावभाव, आळेपिळे दाखवितात व पिंगे घालतात. हेच काल्पनिक तांडव ऊर्फ नृत्य होय. आणिक कित्येक मनुष्ये भ्रांतीने पिशाच, राक्षस, खैस, वेताळ, स्वर्ग, नरक, पाताळ, देव, दानव वगैरे बनाकृती बनवितात. हेच काल्पनिक मूर्तिकरण व स्थापत्य समजावे. अज्ञानोद्भव भ्रांतिकृत ध्वनी, रेखा, हावभाव व बनाकृती ह्या काल्पनिक साधनचतुष्टयाचा जोड उपरिनिर्दिष्ट ज्ञातोद्गम विश्वसनीय वास्तविक साधनांना दिला म्हणजे जो नकाशा बनतो तो असा :

विकारविचारप्रदर्शनाची साधने

वास्तव ऊर्फ शुद्ध	भ्रांत ऊर्फ शबल
१ ध्वनि-भाषा-गान-काव्य-वाद्य	१ ध्वनि–भाषा–गान–काव्य–वाद्य
२ रेखन–अक्षर–चित्रण–चित्रमयग्रंथ-प्रकाशलेखन	२ रेखन–अक्षर–चित्रण–चित्रमयग्रंथ –प्रकाशलेखन
३ हावभाव–अभिनय–तांडव–नाटक–कळसूत्र	३ हावभाव–अभिनय–नृत्य–नाटक –वेताळसभा
४ बनाकृति–भांडी–मूर्ति–स्थापत्य –भुमिरचना	४ बनाकृति–भांडी–मूर्ति–स्थापत्य –भूमिरचना

वास्तव साधनांची उदाहरणे कोणती व भ्रांत साधनांची उदाहरणे कोणती ती खालील यादीत क्रमवार देतो–

१ वास्तव	ध्वनी :	मानुष व बाह्य सृष्टीतील पदार्थांचे
२ भ्रांत	ध्वनी :	अज्ञात उगमापासून निघालेले
३ वास्तव	भाषा :	व्यवहारात बोलतात ती

	वास्तव ऊर्फ शुद्ध		भ्रांत ऊर्फ शबल
४	भ्रांत	भाषा :	अज्ञातोद्भव ध्वनीच्या अनुकरणाने ऱ्हां ऱ्हीं ऱ्हूं इत्यादी मंत्रभाषा
५	वास्तव	गान :	स्वरोद्भव
६	भ्रांत	गान :	इुं इुं णे, गुणगुणणे, पुटपुटणे इत्यादी मंत्रगान
७	वास्तव	काव्य :	शिवाजी काव्य, नारायणवध, पोपचे इन्शियाड, मनाचे श्लोक इत्यादी
८	भ्रांत	काव्य :	मिल्टनचे पॅरेडाइज लॉस्ट, डांटीची काव्ये, कुमारसंभव इ. इ.
९	वास्तव	वाद्ये :	सनया, ढोल, इत्यादी
१०	भ्रांत	वाद्ये :	डौर (डमरू), कुडबुडे इत्यादी
११	वास्तव	रेखन :	वस्तुदर्शक रेषा
१२	भ्रांत	रेखन :	तोडग्यांच्या सरळ, वक्र व नागमोडी रेषा
१३	वास्तव	अक्षरे :	अ, क, इत्यादी
१४	भ्रांत	अक्षरे :	ओंकार, यंत्रे, स्वस्तिके वगैरे
१५	वास्तव	चित्र :	पशुपक्षी इत्यादींचे
१६	भ्रांत	चित्र :	राक्षसकिन्नरदेवदानवादींचे
१७	वास्तव	सचित्रग्रंथ :	इतिहास, सुतारकी, लोहारकी इत्यादींच्या विशदीकरणार्थ
१८	भ्रांत	सचित्रग्रंथ :	पुराणे, माहात्म्ये, इन्फर्नो इत्यादींच्या विशदीकरणार्थ
१९	वास्तव	प्रकाशलेखन :	फोटोग्राफी इत्यादी
२०	भ्रांत	प्रकाशलेखन :	आकाशात कल्पनेने नगरे वगैरे पहाणे
२१	वास्तव	हावभाव :	रोजचे अंगाचे विक्षेप
२२	भ्रांत	हावभाव :	संचाराच्या वेळचे विक्षेप
२३	वास्तव	अभिनय :	विक्षेपाचे वर्गीकरण करून शास्त्रात सांगितलेले
२४	भ्रांत	अभिनय :	वेताळ, स्मशान, खंडोबा इत्यादी संबंधक नेमके विक्षेप
२५	वास्तव	नृत्य :	प्रसिद्ध आहे
२६	भ्रांत	नृत्य :	पिंगा, अंगात येऊन नाचणे इ. इ.
२७	वास्तव	नाटक :	मनुष्यसमाजसंसारदर्शक

वास्तव ऊर्फ शुद्ध		भ्रांत ऊर्फ शबल
२८ भ्रांत	नाटक :	देवासुरपिशाचसमाजदर्शक
२९ वास्तव	कळसूत्र :	मनुष्याकृती बाहुल्यांचे
३० भ्रांत	कळसूत्र :	पिशाचाकृती बाहुल्यांचे
३१ वास्तव	घनाकृती :	पशुपक्ष्यादींच्या
३२ भ्रांत	घनाकृती :	देवादानवांच्या
३३ वास्तव	भांडी :	स्वयंपाकपात्रे, सामान्य घरे, वाडे
३४ भ्रांत	भांडी :	देववेताळ यांच्या पूजेची साधी उपकरणी, दगडाची व लाकडाची देवांची साधी छपरे, साधे तकिये, खिस्त्यांची साधीं प्रार्थना-मंदिरे, साधी थडगी, इ. इ.
३५ वास्तव	मूर्ती :	पशुपक्ष्यादींच्या
३६ भ्रांत	मूर्ती :	रामकृष्ण, सैतान, देवदूत इत्यादींच्या
३७ वास्तव	स्थापत्य :	वाडे, किल्ले, कोट, घाट इत्यादी
३८ भ्रांत	स्थापत्य :	देवळे, चर्चेस्, मशिदी इत्यादी
३९ वास्तव	भूमिरचना :	उद्याने, बागा, पदार्थसंग्रहभूमी, नगररचना
४० भ्रांत	भूमिरचना :	स्वर्ग, नरक, पाताळ, वायुलोक, चंद्रलोक इ. इ.

अज्ञातोद्भव शबल साधने केवळ भ्रांतिकृत असतात; परंतु ती भ्रांतिकृत असतात असे मनुष्य समजत मात्र नाही. वास्तव साधनांच्या व कलांच्या इतकीच किंवा त्याहूनही जास्त खरी ती आहेत असा मनुष्याचा समज असतो. गूढ आवाज वगैरे मूळ पाया. त्यावर ती कोठून आली एतद्विषयी तर्क. माहीत असणाऱ्या कोणत्याही पदार्थापासून आला नाही त्या अर्थी व कोण्यातरी प्राण्यापासून आला पाहिजे या अर्थी, उपमानप्रमाणाने प्राथमिक मनुष्याने असे ठरविले की कोण्यातरी अदृश्य प्राण्याचा हा आवाज असावा. आवाज झाडावरून, रानातून, सरोवरावरून, मेघांतून, आकाशातून वगैरे जिकडून येईल तिकडे तो अदृश्य प्राणी रहात असावा. असे नाना तर्क करून मनुष्याने भुते, यक्ष, देव, दानव, अप्सरा, गंधर्व, वेताळ, पिशाच इत्यादी गूढ प्राणी प्रथम निर्माण केले; नंतर त्यांच्या रहाण्याच्या जागा, स्थले, प्रदेश व लोक निर्माण केले, आणि शेवटी त्यांची त्यांच्या गुणानुरूप उपमानप्रमाणाने रूपे निर्माण केली. इतकेच करून मनुष्य थांबला नाही, तर हे अदृश्य प्राणी रागावले म्हणजे पूजा, प्रार्थना, नैवेद्य व बळी देऊन त्यांची मर्जी संपादण्याचे मार्ग त्याने ठरविले, ह्या मार्गानाच देवधर्म म्हणतात. सुष्ट देव, दुष्ट देव, खाष्ट देव, वरिष्ठ देव, कनिष्ठ देव, प्रेष्ठ देव, श्रेष्ठ देव आणि एकमेव एक देव असे नाना प्रकारचे देव व देवदूत व भुते व सैताने व या सर्वांच्या स्त्रिया व पोरे

असे एक नवीन जगच्या जग मनुष्याने निर्माण केले आणि ते जग खरे व मेल्यावर त्या खऱ्या जगात आपण अक्षय्य रहाण्याला जाणार, इतकेच नव्हे तर आपले हे दोन दिवसांचे साधे जग खोटे आणि खोटे नसले तर क्षणिक इत्यादी तर्कपरंपरा बांधीत बांधीत तो त्या खऱ्या परलोकावर बेसुमार आसक्त झाला. इतका आसक्त की, रोजची व्यवहारातली जी कर्मे, आयुधे, उपकरणी, चित्रे, मूर्ती, इमारती, थडगी, लग्ने, जातकरणे, पताका, ध्वज, संस्कार इत्यादी सर्वांवर त्या खऱ्या जगातील वस्तूंचा त्याने छाप मारिला. त्या खऱ्या जगाची व तेथील देवादानवांची चित्रे, स्तोत्रे, वेद, बायबले, कुराणे, त्रिपीटके, काव्ये, नाटके, तांडवे देखील मनुष्याने केली. असा मोठा गोंधळ मनुष्याने माजवून ठेविला. खरेच खरे होते त्याला त्याने खोटे ठरविले आणि निव्वळ काल्पनिक जे होते त्याला खरे ठरविले. मनुष्याने ही जी कल्पनासृष्टी बनविली तिचे उत्कट ऐतिहासिक रूप पहावयाचे असल्यास उत्तम मार्ग म्हटला म्हणजे कोणत्याही लोकांच्या देवळाकडे चला. म्हणजे मनुष्याच्या भ्रांत साधनांचा केवळ ऐतिहासिक संग्रह एका ठिकाणी केलेला तुम्हाला आयताच आढळेल. शहरातले अलीकडील शेदीडशे वर्षांतील देऊळ घेऊ नका. मुफस्सल मधील जुना विदीर्ण झालेला एखादा देऊळवाडा घ्या आणि ज्या भागात तो कालाने किंवा देऊळफोड्यांच्या हाताने छिन्नभिन्न झाला असेल ते भाग कल्पनेने एकत्र जुळवा. प्रथम जुनाट पिंपळ व वड यांचे पार लागतील. हे वृक्ष ब्राह्मण आहेत व ह्यांच्यावर ब्रह्म-राक्षस रहातात. भ्रांतदृष्ट्या ब्रह्मराक्षस म्हणजे एक व्यंतरयोनी समजतात. ऐतिहासिक-दृष्ट्या ब्रह्मराक्षस म्हणजे ब्राह्मण व राक्षस यांच्यापासून झालेली एक पुरातन संकर जात समजली तर फारसे चुकणार नाही. ज्या काली देशात राक्षसांची वस्ती होती त्या कालचा हा संकर असेल. ह्या वृक्षांच्या पुढे एखादा म्हसोबा किंवा विरोबा किंवा पोटोबा लागेल. एक साधा ओबडधोबड दगड व त्याला शेंदूर फासलेला चांगली नक्षीदार मूर्त करता आली नसती असे नाही. परंतु हे म्हसोबा वगैरे देव फार साधे व ओबडधोबडच असतात. त्यांच्या ओबडधोबडपणात इतिहास आहे. पुरातनकाली हे देव ज्या लोकात अस्तित्वात आले त्यांना ह्याहून जास्त कौशल्याची मूर्तिकला माहीत नव्हती, आणि माहीत असली तत्रापि स्वयंभू ओबडधोबड मूर्तीपुढे कृत्रिम सुंदर मूर्तीची किंमत त्यांना वाटत नव्हती. थोडे पुढे गेलात म्हणजे एका बाजूला वेताळसभा लागेल. हा वैशिष्ट्याने महारलोकांचा म्हणजे नागलोकातील एका कनिष्ठ जातीचा देव आहे. दुसऱ्या बाजूला दगडाच्या एका देवळीत एक दगडी दिवा जळताना आढळेल. ही दगडी देवळी पितरांची आहे आणि दिवा रात्रंदिवस त्यांना उजेड दाखविण्याकरिता पाजळत आहे. दहा पाच हातांवर गावातील दोन चार सतींची देवळे लागतील. त्यावर दांपत्य कोरलेले असते. नंतर मारुतीच्या देवळापाशी याल. वैदिककालीन मरुत् म्हणजेच पौराणिककालीन मारुती. मरुत्, मारुतः, मारुतिः अशी तिसरी पिढी आहे. मारुती हा पांथस्थांचा संरक्षक. ह्यांच्यापुढे देवडी व त्यावरील गोपूर भेटेल. गोपुरात पूर्वी देऊळवाड्याच्या

गाई बांधीत असत. सध्या तेथे वाजंत्र्यांचा ताफा रहातो. गोपुर पूर्वाभिमुख असून त्यातून प्राकारान्तः प्रदेशात जाण्याचा रस्ता आहे. प्राकार दोन अडीच पुरुष उंच असून त्यांच्या विटा हातहात लांब आहेत. प्राकार दुमजली आहे. खालच्या मजल्यात चौफेर वोवऱ्या केल्या आहेत व वरच्या उघड्या मजल्यावरून शत्रूवर तिरंदाजी किंवा गोळीबार करण्याकरिता तटात छिद्रे ठेविली आहेत. देऊळ एकप्रकारचा किल्लाच आहे. प्राकार दोन हजार वर्षांपूर्वीच्या शकयवनांच्या धाडी परतविण्याकरिता तटांच्या धर्तीवर बांधलेला आहे. आत गेलात म्हणजे मध्ये एक दोन मुख्य देवळे व भोवताली उपदेवालये दिसतील आणि त्यांच्यापुढे दहा पाच उभ्या काठ्या आढळतील. एक काठी इंद्रध्वज आहे, दुसरी गरुडध्वज आहे, तिसरी सिंहध्वज आहे आणि चवथी रामदासी भगवा झेंडा आहे. साऱ्या ध्वजा ऐतिहासिक आहेत. इंद्रापासून समर्थांपर्यंत साऱ्यांचे ते ध्वज आहेत. भगवा झेंडाही इंद्रध्वजच आहे. ध्वजदंड या शब्दाचा मराठी अपभ्रंश ध्वजदंडः = झअअंडा = झेंडा. आणि भगवान् जो इंद्र त्याचा अपभ्रंश भगवा. भगवद्ध्वजदंडः = भगवा झेंडा. पाचवी काठी पेशव्यांच्या जरीपटक्याची आहे. जरीपटका म्हणजे पुनः इंद्रध्वजच. इंद्राच्या ध्वजाला जर्झरं म्हणून संस्कृत नाव असे. पटक म्हणजे कापडाचा तुकडा. जर्झरीकपटकः = जरीपटका. जरीपटका म्हणजे इंद्राचे निशाण. पेशव्यांनी ते नवीन शोधून काढिलेले नाही. वैदिक कालापासूनचे ते जुनेच आहे. मध्ये मुसलमानी धाडीत देवळातून लपून राहिले होते ते छत्रपतींनी व पेशव्यांनी सैन्यात पुनः प्रचलित केले इतकेच. ह्या ऐतिहासिक काठ्यांच्या शेजारी अत्यंत जीर्ण झालेले व पावसापाण्याने झडलेले दहा पाच दगड तुमच्या सूक्ष्म नजरेखाली येतील. दगड पुरुषपुरुष किंवा अर्धा पुरुष उंच व हात पाऊण हात रुंद आहेत व त्यावर तीन चार मजली अर्धमूर्ती कोरलेल्या आहेत. कोरकाम ओबडधोबडच आहे, परंतु म्हसोबा, विरोबांच्याहून जास्त कुसरीचे आहे. एका मजल्यात शिवलिंग व स्त्रीपुरुष उपासक कोरलेले आहेत. दुसऱ्या मजल्यात भालेवाले घोडेस्वार कोरलेले आहेत. तिसऱ्या मजल्यात मोठमोठ्या ढुंगणाच्या नितंबिनी व कुंभस्तनी महाराष्ट्रवधूटिका कोरलेल्या आहेत. ह्या अर्धमूर्ती दगडांना कांदळ किंवा कांदळाचे दगड म्हणतात. महाराष्ट्रात असे एक गाव नाही की जेथील देवळाबाहेर, शेजारी किंवा आत हे कांदळ सापडणार नाहीत. हे कांदळ केव्हाचे ? ज्या काली पर्वतात व गुहांत व दऱ्यात लेणी कोरण्याचे वारे महाराष्ट्रात शिरले तेव्हाचे. कांदळ हा शब्द कांदर या शब्दाचा अपभ्रंश. ' कंदरस्य इदं कांदरं. ' कंदर म्हणजे पर्वतातील कोरीव लेणे. हा कंदर शब्द वाल्मीकि-रामायणात येतो. कंदरपूजा ऊर्फ लिंगपूजा महाराष्ट्रात फार जुनी आहे. बौद्धांपासून लिंगपूजकाचे संरक्षण करणारे भालेवाले कंदरांवर कोरलेले आहेत. बहुशः बौद्धांचा पराजय व लिंगपूजकांचा जय सुचविलेला असावा. ज्या अर्थी प्रत्येक खेड्यात कंदर सापडतात त्या अर्थी एका काली बौद्धांची व शैवांची मोठी दंगल महाराष्ट्रात होऊन गेली असावी असा तर्क होतो. कांदळांपैकी काही दगड अती जुने व काही अनु-

करणाने केलेले बरेच म्हणजे फक्त पाच-सातशे वर्षांपलीकडील अर्वाचीन असे दोन प्रकारचे असतात. ह्या कांदळाशेजारी किंचित् अंतरावर वीर असतात. असुर, राक्षस, शक, यवन व मुसलमान यांच्यापासून शौर्याने गावाचे संरक्षण करण्यात देह ज्यांनी खर्चिला त्यांचे पुतळे देवळाच्या आवारात बहुमानाने मांडून ठेवण्याची चाल महाराष्ट्रात असे. मूर्ती ग्राम्य कारागिरीच्या असतात व काहीच्या खाली लेखही कोरलेला असतो.

मध्यवर्ती देवालय प्रायः शिवाचे किंवा विष्णूचे व कधी कधी दोहोंची दोन देवळे असतात. कित्येक देवळे चालुक्यकालीन, कित्येक राष्ट्रकूटकालीन, कित्येक यादवकालीन व क्वचित् एखादे मुसलमानकालीन असते. यादवकालीन व मुसलमानकालीन देवळे साध्या हेमाडपंती घाटाची प्रसिद्ध आहेत. चालुक्यकालीन देवळे फार कलाकुसरीची व कारागिरीची असतात. प्रथम गरुड किंवा नंदी लागतो. नंतर सभामंडप सुरू होतो आणि गाभाऱ्याच्या प्रारंभाला जयविजयांची परवानगी मागावी लागते. ती मागताना गणराजांची व त्यांचे बंधू स्कंदराज यांची प्रार्थना केल्यावर उंबरठ्याखालील कीर्तिमुखाला पायाखाली चिरडून आत प्रवेश जो करावा तो गर्भागाराची अपूर्व शोभा डोळ्यांत भरते. इथे प्रेक्षकांचे चिमुकले मन भांबावून जाते. पहावे तरी काय काय ? आधी कोणते पहावे आणि मागून कोणते पहावे ? प्रथम गर्भागार पहावा की सभामंडप पहावा की प्राकारचित्रे पहावी याचा निश्चय होत नाही. कोठे इंद्रसभा व दशावतार यांची रंगीत चित्रे काढिलेली आहेत, कोठे देवयोनी व गणदेवता यांच्या अर्धमूर्ती कोरिल्या आहेत, कोठे यक्षकिन्नरराक्षस यांच्या प्रतिमा घडलेल्या आहेत, कोठे तत्कालीन राजांच्या सभा चितारल्या आहेत. हे सर्व नीट व साद्यंत व सार्थ पहावयाला महिना पुरणार नाही. नुसती उपकरणीच घेतली तर तो अटनीवरचा शंख, सर्पाकृति पळी, कमलाकृती अभिषेकपात्र, मच्छाकृती धुपाटणे वगैरे वस्तूंतही इतिहास भरलेला सापडतो. देवळांतून प्राकारांगणात येऊन खुद्द देवालयाचा पायापासून शिखरापर्यंतचा घाट पहावा तर तोही किती आश्चर्यकारक ! त्या मेहरपा, त्या जाळ्या, त्या मूर्ती, ते कोण, तो आकाशदिवा, सर्वच कांही विचित्र ! अंगणात नागशिला पडली आहे ती नागलोकांची स्मृती करून देते. पश्चिम देहलीने प्राकाराच्या बाहेर पडले म्हणजे अगदी नदीच्या पाण्यापर्यंत उतरलेला अर्धचंद्राकृती घाट लागतो. तेथे जलदेवतेचे देवालय आहे, संन्याशांच्या समाधी आहेत, चबुत्रे आहेत, सोडूनच शंभर हातांवर एक मशीद आहे, दुसऱ्या बाजूस मातीचा एक ढिगारा दिसतो तो कदाचित् बौद्ध स्तूप असेल, पांच-चार मैलांवर डोंगरांची रांग दिसते तीत पांडवलेणी आहेत, दरम्यानच्या अंतरात ख्रिस्त्यांनी अलीकडे तीन-चारशे वर्षांत नवीनच उभारलेले एक क्याथोलिक चर्च आहे, आणि त्याच्याच जोडीला समाजिस्टांचे दहावीस वर्षांतले एक लहानसे साधे प्रार्थनामंदिर आहे.

१४. लोकभ्रम शैशवावस्थादर्शक

ह्या सर्व देखाव्याचा अर्थ काय ? गेल्या तीन हजार वर्षांतील महाराष्ट्रांतल्या लोकांच्या शबल, काल्पनिक, व अस्ताव्यस्त साधनांचे, कलांचे व मतांचे हे मूर्त प्रदर्शन आहे. ह्याचा अर्थ तीन तऱ्हांनी करता येतो. केवल श्रद्धाळू जे आहेत त्यांना स्वर्गनरक ऊर्फ परलोक यातील देवादींच्या कृती या देखाव्यात दिसतात व त्या खऱ्याहून खऱ्या ते मानतात. केवळ कलेचे व शिल्पाचे जे चुंचू आहेत ते मूर्तीचे डौल, इमारतीचा घाट, चित्रांचा उठाव, रंगाची भरदारी व कल्पनेची भरारी वर्णन करण्यात दंग होतात आणि असले शिल्प आता लोपले म्हणून शोक करतात. इतिहासाचे जे अभ्यासी आहेत त्यांना ह्या देखाव्यात वरील दोघांच्याहून निराळा अर्थ दिसतो. सोंडेचा गणपती, पंखाचे देवदूत, चोचीचा गरूड, शेषशायी नारायण, चतुर्मुख ब्रह्मदेव, दशमुख रावण, घोडमुखे किन्नर, उर्ध्वशिख नारद, डोक्याच्यावर असलेला स्वर्ग व पायाच्या खाली असलेले पाताळ, हे सर्व भ्रांत कल्पनेचे खेळ आहेत, हे सर्वथैव खोटे आहेत, आणि शुद्ध शास्त्रज्ञान जसजसे वाढत जाईल तसतसा ह्याचा लोप कालान्तराने झालाच पाहिजे हे इतिहासज्ञ जाणतो आणि लोपत जाणाऱ्या भ्रांत शिल्पाबद्दल हळहळत बसत नाही. उलटे, लोप अत्यंत मंदतम गतीने होत आहे ह्याचे त्याला दुःख होते. स्थूल मूर्तीवरचा, चित्रावरचा व वृक्षपशुपक्ष्यादींच्या प्रतिमांवरचा तरी भ्रांत विश्वास अद्याप लुप्त कोठे झालेला आहे ? आणि यद्यपि कोठे कोठे क्वचित् क्वचित् झाला, तत्रापि स्वर्ग, नरक, देव, देवदूत, जिहोव्हा, God, अल्ला, ह्या अमूर्त भ्रांत कल्पना अद्याप सर्वत्र विराजमान आहेतच. फक्त अद्वैत वेदान्ती म्हणून ज्यांना म्हणतात त्यांच्यातून व भौतिकशास्त्रज्ञ म्हणून ज्यांना म्हणतात त्यांच्यातून काहींच्या ठाई ह्या कल्पना नष्ट झालेल्या आहेत. परंतु ह्या थोड्या काहींची संख्या पृथ्वीवरील एकंदर लोकसंख्येचा कितवा लक्षांश आहे ? अद्याप जग, बाल्यावस्थेत कसले, शैशवावस्थेतच आहे.

१५ देवकल्पनेचे मूळ भ्रम

मनुष्यमात्राच्या ह्या दीर्घकालीन म्हणजे लाखो वर्षांच्या शैशवावस्थेचा मंद इतिहास विचारविकारप्रदर्शनाच्या वरील शुद्ध व शबल चाळीस साधनांच्या स्थितीवरून अल्पस्वल्प अनुमानता येतो ह्या इतिहासावरून असे दिसते की ईश्वर, आत्मा, परमात्मा, काल, दिक्, कारण इत्यादी शुद्ध किंवा शबल कल्पना स्वयंभू नसून मनुष्याने शुद्ध भ्रांत अनुमानाने बनविलेल्या आहेत. अनुभवाच्या अन्वयव्यतिरेकाने शुद्धाचे काही कण मनुष्याला गावले आहेत, बाकी सर्व साम्राज्य येथून तेथून शबलाचे आहे. शबलातून शुद्धाकडे गती होत आहे. त्यातल्यात्यात समाधान. चमत्कार असा की उत्क्रांतीकडे म्हणजे इतिहासाकडे अवर्णनीय दुर्लक्ष्य असलेले दिसते. नीतिकल्पना, ईश्वरकल्पना, कार्यकारणभावकल्पना, दिक्कल्पना, कालकल्पना ह्या सर्व कल्पना लाखो वर्षांच्या

उत्क्रांतीने बनत आलेल्या आहेत हे बहुतेक कोणताच तत्त्वज्ञ लक्षात घेत नाही. जो उठतो तो स्वयंभूत्वाकडे म्हणजे ईश्वरदत्तत्वाकडे ऊर्फ उपजतस्वभावाकडे धाव घेतो. जणू काय आज ह्या घटकेला माणूस आकाशातून अचानक भूमितलावर पडला! जणू काय त्याच्या पाठीमागे लाखो वर्षांचा इतिहास नाहीच! लाखो वर्षांच्या उत्क्रांतीने बनलेल्या एका कल्पनेची त्रोटक परंपरा देतो त्यावरून वरील कल्पना व त्यांचे स्वयंभूत्व ही दोन्ही किती भ्रांत्युद्भूत आहेत ते स्पष्ट होईल. अज्ञात प्रदेशातून ध्वनी ऐकू आला, माणूस दचकला, आजारी पडला, आजाराचे स्पष्ट कारण कळेना, सबब भूताची कल्पना केली. निरनिराळ्या अज्ञातोद्‌गम ध्वनींना, हावभावांना, आकाशचित्रांना, रोगांना, दुःखांना, सुखांना, जन्माला व मरणाला एक एक भूत कल्पिले. सुष्ट भुते व दुष्ट भुते निर्माण झाली. त्यांची उपासना सुरू झाली. नंतर रोगांची, सुखांची व दुःखाची खरी कारणे व तन्निवारक उपाय जसजसे कळू लागले, तसतशी सुष्ट भुतांची म्हणजे देवांची व दुष्ट भुतांची म्हणजे सैतानाची टर उडून जरूरी भासतनाशी झाली. विद्युत्पाताने मनुष्य मेला म्हणजे इंद्राने आपल्या वज्राने तो मारिला अशी भ्रांत समज असे व पटकीने माणूस मेला म्हणजे मरीदेवीने त्याला मारिले अशी भ्रांत कल्पना असे. घराला विद्युद्वाहक तार योग्य रीतीने लाविली म्हणजे विजेचे भय फारसे राहत नाही हे शास्त्रीय ज्ञान झाल्यावर, इंद्र व त्याचे वज्र ही दोन्ही भ्रांतिजन्य व काल्पनिक ठरतात व मनुष्याच्या मनातून दोघांची हकालपट्टी होते. तसेच शुद्ध हवापाणी असले म्हणजे मरीदेवीची गुमान भासत नाही. देवाची आणि देवीची जरूर कोठपर्यंत, तर संकट-निवारणाचे उपाय सुचले नाहीत तोपर्यंत. संकटनिवारणाचे जसजसे जास्त उपाय मनुष्याला सुचतात तसतसा तेवढ्यापुरता देवाला कमीकमी त्रास द्यावयाचा, किंवा तो तो देव काढून टाकून पदभ्रष्ट करावयाचा परिपाठ मनुष्याचा आहे. अशा रीतीने अनेक देव खोटे ठरल्यावर एकच एक देव मनुष्य प्रौढीने कल्पितो व आपणास शहाण्यांचा शिरोमणी समजतो. पण हा एकमेव अद्वितीय देवहि हजारो प्रसंगी उपयोगी पडत नाही. शेवटी त्या अद्वितीयालाही भिरकाटून देऊन मनुष्य एक अद्वैतवेदान्ती तरी बनतो व ईश्वराला मायेच्या म्हणजे भ्रांतीच्या सदरात काढतो किंवा भौतिकशास्त्रज्ञ बनून कल्पित ईश्वराच्या ताब्यातून संकटे निवारण्याचे काम आस्ते आस्ते बळकावीत जातो. तात्पर्य, कार्याचे खरे कारण जेथे जेथे सापडले नाही तेथे तेथे भूत किंवा देव हे कारण अज्ञ मनुष्य कल्पीत आलेला आहे व खरे कारण सापडले म्हणजे भूतकारणाला किंवा देवकारणाला रजा देण्याची त्याची वहिवाट आहे. तात्पर्य, देव ही कल्पना कृत्रिम आहे, स्वयंभू नाही.

१६. विकार-विचार प्रदर्शक ४० साधने व इतिहास

असो. वीस शुद्ध व वीस शबल मिळून चाळीस साधने विकारविचारप्रदर्शनाची

वर्णिली. ह्या चाळीस साधनांच्या साहाय्याने कोणत्याही देशाचा व तेथील भूत व वर्तमान लोकांचा इतिहास जाणावयाचा असतो. आपल्या महाराष्ट्राचा व ह्या भूमीतील भूत व वर्तमान लोकांचा इतिहास याच साधनांच्या साहाय्याने लिहिला जावयाचा आहे. अलीकडील पन्नास वर्षांत या चाळीस साधनातून फक्त अक्षरसाधने जी कागदपत्रे व ग्रंथ त्याकडे आपले विशेष लक्ष्य वेधून गेले. अल्पद्रव्यात अल्पश्रमाने याच साधनांची सहजोपलब्धी प्रथम होणे शक्य होते. तेव्हा झाले तें ठीकच झाले. परंतु या एका अक्षरसाधनाच्या उपलब्धीने सर्वच कार्यभाग आटपत नाही. अक्षर हे विचाराचे एक साधन आहे. अक्षराव्यतिरिक्त आणीक एकोणचाळीस साधने राहिली त्यांची वाट काय? अक्षराने सर्वच विचार प्रगट होतात असे नाही. अक्षराला साध्य नाहीत असे शुद्ध व शबल विचार, गान, चित्र, मूर्ती, स्थापत्य साधतात. तेव्हा ह्याही साधनांचा यथायोग्य समाचार आपण घेतला पाहिजे. अक्षरसाधनसंशोधनाहून हे संशोधन द्रव्यदृष्ट्या सापेक्षतः किंचित् जड आहे. तत्रापि जड असो वा हलके असो, या संशोधनाविना महाराष्ट्रेतिहासाचे चित्र फारच फार कोते राहील हे काही नाकबूल करता येत नाही. शिवाय अक्षरसाधन सर्व काळी सारखेच उपलब्ध असते असे नाही, पाच चारशे वर्षे सोडली म्हणजे कागदपत्रांचे सहाय्य बंद होते. फक्त ग्रंथ राहतात. त्यांना पुष्टी मूर्ती, चित्रे, स्थापत्य यांची द्यावी लागते. कित्येक कालाचा इतिहास तर अल्पस्वल्प अवशेषांवरून तर्काने अनुमानावयाचा असतो. अशा अडचणी आहेत. त्या टाळण्यास उपरिनिर्दिष्ट चाळीसही साधनांचे सहाय्य आवश्यक असल्यामुळे त्यांच्यासंबंधाने वरील सोळा कलमात किंचित् प्रपंच करणे अगत्याचे भासले.

❖

V. V. Bhagwat

आमची प्रकाशने

आगामी प्रकाशने

भांडवल : भाग ३ रा
मूळ लेखक : कार्ल मार्क्स
अनुवाद : कॉ. व. ह. तुळपुळे

सागराचा जन्म
अनुवाद : शांता रानडे

निसर्गाचा द्वंद्वात्मक विकास
मूळ लेखक : फ्रेडरिक एंगल्स
अनुवाद :

कॉ. व. ह. तुळपुळे यांनी अनुवाद केलेले इतर ग्रंथ

शासनसंस्था आणि क्रांती ००–४०
लेखक : कॉ. लेनिन
(आवृत्ती २ री)

साम्राज्यशाही २–००
लेखक : कॉ. लेनिन

डावा कम्युनिझम एक बालरोग १–००
लेखक : कॉ. लेनिन
(आवृत्ती २ री)

कार्ल मार्क्सचे सिद्धान्त १–००
लेखक : कॉ. लेनिन
(आवृत्ती २ री)

गोथा कार्यक्रमावरील टीका ००–५०
लेखक : कार्ल मार्क्स

" भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास " या ग्रंथांतील सामग्री वाचून माझी खात्री झाली की कम्युनिस्ट तत्त्वज्ञान प्रस्थापक कार्ल मार्क्स व त्यांचे सहकारी एंगल्स यांनी " कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता व शासनसंस्था " हा जो ग्रंथ लिहिला त्याला संपूर्ण पूरक असा खात्रीलायक पुरावा भारतीय शास्त्रांतून व इतिहासातून राजवाड्यांच्या ग्रंथामुळे मिळू शकेल.

सध्या आपली घटना व समाजधारणा सेक्युलर म्हणजे धर्मनिरपेक्ष आहे असे जाहीर झाले आहे; पण हा केवळ जाहीरनामा आहे सत्यनामा नाही. तो सत्य करावयाचा असेल तर सर्व शाळा-कॉलेजांतून विशेषत: सर्व मंत्रिमंडळे, विद्वान, शिक्षक आणि नोकरवर्ग यांना " विकार आणि विचार प्रदर्शनांच्या साधनांची उत्क्रांती " या लेखाचे वाचन व मनन सक्तीचे करावे असे मला वाटते.

—कॉ. एस्. ए. डांगे